# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ४.१, ४.२, ४.३, ४.४, ६.१, ६.४ व ६.५), सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.२ व ६.३), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.६) आणि नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.७) यावरील**

# छप्पन्नावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक        जून/जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई/नागपूर**
**जून/जुलै, २०१९**

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या**
**महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित**
**(परिच्छेद क्रमांक ४.१, ४.२, ४.३, ४.४, ६.१, ६.४ व ६.५), सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.२ व ६.३), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.६) आणि नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ६.७) यावरील**

# छप्पन्नावा अहवाल

**लोकलेखा समिती**

**२०१७-२०१८**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

* (१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

** (१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

**** (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

***** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

****** (२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**निमंत्रित :**

******* (२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.).

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. सुरेश उर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

*** **श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

****** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

******* **श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

******** **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा छपन्नावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ११ व २७ डिसेंबर, २०१८ आणि दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग, दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी प्रधान सचिव, सहकार वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग, दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग आणि प्रधान सचिव, नगरविकास विभाग व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई व महालेखाकार लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “ब” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १३ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत महसूल व वन (महसूल), सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार), गृह (राज्य उत्पादन शुल्क) व नगरविकास विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक १३ जून २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** ... ... ... ... ... | (पाच) |
| (१) | **महसूल व वन (महसूल) विभाग** ... ... ... ... | १ |
| | (परिच्छेद क्र. ४.१) | |
| | (परिच्छेद क्र. ४.२) | |
| | (परिच्छेद क्र. ४.३) | |
| | (परिच्छेद क्र. ४.४) | |
| | (परिच्छेद क्र. ६.१) | |
| (२) | **सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग** ... ... ... | ७२ |
| | (परिच्छेद क्र. ६.२) | |
| | (परिच्छेद क्र. ६.३) | |
| (३) | **महसूल व वन (महसूल) विभाग** ... ... ... | ९७ |
| | (परिच्छेद क्र. ६.४) | |
| | (परिच्छेद क्र. ६.५) | |
| (४) | **गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग** ... ... ... | ११५ |
| | (परिच्छेद क्र. ६.६) | |
| (५) | **नगरविकास विभाग** ... ... ... | १२० |
| | (परिच्छेद क्र. ६.७) | |

महसुल व वन (महसुल) विभाग

७.१ ज्ञापन :-

~~क्र. लोलेस- ३८१७/प्र.क्र.३५७/ज-५अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,~~

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल

| परिच्छेद क्र व तपशिल | शासनाचे अभिप्राय |
| --- | --- |
| क्र ४.३.१ **भाडेपटटा कमी आकारणी :-**<br>शासन निर्णय (GR) (जून १९९२) नूसार भाडेपट्टा वाटपनूतनीकरण/ आदेशाच्या तारखेच्या पाच वर्षाआधीच्या १ जानेवारीला असलेल्या बाजारमूल्याच्या ५० टक्क्यावर विहीत दराने भाडेपट्टा आकारावयास पाहिजे. GR (मे १९८४) नूसार भाडेपटटयाचे निहीत दर ८ टक्के आहे.<br>लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की सप्टेंबर १९९१ मध्ये ७,९०० चौ.मी. जमिन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी देण्यात आली. बाजार मूल्याच्या आधारावर वार्षिक भाडेपट्टा रू. ५०६ ठरविण्यात आले. भाडेपट्टा सप्टेंबर २००६ मध्ये संपुष्टात आला आणि शासनाने त्यांच्या आदेशानूसार (जुलै २०१४) भाडेपटटा आणखी ३० वर्षासाठी वाढविला. शासनाने अशा देखिल सूचना केल्या की भाडेपटटा संपुष्टात येण्याच्या भाडेपट्टा जून १९९२ च्या GR मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वसूल करावयास पाहिजे.<br>GR नूसार वार्षिक भाडेपट्टा रू.५.९३ लाख काढण्यात आले, म्हणजेच २००६-०७ ते २०१५-१६ या १० वर्षासाठी एकूण भाडेपट्टा रू.५९.३४ लाख होते. परंतु विभागाने रू. १/- प्रति वर्ष या चुकीच्या दराने ३० वर्षासाठी रू.३० वसूल केले. यामुळे रू.५९.३४ लाख भाडेपटटयाची कमी आकारणी झाली.<br>याशिवाय, जर हि चूक सुधारण्यात आली नाही तर चुकीचे भाडेपट्टा आकारल्यामुळे पुढील वर्षातही भाडेपटटयाची कमी वसूली होईल.<br>हे निदर्शनास आणल्यावर विभागाने पटटेदाराला नोटीस जारी केली. या प्रकरणी पुढील अहवाल पाठविण्यात आला नाही. | प्रस्तुत प्रकरणी शासन ज्ञापन दिनांक: ७/७/२०१४ अन्वये मौजे कदमवाडी ता. करवीर जि. कोल्हापूर येथील रि.स.नं. २१५ (सिसनं. ५०५) येथील क्षेत्र ०.७९ आर या शासन ज्ञापन दिनांक: २/९/१९९१ नुसार भारती विदयापीठास क्रीडांगणासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जागेच्या भाडेपट्टयास. सदर क्षेत्र म.न.पा.क्षेत्रात असल्यामुळे शासन निर्णय दिनांक: ३०/६/१९९२ नुसार भाडेपट्टा संपुष्टात आल्यापासून भाडेपट्टयाच्या पुढील कालावधीसाठी सदर शासन निर्णयातील नमूद दरानुसार वार्षिक भाडे आकारुन पुढील ३० वर्षासाठी भाडेपट्टयास मुदतवाढ देण्यात आली आहे.<br>शासन निर्णय दिनांक: ३०/६/१९९२ मध्ये म.न.पा. हददीतील क्षेत्रासाठी जमीन मंजूरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमूल्याच्या ५०% भोगाधिकार मूल्य वसूल करणेबाबत नमूद केले आहे. सदर प्रकरणी क्रीडांगणाच्या भाडेपट्टयाची मुदत २००६ साली संपली असल्याने सन २००६ च्या ५ वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी म्हणजेच १ जानेवारी २००१ रोजी अस्तित्वात असलेले बाजारमुल्य विचारात घेवून वार्षिक भाडेपट्टयाचा दर ठरवून त्याप्रमाणे वसुली करणे आवश्यक आहे, असे मत आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात येत आहे. |

Desk Officer,
Revenue and Forest Department
Mantralaya, Mumbai - 400 032

BSE 377-2

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक व विषय | |
|---|---|---|
| १ | ४.३.२<br>**अनर्जित उत्तपन्नची कमी आकारणी**<br>"महसूल व वन विभागाच्या (R&FD) सप्टेंबर १९८३ च्या शासन निर्णयामध्यें असे विनिर्दिष्ट आहे की वर्ग-II म्हणून जमीन धारण करणाऱ्या भूधारकास शासकीय जमीन विकण्याची परवानगी बाजार मूल्याच्या ५० टक्के रक्कम निव्वळ अनर्जित उत्पन्न अदा केल्यानंतरच मिळू शकेल.<br>GOM ने १६,००० चौ.मी जमीन हस्तांतरित करण्याची परवानगी दिली (जून २००८) ही जमीन पवई, मुंबई रायगड शिक्षण संस्थेस(ट्रस्ट) आश्रम शाळेसाठी महसूल मुक्त पध्दतीने देण्यात आली (जूलै १९९५) या ट्रस्ट ने ही जमीन दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित केली. R&FD ने जिल्हाधिकारी यांना अनर्जित उत्पन्न बाजार मूल्याच्या ५० टक्क्यांऐवजी १० टक्के दराने निव्वळ अनर्जित उत्पन्न म्हणून वसूल करावयाचे निर्देश दिले. दस्तावेजानुसार निव्वळ अनर्जित उत्पन्न रु.३२ लाख होते. परंतू विभागाने फक्त रु.६.४० लाख वसूल केले. यामुळे रु.२५.६० लाख अनर्जित उत्पन्नाची कमी आकारणी झाली.<br>हे निदर्शनास आणल्यावर, जिल्हाधिकाकरी, रायगड यांनी कमी आकारणी मान्य केली (सप्टेंबर २०१६) आणि वसूली करण्यात येईल असे नमूद केले." | मौजे वरप, ता.पेण जि.रायगड येथील स.नं.११३ पैकी ४ एकर या जमिनीवरील परिवर्तन ८४ पेण संचालित अनुदानित आदिवासी आश्रमशाळा रानपाखरे ही आश्रमशाळा पवार पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई या संस्थेकडे आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २८.०९.२००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये हस्तांतरण झालेले आहे. शासन ज्ञापन दिनांक ०७.०६.२००८ अन्वये तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक २६.०६.२००८ च्या आदेशान्वये उक्त जमीन हस्तांतरणास मंजूरी दिलेली आहे. शासन ज्ञापन दिनांक ०७.०६.२००८ अन्वये जमिनीच्या किमतीच्या १० टक्के रक्कम अनर्जित रक्कम म्हणून शासनपरिपत्र दिनांक ०१.०२.१९८३ व शासन निर्णय दिनांक ११.०५.१९८४ मधील अटी व शर्तीस अधीन राहून सदरची मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. शासनाने याबाबत कोणतेही नवीन धोरण ठरविलेले नसल्याने यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार १० टक्के इतकी अनर्जित रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. मात्र भविष्यात विषयांकित प्रकरणी शासनाने नवीन धोरण ठरविल्यास त्यानुसार सदर संस्थेकडून होणारी अनर्जित रक्कम वसूल करण्याबाबतची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. |

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक व विषय | वर्ष | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | परिच्छेद क्रमांक ४.३.३<br>**भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे.**<br>नोंदणी अधिनियम १९०८ च्या नियम १७(१)(d) मध्ये स्थावर मालमत्तेच्या भाडेपटयाची प्रत्येक वर्षी अथवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनिवार्यरित्या नोंदणी करण्याचे प्रावधान आहे. तसेच R&FD च्या ३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयामध्ये प्रावधान आहे की. अशा सर्व प्रकरणात ज्यात शासकीय जमीन एखादया संस्था स्थानिक संस्था अथवा व्यक्तीस भोगवटाधिकार किंवा भाडेपट्टयावर देण्यात येते त्या वेळी ज्याला जमीन देण्यात येत आहे त्याचे सोबत एक करार निष्पादित करुन त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारुन त्याची महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणी करावयास पाहिजे. जेणे करुन शासन खाती महसूल जमा होईल. त्यात असे सुध्दा सूचित केले आहे की, करार निष्पादित होऊन त्याची नोंदणी होईपर्यंत जमिनीचा ताबा द्यावयास नको.<br>लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले (फेब्रुवारी मे २०१६) की चार जिल्हाधिकारी कार्यालयातील (कोल्हापूर, रायगड, सोलापूर, आणि ठाणे) आठ प्रकरणात मे २००७ ते जुलै २०११ दरम्यान विविध शिक्षण सोसायटी संस्थाना जमीन देण्यात आली. ही जमीन भोगवटा तत्त्वावर आणि भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आली. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ च्या अनुक्रमे अनुच्छेद २५ आणि ३६ अनुसार याची नोंदणी करावयास पाहिजे होती. तथापि, लेखापरिक्षेला असे आढळले की संबंधित पार्टीमध्ये भाडेपट्टा करार जमिनीचा ताबा दिल्यानंतरही निष्पादित करण्यात आला नाही . कराराशिवाय शासकीय जमीनीस भाडेपट्टयाने देणे अधिनियमाच्या प्रावधनाच्या अनुरुप नव्हते. यामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी च्या स्वरुपात मिळणारा रु. १४.७५ लाखाचा महसूलही मिळू शकला नाही. हे निदर्शनास आणल्यावर विभागाने नमूद केले (एप्रिल- मे २०१६) की लेखापरिक्षेने सांगितल्याप्रमाणे दस्तावेजाच्या नोंदणीसाठी कारवाई करण्यात येईल. | २०१५-२०१६ | या कार्यासनामार्फत ठाणे जिल्ह्यातील जमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदात ठाणे जिल्ह्यातील खालील मिळकतींबाबत जिल्हाधिकारी व वाटपग्रही यांच्यामध्ये करारनाम्याचा दस्तऐवज निष्पादित न झाल्याने मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या रुपाने मिळणारा महसूल मिळू शकला नाही, असा आक्षेप नोंदविला आहे :-<br>(१) मौजे कावेसर, ता.ठाणे येथील समन्वय प्रतिष्ठान<br>(२) मौजे ठाणे, ता.ठाणे येथील महाराष्ट्र कोळी समाज<br>(३) मौजे काटेमानिवली, ता.कल्याण येथील स्वामी समर्थ शिक्षण संस्था<br>(४) मौजे राहनाळ, ता.भिवंडी येथील साई सेवा शिक्षण मंडळ<br>(५) मौजे उल्हाननगर, ता.उल्हासनगर येथीस छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था<br>वरील वाटपग्रही संस्थापैकी मौजे ठाणे, ता.ठाणे येथील महाराष्ट्र कोळी समाज यांना प्रदान करण्यात जमिनीबाबत दिनांक ०४/१०/२०१७ रोजी करारनामा निष्पादित करण्यात आला असून त्यानुषंगाने मुद्रांक शुल्क (रु.३,०८,०००/-) व नोंदणी फी (रु.३०,०००/-) शासन जमा करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित चार वाटपग्रही संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या जमिनीबाबत शासन परिपत्रक दिनांक ३१/१०/२००६ मधील तरतूदीअन्वये करारनामा निष्पादित करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी संबंधित तहसिलदार यांना दिनांक १५/१२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे. जेणेकरुन प्रस्तुत प्रकरणी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी शासनास मिळू शकेल. |

BSE¤E0 377-2+

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०२ | **४.३.३**<br>**भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे.**<br><br>नोंदणी अधिनियम १९०८ च्या नियम १७(१)(d)मध्ये स्थावर मालमत्तेच्या भाडेपट्याची प्रत्येक वर्षी अथवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनिवार्यरित्या नोंदणी करण्याचे प्रावधान आहे. तसेच R&FD च्या ३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयामध्ये प्रावधान आहे की, अशा सर्व प्रकरणात ज्यात शासकीय जमीन एखादया संस्था स्थानिक संस्था अथवा व्यक्तीस भोगवटाधिकार किंवा भाडेपट्टयावर देण्यात येते त्या वेळी ज्याला जमीन देण्यात येत आहे त्याचे सोबत एक करार निष्पादित करुन त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारुन त्याची महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणी करावयास पाहिजे. जेणे करुन शासन खाती महसूल जमा होईल. त्यात असे सुध्दा सूचित केले आहे की, करार निष्पादित होऊन त्याची नोंदणी होईपर्यंत जमिनीचा ताबा दयावयास नको.<br>लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले (फेब्रुवारी-मे २०१६) की चार जिल्हाधिकारी कार्यालयातील (कोल्हापूर, रायगड, सोलापूर, आणि ठाणे) आठ प्रकरणात मे २००७ ते जुलै २०११ दरम्यान विविध शिक्षण सोसायटी संस्थाना जमीन देण्यात आली. ही जमीन भोगवटा तत्त्वावर आणि भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आली. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ च्या अनुक्रमे अनुच्छेद २५ आणि ३६ अनुसार याची नोंदणी करावयास पाहिजे होती. तथापि, लेखापरिक्षेला असे आढळले की संबंधित पार्टीमध्ये भाडेपट्टा करार जमिनीचा ताबा दिल्यानंतरही निष्पादित करण्यात आला नाही . कराराशिवाय शासकीय जमीनीस भाडेपट्टयाने देणे अधिनियमाच्या | या कार्यासनामार्फत पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयातील नमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदात रायगड जिल्ह्यातील खालील नमूद मिळकतींबाबत जिल्हाधिकारी व वाटपग्रही यांचेमध्ये करारनाम्याचा दस्तऐवज निष्पादित न झाल्याने मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या रुपाने मिळणारा महसूल मिळू शकला नाही, असा आक्षेप नोंदविला आहे:-<br>१. मौजे वरप, ता. पेण येथील परिवर्तन ८४ पवई मुंबई संस्था.<br>२. सुहित जीवन ट्रस्ट, पेण, ता.पेण.<br>३. अध्यक्ष कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळ, वरसगाव कोलाड, ता. रोहा.<br>४. तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट, गोवे, ता. रोहा.<br>५. प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था ,आगरवाडा, ता.म्हसळा.<br>६. सरकारी आश्रमशाळा, नेणवली, उध्दर, ता.सुधागड.<br>वरील संस्थांकडून शासन निर्णय दिनांक ३१.१०.२००६ मधील तरतूदीनुसार भाडेकरार निष्पादित करुन घेण्याबाबत फरक घेतला आहे. घेतलेल्या फरकाच्या अनुषंगाने खालील संस्थांकडून मुद्रांक शुल्क व नोंदणी व फी वसूल करण्यात आली आहे.<br>१. अध्यक्ष कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळ, वरसगाव कोलाड, ता.रोहा र.रु.३००/-(शासनजमा)<br>२. तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट, गोवे, ता. रोहा र.रु. ४९,०२०/-(शासनजमा)<br>३. प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था ,आगरवाडा ता.म्हसळा र.र.३००/-(शासनजमा)<br><br>वरील ०१ ते ०३ बाबत करारनामा निष्पादित करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.<br>४. सुहित जीवन ट्रस्ट, पेण, ता.पेण र. रु.३००/-(शासनजमा) |

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | प्रावधनाच्या अनुरुप नव्हते. यामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी च्या स्वरुपात मिळणारा रु. १४.७५ लाखाचा महसूलही मिळू शकला नाही. हे निदर्शनास आणल्यावर विभागाने नमूद केले (एप्रिल- मे २०१६) की लेखापरिक्षेने सांगितल्याप्रमाणे दस्तावेजाच्या नोंदणीसाठी कारवाई करण्यात येईल. | सुहित जीवन ट्रस्ट, पेण, ता.पेण यांचा करारनामा निष्पादित करण्यात आलेला आहे. (नोंदणी क्र.८४२/२०१८, दि.०४.०४.२०१८)<br>५. सरकारी आश्रमशाळा, नेणवली, उध्दर, ता.सुधागड :- सदर प्रकरणात विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे दिनांक. २९/०७/२०१३ च्या आदेशान्वये सरकारी आश्रमशाळा, नेणवली, उध्दर या शाळेस जमिनीचा आगाऊ ताबा देण्यात आलेला होता.<br>प्रकरणी महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग चार -ब, दिनांक ०१ जानेवारी, २०१६ अन्वये प्रसिध्द, महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) (द्वितीय सुधारणा) नियम, २०१५ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार -ब, दिनांक १५ मार्च, २०१८ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २२ अ पोट कलम (२) मधील सुधारणांनुसार जिल्हाधिकारी यांना प्राप्त अधिकारानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ३१/०५/२०१८ अन्वये प्रस्तावित शासकीय जमीन "प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांचेकडे शासकीय आश्रमशाळा नेणवली करिता मौजे उध्दर, ता.सुधागड, जि. रायगड यांचे भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने हस्तांतरित करणेबाबत आदेश पारित करणेत आलेले होते.<br>परंतु, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास प्रकल्प, पेण यांनी त्यांचेकडील दिनांक ०३/१२/२०१८ च्या पत्रान्वये प्रश्नाधिन जमिन मिळकत हि आज रोजी शासकीय आश्रम शाळेकरीता आवश्यक नसल्याने, परत करत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार उक्त जमीन जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक १५.१२.२०१८ च्या आदेशान्वये शासनजमा करण्यात आली आहे.<br><br>६. (मौजे वरप, ता. पेण येथील परिवर्तन ८४ पवई मुंबई संस्था ) यांचेकडून शासन निर्णय दिनांक ३१/१०/२००६ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रतिग्रहीता यांनी मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ नुसार करारनामा दस्त निष्पादित करणेची कार्यवाही करणेत येत असून, त्यानुसार मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी वसूल करणेची कार्यवाही सुरु आहे. |

क्र. लोलेस- ३८१७/प्र.क्र.३५८/ज-५अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल

| परिच्छेद क्र व तपशिल | शासनाचे अभिप्राय |
| --- | --- |
| **परिच्छेद क्र. :४.३.३ भाडेपटटा, करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादीत न करणे**<br>नोंदणी अधिनियम, १९०८ च्या नियत १७(१)(d) मध्ये स्थावर मालमत्तेच्या भाडेपटटयाची प्रत्येक वर्षी अथवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनिवार्यरित्या नोंदणी करण्याचे प्रावधान आहे. तसेच R&FD च्या ३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयामध्ये प्रावधान आहे कि अशा सर्व प्रकरणांत ज्यात शासकीय जमिन एखाद्या संस्था, स्थानिक संस्था व्यक्तीस भोगवटाधिकार किंवा भाडेपटटयावर देण्यात येते, त्या वेळी ज्याला जमिन देण्यात येत आहे त्याचे सोबत एक करार निष्पादीत करून त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारून त्याची महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणी करावयास पाहिजे, जेणे करून शासन खाती महसूल जमा होईल. त्यात असे सुध्दा सूचित केले आहे कि करार निष्पादीत होऊन त्याची नोंदणी होई पर्यंत जमिनीचा ताबा दयावयास नको.<br>लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले (फेब्रुवारी-मे २०१६) की चार जिल्हाधिकारी कार्यालयातील (कोल्हापूर, रायगड, सोलापूर आणि ठाणे) आठ प्रकरणांत मे २००७ ते जुलै २०११ दरम्यान विविध शिक्षण सोसायटी/संस्थांना देण्यात आली. हि जमिन भोगवटा तत्वावर देण्यात आली. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुक्रमे अनुच्छेद २५ आणि ३६ अनुसार याची नोंदणी करावयास पाहिजे होती. तथापि, लेखापरिक्षेला असे आढळले कि संबधीत पार्टीमध्ये भाडेपटटा करार जमिनीचा ताबा दिल्यानंतरही निष्पादीत करण्यात आला नाही. कराराशिवाय शासकीय जमिनीस भाडेपटटावर देणे अधिनियमाच्या प्रावधानांच्या अनुरूप नव्हते. यामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी च्या स्वरूपात मिळणारा रू.१४.७६ लाखाचा महसूलही मिळू शकला नाही. हे निदर्शनास आणल्यावर विभागाने नमूद केले (एप्रिल-मे २०१६) की लेखापरिक्षेने सांगितल्याप्रमाणे दस्तावेजाच्या नोंदणीसाठी कारवाई करण्यात येईल. | परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या कोल्हापूर जिल्हयातील शैक्षणिक प्रयोजनार्थ क्रिडांगणासाठी ४ संस्थाना दिलेल्या जमिनीचा भाडेपटटा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न केलेबाबत परिच्छेद उपस्थित केला होता.<br>त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक: ३१/१०/२००६ अन्वये दिलेलया निर्देशास अनुसरुन सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने ३ संस्थांचा भाडेपटटा निष्पादनाबाबतची कार्यवाही करण्यात आलेली असून विहीत मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारण्यात आलेली आहे. त्याबाबतच्या दस्ताची प्रत सोबत जोडून सादर करीत आहे.<br>भारती विद्यापीठ, करवीर जिल्हा कोल्हापूर या संस्थेबाबत मा. महालेखाकार, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून केलेली भाडेपट्याच्या वार्षिक दराची परीगणना चुकिची असल्याचे नमुद केले आहे. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. सदर संस्थेच्या वार्षिक भाडेपट्टयाच्या रक्कमेबाबतचा निर्णय अंतीम झाल्यानंतर उक्त संस्थेशी भाडेपट्टा करार निष्पादित करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.<br>सबब सदरचा परिच्छेद स्वीकृत करण्यात यावा, ही विनंती. |

Desk Officer,
Revenue and Forest's Department
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai - 400 032

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

**परिच्छेद क्रमांक ४.३.३:- भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे**

| परिच्छेद क्रमांक व विषय | कार्यवाहीची सद्यस्थिती |
|---|---|
| ४.३.३<br>**भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे.**<br>नोंदणी अधिनियम १९०८ च्या नियम १७(१)(d)मध्ये स्थावर मालमत्तेच्या भाडेपट्याची प्रत्येक वर्षी अथवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनिवार्यरित्या नोंदणी करण्याचे प्रावधान आहे. तसेच R&FD च्या ३१ ऑक्टोबर २००६ च्या शासन निर्णयामध्ये प्रावधान आहे की, अशा सर्व प्रकरणात ज्यात शासकीय जमीन एखादया संस्था स्थानिक संस्था अथवा व्यक्तीस भोगवटाधिकार किंवा भाडेपट्ट्यावर देण्यात येते त्या वेळी ज्याला जमीन देण्यात येत आहे त्याचे सोबत एक करार निष्पादित करुन त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारुन त्याची महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणी करावयास पाहिजे. जेणे करुन शासन खाती महसूल जमा होईल. त्यात असे सुध्दा सूचित केले आहे की, करार निष्पादित होऊन त्याची नोंदणी होईपर्यंत जमिनीचा ताबा दयावयास नको.<br>लेखा परिक्षेस असे निदर्शनास आले (फेब्रुवारी-मे २०१६) की चार जिल्हाधिकारी कार्यालयातील (कोल्हापूर, रायगड, सोलापूर, आणि ठाणे) आठ प्रकरणात मे २००७ ते जुलै २०११ दरम्यान विविध शिक्षण सोसायटी संस्थाना जमीन देण्यात आली. ही जमीन भोगवटा तत्त्वावर आणि भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आली. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ च्या | महसूल व वनविभागाच्या शासन ज्ञापन क्र.जमीन /३७२००१/५९६/प्र.क्र.सो-८२/ज-५ दि.२०/०४/२००५ अन्वये सोलापूर टि.पी.नंबर १ फायनल प्लॉट नं.९ए/२अ मधील एकूण ४४७७ चौ.मी. क्षेत्रापैकी २८४६ चौ.मी. जमीन शासन निर्णय दिनांक ३०/०६/१९९२मधील तरतूदीनुसार कब्जेहक्काची रक्कम वसूल करून तसेच १६३१ चौ.मी. क्षेत्र शासन निर्णय दि.११/०५/१९८४ मधील तरतूदीनुसार दि.०१/०२/१९७६ रोजी येणाऱ्या किंमतीच्या १० टक्के रकमेवर येणाऱ्या प्रचलित दराने येणाऱ्या व्याजाएवढया रकमेचा भाडेपट्टा आकारून पद्मशाली शिक्षण संस्थेस महाविद्यालयाकरीता प्रदान करण्यात आली होती.<br>सदर शासन ज्ञापनास अनुसरून जिल्हाधिकारी कार्यालयाकडील कार्यालयीन आदेश दि.२३/१०/२००८ अन्वये सदर जागेच्या प्रदानाबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.<br>महसूल व वनविभागाकडील शासन परिपत्रक दि.३१/१०/२००६ अन्वये सदर संस्थेस क्रिडांगणासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेचा करारनामा दस्त निष्पादित करणे आवश्यक होते. तथापि सदर संस्थेने करारनामा दस्त अदयापही निष्पादित करून घेतलेला नाही.<br>जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाने सबंधित संस्थेच्या सचिवांना दि.२९/१२/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये करारनाम्याची प्रत सादर करण्याबाबत सुचित केलेले होते. तसेच तद्नंतर दि.२०/०३/२०१८ व दि.१०/१२/२०१८ रोजीच्या नोटिसीव्दारे करारनामा दस्त निष्पादित करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आलेले आहे.<br>(स्वाक्षरी) |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

D:\PAC para २०१८\PAC Para Saksh २७१२२०१८.docx

| परिच्छेद क्रमांक व विषय | कार्यवाहीची सद्यस्थिती |
| --- | --- |
| अनुक्रमे अनुच्छेद २५ आणि ३६ अनुसार याची नोंदणी करावयास पाहिजे होती. तथापि, लेखापरिक्षेला असे आढळले की संबंधित पार्टीमध्ये भाडेपट्टा करार जमिनीचा ताबा दिल्यानंतरही निष्पादित करण्यात आला नाही . कराराशिवाय शासकीय जमीनीस भाडेपट्ट्याने देणे अधिनियमाच्या प्रावधनाच्या अनुरुप नव्हते. यामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी च्या स्वरुपात मिळणारा रु. १४.७५ लाखाचा महसूलही मिळू शकला नाही. हे निदर्शनास आणल्यावर विभागाने नमूद केले (एप्रिल- मे २०१६) की लेखापरिक्षेने सांगितल्याप्रमाणे दस्तावेजाच्या नोंदणीसाठी कारवाई करण्यात येईल. | |

(प्रताप सं. माडकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक व विषय | वर्ष | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | (खाली पहा) | २०१५-२०१६ | (खाली पहा) |

**परिच्छेद क्रमांक व विषय:**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४ शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.१ जमिनीचा वापर न करणे**

महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनींची विल्हेवाट) नियम , १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की शर्तीचे उल्लंघन झाल्यास अथवा ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन प्रदान केली आहे. त्यासाठी तिचा वापर जिल्हाधिकारी ठरवतील त्या तारखेपर्यंत न झाल्यास शासनाने ती जमीन पुनर्ग्रहीत करावयास पाहिजे.

चार जिल्ह्यातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की, १५ प्रकरणांत २,१३,०२३ चौ.मी. जमीन शिक्षण संस्थांना प्रदान करण्यात आली होती. या संस्थांनी जमिनीचा वापर केला नव्हता (जून २०१६). या सर्व प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्यांद्वारे विनिर्दिष्ट वापर अवधी संपली होती. काही प्रकरणें **तक्ता ४.३.४.१** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता ४.३.४.१**

| अ. क्र. | गांव व जिल्हा | प्रयोजन | क्षेत्रफळ | जमीन वाटपाची तारीख | या तारखेपर्यंत बांधकाम पूर्ण करावयाचे होते | विभागीय दस्तावेजांत नमूद केलेली स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भूदरगड, कोल्हापूर | शिक्षण | २८,००० चौ.मी. | २८ ऑगस्ट, २००८ | २७ ऑगस्ट, २०१० | जमीन पडित आणि विनावापर आहे |
| २ | राजाराम नगर, दिंडोरी, नाशिक | शिक्षण आणि क्रीडांगण | १२,००० चौ.मी. | १६ जानेवारी, २००६ | १५ जानेवारी, २००८ | बांधकाम पूर्ण झाले नाही |

**स्पष्टीकरण:**

या कार्यासनामार्फत ठाणे जिल्ह्यातील जमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदातील **तक्ता ४.३.४.१** मधील फक्त अ. क्र. ५ येथील प्रकरण ठाणे जिल्ह्यातील मिळकतीशी संबंधित आहे. सदर मिळकतीबाबत परिच्छेदात नमूद आक्षेपाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे:-

मौजे मोरीवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील डी.डी. स्किम १५, सि.सं.नं. ९१६७ मधील ६७,३७४ चौ.मी. शासकीय जमिनीपैकी ३,२८० चौ.मी. जमीन शाळेच्या इमारतीसाठी महसूल मुक्त व सारा माफीने कब्जाहक्काने व लगतची ६,५६० चौ.मी. जमीन क्रीडांगणासाठी रु. १/- नाममात्र वार्षिक भाडे आकारुन १५ वर्षाच्या कालावधीकरीता भाडेपट्टयाने शासन ज्ञापन दि.१६/१०/२००२ अन्वये मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ यांना विहीत अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे. सदर जागेचा ताबा दि.१९/१२/२००२ रोजी मंडळ अधिकारी, अंबरनाथ यांनी मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ यांना दिला आहे.

तथापि, उक्त नमूद जागेचा वापर सदर संस्था करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने शर्तभंगाबाबत रोजी संबंधितास नोटीस बजावण्यात आली होती. अर्जदार संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या जमिनीवर स्थानिक लोकांनी आक्षेप घेतले होते. तसेच, त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्याने सदर संस्थेस स्थानिक नियोजन प्राधिकारी यांच्याकडून आवश्यक त्या परवानग्या

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बोकरदरे निफाड, नाशिक | शिक्षण | ६०,००० चौ.मी. | ७ सप्टेंबर २००९ | ६ सप्टेंबर २०१२ | जमीन पडित आणि विनावापर आहे |
| ४ | नाशिक (मुख्य शहर) | शिक्षण | ४,२०० चौ.मी. | ४ जानेवारी २०१० | ३ जानेवारी २०१३ | जमीन पडित आणि विनावापर आहे |
| ५ | मोरीवली, ठाणे | शिक्षण | ९,८४० चौ.मी. | १७ डिसेंबर २००२ | १६ डिसेंबर २००५ | जमीन पडित आणि विनावापर आहे |

याव्यतिरिक्त नाशिक जिल्ह्यामधील एका प्रकरणात ४,००० चौ.मी. शासकीय जमीन ऑक्टोबर १९३३ मध्ये शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आली होती. ही जमीन भोगवटा तत्त्वावर देण्यात आली होती. त्यामुळे, ह्या जमिनीचे हक्क शासनाकडेच होते. तलाठी यांनी तहसिलदार, नाशिक यांना सादर केलेल्या अहवालानुसार ही जमीन पडित असून या जमिनीवर कोणतेही बांधकाम नव्हते. यावरुन असे निर्दशित होते की, या जमिनीला ज्या प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आले होते त्यासाठी तिचा वापर होत नव्हता. जमिनीचे वाटप रद्द करुन ही जमीन शासनाने पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती.

हे निदर्शनास आणल्यावर तीन जिल्हाधिकारी (कोल्हापूर, सोलापूर आणि ठाणे) यांनी उत्तरादाखल संबंधित तहसिलदारामार्फत या प्रकरणाची पडताळणी करण्यात येईल असे नमूद केले. जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून उत्तर अद्याप प्रतीक्षित आहे (फेब्रुवारी २०१७).

घेऊन प्रत्यक्ष वापर सुरु करण्यास विलंब झाला असल्याचे सदर संस्थेने त्यांच्या खुलाशात कळविले आहे.

सदर जागेवरील इमारत बांधकामास झालेला विलंब हा प्रशासकीय कारणांमुळे झालेला असून तहसिलदार, अंबरनाथ यांचेमार्फत सदर जागेची स्थळ पाहणी केली असता सदर जागेवर G+३ या स्वरुपाचे बांधकाम केलेले असून तेथे इयत्ता १ ते ५ पर्यंतचे वर्ग भरत आहेत.

उक्त जमिनीपैकी क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या ६,५६० चौ.मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत दि.१६/१२/२०१७ रोजी संपुष्टात आली असून अर्जदार संस्थेने त्यांच्या दि.०४/०५/२०१७ रोजीच्या अर्जान्वये सदर भाडेपट्ट्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापरासाठी भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या संदर्भात भाडेपट्ट्याचे नुतनीकरणाचे करताना आकारावयाची भूईभाड्याची रक्कम व नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करणे इ. विषयक सर्वसमावेशक धोरण शासन निर्णय दिनांक १६/११/२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. सदर धोरणातील तरतूदीनुसार भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र

परिच्छेद क्रमांक ४.३.४.-: शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| **परिच्छेद क्रमांक ४.३.४.१ जमिनीचा वापर न करणे**<br><br>महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनींची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की, शर्तीचे उल्लंघन झाल्यास अथवा ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन प्रदान केली आहे, त्यासाठी तिचा वापर जिल्हाधिकारी ठरवतील त्या तारखेपर्यंत न झाल्यास शासनाने ती जमिन पुर्नग्रहित करावयास पाहिजे.<br>चार जिल्हयातील दस्ताऐवजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की १५ प्रकरणात २,१३,०२३ चौ. मी. जमीन शिक्षण संस्थाना प्रदान करण्यात आली होती. या संस्थानी जमीनीचा वापर केला नव्हता (जून २०१६) या सर्व प्रकरणांत जिल्हाधिका-यांदवारे विनिर्दिष्ट वापर अवधी संपली होती. काही प्रकरणे तक्ता ४.३.४.१ मध्ये दर्शविली आहे......<br>...... यात्व्यतिरिक्त नाशिक जिल्ह्यातील एका प्रकरणात ४,००० चौ.मी. शासकीय जमीन ऑक्टोबर १९३३ मध्ये शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आली होती. ही जमीन भोगवटा तत्वावर देण्यात आली होती. त्यामुळे या जमिनीचे हक्क शासनाकडेच होते. तलाठी यांनी तहसिलदार, नाशिक यांना सादर केलेल्या अहवालानुसार ही जमीन पडीत असून या जमिनीवर कोणतेही बांधकाम नव्हते. यावरून असे निदर्शित होते की, या जमिनीला ज्या प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आले होते त्यासाठी तिचा वापर होत | ज-६ कार्यासनामार्फत नाशिक जिल्हयातील जमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदातील नाशिक जिल्ह्यातील मिळकतीशी संबंधित परिच्छेदात नमूद आक्षेपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण आहे:-<br>महालेखापाल यांचे सदर परिच्छेदामध्ये नाशिक जिल्ह्यातील एकूण चौदा (१४) शैक्षणिक संस्थांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या जागेचा वापर न केल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आलेला आहे. त्याबाबतचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.<br>सदर प्रकरणी संबंधित तहसिलदार यांच्याकडून सदर जागांचा स्थळ निरिक्षण अहवालासह प्रस्ताव प्राप्त करून घेणेबाबत व प्रचलित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी नाशिक यांच्या स्तरावर सुरू आहे.<br>महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन २०१६/ प्र.क्र.२५४/ज-१, दि.११ जानेवारी, २०१७ अन्वये विविध व्यक्ती, संस्था आणि कंपनी यांना विविध प्रयोजनार्थ कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील इमारत बांधकामासाठी मुदतवाढ देण्याबाबत धोरणात्मक निर्देश देण्यात आले आहेत.<br><br>**<u>अ.क्र. ४ युथ एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर सेवा ट्रस्टी एज्युकेशन सोसायटी, नाशिक.</u>**<br>युथ एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर सोसायटी, नाशिक या संस्थेस शासन निर्णय क्र. ९०४८/२८, दि. ०६ जुलै, १९३२ नुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि. २१ जुलै, १९३२ च्या आदेशान्वये मौजे नाशिक ता. जि. नाशिक येथील स.नं. ६४३/ब (न.भू.क्र. ६१४/व, अंतिम भूखंड क्र. १२७) क्षेत्र ०.४० आर ही जागा मुस्लिम विद्यार्थी वसतीगृह या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात आलेली आहे. शासन |



BSE 377-3+

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| नव्हता. जमिनीचे वाटप रद्द करून ही जमीन शासनाने पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती.<br>हे निर्देशनास आणल्यावर तीन जिल्हाधिकारी (कोल्हापूर, सोलापूर आणि ठाणे) यांनी उत्तरादाखल संबंधित तहसीलदारामार्फत या प्रकरणाची पडताळणी करण्यात येईल असे नमूद केले. जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून उत्तर अद्याप प्रतीक्षेत आहे. (फेब्रुवारी २०१७). | ज्ञापन दि.२१ नोव्हेंबर, २००७ अन्वये संस्थेस वरील नमूद जागेवर एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्रावर वाणिज्यिक वापर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.<br>सदर संस्थेने शासन निर्णय दि. १३ एप्रिल, २०१७ नुसार सदर मिळकतीस पुर्नविकास व पुर्नबांधणीस परवानगी मिळण्याबाबत दि. २६ सप्टेंबर, २०१७ च्या अर्जान्वये विनंती केली आहे. शासन निर्णय दि. १३ एप्रिल, २०१७ व शासन ज्ञापन दि. २१ नोव्हेंबर, २००७ च्या अनुषंगाने पुर्नविकास परवानगी देणेकामी कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाच्या दि. १७ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये अर्जदारांना कळविण्यात आले असून प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून पुढील कार्यवाही सुरू आहे. |

(अनुष्का दळवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

क्र. लोलेस- ३८१७/प्र.क्र.३५९/ज-५अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल

| परिच्छेद क्र व तपशिल | शासनाचे अभिप्राय |
|---|---|
| **४.३.४.१ - जमिनीचा वापर न करणे :-**<br>महाराष्ट्र जमिन महसूल (शासकीय जमिनींची विल्हेवाट( नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की शर्तींचे उल्लंघन झाल्यास अथवा ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमिन प्रदान केली आहे. त्यासाठी तिचा वापर जिल्हाधिकारी ठरवतील त्या तारखेपर्यंत न झाल्यास शासनाने ती जमिन पुनग्रहित करावयास पाहिजे.<br>चार जिल्हयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की १५ प्रकणांत २१३,०२३ चौ.मी. जमिन शिक्षण संस्थांना प्रदान करण्यात आली होती. या संस्थांनी जमिनीचा वापर केला नव्हता (जून २०१६) या सर्व प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्याव्दारे विनिर्दिष्ट वापर अवधी संपली होती. काहि प्रकरणे तक्ता ४.३.४.१ मध्ये दर्शविली आहे.<br>हे निदर्शनास आणल्यावर तीन जिल्हाधिकारी (कोल्हापूर, सोलापूर आणि ठाणे( यांनी उत्तरादाखल संबंधीत तहसिलदारामार्फत या प्रकरणाची पडताळणी करण्यात येईल असे नमूद केले. | परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या कोल्हापूर जिल्हयातील प्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडील आदेश क्र. कार्यासन-३डजमीन/ /आरआर /१७१/२०१६, दिनांक: ०९/०८/२०१६ अन्वये सदरची जमीन सरकार हक्कांत घेणेत आली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे.<br>अध्यक्ष,श्री. विदयावर्धिनी एज्युकेशन सोसायटी, सोनारवाडी,ताभुदरगड. , जि. कोल्हापूर यांना इंजिनिअरींग कॉलेज इमारत, क्रिडांगण व इतर प्रायोगिक कारणासाठी मौजेफणसवाडी- ता. भुदरगड येथील गट नं. ५८९ अ मधील २ हेक्टर ८० आर जमीन इमारत, क्रिडांगण बांधकामासाठी भोगाधिकारे मूल्यरहित व महसूल मुक्त तत्वावर १ ते १९ अटी व शर्तीस अधिन राहून मंजूर करणेत आलेली होती. तथापि, संस्थेला ज्या कारणांसाठी जमिन दिली होती त्या कारणाकरिता गेल्या सहा वर्षापासून जमिनीचा वापर केला नसलेमुळे सदर आदेशातील अटींचा भंग झालेमुळे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडील आदेश क्र. कार्यासन-३डजमीन/ /आरआर /१७१/२०१६, दिनांक: ०९/०८/२०१६ अन्वये सदरची जमीन सरकार हक्कात घेणेत आली आहे. त्याबाबतचा आदेश व दुरुस्त ७/१२ उतारा व फेरफार उतारा यासोबत सादर केला आहे. सबब सदर आक्षेपीत परिच्छेदातील कार्यवाही पूर्ण झालेने सदरचा परिच्छेद स्वीकृत होणेस नम्र विनंती. (सोबत आदेश, दुरुस्त ७/१२ उतारा व फेरफार उतारा) |

Desk Officer,
Revenue and Forest Department
Rajguru Chowk,
Cama Road,
Mumbai - 400 032.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र

**परिच्छेद क्रमांक ४.३.४:- शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे**

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|
| **परिच्छेद क्रमांक ४.३.४.१ जमिनीचा वापर न करणे**<br>महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनींची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की, शर्तीचे उल्लंघन झाल्यास अथवा ज्या विशीष्टय प्रयोजनासाठी जमीन प्रदान केली आहे, त्यासाठी तिचा वापर जिल्हाधिकारी ठरवतील त्या तारखेपर्यंत न झाल्यास शासनाने ती जमिन पुर्नग्रहित करावयास पाहिजे.<br>चार जिल्हयातील दस्ताऐवजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की १५ प्रकरणात २,१३,०२३ चौ. मी. जमीन शिक्षण संस्थाना प्रदान करण्यात आली होती. या संस्थानी जमीनीचा वापर केला नव्हता (जून २०१६) या सर्व प्रकरणांत जिल्हाधिका-यांदवारे विनिर्दिष्ट वापर अवधी संपली होती....<br>...... हे निर्दशनास आणल्यावर तीन जिल्हाधिकारी (कोल्हापूर, सोलापूर आणि ठाणे) यांनी उत्तरादाखल संबंधित तहसीलदारामार्फत या प्रकरणाची पडताळणी करण्यात येईल असे नमूद केले. जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून उत्तर अद्याप प्रतीक्षेत आहे. (फेब्रुवारी २०१७) | सदर परिच्छेदातील सोलापूर जिल्ह्यातील मिळकतीशी संबंधित परिच्छेदात नमूद आक्षेपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे संस्थानिहाय स्पष्टीकरण आहे:-<br>१. **नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड संचलित चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला सोलापूर :-**<br>उक्त संस्थेस महसूल व वनविभागाकडील ज्ञापन क्र.जमीन ३७९०/ममआ/४८/प्र.क्र.सो.१०१/९०/ज-५ दि.११ नोव्हेंबर १९९२ अन्वये तसेच जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील आदेश दि.२०/०२/१९९३ अन्वये सोलापूर योजना क्र.३, सि.सर्व्हे क्र.११९ पैकी अंतिम भूखंड क्र.८५ मधील ४२३७ चौ.मी. पैकी ६१०.७६ चौ.मी. क्षेत्र शाळेच्या इमारतीकरीता व ३६२६.२४ चौ.मी. क्षेत्र क्रिडांगणासाठी प्रदान करण्यात आलेले आहे. क्रिडांगणासाठी प्रदान केलेली जागा ही १५ वर्षाच्या भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली आहे.<br>सदर संस्थेस क्रिडांगणासाठी प्रदान केलेल्या ३६२४.२४ चौ.मी. जागेचा स्थळपंचनामा केला असता, सदर संपूर्ण जागेचा वापर क्रिडांगणासाठी होत असल्याचे तसेच सदर जागेवर संस्थेचे आरसीसी बांधकाम असल्याचे दिसून येत असल्याने सर्व जागेचा मंजूर प्रयोजनासाठी वापर झाला असल्याचे जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर यांनी त्यांच्या दि.१०/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.<br>संस्थेस क्रिडांगणासाठी प्रदान केलेल्या जागेच्या भाडेपट्टयाची मुदत २००८ साली संपलेली आहे. यासंदर्भात महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय दिनांक |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|
| | १६/११/२०१८ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी स्तरावर संस्थेच्या क्रिडांगण भाडेपट्टयाच्या मुदतवाढीसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.<br><br>**२. कृष्णा सदा आप्पाजी यल्मार भंडीशेगाव ता. पंढरपूर जि. सोलापूर.**<br><br>मौजे भंडीशेगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील सि.स.नं.६६८ क्षेत्र २४६.३ चौ.मी. असून, सदर क्षेत्राचे आखीव (मालमत्ता पत्रकं) पत्रिका पाहता सदरची जमीन गावठाणातील असनू सन १९८० साली झालेले नगर भूमापन चौकशीच्या वेळेपासून किसन आप्पाजी यल्मार यांचे नावाची नोंद दिसून येते. सदरची जमीन खाजगी जमीन असल्याचे दिसून येत. असल्यामुळे सदरची जमीन सरकार जमा करणे आवश्यक नाही, असे जिल्हाधिकारी सोलापूर यांनी कळविले आहे. |

प्र.सं.माडकर
29/12/18

(प्रताप सं. माडकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>परिच्छेद क्रमांक व विषय</th><th>वर्ष</th><th>स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>१</td><td>

**परिच्छेद क्रमांक ४.३.४ शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.२ जमिनीच्या वाटपात शर्तीचे उल्लंघन**

महसूल व वन विभागाने (R&FD) त्यांच्या ८ फेब्रुवारी १९८३ च्या परिपत्रकात जमीन वाटपाची पध्दती विहीत केली आहे. त्यात विहीत आहे की संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने शैक्षणिक प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याच्या संबंधातील प्रस्तावाची पडताळणी करावयास पाहिजे. तसेच पुढे असेही नमूद केले आहे की आवश्यक असेल तेथे हे प्रस्ताव पोलिस इन्टेलिजेन्स मार्फत पाठवावयास पाहिजे.

लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की R&FD ने ठाणे जिल्ह्यातील ३९४.६० चौ.मी. शासकीय जमीन महाराष्ट्र कोळी समाजा (संस्था) ला कार्यालय तसेच शैक्षणिक प्रयोजनासाठी वाटप करण्यात आली (फेब्रुवारी २००९). जमिनीची भोगवटा किंमत म्हणून रु.५१.३० लाख संस्थेकडून वसूल करण्यात आले (मे २०१०). प्रकरणाच्या पडताळणीत असे आढळले की जिल्हाधिकारी ठाणेने हे प्रकरण परिपत्रकातील शर्तींना पूर्ण न करता पाठविले होते. तपशील **तक्ता ४.३.४.२** मध्ये नमूद केले आहे.

**तक्ता ४.३.४.२**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>जमीन वाटपाच्या शर्ती</th><th>जमीन वाटपात शर्तीचे उल्लंघन</th></tr>
<tr><td>१</td><td>R&FD च्या फेब्रुवारी १९८३ च्या परिपत्रकानुसार शैक्षणिक प्रयोजनासाठी जमीन वाटपाआधी जिल्हाधिकारी यांनी शैक्षणिक प्रयोजनासाठी जी संस्था शासकीय जमीन घेऊ इच्छित असेल त्या आवेदक शिक्षण संस्थांनी शिक्षण विभागाकडून शाळा सुरु करावयाची अनुमती घेतलेली आहे या बाबतची पडताळणी करावी.</td><td>३९४.६० चौ.मी. शासकीय जमीन कार्यालय तसेच शैक्षणिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र कोळी समाज (संस्था) यांना देण्यात आली. लेखापरीक्षेस असे आढळले की आवदेक संस्थेने शिक्षण विभागाकडून अनुमती घेतली नव्हती.</td></tr>
<tr><td>२</td><td>R&FD च्या फेब्रुवारी १९८३ च्या परिपत्रकांत विनिर्दिष्ट आहे की संस्थेजवळ</td><td>आवेदकाने सादर केलेल्या विवरणानुसार प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.२५.०३ लाख होती.</td></tr>
</table>

</td><td>२०१५-२०१६</td><td>

मोजे ठाणे, ता.जि.ठाणे येथील नगर भूमपान क्षेत्रातील टिका नं.७, सि.स.नं.१४१/ब, क्षेत्र ३९४.६० चौ.मी. जमीन महाराष्ट्र कोळी समाज संघ या संस्थेस कार्यालयासाठी व शैक्षणिक उपक्रमासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.२४/०५/२०१० च्या आदेशान्वये कब्जाहक्काने प्रदान करण्यात आली आहे.

प्रदान केलेल्या जागेवर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून आजपर्यंत पूर्ण बांधकाम केल्याचे दिसून येत नाही. सदर जागेवर इमारतीच्या बांधकामासाठी मुदतवाढ घेण्याबाबत तहसिलदार, ठाणे यांनी दि.१४/०२/२०१८ रोजी अध्यक्ष, महाराष्ट्र कोळी समाज संघ यांना कळविण्यात आले आहे. त्यावर महाराष्ट्र कोळी समाज यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला आहे. प्रकरणी अर्जदार यांनी सादर केलेल्या फोटोप्रतींनुसार आज रोजी जागेवर बांकाम सुरु असून इमारतीचे तीन मजले बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे सदर जागा शासनाकडे पुनर्ग्रहीत करणे उचित होणार नाही.

</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | बांधकाम अंदाजित किमतीच्या कमीतकमी २५% आर्थिक स्त्रोत असावयास पाहिजे. | आवेदकाजवळ रु.६.२६ लाखाचे वित्तीय बळ असावयास पाहिजे होते. आवेदकाने सादर केलेल्या आर्थिक विविरणानुसार आवेदकाजवळ फक्त रु.१.५० लाख (२५ टक्क्यांऐवजी अंदाजित किंमतीचे ४ टक्के) |
| ३ | १९८३ च्या परिपत्रकानुसार आवेदकाने आवेदनासोबत विहित नमून्यात इमारत योजना सादर करावयास पाहिजे. | आवेदकाने आवेदानाचे वेळी अथवा नंतरही इमारत योजना सादर केली नाही. |
| ४ | १९८३ च्या परिपत्रकानुसार आवेदकाने विहित नमुन्यात माहिती सादर करावयास पाहिजे ज्यात संस्थेबाबत पूर्व माहिती / वास्तविकता अंतर्भुत असावयास पाहिजे व जिल्हाधिकाऱ्याने हे प्रस्ताव जमीन वाटपासाठी शासनाकडे पाठविण्याआधी तपासावयास पाहिजे. | संस्थेने माहिती सादर केली नव्हती. जिल्हाधिकाऱ्याने आवेदकाविरुध्द काही कायदेशीर प्रकरण असल्यास त्याची स्थिती सूचित करावयाच्या सूचना पोलीस विभागास दिल्या होत्या. पोलीस विभागाने संस्थेचे अध्यक्ष आठ प्रकरणांत ३६ गुन्ह्यामध्ये गुंतले असल्याचे कळविले. |

प्रस्तावामध्ये वरील उणीवा / त्रुटी असूनही जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आवेदकास शासकीय जमीन वाटप करण्याची शासनाकडे शिफारस केली. ही जमीन फेब्रुवारी २००९ मध्ये प्रदान करण्यात आली. जमीन वाटपाच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत शिक्षण संस्थेने बांधकाम पूर्ण करावयाचे होते. तलाठी तहसिलदार, ठाणे यांना सादर केलेल्या (डिसेंबर २०१६) अहवालानुसार संस्थेने इमारतीचे बांधकाम पूर्ण केले नव्हते. वरील बाबी विचारात घेता, या जमीनीचे शासनाने पुनर्ग्रहण करावयास पाहिजे होते.

हे निदर्शनास आणल्यावर (एप्रिल २०१६) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी हे प्रकरण तपासण्यात येईल असे नमूद केले.

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

| अ.क्र. | परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ०३ | **४.३.४**<br>**परिच्छेद क्रमांक ४.३.४ शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे**<br>**४.३.४.३**<br>**शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यांत आलेल्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण न करणे -**<br><br>जिल्हाधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यांत आलेल्या आदेशांच्या शर्ती व अटी प्रमाणे क्रिडांगण म्हणून जमीनीचे वाटप १५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यांत आले होते. भाडेपट्टा कालावधी संपण्याआधी शासनाने त्यांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते.<br><br>लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की चार जिल्ह्यातील ४२ प्रकरणांत क्रिडांगणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपट्टा कालावधी जून, १९६६ ते ऑगस्ट, २०१६ दरम्यान संपला होता. शासनाने या जमिनीच्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते. अथवा ही जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती. पट्टेदारांनी नवीनीकरणासाठी आवेदनही केले नव्हते आणि विभागाने जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाईही केली नव्हती, काही प्रकरणे खालील प्रमाणे आहेत.<br>१) जिल्हाधिकारी सोलापूर यांनी ९,१४६.१० चौमी १५ वर्षाच्या कालावधीकरिता क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (नोव्हेंबर १९८६) हा भाडेपट्टा नोव्हेंबर २००१ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तींच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्टयाचे नवीनीकरण झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. | या कार्यासनामार्फत पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयातील जमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदातील रायगड जिल्ह्यातील मिळकतीशी संबंधित परिच्छेदात नमूद आक्षेपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण आहे:-<br>रायगड जिल्हयामध्ये खालील दोन शैक्षणिक संस्थांना क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाने जमिनी मंजूर करण्यात आल्या आहेत.<br><br>१) **अभिनव ज्ञान मंदिर संस्था संचलित श्री. गजानन विद्यालय कडाव-**<br>अभिनव ज्ञान मंदिर संस्थेला मौजे कडाव ता. कर्जत येथील स. नं. १३२/० या जमिनीपैकी ८६५० चौ.मी क्षेत्र क्रिडांगणासाठी १५ वर्षाच्या कालावधीसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक २०.०४.१९९४ भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आली आहे. सदर भाडेपट्टा दिनांक १९.०४.२००९ रोजी संपलेला आहे. सदर संस्थेने दिनांक ०४.११.२०१५ रोजी सदरचा भाडेपट्टा मुदत वाढवून मिळणेबाबत दिनांक ०४.११.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे केली असून जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ०२.०८.२०१६ रोजी आगाऊ प्रत उपलब्ध करुन प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे सादर केला आहे. दरम्यान दिनांक १६.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापरासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या संदर्भात भाडेपट्टयांचे नुतनीकरण करताना आकारवयाची भुईभाड्याची रक्कम व नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करणे इत्यादी विषयक सर्वसमावेशक धोरण शासननिर्णय दिनांक १६.११.२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. सदर धोरणातील तरतूदीनुसार भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्यास संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम आहेत.<br>त्यानुषंगाने विषयांकित प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शासनपत्र दिनांक ०४.१२.२०१८ अन्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले होते. |

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | परंतु जिल्हाधिकाऱ्यांस भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १५ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ६.३०० चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (जून १९८८) हा भाडेपट्टा जून २००३ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद क्र. १५ नुसार भाडेपट्टयांचे नवीनीकरण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्याने भाडेपट्टा संपल्याच्या तारेखपासून १३ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केलेली नाही.<br><br>३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी १८.१७९ चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली. (एप्रिल १९९७) हा भाडेपट्टा एप्रिल, २०१२ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्टयाचे नवीनकरण न झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून ४ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br><br>४)जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी ८,००० चौमी जमीन १५ वर्षाच कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली. (मार्च १९९४) हा भाडेपट्टा मार्च २००९ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद क्र. १२ नुसार भाडेपट्टा कालावधी संपल्यानंतर भाडेपट्टा संपुष्टात आले, असे मानावयास पाहिजे होते आणि जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्यानंतर ६ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br><br>५) जिल्हाधिकारी नाशिक यांनी ८००० चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली. एप्रिल १९८८ हा भाडेपट्टा मार्च २००३ मध्ये | जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १५.१२.२०१८ च्या आदेशान्वये सदर भाडेपट्टयास ३० वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.<br>**२) अध्यक्ष, लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, चोंढी -**<br>लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, चोंढी किहीम, ता. अलिबाग येथील ग. नं ४१९/२ क्षेत्र ०.६०.० हे.आर जमिन क्रिडांगणासाठी १५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेकराराने जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १८.०१.१९९४ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली आहे. सदर भाडेपट्टयाची मुदत दिनांक १७.०१.२००९ रोजी संपल्याने सदर संस्थेने जिल्हाधिकारी, रायगड यांना दि.१९/११/२००९ रोजीच्या अर्जान्वये भाडेपट्टयाची मुदत ९९ वर्षासाठी वाढविण्यासाठी विनंती केली आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १६/८/२०१० अन्वये मा.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग,(मा. विभागीय आयुक्त यांचे मार्फत) यांजकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>मात्र सदरचा प्रस्ताव सन २०१२ च्या मंत्रालयीन आगीमध्ये नष्ट झाल्याने, सदर संचिकेची पुर्नबांधणी करुन, सदरचा फेर प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास ०१/१२/२०१८ च्या पत्रान्वये सादर करणेत आला होता, दरम्यान दिनांक १६.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापरासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या संदर्भात भाडेपट्टयांचे नुतनीकरण करताना आकारावयाची भुईभाड्याची रक्कम व नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करणे इत्यादी विषयक सर्वसमावेशक धोरण शासननिर्णय दिनांक १६.११.२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. सदर धोरणातील तरतूदीनुसार भाडेपट्टयांचे नुतनीकरण करण्यास संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम आहेत.<br>त्यानुषंगाने विषयांकित प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शासनपत्र दिनांक ०४.१२.२०१८ अन्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आलेले होते. जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १५.१२.२०१८ च्या आदेशान्वये सदर भाडेपट्टयास ३० वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. |

| अ.क्र | परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| | संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद क्र. १३ नुसार भाडेपट्टयाचे नवीनीकरण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १३ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>हे निदर्शनास आणल्या (फेब्रुवारी ते मे २०१६) जिल्हाधिकारी कोल्हापूर आणि सोलापूर यांनी नमूद केले (मे - सप्टेंबर २०१६) की संबंधित तहसीलदारांकडून या प्रकरणांचा तपास करण्यांत येईल आणि आवश्यक कारवाई करण्यात येईल. **जिल्हाधिकारी, रायगड** यांनी पुष्टी केली (सप्टेबर २०१६) की संबंधित शिक्षण संस्थेने भाडेपट्टा कालावधी वाढविण्यासाठी आवेदन केले नव्हते, तथापि जमीन पुनर्ग्रहन न करण्याची कारणे देण्यात आली नाही. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे उत्तर अद्याप प्रतिक्षीत आहे.(फेब्रुवारी २०१७) | |

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.३:-शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण न करणे**

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|
| **४.३.४.३**<br>**शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण न करणे -**<br><br>जिल्हाधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यांत आलेल्या आदेशांच्या शर्ती व अटीं प्रमाणे क्रिडांगण म्हणून जमीनीचे वाटप १५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यांत आले होते. भाडेपट्टा कालावधी संपण्याआधी शासनाने त्यांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते.<br>लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की चार जिल्ह्यातील ४२ प्रकरणांत क्रिडांगणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपट्टा कालावधी जून, १९६६ ते ऑगस्ट, २०१६ दरम्यान संपला होता. शासनाने या जमिनीच्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते. अथवा ही जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती. पट्टेदारांनी नवीनीकरणासाठी आवेदनही केले नव्हते आणि विभागाने जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाईही केली नव्हती,काही प्रकरणे खालील प्रमाणे आहेत....<br>१) जिल्हाधिकारी सोलापूर यांनी ९,१४६.१० चौमी १५ वर्षाच्या कालावधीकरिता क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (नोव्हेंबर १९८६) हा भाडेपट्टा नोव्हेंबर २००१ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्टयाचे नवीनीकरण झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांस भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १५ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ६.३०० चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (जून १९८८) हा भाडेपट्टा जून २००३ मध्ये संपला. वाटप | सदर परिच्छेदातील सोलापूर जिल्हयामधील एकूण पंधरा (१५) शैक्षणिक संस्थांना क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या जागेसंदर्भातील संस्थानिहाय सविस्तर विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.<br>शैक्षणिक संस्थांना क्रिडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या जागांच्या भाडेपट्टा मुदतवाढीसंदर्भात महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र. ९१/ज-१, दि.१६/११/२०१८ अन्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार क्रीडांगण भाडेपट्टा मुदतवाढ देण्यासाठी सबंधित जिल्हाधिकारी हे सक्षम आहेत. शासनाच्या सदर सुधारीत निर्देशानुसार सोलापूर जिल्हयामधील उपरोक्त नमूद विवरणपत्रामधील शैक्षणिक संस्थांच्या क्रिडांगण भाडेपट्टा नुतनीकरणसंदर्भात कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी सोलापूर यांच्यामार्फत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे. |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| आदेशाच्या अटी व शर्तींच्या परिच्छेद क्र. १५ नुसार भाडेपट्टयांचे नवीनीकरण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्याने भाडेपट्टा संपल्याच्या तारेखपासून १३ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केलेली नाही.<br>३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी १८.१७९ चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली. (एप्रिल १९९७) हा भाडेपट्टा एप्रिल, २०१२ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तींच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्टयाचे नवीनकरण न झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून ४ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.....<br>.........हे निदर्शनास आणल्यानंतर (फेब्रुवारी ते मे २०१६) जिल्हाधिकारी कोल्हापूर आणि सोलापूर यांनी नमूद केले (मे - सप्टेंबर २०१६) की संबंधित तहसीलदारांकडून या प्रकरणांचा तपास करण्यात येईल आणि आवश्यक कारवाई करण्यात येईल. जिल्हाधिकारी, रायगड यांनी पुष्टी केली (सप्टेबर २०१६) की संबंधित शिक्षण संस्थेने भाडेपट्टा कालावधी वाढविण्यासाठी आवेदन केले नव्हते, तथापि जमीन पुनर्ग्रहन न करण्याची कारणे देण्यात आली नाही. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे उत्तर अद्याप प्रतिक्षीत आहे.(फेब्रुवारी २०१७) | |

प्रमाडकर 29/12/18

(प्रताप सं. माडकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल

Paragraph No.४.३.४.३

| अ. क्र. | तालुका | गाव | गट नं व क्षेत्र | प्रयोजन | संस्थेचे नाव | केलेली कार्यवाही | जमीन प्रदान केलेला आदेश / ज्ञापन क्र व दिनांक | भाडेपट्टा मुदत संपलेची तारीख | भाडेपट्टा नुतणीकरण कधी करुन देणेत आले. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | करमाळा | साडे | ४५९ पै ०.८९ हे आर | क्रिडांगण | श्री. यशवंत प्रसाद शिक्षण प्रसारक मंडळ साडे ता करमाळा | जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्रं २०१७/मशा/कार्या/४/३ब/आर आर/४५० दि २९.०४.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरण बाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे. | आदेश क्र.मशा/कार्या/४/३ब/सीआर/ २०० /१९८६ दिनांक १३.१०.१९८६ | १५.१०.२०१५ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/ ४५० दि २९.०४.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणाबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेमार्फत शासनास सादर करणेत आलेला होता. तथापि शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार सदर प्रस्ताव फेरतपासणी व उचित कार्यवाहीसाठी शासनाने दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परत पाठविलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |
| २. | पंढरपूर | गादेगाव | १ क्षेत्र २१.२८ चौ.मी | क्रिडांगण | रयत शिक्षण संस्था सातारा | आदेश क्र.मशा/कार्या/४/३ब/आरआर /४८४/ दिनांक.०३.०४.२०१८ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा | क्र.आरबी/डेस्क.४३ब/सीआर.४५० दिनांक.१५.०३.१९९८ | २५.०२.२०१३ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/कार्या/४/३ब/आरआर/४८४ / दिनांक.०३.०४.२०१८ अन्वये सदर |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नुतणीकरण दिनांक.२४.०२.२०४३ पर्यंत करण्यात आला आहे. | | | संस्थेचा भाडेपट्टा नुतणीकरण दिनांक.२४.०२.२०४३ पर्यंत करण्यात आला आहे. |
| ३. | पंढरपूर | भोसे | स नं १६१ ग नं ४१९ क्षेत्र ०.२२ हे आर | क्रिडांगण | रयत शिक्षण संस्था सातारा | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.RB,DESK/IV/IIIB/CR/ ४४० दिनांक.३१.०८.१९७९ अन्वये प्रदान करण्यात आलेली जमीनीबाबत तहसिलदार पढरपूर यांनी यांचेकडील पत्र जमा.१/कावि/१०४५/२०१८ दि.०४.१२.२०१८ अन्वये मौजे भोसे ता.पंढरपूर येथील जमीन गट नं. ४१९ पैकी ० हे २२ आर रयत शिक्षण संस्था सातारा यांना क्रिडांगणासाठी प्रदान करण्यात आलेली जमीन कायमस्वरुपी प्रदान केलेचे अहवाल सादर केलेला आहे. | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र. No.RB.DGBK/TV/THB/ GR/४४० दिनांक.२१.०८.१९७९ | | रयत शिक्षण संस्था सातारा यांना आदेश क्र.आरबी/डब्लूएस/IIIB/ १६७७/७६ दिनांक.१८.०९.१९७६ अन्वये क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली जमीन क्षेत्र १ हे ३६ आर या क्षेत्रापैकी ० हे २२ आर इतके क्षेत्र आदेश क्र . RB.DESK/IV/IIIB/CR/४४० दिनांक.३१.०८.१९७९ अन्वये शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी कायमस्वरुपी प्रदान केले असल्याने भाडेपट्टयाची मुदतवाढ करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| ४. | पंढरपूर | भोसे | स नं १६१ ग नं ४१९ क्षेत्र १ एः १४ गुंठे | क्रिडांगण | रयत शिक्षण संस्था सातारा | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/कार्या/४/३ब/आरआर /२०५/०७ दिनांक.१५.०३.२००७ अन्वये सदर संस्थेचा नुतणीकरण पंधरा वर्षाच्या भाडेपट्टयावर दिनांक.१५.०९.२०२१ पर्यंत करण्यात आला आहे. | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.आरबी/डब्लूएस/३ब/१६७ ७/७६ दिनांक.१८.०९.१९७६ | १६.०९.२००६ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा/कार्या/४/३ब/आरआर/२०५/ ०७ दिनांक.१५.०३.२००७ अन्वये सदर संस्थेचा नुतणीकरण पंधरा वर्षाच्या भाडेपट्टयावर दिनांक.१५.०९.२०२१ पर्यंत करण्यात आला आहे. |
| ५. | दक्षिण | कुंभारी | ग नं | क्रिडांगण | गेणसिध्द | सदर क्रिडांगणाची मुदत | जिल्हाधिकारी , सोलापूर | २२.११.२००१ | सदर क्रिडांगणाची मुदत |

(स्वाक्षरी)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सोलापूर | | ५९७ क्षेत्र ९१४६.१० चौ. मी | | शिक्षण प्रसारक मंडळ | दि.२२.११.२००१ मध्ये संपलेली आहे. तथापि तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी सदर क्रिडांगण नुतणीकरण करुन मिळणेबाबत त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/९३९/२०१८ दि. २२.११.२०१८ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव तपासणी करुन नुतणीकरणा बाबत कार्यवाही करीत आहोत. | यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा. कार्या/४/३ब/आरआर-२०९६० दि.२०.११.१९८६ | | दि.२२.११.२००१ मध्ये संपलेली आहे. तथापि तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी सदर क्रिडांगण नुतणीकरण करुन मिळणेबाबत त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/९३९/ २०१८ दि.२२.११.२०१८ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयास सादर केलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |
| ६. | मोहोळ | पाटकुल | ग नं. १४५ क्षेत्र ९८४७ चौ मी | क्रिडांगण | शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र २०१७/मशा/कार्या/४/३ब/आर आर/११२६ दि.१९.०९.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र आरबी/डेस्क/४/३ब/सीआर/३४६ दिनांक २०.०३.१९७९ | २०.०३.१९९४ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/११२६ दि.१९.०९.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेमार्फत शासनास सादर करणेत आलेला होता. तथापि शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार सदर प्रस्ताव फेरतपासणी व उचित कार्यवाहीसाठी शासनाने दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परत पाठविलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत |

पेंभाळकर

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |
| ७. | माढा | पिंपळणेर | ग नं ५०० ते ५०२ व ५४५. क्षेत्र ०.६३ हे आर | क्रिडांगण | मुख्याध्याप श्री गणेश विद्यालय पिंपळणेर | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र.२०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/७०८ दि २१.१०.२०१५ अन्वये सदर संस्थेस भाडेपटटा नुतनीकरण करून देणेत आलेले आहे. | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र मशा/कार्या/४/३ब/आर आर/२५३९४ दिनांक २८.०६.१९८८ | २७.०६.२०१५ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/७०८ दि २१.१०.२०१५ अन्वये सदर संस्थेस दिनांक २७.०६.२०३० अखेर भाडेपटटा नुतनीकरण करून देणेत आलेले आहे. |
| ८. | पंढरपूर | बाभूळगाव | ग नं २९५ क्षेत्र ४००० चौ.मी | क्रिडांगण | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | तहसिलदार पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/ १०४६/२०१८ दि.०४.१२.२०१८ अन्वये सदरची जागा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांना प्रदान करण्यात आलेली आहे. मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांनी सदर शाळेकडे कोणतेही अभिलेख अढळ होत नसलेबाबत तहसिलदार पंढरपूर यांना दि.०४.१२.२०१८ रोजी लेखी पत्रान्वये कळविले आहे. | | | सदर प्रकरणातील जागा ०.४० क्षेत्राचा जागा वाटपाचा मूळ आदेश आढळून येत नाही. तथापि सदर शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक, जि.प.प्रा. केंद्रशाळा, बाभुळगांव यांनी दि.०४/१२/२०१८ रोजी तहसिलदार पंढरपूर यांचेकडे पत्र देऊन सदर जागा प्रदानाबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. असे कळविलेले आहे. त्यामुळे नुतनीकरण करता आले नाही. |
| ९. | अक्कलकोट | हन्नूर | ग नं ४४३/२ क्षेत्र | क्रिडांगण | महर्षि विवेकानंद समाज | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र.२०१७/मशा/कार्या/४/३ब/ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र | २४.४.२०१२ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/ |

(स्वाक्षरी)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १८१७९ चौ.मी | | कल्याण संस्था हन्नूर | आरआर/४८० दि ०७.०५.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणब्राबतचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे | मशा/कार्या/४/३ब/आरआर/४४१ दिनांक २४.०४.१९९७ | | ४८० दि ०७.०५.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक १६/११/२०१८ नुसार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिका-यान्वये कार्यवाही करण्यात येत आहे. |
| १० | बार्शी | तांबेवाडी | ग नं ४५५ नविन ग नं १३४ क्षेत्र ४०४७ चौ मी | क्रिडांगण | अध्यक्ष, उस्मनाबाद जिल्हा वसंतराव नाईक मागासवर्गीय सेवा मंडळ उस्मनाबाद | तहसिलदार बार्शी यांनी सदर अहवालाबाबत स्थळपाहणी व इतर आवश्यक कागदपत्रे त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/ १५५२/२०१८ दि.०४.१२.२०१८ अन्वये अहवाल जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या या कार्यालयास सादर केलेला आहे. | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र मशा/कार्या/४/३ब/आरआर/१ १७२ दिनांक २१.१०.१९९४ | २१.१०.२००९ | सदर क्रिडांगणाची मुदत दि.२१.१०.२००९ मध्ये संपलेली आहे. तथापि तहसिलदार बार्शी यांनी सदर क्रिडांगण नुतणीकरण करुन मिळणेबाबत त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/१५५२/ २०१८ दि.०४.१२.२०१८ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयास सादर केलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदींनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |
| ११ | मोहोळ | वाळूज | ग नं ५४४ क्षेत्र ६८४५ चौ मी | क्रिडांगण | जवाहर ग्रामविकास मंडळ वाळूज जिल्हा परिषद | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आर आर/१२४४ दि ३०.१०.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा. कार्या/४/३ब/आरआर-२०७१२ दि.०७.०८.१९८६ | ०७.०८.२००१ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/१२४४ दि ३०.१०.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव विभागीय |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्राथमिक शाळा वाळूज | विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे | | | आयुक्त पुणे यांचेमार्फत शासनास सादर करणेत आलेला होता. तथापि शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार सदर प्रस्ताव फेरतपासणी व उचित कार्यवाहीसाठी शासनाने दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परत पाठविलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |
| १२ | माळशिरस | फळवणी | सि. स. नं. २७ क्षेत्र ४४७.५ चौ मी | क्रिडांगण | रयत शिक्षण संस्था सातारा | सन १९९४ ते सन २०१८ पर्यंतचे प्रति वर्षाचे एकूण बाजार मूल्याच्या (शासकीय मूल्यांकनाच्या) १५ टक्के ४,४५,४९४ (चार लाख पंचेच्याळीस हजार चारशे चौऱ्याण्णव) इतकी भाडेपट्याची रक्कम ००२९ या लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने भरुन त्याची प्रत व फरकाची रक्कम भरणेस तयार असलेचे हमीपत्र सादर करणेबाबत पत्र क्र.मशा/ कार्या/ ४/३ब/आरआर-४५२ दिनांक.०३.०४.२०१८ अन्वये सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा मौजे फळवणी | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील आदेश क्र.मशा. कार्या/४/३ब/आरआर- १९५ दि.३१.०३.१९९३ | ३१/०३/२००८ | सन १९९४ ते सन २०१८ पर्यंतचे प्रति वर्षाचे एकूण बाजार मूल्याच्या (शासकीय मूल्यांकनाच्या) १५ टक्के ४,४५,४९४ (चार लाख पंचेच्याळीस हजार चारशे चौऱ्याण्णव) इतकी भाडेपट्याची रक्कम ००२९ या लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने भरुन त्याची प्रत व फरकाची रक्कम भरणेस तयार असलेचे हमीपत्र जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयास सादर करणेबाबत पत्र क्र.मशा/ कार्या/४/३ब/आरआर-४५२ दिनांक.०३.०४.२०१८ अन्वये सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा मौजे फळवणी ता.माळशिरस यांना कळविण्यात आले होते. तसेच |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ता.माळशिरस यांना कळविण्यात आले होते. सदरची रक्कम भरणे शक्य नसल्याने ती माफ करण्यात यावी असे पत्र दि.०४/१२/२०१८ रोजी संबंधित संस्थेचे मुख्याध्यापक यांनी दिलेले आहे. सदरचे प्रकरणात प्रचलित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहोत. | | | मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण विद्यालय, फळवणी ता माळशिरस यांनी सदरचे विद्यालय रयत शिक्षण संस्था यांचेमार्फत चालविले जात आहे. सदर विद्यालय ग्रामीण भागात असून सध्या विद्यालयात ३५१ मुले व ३४९ मुली अशी एकूण ७०० विद्यार्थी शिकत आहेत. शाळेचे वार्षिक अंदाजपत्रक सन २०१८-१९ करीता १,४१,०००/- आहे. (वेतन अनुदान सोडून) तरी सदरची रक्कम भरणे शक्य नसल्याने ती माफ करण्यात यावी असे पत्र दि.०४/१२/२०१८ रोजी सबंधित संस्थेचे मुख्याध्यापकांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयास दिलेले आहे. सदरचे प्रकरणात प्रचलित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहोत. |
| १३ | सांगोला | वांसूद | गावठाण २०८१ चौ मी | क्रिडांगण | चेअरमन लोकल बोर्ड सोलापूर | तहसिलदार सांगोला यांनी त्यांचेकडील पत्र क्र.१५६२/२०१८ दि.०३.१२.२०१८ अन्वये सदर जागा प्रदानाचा आदेश किंवा नुतनीकरणा बाबत कोणतेही कागदपत्र आढळून येत नाहीत. याबाबत सबंधित संस्थेकडे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अध्यक्ष जिल्हा लोकल | आदेश क्र.III B दिनांक.२३.०४.१९५२ | - | सदरची जागा दि.२३/०४/५२ चे आदेशानुसार जिल्हा लोकल बोर्ड सोलापूर यांना प्रदान केलेली आहे. सदयस्थितीत सदर जागा प्रदानाचा आदेश किंवा नुतनीकरणाबाबत कोणतेही कागदपत्र आढळून येत नाहीत. याबाबत सबंधित संस्थेकडे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अध्यक्ष जिल्हा लोकल बोर्ड यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बोर्ड यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तथापि सदरचे प्रकरणांत कोणतेही कागद पत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदयस्थितीत नुतनीकरणा बाबत कोणतीही कार्यवाही करता येत नाही. कागदपत्र उपलब्ध झाल्या नंतर पुढील कार्यवाही करता येईल. | | | तथापि सदरचे प्रकरणात कोणतेही कागदपत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदयस्थितीत नुतनीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही करता येत नाही. कागदपत्र उपलब्ध झाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल. |
| १४. | मंगळवेढा | बोराळे | ४ एकर क्षेत्र | क्रिडांगण | शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा | तहसिलदार मंगळवेढा यांनी सदर अहवालाबाबत त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/काවि/१४६१/२०१८ दि.०५.१२.२०१८ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केले आहे. | आदेश क्र. व्हीपीटी.नं.I/०९६ दिनांक.२४ मार्च १९६९ शासनाचे परिपत्रक क्र. एलआरएफ/३७६७/११४५२ २-बी दि.२४.११.१९७० | | सदर संस्थेस महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एलआरएफ / ३७६७/११४५२२-बी दि. २४.११.१९७० अन्वये शाळा, खेळाचे मैदाने आणि वसतीगृह यासाठी प्रदान केल्याचे तहसिलदार मंगळवेढा यांनी त्यांचेकडील पत्र क्र.जमा.१/कावि/१४६१/२०१८ दि. ०५.१२.२०१८ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केले आहे. तसेच सदर जमीन कब्जेपावती करुन कब्जा दिलेबाबत फेरफार नं.१९४ अन्वये जमीन कब्जे हक्काने वाटप केल्याचे दिसून येते त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी भाडे पट्टा नुतणीकरण करणेची कार्यवाही केले नसल्याचे तहसिलदार मंगळवेढा यांनी अहवाल जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयास सादर केला आहे. सदरचे प्रकरणात प्रचलित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | करण्याची दक्षता घेत आहोत. |
| १५ | माळशिरस | फोंडशिरस | ग नं ३११/१/२ स नं ३२३/१ क्षेत्र ७००० चौ मी | क्रिडांगण | शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र.२०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/४५१ दि २९.०४.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरण बाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.त्याची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे. | आदेश क्र मशा/कार्या/४/३ब/आरआर/२ ४३८३ /१९८६ दिनांक २९.१२.१९८७ | २९.१२.२००२ | जिल्हाधिकारी , सोलापूर यांच्या कार्यालयाकडील पत्र क्र. २०१७/मशा/कार्या/४/३ब/आरआर/ ४५१ दि. २९.०४.२०१७ अन्वये सदर संस्थेचा भाडेपटटा नुतनीकरणबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेमार्फत शासनास सादर करणेत आलेला होता. तथापि शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार सदर प्रस्ताव फेरतपासणी व उचित कार्यवाहीसाठी शासनाने दि.०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परत पाठविलेला आहे. यानुषंगाने शासन निर्णय दि.१६/११/२०१८ मधील तरतूदीनुसार भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही चालू आहे. |

(प्रताप माडकर) २१/१२/१८

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**कक्ष अधिकारी**

**महसूल व वन विभाग**

**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

क्र. लोलेस- ३८१७/प्र.क्र.३६०/ज-५अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल**

**परिच्छेद क्र व तपशिल**

परिच्छेद क्र.४.३.४.३ शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपटटयांचे नवीनीकरण करणे

जिल्हाधिकाऱ्यांव्दारे जारी करण्यात आलेल्या आदेशांच्या शर्ती आणि अटी प्रमाणे क्रिडांगण म्हणून जमिनीचे वाटप १५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आले होते. भाडेपटटा कालावधी संपण्याआधी शासनाने त्याचे नविनीकरण करावयास पाहिजे होते.

लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की चार जिल्हयातील ४२ प्रकरणांत क्रिंडागणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपटटा कालावधी जून १९९६ ते ऑगस्ट २०१६ दरम्याने संपला होता. शासनाने या जमिनीच्या भाडेपटटयांचे नविनीकरण करावयास पाहिजे होते अथवा हि जमिन पुनग्रहित करावयास पाहिजे होती. पटटेदारांनी नविनीकरणासाठी आवेदन हि केले नव्हते आणि विभागाने जमिनीच्या कारवाईही केली नव्हती.

कोल्हापूर जिल्हयातील भाडेपटटा मुदत संपलेली यादी खालीलप्रमाणे

Annexure- III.

| s.no | Date of order | Name of socity | Purpose | Taluka | Survey no and area | Lease epired date |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 22-11-1963 | Udgaon education society Udgaon, Technical H S Udgaon | Playground Bullding | Tahsil shirol | S. no. 1220 E 1.21 HR | Nov 1978 |
| 2 | 03-03-194 | Ratnasagar High School | Plygorund | Tahasil shirol | S No 764 | March 2009 |

**शासनाचे अभिप्राय**

कोल्हापूर जिल्हयातील शैक्षणिक प्रयोजनार्थ क्रिडांगणासाठी दिलेल्या जमिनींचा भाडेपट्टा संपल्यांनतर भाडेपट्टा नुतनीकरण अथवा जमीन पुनर्ग्रहन न केलेबाबतचे परीच्छेदाच्या अनुषंगाने सदर Annexure – III मधील अनुक्रमांक २,३, व ६ येथील संस्थांचा क्रिडांगणासाठी दिलेल्या जमिनींचा भाडेपट्टा नुतनीकरण करुन देणेत आलेले आहे. सोबत आदेशाची प्रत जोडलेली आहे.

अनुक्रमांक १ येथील मौजे उदगाव ता. शिरोळ येथील उदगांव एज्युकेशन सोसायटी उदगाव टेक्नीकल एच एस उदगाव यास प्रदान केलेली मौजे उदगांव येथील रि.स.नं. १२२० क्षेत्र १.२१ हे. आर ह्या जमीनीबाबतचा दिनांक २२ नोव्हेंबर १९६३ रोजीचा आदेश पाहिला असता सदरची जमीन संस्थेला तांत्रिक विदयालयाच्या इमारतीसाठी वाटप झालेचे दिसून येते. दिनांक २२.११.१९६३ रोजीचे आदेशात सदरची जमीन भाडेपट्टयाने दिलेचे नमुद नाही. सबब भाडेपट्टा नुतनीकरणाचा प्रश्न उदभवत नाही.

अनुक्रमांक ४ येथील मौजे शिरटी ता. शिरोळ येथील गट नं. ५५३ जुना सर्व्हे नं. २१९ चे सन १९४९ पासूनचे गा.न.नं ७/१२ पाहता ०.८१ हे.आर. ही जमीन शाळा इमारत अशी नोंद असून सद्यस्थितीत सदर जमीनीचा ताबा देखील कुमार विद्यामंदीर शिरटी या शाळेचा असलेचे दिसून येते. त्यापैकी २३४५.४० चौमी (२३.४५ आर) इतक्या क्षेत्रावर सध्य स्थितीत बांधकाम असलेचे दिसून येते. त्यामूळे सध्यस्थिती पहाता वाटप झाले ८१०० चौ.मी पैकी परीच्छेदांमध्ये नमुद केलेले केवळ ४०० चौ.मी. वापर सुरु नसुन सदर शिक्षण संस्थेने २३४५.४० चौ.मी इतक्या क्षेत्रावर वापर सुरु केलेला आहे. सदर जमीनीचे प्रदान आदेशांबाबतचा अभिलेख प्राप्त करून कार्यवाही करणेची दक्षता घेण्यात येत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Nimshirgaon | | | 0.80 HR | |
| 3 | 23.12.1968 | Kumar Vidya Mandir Ghosarwad | Plyground Building | Tahasil shirol | 1226/1 0.548 HR | Dec 1983 |
| 4 | 13.12.57 | Kumar Vidya Mandir shirati | Plygroud Bulding | Tahasil shirol | S No 553 0.77 HR | 13.12.72 |
| 5 | Since 1985 | Prathamik vidya Mandir Terwad | Plyground bulding | Tahasil shirol | S no 554 A 7.60 R | 2000 |
| 6 | 16.07.2001 | Mahatma phule Shikshan sanstha (Padal) Yavaluj Tahasil Panhala | Playground | Tahasil Panhala | s.No. 1060 0.60 HR | July 2016 |
| 7 | 13.08.2001 | President Rayat Shikshan Sanstha Satara | Playground | Tahsil Hatkangale | S No 1959 1.24 HR | August 2016 |

अनुक्रमांक ५ येथील मौजे तेरवाड येथील मिळकत क्र. २४६/१ या मिळकतीच्या मालक सदरी सरकार असून सदर जमिनीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांचेकडील प्राथमिक विदया मंदीर तेरवाड या शाळेची इमारतीचे अतिक्रमण असलेचे दिसून येते. तरी प्रकरणी अंतिक्रमणाबाबत संबंधितांना नोटीस दिलेली असून अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करणेची दक्षता घेत आहोत.

अनुक्रमांक ७ येथील पदमभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील लक्ष्मीबाई पाटील शैक्षणिक संकुल कुंभोज ता. हातकणंगले येथील गट नं. १९५९ पै क्षेत्र ०२४०० चौ.मी. बाबतचा भाडेपटटा नुतनीकरण प्रस्ताव शासन निर्णय दि.१६.११.२०१८ मधील तरतुदीनुसार भाडेपटटा नूतनीकरणासाठी जिल्हाधिकारी सक्षम असल्याने दि.१९.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर प्रकरणी भाडेपटटा नुतनीकरणाची कार्यवाही जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या स्तरावरून करण्यात येत आहे.

Desk Officer,
Revenue and Forest's Department
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai - 400 032.

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

**परिच्छेद क्रमांक -:४.३.४.३शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण न करणे**

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|
| **परि.क्र. ४.३.४.३- शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण न करणे -**<br>जिल्हाधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यांत आलेल्या आदेशांच्या शर्ती व अटी प्रमाणे क्रिडांगण म्हणून जमीनीचे वाटप १५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यांत आले होते. भाडेपट्टा कालावधी संपण्याआधी शासनाने त्यांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते.<br>लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की चार जिल्ह्यातील ४२ प्रकरणांत क्रिडांगणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपट्टा कालावधी जून, १९६६ ते ऑगस्ट, २०१६ दरम्यान संपला होता. शासनाने या जमिनीच्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण करावयास पाहिजे होते. अथवा ही जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती. पट्टेदारांनी नवीनीकरणासाठी आवेदनही केले नव्हते आणि विभागाने जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाईही केली नव्हती, काही प्रकरणे खाली दिली आहेत.<br>• जिल्हाधिकारी सोलापूर यांनी ९,१४६.१० चौमी १५ वर्षाच्या कालावधीकरिता क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (नोव्हेंबर १९८६) हा भाडेपट्टा नोव्हेंबर २००१ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तींच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्टयाचे नवीनीकरण झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांस भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १५ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>• जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ६.३०० चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्टयावर दिली (जून १९८८) हा भाडेपट्टा जून २००३ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तींच्या परिच्छेद क्र. १५ नुसार भाडेपट्टयांचे नवीनीकरण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्याने | ज-६ कार्यासनामार्फत नाशिक जिल्हयातील जमिनविषयक बाबी हाताळल्या जातात. सदर परिच्छेदातील नाशिक जिल्ह्यातील मिळकतीशी संबंधित परिच्छेदात नमूद आक्षेपाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण आहे:-<br>महालेखापाल यांच्या सदर परिच्छेदामध्ये नाशिक जिल्ह्यातील एकूण एकोणीस (१९) शैक्षणिक संस्थांना क्रीडांगणासाठी प्रदान करण्यात आलेल्या जमिनींच्या भाडेपट्टयांचे नवीनीकरण शासनाने कालावधी संपण्याआधी न केल्याबाबत आक्षेप उपस्थित करण्यात आलेला आहे. क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या जागेसंदर्भातील संस्थानिहाय सविस्तर विवरणपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.<br>शैक्षणिक संस्थांना क्रिडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेल्या जागांच्या भाडेपट्टा मुदतवाढीसंदर्भात महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१८/प्र.क्र. ९१/ज-१, दि.१६.११.२०१८ अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार क्रीडांगण भाडेपट्टा मुदतवाढ देण्यासाठी सबंधित जिल्हाधिकारी हे सक्षम आहेत. सदर धोरणानुसार संबंधित संस्थांच्या क्रीडांगण भाडेपट्टा मुदतवाढीबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत जिल्हास्तरावर सुरू आहे. |

| परिच्छेद क्रमांक व विषय | स्पष्टीकरण |
|---|---|
| भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १३ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केलेली नाही.<br>• जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी १८.१७९ चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्ट्यावर दिली. (एप्रिल १९९७) हा भाडेपट्टा एप्रिल, २०१२ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद १५ नुसार भाडेपट्ट्याचे नवीनकरण न झाल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून ४ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>• जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी ८,००० चौमी जमीन १५ वर्षाच कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्ट्यावर दिली. (मार्च १९९४) हा भाडेपट्टा मार्च २००९ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद क्र. १२ नुसार भाडेपट्टा कालावधी संपल्यानंतर भाडेपट्टा संपुष्टात आले, असे मानावयास पाहिजे होते आणि जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्यानंतर ६ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>• जिल्हाधिकारी नाशिक यांनी ८००० चौमी जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रिडांगणासाठी भाडेपट्ट्यावर दिली. एप्रिल १९८८. हा भाडेपट्टा मार्च २००३ मध्ये संपला. वाटप आदेशाच्या अटी व शर्तीच्या परिच्छेद क्र. १३ नुसार भाडेपट्ट्याचे नवीनीकरण न झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी भाडेपट्टा संपल्याच्या तारखेपासून १३ वर्षापेक्षा जास्त अवधी उलटल्यावरही ही जमीन पुनर्ग्रहित केली नाही.<br>हे निदर्शनास आणल्या (फेब्रुवारी ते मे २०१६) जिल्हाधिकारी कोल्हापूर आणि सोलापूर यांनी नमूद केले (मे-सप्टेंबर २०१६) की संबंधित तहसीलदारांकडून या प्रकरणांचा तपास करण्यांत येईल आणि आवश्यक कारवाई करण्यात येईल. जिल्हाधिकारी, रायगड यांनी पुष्टी केली (सप्टेंबर २०१६) की संबंधित शिक्षण संस्थेने भाडेपट्टा कालावधी वाढविण्यासाठी आवेदन केले नव्हते, तथापि जमीन पुनर्ग्रहन न करण्याची कारणे देण्यात आली नाही. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे उत्तर अद्याप प्रतिक्षीत आहे.(फेब्रुवारी २०१७) | |

अ. अ. दळवी
( अनुष्का दळवी)
कक्ष अधिकारी

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवरील कार्यवाहीचे विवरणपत्र**

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक व विषय | वर्ष | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १ | **परिच्छेद क्रमांक ४.३.४ शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे**<br>**परिच्छेद क्रमांक ४.३.४.४ जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाई न करणे**<br>महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की वाटप आदेशातील शर्तीचे उल्लंघन झाल्यास शासनाने जमिनीचे पुनर्ग्रहण करावयास पाहिजे. यात असेही विनिर्दिष्ट आहे की ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर न झाल्यास, जिल्हाधिकाऱ्याने ठरविलेल्या तारखेपर्यंत जमिनीचे पुनर्ग्रहण करावयास पाहिजे.<br>६०,७०० चौ.मी. जमीन आदर्श विद्या प्रसारक संस्था, कुळगाव ला शैक्षणिक प्रयोजनासाठी वाटप करण्यात आली (जुलै १९६३). या जमिनीपैकी २४० चौ.मी. जमीन या संस्थेने एका बँकेस पोटभाडयाने दिली. म्हणून, तहसिलदार, अंबरनाथ यांनी शर्तीभंग चा प्रस्ताव तयार करुन उप विभागीय अधिकारी (SDO), उल्हासनगर यांना आवश्यक कारवाईसाठी पाठविला (जुलै २००७). परंतु, त्यानंतर SDO किंवा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आजपर्यंत याबाबतीत काणेतेही कारवाई केली नाही.<br>हे एप्रिल २०१६ मध्ये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या निदर्शनास आणण्यात आले, त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (फेब्रुवारी २०१७). | २०१५-२०१६ | मौजे कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील स.नं. ४२पै क्षेत्र ६०६९००.०० चौ.मी. पैकी क्षेत्र ६५६२.५१ चौ.मी. ही जमीन आदर्श विदया प्रसारक संस्था कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांना शासनाकडून शैक्षणिक प्रयोजनार्थ भाडेपट्टयाने देण्यात आली आहे. सदर जमिनीचा शैक्षणिक व वाणिज्य बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्जदार संस्थेने दि.०८/१२/२००४ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.१५/१०/२००७ च्या आदेशान्वये ६५६२.५१ चौ.मी. क्षेत्राची शैक्षणिक व वाणिज्य बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यात काही अटी व शर्तीवर परवानगी दिली आहे. सदर बिगरशेती आदेशातील अट क्र. २३ पाहता अर्जदार संस्था यांनी विषयांकीत जमिनीवरील बांधकामापैकी २५०-०० चौ.फुट क्षेत्र परस्पर दि जनता कल्याण सहकारी बँक यांना भाडेपट्टयाने दिल्याने सदरचा शर्तभंग नियमानुकुल करण्यासाठी दंड रक्कम रु.७२६३०, पावती क्र.१२, दि.१३/१०/२००७ अन्वये तहसिलदार, अंबरनाथ यांच्याकडे भरणा केल्याचे दिसून येते. |

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या दि. ३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावरील अहवालातील परिच्छेद क्र.४.४.१.१**
**परिशिष्ट-अ (नस्ती क्र.भानिम-२०१७/प्र.क्र.४८८/ज-७ (अ)**

| शिफारस क्र. | लोकलेखा समितीने उपस्थित केलेल्या शिफारशी | शासनाचे स्पष्टीकरणात्मक अभिप्राय |
|---|---|---|
| ४.४.१.१ | जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले (मे,२०१४) की, जिल्हाधिकारी, बीड यांनी मौ.गवारी, तहसील बीड मधील गट क्र.३५/१ ची ४९,५०० चौ.मी.शासकीय जमीन आगाऊ ताब्यासह महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड लातूर ला दिली (जुलै, २०१३) जिल्हाधिकारी, बीड यांनी सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) बीड यांनी सूचित केलेल्या परिगणनेनुसार रु.४०.२५ लाख भोगवटा किंमत वसूल केली.<br>सह जिल्हा निबंधक (वर्ग-१), बीड द्वारे परिगणित केलेल्या भोगवटा किंमतीची ASR २०१३ च्या सुचना २९ आणि उक्त GR च्या प्रावधानांप्रमाणे भोगवटा किंमत रु.५५.८३ लाख येते. अशाप्रकारे, चुकीचे टप्पा दर लावल्यामुळे रु.१५.५८ लाख भोगवटा किंमतीची कमी आकारणी झाली.<br>हे निदर्शनास आणल्यावर (मे, २०१४) जिल्हाधिकारी, बीड यांनी रक्कमेतील फरक वसूल करण्यात येईल असे नमूद केले. | बीड जिल्ह्यातील मौ.गवारी जि.बीड येथील ग.नं.३५/१ मधून ४.९५ हे.आर जमीन २२०/३३ के.व्ही उपकेंद्रासाठी दि.२०.०७.२०१३ रोजीच्या आदेशाने जिल्हाधिकारी, बीड यांनी मंजूर केली आहे. सदर प्रकरणाच्या लेखापरिक्षणामध्ये जमिनीचे भोगवटामूल्य रु.५५,८२,५००/- ऐवजी रु.४०,२५,०००/- वसूल केली असून फरकाची रक्कम रु.१५.५८ लक्ष वसूल करण्याबाबत लेखापरिच्छेद उपस्थित करण्यात आला आहे. सदर परिच्छेदातील फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडून महापारेषण कंपनीकडे वारंवार पाठपूरावा करण्यात आला आहे.<br>जिल्हाधिकारी, बीड कार्यालयांतर्गत अन्य एका प्रकरणामध्ये धानोरा (वाघळुज) येथील १३२ के.व्ही.उपकेंद्रासाठी महापारेषण कंपनीकडून भोगवटामूल्य रु.२४.०० लक्ष वसूल करण्यात आले होते. मात्र, जमीन देण्याचा सदर प्रस्ताव रद्द करण्यात आला. त्याअनुषंगाने, सदर भोगवटामूल्याची रु.२४.०० लक्ष एवढी रक्कम लेखापरिच्छेदातील रु.१५.५८ लक्ष फरकाच्या रक्कमेतून समायोजीत करण्याची विनंती महापारेषण कंपनीने केली होती. तथापि, मौ.गवारी. जि.बीड येथील जमिनीचे रु.४०,२५,०००/- एवढे भोगवटामूल्य लेखाशिर्ष ००२९१७७३०१ Land Revenue other receipt मध्ये भरणा करुन घेण्यात आली असून मौ.धानोरी वाघळुज येथील जमिनीचे रु.२४,००,०००/- लक्ष भोगवटामूल्य ००२९११६५०१ Land Revenue ८०० (०५) other मध्ये भरणा करुन घेण्यात आले आहे. सदर दोन्ही रकमा या वेगवेगळया लेखाशीर्षाखाली भरणा केल्या असल्यामुळे त्या समायोजीत करता येणे शक्य नाही. ही बाब महसूल विभागाने ऊर्जा विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने सदर बाब महापारेषण कंपनीस दि.१०.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविली व सदर रक्कम रु.१५,५७,५००/- ही रक्कम जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडे जमा करण्याबाबतची कार्यवाही करण्यास कळविले आहे.<br>त्याअनुषंगाने सदर प्रकरणी मौ.गवारी, ता.बीड येथील ग.नं.३५/१ मधून २२०/३३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी ४.९५ हे.आर जमिनीची तफावत किंमत रु.१५,५७,५००/- शासन खाती जमा करण्याचा प्रस्तावास मुख्य अभियंता, महापारेषण, कं, मुंबई यांनी मान्यता दिली असून सदर रक्कम शासन खाती जमा केली जाणार असल्याची हमी दि.१९.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महापारेषण कंपनी यांनी दिली आहे. |

मा.म.साठे

(मा.म.साठे)
कक्ष अधिकारी

**महालेखाकार (लेखापरीक्षा)-II नागपूर कार्यालयाकडून प्राप्त सन २०१५-१६ या वर्षातील Short levy of Occupancy Price या विषयावरील परिच्छेद क्र.४.४.१.२ बाबत शिफारशीवर कार्यवाही करणेबाबत**

| प्रारुप परिच्छेद क्र. | उपस्थित परिच्छेदाचा तपशिल | शासनाने केलेली कार्यवाही | मा.महालेखाकार (लेखापरीक्षा )-II नागपुर यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| ४.४.१.२ | तहसिलदार, आंबेगाव यांच्या कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले (जानेवारी २०१५) की महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग, मुंबई ने मौजा तांबडेमळा, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे येथील गट क्र. २८/१/अ ची दोन हेक्टर (२०,०००चौ.मी.) शासकीय जमीन आगऊ ताब्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ, पुणे ला दिली ( फेब्रुवारी २०१३) विभागाने रू. १७.५० लाख भोगवटा किंमतीची वसुली केली (ऑगस्ट २०१३).<br>याशिवाय, असे आढळले की भोगवटा किंमतीची परिगणना करतांना विभागाने खुल्या जमिनीचे दर रु.२५० प्रति चौमी. (म्हणजेच रु.५०० चे ५०%) इतके कमी केले अणि अंकगणितीय चुकी करुन बाजार मुल्य रु. ३५ लाख काढले आणि पुन्हा त्यालाही ५० टक्क्यांनी कमी केले आणि रु. १७.५० लाख इतकी भोगवटा किंमत परिगणित केली. ASR २०१३ च्या सुचना २९ अनुसार आणि वर नमुद कलेल्या GR प्रमाणे भोगवटा किंमत रु.३५.५० लाख असावयास पाहीजे होती. अशाप्रकारे, चुकीच्या | शासन ज्ञापन क्र.जमीन ३०१२/१११/प्र.क्र.पु.१८/ज-५, दि.०७/०२/२०१३ अन्वये मौजे तांबडेमळा, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील गायरान जमीन ग.नं.२८/१अ क्षेत्र २ हेक्टर मंचर ता. आंबेगाव महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रस्तावित आगारासाठी विभाग नियंत्रक राज्य महामंडळ, पुणे यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने तहसिलदार यांनी सन २०१३ च्या मुल्यांकनानुसार प्रतिग्राही यांच्याकडून रक्कम रु.१७,५०,०००/- वसूल करुन जागेचा ताबा संबंधितांना देण्यात आलेला आहे.<br>परंतु तत्कालीन बाजार भावानुसार जागेचे एकूण मुल्यांकन रु.७०,००,०००/- होत असून त्या रक्कमेच्या ५०% रक्कम म्हणजेच रु.३५,००,०००/- अपेक्षीत होते, असा आक्षेप मा.महालेखाकार, नागपूर यांच्या कार्यालयाने उपस्थित केलेला आहे. त्यानुसार प्रतिग्राही यांनी यापूर्वी भरलेली रु.१७,५०,०००/- इतकी रक्कम वजा जाता उर्वरीत रु.१७,५०,०००/- एवढी रक्कम दि.०५/०५/२०१६ अन्वये | No Remarks. |

कक्ष अधिकारी

महसूल व वन विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| | | | |
|---|---|---|---|
| | परिगणनेमुळे रु. १८ लाख (रु.३५.५०लाख-रु. १७.५० लाख) भोगवटा किंमतीची कमी आकारणी झाली.<br>हे निदर्शनास आणल्यावर (जानेवरी २०१५ आणि डिसेंबर २०१५) तहसीलदार आंबेगाव, यांनी नमूद केले (जानेवारी २०१५) की विभागीय आयुक्त पुणे विभाग आणि जिल्हाधिकारी, पुणे यांचेशी विचार विनिमय करुन अहवाल पाठविण्यात येईल.<br>वरील बाब जून २०१६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यांचे उत्तर प्रतीक्षित होते(फेब्रुवारी २०१७). | शासकीय कोषागारात जमा केलेली आहे (चलनाची प्रत सोबत जोडलेली आहे).<br>तथापि, आता मा.महालेखाकार, नागपूर-II यांचेकडील पत्र दि.१७/०६/२०१६ अन्वये सदरची भोगवटा किंमत ही रु.१८,००,०००/- (३५.५० लाख-१७.५० लाख) वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार प्रतिग्रहीता विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे यांना उर्वरीत रु.५०,०००/- इतकी रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले असून सदरची रक्कम वसूल करण्यासंदर्भात आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे.<br>तरी सदर प्रकरणी मा. महालेखापाल नागपुर यांनी निर्देशीत केल्यानुसार प्रस्तुतच्या परिच्छेदातील मूळ रक्कमेच्या १०% पेक्षा जास्त रक्कम वसुल करण्यात आली असल्याने उक्त परिच्छेदास स्विकृती मिळुन सदर परिच्छेद वगळण्याची विनंती आहे. | |

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

| भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल | | | | |
|---|---|---|---|---|
| परिच्छेद क्र. | विषय | स्पष्टीकरण | महालेखापाल यांचे अभिप्राय | महालेखापाल यांच्या अभिप्रायावर विभागाने केलेली कार्यवाही |
| ४.४.२ | **बोलीदारांकडून लिलाव रक्कमेवरील मूल्यवर्धित कराची (VAT) कमी वसुली-**<br>**१० टक्के दराने VAT ची वसुली स्त्रोतातून न करता रेती उत्खननाचे हक्क बहाल केल्यामुळे VAT ची रू.१६.१८ लाखाची कमी वसूली झाली.**<br>महाराष्ट्र शासन, वित्त विभागाने अधिसूचित केले (फेब्रुवारी २०१३) की १५ फेब्रुवारी २०१३ पासून महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम ३१ (A)(१)(a) च्या प्रयोजनार्थ लिलाव रक्कमेच्या १० टक्के दराने ज्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस रेती उत्खननाचा हक्क दिला असेल अशा यशस्वी बोलीदारांकडून रेती उत्खननासाठी ठरवून दिलेल्या रक्कमेशिवायची रक्कम ज्याच्या अधिकारितेत ते क्षेत्र येत असेल, त्या जिल्हाधिकाऱ्याने वसूल करावयास पाहिजे.<br>जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले (मे २०१५) की जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी मार्च २०१३ ते सप्टेंबर २०१४ दरम्यान रेती घाटांचे ई-लिलाव केले आणि दोन यशस्वी बोलीदारांना निर्देशित (designated) क्षेत्रातून रेती उत्खननाचे | नंदुरबार जिल्ह्यातील सन २०१३-१४ या कालावधीत मूल्यवर्धीत कराची (VAT) एकूण रू. १६,१७,६२२/- एवढी रक्कम वसूल करावयाची होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी नंदूरबार यांनी मे. एकता कंपनी प्रो. प्रा. लियाकत अहमद फरीद अहमद यांचेकडून मूल्यवर्धित कराची रक्कम रू. ७,६७,५००/- दि.१६/०१/२०१७ च्या चलनाद्वारे विक्रीकर विभागाकडे जमा करण्यात आली आहे.<br>तसेच दुसरे लिलावधारक श्री. सचिन रामचंद्र थोरात यांचेकडून मूल्यवर्धीत करापोटी रू. ८,५०,१२२/- वसूल करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडून करण्यात येत आहे. | **Following rearks may be offered:**<br>1) An amount of Rs.7.67 lakh has been recovered from M/s Ekta Company. In view of recovery no further comments.<br>2) Further progress of recovery of VAT amount of Rs.8.50 lakh from Shri Sachin Ramchandra Thorat by Collector, Nandurbar may be intimated to PAC. | श्री. सचिन रामचंद्र थोरात यांचेकडून मूल्यवर्धीत करापोटी रू. ८,५०,१२२/- वसूल करावयाची असून श्री. थोरात यांचे वास्तव्य शिरगाव, ता. वाळवा, जि. सांगली येथे असून त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता सांगली जिल्ह्यात आहे. त्याअनुषंगाने उक्त थकित वसूली महाराष्ट्र जमीन महसूलाच्यां वसूलीबाबत नियम, १९६७ मधील नियम १७ (२) जमीन महसूलाची थकबाकी (आर.आर.सी. वसूली अंतर्गत) वसूल करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी, नंदूरबार यांनी जिल्हाधिकारी, सांगली यांना कळविण्यात आले असून, जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून वसूलीची कार्यवाही सुरू आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | हक्क बहाल केले. दोन बोलीदारांकडून रू.३२३.५२ लाख लिलाव रक्कम आणि त्यावरील रू. १६.१७ लाख मूल्यवर्धीत कर वसूल करण्यात आले.<br>लिलाव रक्कमेच्या १० टक्के दराने मूल्यवर्धित कर वरूल करावयास पाहिजे होता. जिल्हाधिकारी, नंदूरबार यांनी रू.१६.१८ लाख (रु. ३२.३५ लाख रक्कमेच्या तुलनेत रु. १६.१७ लाख वसूल झाले) मूल्यवर्धित कर कमी वसूल केला.<br>ही बाब जून २०१६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यावर उत्तर प्रतीक्षित होते. (फेब्रुवारी २०१७). | | | |

(ग.ध.दाभिळकर)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

**भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रावर अहवाल**

| परिच्छेद क्र व तपशिल | शासनाचे अभिप्राय |
|---|---|
| परिच्छेद क्र.४.४.३ **अनर्जित उत्पन्नाची कमी वसूली ( ASR प्रमाणे बाजारमूल्याचे परिगणन न केल्यामुळे रु. ५७.६९ लाख अनर्जित उत्पन्नाची कमी वसूली झाली)**<br>महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानूसार (सप्टेंबर १९८३) भोगवटादाराने निव्वळ अनर्जित उत्पन्नाच्या ५० टक्के रक्कम म्हणजेच चालू बाजार मूल्य आणि विक्रीव्दारे संपादीत केलेली रक्कम यांच्यातील फरकाच्या ५० टक्के, यापैकी जी अधिक असेल, ती रक्कम शासनाला अदा करावी. तसेच, महसूल व वन विभागाव्दारे निर्गमित परिपत्रकानूसार (जुलै २०१२) वर्ग- II जमिनीचे वर्ग- १ जमिनी (इनाम/वतन जमीनं) कृषितर प्रयोजनासाठी रूपांतर करावयाचे असल्यास बाजार मूल्याच्या ५० टक्के इतकी रक्कम नजराणाअनर्जित/ उत्पन्न म्हणून अर्जदाराकडून वसूल करावयास पाहिजे.<br>तहसिलदार करवीर यांच्या कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले (जानेवारी २०१६) की कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर (KMC) यांच्या कार्यक्षेत्रातील कसबा बावडा, ईवॉर्ड-, येथील सुधारित सर्वे क्र.९११/C ची ३,१०९ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या इनाम/वतन जमिनीच्या भोगवटादाराने ही जमिन रस्त्याच्या विकास प्रकल्पात येत असल्यामुळे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करिता KMC कडे आवेदन केले (जून २०१३) आयुक्त, KMC यांनी तहसिलदार, करवीर यांना वरील जमिनीच्या रूपांतरणाकरीता भोगवटादाराकडून नजराणा रक्कम वसूल करण्याचे निर्देश दिले (डिसेंबर २०१४) त्यानूसार तहसिलदार करवीर यांनी जमिनीचे बाजार मूल्य रू.१२.०९ लाखावर ५० टक्के इतके नजराणा /अनर्जित उत्पन्न रू.६.०४ लाख वसूल केले (एप्रिल २०१५) बाजार मूल्याच्या परिगणनेचे तपशीत दस्तावेजात आढळले नाही.<br>वरील जमिनीच्या हस्तांतरणाकरीता भोगवटादार आणि KMC यांच्यात निष्पादीत (जून २०१३) दस्तावेजांच्या पठनानूसार, विभागाने परिगणीत केलेल्या रू.१२.०९ | मौजे- कसबा बावडा, ई वॉर्ड, जि. कोल्हापूर येथील सर्व्हे नंबर ९११/सी, ३१०९ चौ.मी. क्षेत्र जागेचे हस्तांतरण करतेवेळी ASR प्रमाणे बाजारमूल्याचे परिगणन न केल्यामुळे रु. ५७.६९ लाख अनर्जित उत्पन्नाची कमी वसूली झाली या परिच्छेदाचे अनुषंगाने सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करणेत आलेली असून वसूली बाबतच्या चलनाची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे. तरी उपरोक्त नमूद केले परिच्छेदामधील वस्तुस्थितीचे अवलोकन होऊन सदरचा परिच्छेद स्वीकृत होणेस विनंती आहे. |

| | |
|---|---|
| लाख मूल्याच्या ऐवजी ASP २०१३ नूसार जमिनीच्या बाजार मूल्याचे मूल्यांकन रू.१.२७ कोटी होते. त्यामुळे रू. ६.०४ लाख ऐवजी रू.६३.७४ लाख नजराणा /अनर्जित उत्पन्न वसूली योग्य होते. परिणामी रू.५७.६९ लाख (रू.६३.७४ लाख-६.०४ लाख) नजराणा /अनर्जित उत्पन्नाची कमी वसूली झाली. हे निदर्शनास आणून दिल्यावर (जानेवारी २०१६) तहसिलदार करवीर यांनी अभिक्षण मान्य केले (जानेवारी २०१६) तथापि, वसूली बाबत सद्यस्थिती कळविण्यात आली नाही.<br>हि बाब जून २०१६ मध्ये विभागाच्या तसेच शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यांचे उत्तर प्रतिक्षित होते (फेब्रुवारी २०१७) | |

Desk Officer,
Revenue and Forest's Department
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai - 400 032.

**साक्ष :**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावरील अहवालातील परिच्छेद क्र.४.३ व ४.४ यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक २७ डिसेंबर, २०१८ व ९ जानेवारी, २०१९ रोजी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**परिच्छेद क्रमांक ४.३.१-भाडेपट्टा कमी आकारणी :**

साक्षीच्यावेळी भाडेपट्टा कमी आकारणी या संदर्भात थोडक्यात माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, मौजे कदमवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील सर्व्हे नं. २१५ संदर्भातील हा परिच्छेद आहे. ही जमीन भारती विद्यापीठाला क्रीडांगणासाठी प्रदान करण्यात आली होती. या जमिनीचा भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतर शासनाने त्याचे नुतनीकरण केले होते. महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार यामध्ये ५.९३ लाख रुपये वार्षिक भाडेपट्टा फिक्स होतो आणि सन २००६-०७ ते २०१५-१६ पर्यंत १० वर्षाकरिता ५९.३४ लाख रुपये वसूल करावयास पाहिजे होती. मात्र विभागाने १ रुपया प्रती वर्ष अशा चुकीच्या दराने ३० रुपये भाडेपट्टा वसूल केलेला आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३० रुपये ३० वर्षासाठी आहेत. ही जी रक्कम आहे ती १० वर्षाकरिता आहे. स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, " त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना कळविण्यात येत आहे." या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाने सन २०१४ मध्ये नुतनीकरणाचा आदेश काढला होता. आदेशामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले होते की, भाडेपट्टा संपुष्टात आल्यापासून भाडेपट्टट्ट्याच्या पुढील कालावधीसाठी शासन निर्णय दिनांक ३०.०६.१९९२ मधील तरतुदीनुसार वार्षिक भाडे आकारुन पुढील ३० वर्षासाठी भाडेपट्टट्ट्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. शासनाने भाडेपट्टा संपुष्टात आल्यापासून पुढील ३० वर्षाकरिता मुदतवाढ दिली होती. शासनाने सन २०१४ मध्ये आदेश काढलेले आहेत. दिनांक ३०.६.१९९२ रोजीच्या शासन निर्णयानुसार जमीन मंजुरीचा जो दिनांक असेल त्याच्या ५ वर्षापूर्वी १ जानेवारी रोजी जे मूल्यांकन असेल त्याच्या ५० टक्के असे मुख्य समजायचे आणि त्यावर ८ टक्के प्रमाणे व्याजाची आकारणी करावयाची आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

भाडेपट्ट्याचे प्रदान करण्यास विलंब झाला तर व्याजाची आकारणी करावयाची आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, व्याज आकारणी करावयाची नाही. भाडे आकारणीकरिता पीएलआर ८ टक्के गृहीत धरावयाचा आहे. कारण, ही जमीन भाडेपट्टट्ट्याने दिलेली आहे. यामध्ये महालेखाकारांनी असा अर्थ काढलेला आहे की, ज्याअर्थी शासनाने सन २०१४ मध्ये नुतनीकरण केले आहे त्याअर्थी सन २०१४ पासून ५ वर्षापूर्वी म्हणजे सन २००९ मधील किंमतीच्या ५० टक्के आणि त्यावर ८ टक्के आकारणी करून ५९ लाख ३४ हजार रुपयांची परिगणना केलेली आहे. सन २०१४ च्या आदेशामध्ये नमूद केलेले आहे की, भाडेपट्टा संपुष्टात आल्यापासून हे करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन १९९२ च्या शासन निर्णयामध्ये काय नमूद आहे? अशी विचारणा समितीने केली असता, जमीन मंजुरीच्या तारखेपासून ५ वर्षापूर्वीच्या बाजारमुल्याच्या, असे शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सन २०१४ मध्ये जमीन भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी दिली आहे काय? जमीन भाडेपट्टट्ट्यास मंजुरी केव्हा देण्यात आली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१४ मध्ये जमीन भाडेपट्टट्ट्याने देण्यास मंजुरी दिलेली नसून सन २००६ पासून जमीन भाडेपट्टा नुतनीकरण करण्यात आले आहे. सन १९९१ मध्ये प्रथम जमीन भाडेपट्टट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तेव्हापासून १५ वर्षाकरिता उक्त जमीन भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. सदरहू कालावधी सन २००६ मध्ये संपला होता. सन २००६ नंतर उक्त जमीन भाडेपट्ट्याने देण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. शासनाने उक्त मुदतवाढ आदेश सन २०१४ मध्ये काढलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त लेखा आक्षेप भुईभाडेपट्टा वसुली प्रकरणीचा आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखाकार यांचे मत आहे की, सन २०१४ पासून ५ वर्ष अगोदरपासून वसुली केली पाहिजे परंतु महसूल विभागाचे मत आहे की, सन २००६ पासून मुदतवाढ देण्यात आली असून तेव्हापासून ५ वर्षे मागे म्हणजे सन २००१ पासून जमीन मुल्यांकनाच्या आधारे वसुली केली पाहिजे, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २००६ पासूनची भाडेपट्टा मुदतवाढ मंजुरी सन २०१४ मध्ये देण्यात आली आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सन २०१४ मध्ये भाडेपट्टा नुतनीकरण आदेश काढण्यात आले आहेत. सन २००६ पूर्वीच्या ५ वर्षे अगोदरच्या जमीन मुल्यांकनाच्या दराने वसूल करावे लागेल असे सांगितले.

विभागाने १ रुपये दराने वसुली केली आहे, ही बाब चुकीची आहे काय? अशी विचारणा करून, सन २००६ पासून ५ वर्षे म्हणजे सन २००१ मधील जमीन मुल्यांकनानुसार भुईभाडे दर आकारण्यात यावेत. असे समितीने सूचित केले असता, महसूल विभागाने अनुपालन अहवालामध्ये सादर केले आहे की, सदरहू प्रकरणी वसुली करण्यास कळविण्यात येईल व ती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येईल. अद्यापपर्यंत वसुली केली नाही, ही बाब मान्य आहे. १ रुपये दराने करण्यात आलेली वसुली चुकीची आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाने वसुली करण्यास सांगितल्यानंतर आतापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाने काहीच वसुली केली नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, अद्याप कळविलेले नाही. आजच्या साक्षीच्या अनुषंगाने महालेखाकार कार्यालयासमवेत असलेला मतभेद समितीसमोर आणावयाचा होता. आजच्या बैठकीमध्ये निर्णय झाल्यानंतर वसुली करण्यास कळविण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Lease expired in the year 2006. The G.R. should have been applied when it started again after the expiry. असे मत महालेखापालांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, The G.R. will be applicable from the date of renewal. The date of renewal is 2006, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००६ से २०१४ तक वे लैंड ऐसे ही युज कर रहे थे. विभागने सन २०१४ में ॲक्च्युअली किया तो विभागने इसको सन २००६ पकडा. महालेखापालका कहना है कि इसे सन २०१४ पकडना चाहिए, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००६ पासून नुतनीकरण करण्यात आले आहे, असे शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या संस्थेकडे भाडेपट्टा जमिनीचा ताबा सन २००६ मध्ये होता त्यांनी १ वर्ष अगोदर भाडेपट्टा नुतनीकरणासाठी अर्ज सादर केला होता काय? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रश्नाचे उत्तर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. शासन निर्णयामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, क्रीडांगणासाठीच्या भाडेपट्ट्याची मुदत सन २००६ मध्ये संपलेली असल्याने व त्यानंतर संस्था अनाधिकाराने क्रीडांगणाच्या जमिनीचा वापर करीत असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० नुसार भाड्याच्या रकमेव्यतिरिक्त २ हजार रुपये प्रतिमहा दंड आकारण्यात यावा. सदरहू संस्थेने भाडेपट्टा नुतनीकरणास ८ वर्ष विलंब केला त्याकरिता दंड आकारण्यात आला आहे. सदरहू विलंबाचा विचार शासनाने केला होता. महालेखाकार कार्यालयाने सन २००९ पासून टीएलआर दराने वसुली करण्याचा लेखा आक्षेप काढलेला असून तो योग्य नाही. सदरहू वसुली सन २००६ पूर्वीचे ५ वर्ष म्हणजे सन २००१ पासून बाजार मुल्यांकनानुसार वसूल केले पाहिजे. It has to be reworked, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाचे मत मान्य आहे परंतु शासनाने उक्त प्रकरणी वसुलीची नोटीस दिल्याचे नमूद केले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, जिल्हाधिकारी यांनी ड्राफ्ट पॅराच्या आधारावर नोटीस दिली होती, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदरहू लेखा आक्षेप अनेक प्रकरणांमध्ये काढण्यात आलेला आहे. कोणत्याही संस्थेने वेळेत भाडेपट्टा नुतनीकरण केला नाही. आता सन २०१८ मध्ये सदरहू प्रकरणी शासनाने धोरण जाहीर केले आहे. त्याबाबत समितीचे काही मत नाही. भुईभाडे भाडेपट्टा विहीत कालावधीत नुतनीकरण न केल्यामुळे संबंधित संस्थेकडून सन २०१४ च्या की सन २००६ च्या दराने भुईभाडे वसूल करावयाचे, हा मुद्दा आहे. सदरहू भुईभाडे सन २००९ पासून घ्यावयाचे की सन २००६ पासून घ्यावयाचे, महालेखाकार यांचे मत आहे की, सन २००९ पासून नव्हे तर सन २०१४ पासून आकारण्यात यावे. सन २००१ मधील दरानुसार वसुली करण्यात यावी, असे समितीचे मत आहे. याबाबत समितीशी चर्चा झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. त्यापूर्वी प्रधान महालेखाकार यांचे मत जाणून घ्यावे. जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्ष आधीच्या, असे सन १९९२ मधील शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. जमिनीचा संदर्भातील निर्णय सन २००६ पासून देण्यात आला आहे. परंतु सदरहू प्रकरणी सन २०१४ मध्ये आदेश काढण्यात आला आहे. जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्ष आधीच्या वर्षाच्या दिनांक १ जानेवारी रोजी अस्तित्त्वात असलेल्या बाजार मुल्याच्या ५० टक्के, असे शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले असे महालेखाकार यांचे मत आहे.

शासन निर्णयामध्ये २ हजार रुपये दंड आकारल्याचे नमूद केले आहे. सदरहू प्रकरणी विलंब क्षमापित केला आहे. But allotment of land was in 2014. सदरहू संस्थांनी भाडेपट्टा नुतनीकरण केला नाही म्हणून त्यांच्याकडून प्रतीवर्ष २ हजार रुपये दंड आकारला आहे. परंतु सन २००६ मध्ये संस्थेने नुतनीकरणाची मागणी केली व पैसे नाही भरले तर २ हजार रुपये दंड देय होतो. सदरहू संस्थेचा भाडेपट्टा संपल्यानंतर तीच संस्था पुन्हा जमीन भाड्याने घेईल, असे समिती गृहीत धरू शकत नाही. यदि लीज समाप्त होता है तो वही वापस लीज मांगेगा इसकी गॅरंटी समिती नहीं दे सकते. त्यांनी रेकॉर्डवर भाडेपट्टा पुन्हा नुतनीकरण करून द्यावा, अशी मागणी केली असेल. त्यामुळे सन २०१४ मधील दर लागू होतो. सदरहू प्रकरणी सर्व संस्थांचा क्षमापित केला आहे. अशीच प्रकरणे आणखी अनेक संस्थांची आहेत. अनेक ट्रस्ट किंवा शासनाकडून विहीत कालावधीत नुतनीकरण करण्यात आले नाही. ट्रस्टकडून मागणी करण्यात आली असली तरी शासनाकडून वेळेत

भाडेपट्टा नुतनीकरण करण्यात आला नाही. दोघांपैकी कोणाकडूनही विलंब झालेला असू शकतो. त्यामुळे याप्रकरणी समितीने विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करून. सदरहू विलंब क्षमापित करताना उक्त जागेचा वापर दिलेल्या प्रयोजनासाठी करण्यात आला होता, याची खातरजमा करण्यात आली होती का? त्या प्रयोजनासाठीच वापर झाला आहे, हे तपासले आहे काय? मुंबईमध्ये इतर प्रयोजनासाठी वापर करण्यात येतो. त्यामुळे २ हजार रुपये दंड आकारताना काही खातरजमा करण्यात आली होती का? महालेखाकार यांच्या म्हणण्यानुसार काही प्रकरणी वसुली करण्यात आली आहे काय? अशी विचारणा करून जर केली असेल तर विभागाचे म्हणणे मान्य केल्यास त्यांच्यावर अन्याय होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू जमीन क्रीडांगणाच्या प्रयोजनासाठी भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. अद्याप वसुली झालेली नाही. या साक्षीनंतर उक्त प्रकरणी झालेल्या निर्णयानुसार वसुली करण्यास निर्देश देण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २००१ किंवा नुतनीकरणाच्या ५ वर्षे आधीच्या बाजारमुल्यानुसार वसुली करण्याची बाब मान्य करण्यात यावी. सदरहू निर्णय उक्त काही संस्थासह सर्व संस्थाना लागू करण्यात यावा, असे मत समितीने व्यक्त केले असता, क्रीडांगणासाठी देण्यात येणाऱ्या जमिनीच्या नुतनीकरणासंदर्भात अद्यापपर्यंत धोरण तयार करण्यात आले नव्हते. आता दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजी क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीचे धोरण तयार करण्यात आले आहे. त्याकरिता जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. यापूर्वी धोरण नसल्याने प्रत्येक प्रकरणी प्रकरणपरत्त्वे निर्णय घेण्यात आला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू प्रकरणी विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन निर्णय घेण्यात यावा. कारण हा Interpretation चा मुद्दा आहे. असे समितीने सूचित केले असता, उक्त प्रकरणी समितीने निर्णय दिला तर बरे होईल. सदरहू प्रकरणी महालेखाकार यांनी लेखा आक्षेप काढलेला आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू संस्थेने सन २०१४ मध्ये भाडेपट्टा नुतनीकरण करण्यासाठी अर्ज सादर केला होता का? प्रशासनाने तीच संस्था सदरहू जमीन भाडेपट्ट्याने घेणार असे गृहीत धरून वसूल करावयाच्या दंडाची रक्कम निश्चित केली आहे. सदरहू जमीन सन २०१४ मध्ये भाडेपट्ट्याने दिली असती तर कोणता दर आकारण्यात आला असता? सदरहू संस्थेने भाडेपट्टा नुतनीकरण करण्यास अर्ज देखील सादर केला नाही. सन १९३२ पासून रयत शिक्षण संस्थेने जमीन भाडेपट्टा नुतनीकरण केला नाही. It should be applicable from the date of renewal and not from the date of order. सदरहू रकमेची वसुली करण्यात यावी. असा निदेश समितीने दिले असता, आता शासनाने धोरण तयार केले असल्याने यापुढे त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदरहू धोरणाच्या पूर्वीच्या प्रकरणांचा प्रश्न होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्रमांक ४.३.२ अनर्जित उत्पन्नाची कमी आकारणी**

या परिच्छेदाबाबत कोणत्या नियमानुसार अनर्जित रक्कम १० टक्के वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे? अशी विचारणा समितीने केली असता, मौजे वरप, ता. पेण, जि. रायगड येथील स.नं.११३ पैकी ३ एकर जमीन आदिवासी आश्रमशाळा रानपाखरे या संस्थेच्या ताब्यामध्ये होती. उक्त आश्रमशाळा आदिवासी विकास विभागाने दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई या संस्थेस हस्तांतरित केली आहे. त्यानुषंगाने महसूल विभागाने दिनांक ७ जून, २००८ रोजीच्या आदेशान्वये उक्त जमीन हस्तांतर प्रकरणी १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करून परवानगी दिली आहे. महालेखाकार यांनी लेखा आक्षेपामध्ये दिनांक ८ सप्टेंबर, १९८३ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे. त्यानुसार ५० टक्के रक्कम वसूल करण्यात आली नाही, असा लेखा आक्षेप काढण्यात आला आहे. सदरहू शासन निर्णय कृषि जमिनीस लागू आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्यासंदर्भात शासन निर्णय आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, प्रकरणपरत्त्वे उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे की, चॅरिटेबल प्रयोजनासाठीची जमीन त्याच प्रयोजनासाठी दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित करण्यात आली आहे. पूर्वीची व आताची या दोन्हीही संस्था चॅरिटेबल आहेत. त्यामुळे शासनाने १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. सदरहू निर्णय सन २००६ मध्ये घेण्यात आला असून त्यावेळी कोणत्याही शासन निर्णयाचा भंग करण्यात आला नाही, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्याची शासनास मुभा नाही. कोणत्याही नियम नसताना अशा पद्धतीचा निर्णय कसा घेता येईल? सदरहू संस्थेने नियमानुसार देय रक्कम अदा करण्यात येईल, असे शपथपत्र संस्थेने सादर केले आहे. तरी देखील विभाग उक्त रक्कम योग्य असल्याचे विभाग समर्थन करीत आहे. शासनाने १० टक्के एवढीच रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. कशाच्या आधारे १० टक्के रक्कम वसूल

करण्यात आली, ती १० पेक्षा कमी किंवा अधिक टक्के का वसूल करण्याचा निर्णय का घेण्यात आला नाही? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकार यांनी ५० टक्के रक्कम वसूल करण्याचा जो आधार नमूद केला आहे तो उक्त प्रकरणी लागू नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशाच पद्धतीने आश्रमशाळेच्या जमिनी हस्तांतरित करताना ५० टक्के अनर्जित रक्कम वसूल केल्याची १० प्रकरणे दाखविणे शक्य आहे विभागाने उक्त प्रकरणी १० टक्के अनर्जित रक्कम कशाच्या आधारे वसूल केली? सदरहू निर्णय घेताना नमूद करण्यात आले आहे की, सवलतीच्या कब्जे हक्काने अथवा भोगाधिकार मूल्यरहीत किंमतीची जमीन प्रदान करण्यात आली असेल अशा प्रकरणी जमिनीची विक्री / हस्तांतरित करावयाची झाल्यास किती अनर्जित रक्कम घ्यावयाची याबाबतचे धोरण स्पष्ट नाही. त्यामुळे उक्त प्रकरणी हस्तांतरित किंमतीच्या १० टक्के रक्कम तूर्त अनर्जित रक्कम म्हणून परिवर्तन ८४ या संस्थेकडून वसूल करण्यात यावी व संस्थेकडून हमीपत्र घेण्यात यावे की, भविष्यात यासंदर्भात शासन जे धोरण ठरविल ते संस्थेस मान्य असेल व त्या धोरणानुसार संस्था अनर्जित रक्कम जमा करील. शासनाने अशा पद्धतीने निर्णय घेतला आहे. त्यावेळी कोणते धोरण नव्हते, या विषयी धोरण नसेल तर कोणत्या प्रस्थापित नियमानुसार पैसे वसूल केले पाहिजे? कब्जेदारी किंवा वहिवाट याचा उल्लेख करण्यात आला आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी निर्णय घेण्यात येईल, असे Exit Conference मध्ये कबूल केले आहे. कब्जेदारी किंवा वहिवाट यापैकी उल्लेख असेल तर अनर्जित रक्कम वसुली संदर्भात शासनाने निर्णय घ्यावयाचा आहे. "रानपाखरे" या संस्थेकडून "पवार पब्लिक ट्रस्टने" जमीन घेतली असेल तर त्यावर त्यांचा कब्जा नसेल कारण ती नंतर हस्तांतरित झाल्यामुळे वहिवाटीचा प्रश्न उद्‌भवत नाही. दोन्ही संस्था वेगवेगळ्या आहेत. विभागाने रेकॉर्डवर सांगितले आहे की, एक चॅरिटेबल ट्रस्ट दुसऱ्या चॅरिटेबल ट्रस्टला त्याच प्रयोजनासाठी जमीन हस्तांतरण करू शकते. परंतु हा आधार होऊ शकत नाही. उक्त संस्था १० टक्के अनर्जित रक्कम देण्यावर ठाम नव्हती. त्यांचे म्हणणे होते की, शासन जो काही निर्णय घेईल तो त्यांना मान्य असेल, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू प्रकरणी शासनाचे सुस्पष्ट धोरण नसल्याने प्रकरणपरत्त्वे १० टक्के अनर्जित रकमेबाबत शासनाने निर्णय घेतला, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावेळी कोणतेही धोरण नव्हते का? सदरहू निर्णय सशर्त घेण्यात आला होता. अशी विचारणा समितीने केली असता, सदरहू माहिती घेताना नमूद करण्यात आले आहे की, १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करावी. सदरहू निर्णय सशर्त घेण्यात आला उक्त प्रकरणी भविष्यामध्ये शासनाने धोरण तयार केले तर, त्यानुसार पैसे भरण्यास संस्था तयार असेल अशा आशयाचे लेखी हमी देण्याचे आदेश काढण्यात आले होते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदरहू प्रकरणी शासनाने धोरण तयार केले आहे काय? शासनाचे सामान्य धोरण काय आहे? एक धर्मादाय संस्थाकडून दुसऱ्या धर्मादाय संस्थेस हस्तांतरण करता येते का? त्यासाठी धर्मादाय आयुक्त यांची परवानगी आवश्यकता असते का? अशी विचारणा समितीने केली असता, एका धर्मादाय संस्थेकडून दुसऱ्या धर्मादाय संस्थेला त्याच प्रयोजनासाठी हस्तांतरण करण्यात येत असेल, धर्मादाय संस्था जमीन भोगवटादार हक्काने धारण करीत असेल तर जिल्हाधिकारी किंवा शासनाच्या परवानगीशिवाय हस्तांतरित करता येत नाही. उक्त धर्मादाय संस्थेने हस्तांतरण प्रकरणी शासनाची परवानगी घेतली होती व त्यानुसार त्यांनी हस्तांतरण केले आहे. त्यावेळी ठराविक प्रकरणांच्या संदर्भात धोरण नसल्याने शासनाने तूर्त १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला होता. सदरहू प्रकरणी ५० टक्के रक्कम वसूल केली पाहिजे, असे महालेखाकार यांचे मत आहे. विभागाच्या मते उक्त आग्रह योग्य नाही. कारण आज रोजीपर्यंत ५० टक्के रक्कम वसूल करण्यासंदर्भात शासनाने धोरण तयार केले नाही. भोगवटादार-२ च्या शर्तीच्या जमिनी हस्तांतरण होत असतील तर ५० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्याबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, १९५७ रोजीचे शासनाचे धोरण आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शासनाने धर्मादाय संस्थांना उक्त प्रकरणी नवीन दर आकारण्याचा निर्णय आतापर्यंत घेणे आवश्यक होते. शासनाने नियम तयार केले नाही तर प्रस्थापित नियमानुसार पैसे वसूल केले पाहिजेत. सन २००८ पासून सन २०१८ पर्यंत विभागाने याबाबत कोणताही नियम केलेला नाही. त्यामुळे संबंधित अधिकारी मनाप्रमाणे कार्यवाही करीत असल्यामुळे या परिच्छेदान्वये आक्षेप काढण्यात आलेला आहे. समितीचा मुद्दा असा आहे की, या विषयासंदर्भात शासन निर्णय घेत असेल तर एक महिन्याची वेळ द्यावी अन्यथा प्रस्तावित नियमानुसार सदर वसुली करण्यात यावी. डिस्क्रिशन पॉवर ठेवण्याऐवजी याबाबतचा नियम करण्यात यावा. सदर नियम तयार करण्यासाठी समिती एक महिन्याचा कालावधी देत आहे. याबाबतचा नियम तयार केल्याशिवाय हा परिच्छेद संपवू शकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबतची वेगळे धोरण तयार करावयाचे असेल तर किमान तीन महिन्यांचा कालावधी लागतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यास समितीने सहमती दर्शविली संबंधित संस्थेने तसे लिहून दिले असेल पण शासन तशी मागणी करीत नाही. विभागाची भूमिका योग्य आहे. याबाबत नियम करावा. त्यामुळे सर्वांना फायदा होईल. समितीची भूमिका अशी आहे की, it should not be discretionary.

सदर नियम दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत करण्यात यावा. त्यानंतर याच विषयावर साक्ष घेण्यात येईल. तोपर्यंत परिच्छेद क्रमांक ४.३.२ प्रलंबित ठेवण्यात येत आहे. असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व समितीच्या सूचनेप्रमाणे दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत सदर नियम तयार करण्यात येईल, असे समितीस आश्वस्त केले. (विवरण क्र. १)

**परिच्छेद क्रमांक ४.३.३ भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे.**

भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे, यामध्ये अनेक ठिकाणी व महालेखापाल यांनी लक्षात आणून दिलेल्या बाबीवर विभागाने स्पष्टीकरण केलेले आहे. विभागाने या विषयावर नियमावली तयार करून या सर्व प्रकरणाची तपासणी केलेली आहे काय किंवा तशी तपासणी करणार काय? जेणेकरून भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित झाला पाहिजे. या दृष्टिकोनातून विभाग कार्यवाही करणार आहे काय? दुसरी बाब अशी आहे की, सदर कार्यवाहीसाठी मोठ्या प्रमाणावर विलंब झालेला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भातील माहिती विस्तृतपणे देताना याबाबतचे दोन ते तीन पैलू आहेत ते समितीसमोर येणे आवश्यक आहे. महालेखापाल यांनी फक्त निष्पादनाचा विषय काढलेला नाही. निष्पादित करणे म्हणजे एक्जिक्यूट करणे किंवा स्वाक्षरी करणे. त्याची नोंदणी झाली पाहिजे, स्टॅम्प ड्यूटी मिळाली पाहिजे, असा महालेखापालाचा यांचा मुद्दा आहे. निष्पादित करणे ही अत्यंत साधी बाब आहे. निष्पादनाबरोबर नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले आहे, असे विभागीय सचिवानी अवगत केले.

प्रथम नोंदणी संदर्भात माहिती देताना, महालेखापाल यांचा जो नोंदणी आग्रह आहे, त्यासंदर्भात दिनांक ३१ ऑक्टोबर २००६ रोजीचा एक शासन निर्णय आहे. संबंधित कार्यासनाने एक परिपत्रक निर्गमित केले होते. त्यांनी असे म्हटले आहे की, शासनामार्फत भाडेपट्टा करार करण्यात येते त्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याकडून स्टॅम्प ड्यूटी देखील वसूल करणे आवश्यक आहे. यासंदर्भात विभागाने आणखी काही तपासणी केलेली आहे. रजिस्ट्रेशन ॲक्ट आहे, तो सदर बाबीसंदर्भात या ॲक्टमधील सेक्शन ९० (१)(d) मध्ये माहिती दिलेली आहे. महालेखापाल यांनी सेक्शन १७ चा उल्लेख करून हा पॅरा काढलेला आहे. याच विषयासंदर्भात सेक्शन ९० (१)(d) आहे, त्याचा उल्लेख महालेखापाल यांनी केलेला नाही. सेक्शन ९० (१)(d) मध्ये असे नमूद केले आहे की, " sanads, inam, title-deeds and other documents purporting to be or to evidence grants or assignments by Government of land or of any interest in land;" असे असेल तर रजिस्ट्रेशनची आवश्यकता नाही. " Section ९०. Exemption of certain documents executed by or in favour of Government.", असे त्याचा हेडींग आहे. म्हणजे शासनातर्फे जे डाक्युमेंट एक्जिक्यूट होतात, त्यांना नोंदणीपासून एक्झमशेन देण्याबाबतचे हे सेक्शन आहे. " In favour of Government or by the Government " दोन्ही आहे. ज्या अर्थी सन २००६ साली कार्यासनाने अशा प्रकारचा निर्णय घेऊन सूचना दिलेल्या होत्या, त्या अर्थी कायद्यामध्ये अशी तरतूद आहे. ही तरतूद खूप जुनी आहे. सदर ॲक्ट अस्तित्त्वात आला तेव्हापासूनची सदर तरतूद आहे. यामध्ये विसंगती होऊ नये यासाठी विभागाने विधि व न्याय विभागाकडे एक अनौपचारीक संदर्भ केलेला आहे. त्यामध्ये सेक्शन ९० (१)(d) ची तरतूद पाहता जो सन २००६ चा शासन निर्णय किंवा परिपत्रक आहे ते रिटेन करणे शक्य आहे की, याच्याशी विसंगत आहे. याबाबत त्यांच्याकडून स्पष्ट खुलासा मागविलेला आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल यांच्या नियमानुसार विभागाने नोंदणी वगैरे सर्व निष्पादित केलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, फिल्डमध्ये सन २००६ चे परिपत्रक असल्यामुळे सदर बाबीची अंमलबजावणी केलेली आहे. मात्र यामध्ये दोन मुद्दे आहेत. दुसरा मुद्दा असा आहे की, जुन्या सर्व भाडेपट्ट्यांची नोंदणी करावी, असा विभागाने आग्रह केला तर त्या सर्व भाडेपट्ट्यांची आजच्या दराप्रमाणे स्टॅम्प ड्यूटी भरावी लागणार आहे. सदर व्यवहार हा ३० ते ४० वर्षांपूर्वीचा असला तरी त्याला आजच्या दराप्रमाणे स्टॅम्प ड्यूटी भरावी लागेल आणि विभागाने अनेक व्यक्ती/संस्थांना concessional grant दिलेली आहे, त्या व्यक्ती/संस्थांना आजच्या दराप्रमाणे स्टॅम्प ड्यूटी भरावी लागली तर त्यांना खूप जास्त पैसे भरावे लागणार आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत कायद्यामध्ये सुधारणा करून बदल करणे शक्य आहे. सन २००६ च्या परिपत्रकानुसार नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागाने जो नियम सांगितला आहे, त्याप्रमाणे नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. पण बाकी करार निष्पादित केले पाहिजेत. असे मत सामितीने व्यक्त केले असता, विभागाने विधि व न्याय विभागाकडे दोन मुद्यासंदर्भात खुलासा मागवलेला आहे. पहिला मुद्दा असा आहे की, सेक्शन ९० ची तरतूद पाहता सन २००६ चे परिपत्रक रिटेन केले पाहिजे की, निरस्त केले पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, जरी नोंदणीपासून सूट दिली असेल तरी स्टॅम्प ड्यूटी भरण्याची लायबिलिटी राहते, त्यामुळे स्टॅम्प ड्यूटी वसूल करावी लागेल, अशी विभागाची धारणा आहे. ही धारणा

विधि व न्याय विभागाकडून निश्चित करून सुधारित सूचना फिल्ड मध्ये देण्यात येणार आहेत. निष्पादन म्हणजे बेसिकली साईन करणे. तो एम.ओ.यू. सारखा विषय आहे. ते करण्याकरिता महाराजस्व अभियान आहे. त्याअंतर्गत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत की, जेवढ्या जमिनी लीजवर आहेत त्या एक्जिक्यूट झाल्या नसतील, करारनाम्यावर स्वाक्षऱ्या झाल्या नसतील तर त्या करार नाम्यावर स्वाक्षऱ्या करून घेण्यात याव्यात. विधि व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार स्टॅम्प ड्यूटी वसूल करणे व त्याची नोंदणी करावी की, नाही याबाबत सुधारित सूचना सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात येतील. त्याअनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी फिल्डमध्ये कार्यवाही करतील. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्यांचा लीज कालावधी संपलेला आहे त्यांना नुतनीकरण करता येऊ शकते काय? अशी विचारणा समितीने केली असता, नुतनीकरणानंतर नवीन करारनामा स्वाक्षरीत केला जातो. ज्या तारखेला नुतनीकरण होईल त्या तारखेच्या दराप्रमाणे स्टॅम्प ड्यूटी आकारली जाईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी शासन निर्णयाप्रमाणे अनेक जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही केलेली नाही. सदर निर्णयाबाबत विधि व न्याय विभागाशी चर्चा करून सदर निर्णय घेण्यात यावा महालेखापालानी काढलेल्या आक्षेपाच्या संदर्भात निष्पादनाच्या नोंदणीची कार्यवाही करण्यात यावी. विभागास जी सर्वसाधारण धोरण ठरवायचे आहे ते एका महिन्याच्या आत निश्चित करून सदर माहिती समितीस सादर करण्यात यावी. असे निदेश समितीने दिले.

ज्यांना ही जागा दिलेली आहे त्यांना त्या जागा विकसित करण्यासाठी काही कालावधी दिलेला आहे काय? यांच्यावर शासनाचे काही नियत्रंण असते का? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रश्नासंदर्भात शासनाने यापूर्वीच कार्यवाही केलेली आहे. अशा प्रकारच्या प्रकरणासंदर्भात शासनाने दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी एक धोरण निश्चित केलेले आहे. त्या धोरणामध्ये असे नमूद केले आहे की, जमीन मंजुरीच्या आदेशातील ठराविक कालावधीनंतर देखील मुदतवाढ मागायची असेल तर त्यासाठी telescopic पद्धतीने दंडाचे अधिमूल्य आकारण्याची तरतूद केलेली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरू आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले. (विवरण क्र. १)

सदर परिच्छेदामध्ये ज्या संस्थेच्या नोंदणीचा उल्लेख केलेला आहे, त्यावर शासन निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. दुसरी बाब अशी की, विभागाने नियम ९० अतंर्गत विधि व न्याय विभागाकडे जो प्रस्ताव सादर केलेला आहे, त्यावर विभागाने जो निर्णय घ्यावयाचा असेल तो निर्णय एका महिन्याच्या आत समितीला सादर करावा. असे समितीने सूचित केले, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक ४.३.४ शासकीय जमीनींचे पुनर्ग्रहण करणे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.१ जमिनीचा वापर न करणे.**

याबाबत नोव्हेंबर, २०१८ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयासंदर्भात माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, सदर शासन निर्णय, दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. तो निर्णय असा आहे की, क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान व व्यायाम शाळा या प्रयोजनाकरिता शासनाने भाडे पट्ट्यावर जी जागा दिलेली आहे, त्या जागेच्या नुतनीकरणाचे धोरण शासनाने जाहीर केलेले आहे. ज्या भाडेपट्ट्यांची मुदत यापूर्वी संपून गेलेली आहे, त्यांच्या मानीव नुतनीकरण दिनांक १ जानेवारी २०१८ पर्यंत जुन्या दराने करण्यात यावे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

भाडेपट्टेधारकाने नुतनीकरणासाठी अर्ज न करताही नुतनीकरण केले जाते का? या समितीच्या प्रश्नाबाबत नुतनीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक आहे आणि उशिरा का होईना सर्व प्रकरणामध्ये सर्वजण अर्ज करतात. सन २०१८ पासून शासन निर्णयामध्ये जे तत्त्व दिलेले आहे त्यानुसार भाडे आकारुन पुढील ३० वर्षांसाठी नुतनीकरण करण्यात येते. सदर जमिनीचे भाडे आकारण्याचे तत्त्व असे आहे की, जमिनीच्या सद्यःस्थितीतील मुल्याकनांच्या १० टक्के आणि त्या १० टक्केच्या ०.१ टक्का भाडे वसूल करावयाचे आहे. म्हणजे १०० रुपये मुल्यांकन असेल तर फक्त एक पैसा भाडे आकारण्यात येणार आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मोरीवली, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथील प्रकरणासंदर्भात महालेखापाल यांनी जेव्हा आक्षेप काढलेला होता त्यावेळी, संबंधित अधिकाऱ्यांने सांगितले होते की, they have breached the conditions and action will be taken. आता सांगण्यात येत आहे की, सदर बांधकाम सुरू आहे. त्यामुळे कारवाईची आता आवश्यकता नाही. सन २०१६ पर्यंत बांधकाम केले नव्हते. त्यानंतर सदर बांधकाम केव्हा सुरू झाले? अशी विचारणा समितीने केली असता, मॉडल एज्युकेशन सोसायटी मोरीवरी, अंबरनाथ यांना सन २००२ साली जागा देण्यात

आली होती. ३ हजार २८० चौ.मी. जागा शाळेच्या इमारतीसाठी कब्जा हक्काने आणि ६ हजार ५६० चौ.मी. क्रीडांगणासाठी १ रुपया नाममात्र भाडे आकारुन ती जागा देण्यात आली होती. जेव्हा हा परिच्छेद काढण्यात आला होता त्यावेळी संबंधित संस्थेने त्या जागेवर बांधकाम केले नव्हते त्यामुळे हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्या मुद्याच्या अनुषंगाने विभागाने ज्यावेळी पाहणी केली तेव्हा असे निदर्शनास आले की, दिनांक २४ फेब्रुवारी २०१२ मध्ये त्या जागेचा उपयोग सुरू न झाल्याबाबत तहसीलदार यांने यांनी शर्तभंगाची नोटीस दिली होती. त्यावेळी असे निदर्शनास आले की, त्यामध्ये दोन ते तीन मुद्दे उपस्थित झाले होते. स्थानिक नागरीकांनी त्या जागेबाबत आक्षेप घेतला होता. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे देखील दाखल करण्यात आले होते. दुसरी बाब अशी की, काही व्यक्तींनी उल्हासनगर न्यायालयामध्ये यासंदर्भात दावा देखील दाखल केलेला होता. या सर्व बाबीमुळे अंबरनाथ नगरपालिकेने त्यावेळी त्यांचे बांधकाम नकाशे मंजूर केले नव्हते. त्या दरम्यान ती शाळा इतरत्र खाजगी इमारतीमध्ये भाडे तत्त्वावर सुरू होती. पण जेव्हा हे प्रकरण निकाली निघाले त्यावेळी अंबरनाथ नगरपालिकेने सदर नकाशे दिनांक २ जानेवारी २०१५ रोजी मंजूर केले आणि दिनांक २८ नोव्हेंबर २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. नगरपालिकेच्या नकाशाप्रमाणे शाळेच्या इमारतीचे बांधकाम होऊन त्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्या ठिकाणी आता शाळा चांगल्या प्रकारे सुरू आहे, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सदर शाळेच्या इमारतीचे बांधकाम केव्हा पूर्ण झाले व भोगवटा प्रमाणपत्र केव्हा देण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता, सदर इमारतीला दिनांक ६ डिसेंबर २०१७ रोजी अंबरनाथ नगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

त्यापूर्वी सन २००२ मध्ये मंजुरी दिली व सन २०१२ मध्ये नोटीस दिलेली आहे. त्या १० वर्षांमध्ये काय कार्यवाही करण्यात आलेली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळेस त्यांचा वाद सुरू होता. यामध्ये दोन ते तीन मुद्दे होते. सन २००२ नंतर वाद झालेला आहे. जिल्हा विकास योजनेमध्ये त्यासाठी जागा दिली होती. एमआयडीसीने त्यावेळेस आक्षेप घेतला होता की, ही जिल्हाविकास योजनेमधील जागा आहे. त्यामुळे याचे वाटप रद्द करावे, असा पत्रव्यवहार एमआयडीसीने तत्कालीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केला होते. हा एक निर्णय प्रलंबित असल्यामुळे याची प्रतिक्षा सुरू होती. दुसरा भाग असा की, स्थानिक नागरीकांनी त्या संस्थेला या जागेवर शाळा सुरू करण्यासाठी विरोध केला होता. त्यातून पोलीस केसेस झाल्या होत्या आणि शेवटी त्यातून काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे सन २००८ साली स्थानिक नागरीकांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता. जोपर्यंत न्यायालयात दावा दाखल आहे त्यावर निर्णय प्रलंबित आहे. तोपर्यंत नकाशा मंजूर करणार नाही, अशी नगरपालिकेने भूमिका घेतली होती त्यामुळे ते प्रलंबित होते. दुसरा मुद्दा होता की, ती जागा १५ वर्षांसाठी दिली होती तर त्याचे काय केले आहे? त्याबद्दल एवढेच आहे की, दिनांक १७ डिसेंबर २००२ ते दिनांक १६ डिसेंबर २०१७ असा एकूण १५ वर्षांचा त्याचा भाडेपट्टा होता. सदर मुदत संपण्यापूर्वीच त्या संस्थेने मुदतवाढीसाठी दिनांक ०४ मे २०१७ रोजी विनंती केली. त्या अनुषंगाने रितसर चौकशी होऊन दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय आयुक्तांकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला होता. तो प्रस्ताव आता निर्णयासाठी प्रलंबित आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

तहसीलदारांनी त्या ठिकाणी पाहणी कशी केली आहे? सन २०१७ पर्यंत या जागेचा वापर झाला आहे तर मग या जागेला सन २०१७ चा शासन निर्णय लावला काय? सर्व जागांना सन २०१८ च्या शासननिर्णयाच्या आधार घेऊन नुतनीकरण करण्यात येत. घेता तर त्याला सन २०१७ चा आधार घेऊन मुदतवाढ दिले आहे काय? अशी विचारणा करून काही ठिकाणी इमारती आणि क्रीडांगण आहे. हि बाब समितीने निदर्शनास आपली असता, ज्या ठिकाणी क्रीडांगण आहे त्या ठिकाणी विकासाची आवश्यकता नव्हतीच कारण तिथे विकास अपेक्षितच नव्हता. त्यामुळे दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे पुढची कारवाई करायची आहे. ज्या ठिकाणी बांधकाम, जमिनीचा विकास अपेक्षित होता त्या ठिकाणी दिनांक ११ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे क्षेत्रीय पातळीवर कारवाई करायची आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिमुल्य वसूल करणे हे सरकारचे काम नाही. ए २ साठी जी जमीन दिलेली आहे त्यासाठी १० वर्षांची एक मर्यादा ठरविण्यात यावी. संस्थाच नाहीतर शासन व्यक्तीला देखील जमीन देते. समजा एखाद्या व्यक्ती/संस्थेला ज्या हेतुने एखाद्याने १० वर्षांसाठी जागा घेतली आहे तो हेतू ती व्यक्ती/ती संस्था साध्य करू शकली नाहीतर सरकारने ती जागा ताब्यात घेतली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यावरच शासन निर्णय आहे. शासन निर्णयामध्ये असे आहे की, १० वर्षांपर्यंतचे स्लॅब दिलेले आहेत. पहिल्या २ वर्षांसाठी मुदत वाढ देण्यासाठी २ टक्के एफआयआर व्हॅल्यु असेल तर पूर्ण १० वर्षांची ५ वेळा मुदतवाढ देताना १० टक्क्यांचा स्लॅब दिलेला आहे. त्यानंतर त्याचे रिझमशन करून घ्यावे, असे ही नमूद केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये ज्या हेतुसाठी त्या संस्थेला जमीन दिली असेल तर ती संस्था परस्पर कोणत्याही व्यक्तीला ती जमीन हस्तांतरित करू शकणार नाही. नाहीतर तो अधिमुल्य भरत राहिल. मग तो हस्तांतरणासाठी विभागाकडे येईल. समजा एखाद्याने जर एखादी

संस्था उभी केली आणि तो त्याचा ट्रस्टी आहे तर त्या जमिनीवर त्याला पुढचे काही काम करता येणार नाही तर मग तो सदस्य त्याला यांना ट्रस्टी करेल आणि निघून जाईल. दुसऱ्या व्यक्तीने त्या जमिनीचे अधिमुल्य भरले असेल तरी सुद्धा ती जमीन आशयबद्ध करायची असेल तर त्याने सरकार दरबारी परवानगी मागितली पाहिजे. त्या हिशोबाने तो होणार नाही. ते अधिकार विभागाने धर्मादाय आयोगाला दिले आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने या ठिकाणी दोन मुद्दे सांगितलेले आहेत. ही जमीन शासकीय आहे यामध्ये कोणताही व्यवहार करायचा असेल तर त्याला जिल्हाधिकारी आणि शासन यांची पुर्वानुमती आवश्यक आहे त्याशिवाय ती त्यांना हस्तांतरित करता येणार नाही, अशी क्लास २ जमिनीसाठी कुठेही सामान्य अट असते. ट्रस्टी बदलले आहेत असा समितीने सांगितलेला मुद्दा वेगळा आहे. कंपनीमध्ये डायरेक्टर किंवा ट्रस्टी बदलणे म्हणजे ट्रस्ट बदलत नाहीत ट्रस्ट तीच राहते फक्त ट्रस्टी बदलतात. त्यामुळे ज्याचे नाव सातबारामध्ये आहे ती संस्था बदलत नाही, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्यामध्ये अशी अट टाकावी की, जमीन ज्या हेतूने घेतली आहे त्या हेतू संबंधित काम जोर्यंत सुरू होत नाही तिथपर्यंत त्याला बदली करता येणार नाही. नाहीतर जमिनीचे हस्तांतरण होते. याचा अर्थ त्यांचा हेतू साध्य झाल्यानंतर हस्तांतर करू द्यावे. या जमिनीवर बांधकाम केले तर याची किंमत १० कोटी रुपये होते. मग तो जमीन घेणारी व्यक्ती या क्षमतेची आहे की नाही हे कळेल. ती व्यक्ती नाममात्र दराने जमीन घेतो, चॅरीटीमध्ये संस्थेच्या नावाने घेतो आणि चॅरीटीचे इंटेशन दाखवतो. असे मत समितीने मांडले असता, कंपनीमध्ये चेंज ऑफ शेअर होल्डरर्स किंवा ट्रस्टमध्ये चेंज ऑफ ट्रस्टीज याकरिता सध्या कोणतेही वेगळे धोरण नाही, अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीचा हेतू चांगला आहे की, ज्या संस्थेने ज्या उद्देशासाठी ही सवलत घेतलेली आहे त्या संस्थेचे काही बांधकाम न करता ती जागा दुसऱ्यांना द्यायची हे योग्य नाही अशा धोरणाचा शासनाने विचार करावा, असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्र. ४.३.४.२–जमिनीच्या वाटपात शर्तीचे उल्लंघन**

"महाराट्र कोळी समाज संघ" या संस्थेस सुरूवातीला जी जमिनीचे वाटप अलॉटमेंट करण्यात आले ते सर्व नियमाची पायमल्ली करूनच करण्यात आले आहे. कारण समितीसमोर असलेले विषय असे आहेत की, यासाठी शिक्षण विभागाची मान्यता नाही. त्यांच्याकडे बांधकामासाठी पैसे नाहीत, त्यांचा इमारती योजनांचा आराखडा नाही. असे सर्व आक्षेप महालेखाकारांनी काढलेले आहेत. याच आक्षेपाना धरून सन २०१६ पर्यंत कोणतेही बांधकाम झालेले नव्हते. यांना शाळेच्या प्रयोजनासाठी जागा दिलेली आहे पण शाळेची देखील त्यासाठी परवानगी नाही. विभागाने कशाप्रकारे ती जागा दिली आहे आणि आता ती जागा परत घेण्याची गरज नाही असे समर्थन विभागाकडून करण्यात येत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, या जागेची ग्राऊंड रिॲलिटी काय आहे हे ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी स्पष्ट करतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The main concern of Accountant General is regarding the conditions that are required to be fulfilled for allotment of land where not fulfilled at the time of allotment, असे मत समितीने व्यक्त केले असता, महालेखाकारांच्या आक्षेपांप्रमाणे पहिला मुद्दा असा होता की, शैक्षणिक कारणासाठी ही जागा दिलेली आहे. त्यासाठी शिक्षण विभागाची रितसर परवानगी घेण्यात आली नव्हती. त्या संदर्भात वाटप आदेश आणि विभागाने संस्थेकडून घेतलेला खुलासा त्यानुसार त्यांना कोणत्याही पद्धतीची शाळा चालवण्यासाठी किंवा कोणतेही शैक्षणिक संकुल चालवण्याच्या पद्धतीसाठी ती जागा अपेक्षित नव्हती आणि त्यांचा हेतु तो नव्हता आणि विभागाच्या वाटप आदेशामध्ये पण तसे नाही. त्यांचे जागा वाटपा संबंधातील आदेश आणि त्यांची मागणी ही कार्यालयीन इमारत आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजना व इतर गोष्टींसाठी लोकांना प्रबोधन करावे. अशा पद्धतीचे त्यांचे शैक्षणिक प्रयोजन आहे. निश्चितपणे फॉरमल शाळा त्यांना अपेक्षित नव्हती, असे संस्थेचे म्हणणे आहे. तसेच वाटप आदेशामध्ये कार्यालयीन इमारत आणि शैक्षणिक प्रयोजन असे म्हटलेले आहे. संस्थेकडून असा खुलासा घेतला आहे की, त्या परिसरातील सर्व कोळी बांधवांना विविध योजना व विविध सवलतींची माहिती होण्यासाठी एक स्थान असावे. त्यासाठी ही जागा वाटप केलेली आहे. त्यामुळे त्यावेळेस त्यासाठी शिक्षण विभागाची परवानगी घेण्यात आली नव्हती, असे विभागीय प्रतिनिधीनी अवगत केले.

या विषयाबाबत विभागाने जी कागदपत्रे सादर केलेली आहेत त्यामध्ये असे आहे की, महाराष्ट्र कोळी समाज संघाचे कार्यालय व शाळेसाठी जागा आहे, असा त्यावेळच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीचा रेकॉर्ड समितीकडे आहे. त्यामुळे हा शाळेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पण आता माहिती देण्यात येत आहे की, ती जागा प्रबोधनासाठी आहे. मग तसे असेल तर हा विषय संपविण्यात येईल, पण तसे नाही. विभागामार्फतच महालेखाकारांना ही कागदपत्रे देण्यात आली आहे की, शाळेसाठी ही जागा आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक २४ मे २०१० रोजीच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वाटप आदेशामध्ये त्याअर्थी " जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून नगरबोंब ठाणे क्षेत्रातील ३९४ चौमी जमीन महाराष्ट्र कोळी समाज संघ या संस्थेस कार्यालयासाठी व शैक्षणिक उपक्रमासाठी कब्जा हक्काने खालील अटी व शर्तीसह मंजुरी देण्यात येत

आहे," असे म्हटलेले आहे. संस्थेची भूमिका पूर्वीपासून आणि आजही हीच आहे की, त्यांना कोणतेही शाळा संकुल किंवा शाळा चालवायची नाही, असे विभागीय प्रतिनिधीनी अवगत केले.

महालेखापालाचे मत आहे की, यातून कोळी बांधवांना प्रबोधन करणे होते त्यात शाळेचा काही मुद्दा नव्हता. जिल्हाधिकाऱ्यांनी जी कागदपत्रे दिलेली आहेत त्यामध्ये स्पष्टपणे शाळेचा उल्लेख आहे त्यामुळे हा विषय उपस्थित झालेला आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, वाटप आदेशाच्या आधारावर विभागाकडून ते सुधारून देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

**परिच्छेद क्र. ४.३.४.३ – शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्टट्याांचे नवीनीकरण करणे**

या ठिकाणी दोन संस्था आहेत तर जिल्हाधिकारी, सोलापूर आणि जिल्हाधिकारी, रायगड थोडक्यात याचा इतिहास द्यावा. In first case the issue is regarding delay in granting extension and not taking any action on the society till the year 2015, though the lease expired in the year २००९. असे मत समितीने व्यक्त केले असता, अभिनव ज्ञान मंदिर संस्था संचलित श्री. गजानन विद्यालय कडाव संबंधित हा मुद्दा आहे याबाबत विभागाने आता याचे नुतनीकरण केलेले आहे. याच्या विलंबाचे कारण असे होते की, सन २०१५ मध्ये अर्ज केला होता. याबाबत संस्थेच्या प्राचार्यांना विभागाने खुलासा विचारला तर ते म्हणाले की, याची मुदतवाढ घेण्याबाबतची कल्पना त्यांना नव्हती. परंतु त्यावर कोणताही शर्तभंग नसल्यामुळे सन २०१५ साली त्यांचा अर्ज आल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यात आली. ३० वर्षांसाठी भाडेपट्टट्याचे नुतनीकरण पण केलेले आहे, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

यामध्ये नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड यांना सन १९९३ साली त्यांना जमीन वाटप केली होती सन २००२ साली त्यांनी बांधकाम केले. आता बांधकाम झालेले असल्यामुळे त्यावर कोणताही शर्तभंग नाही. दिनांक २१ नोव्हेंबर १९५७ रोजीचा शासन निर्णय होता की, १० पट असेसमेंट घ्यायचा तर विभाग तो असेसमेंट घेत आहे. त्यांना क्रीडांगणासाठी जी जागा दिलेली आहे ती आता नवीन योजनेनुसार त्याची मुदत वाढ देण्यात येत आहे, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

समितीने दि. ९ जानेवारी, २०१९ रोजी पुन्हा महसूल व वन (महसूल) विभागाचे अपर मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी "शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे" या परिच्छेदाअंतर्गत शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नवीनीकरण न करणे याबाबत सन २०१८ च्या शासन निर्णयांतर्गत भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर सुरू करण्यात आली आहे. २०१८ चा शासन निर्णय आता निर्गमित करण्यात आला, परंतु महालेखापाल यांचा आक्षेप आहे की, दरम्यानच्या कालावधीत अधिकाऱ्यांनी या विषयाला गांभीर्याने घेतलेले नाही. २०१८ च्या शासन निर्णयाचा फायदा मिळत आहे. महालेखापाल यांचा आक्षेप आहे की, विभागाने आतापर्यंत प्रस्थापित नियमांतर्गत कारवाई का केली नाही? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून विविध संस्थांना क्रीडांगणासाठी जागा दिलेली आहे. परंतु त्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करण्यासाठी पूर्वी धोरण अस्तित्वात नव्हते. आता दि. १६ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये धोरण विहित केले असून, त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करण्याबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत. पूर्वी धोरण अस्तित्वात नसल्यामुळे अनेक ठिकाणी या संदर्भातील कार्यवाही होऊ शकलेली नाही, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एखाद्या संस्थेला क्रीडांगणांसाठी १५ वर्षांसाठी, ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर जागा दिल्यानंतर व ती मुदत संपल्यानंतर कराराचे नुतनीकरण करावेच लागेल. If they are using the land it should be renewed within time. परंतु त्या संस्थांनी २०-२५-५० वर्षापर्यंत भाडेपट्ट्यावर दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण केले नाही. मुळात विभागाने त्यांना मर्यादित कालावधीसाठी भाडेपट्ट्यावर जागा दिली होती. महालेखापाल यांचे निरीक्षण असे आहे की, या संदर्भातील कोणतीही कार्यवाही करण्याची भूमिका एकाही जिल्ह्यात निदर्शनास आली नाही. या विषयाच्याबाबतीत शासन गंभीर का नव्हते? अशी विचारणा समितीने केली असता, हे खरे आहे की, यामध्ये धोरण असणे आवश्यक होते. परंतु, पूर्वीच्या काळात धोरण नव्हते परंतु, आता धोरण तयार केले असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. उक्त धोरणात असे नमूद केले आहे की, सर्व भाडेपट्ट्यांचे मानीव नुतनीकरण दि. ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत केले पाहिजे आणि त्यानंतर नवीन धोरणानुसार २०१८ पासून भाडेपट्टे वसूल केले पाहिजे. यावरून निदर्शनास येईल की, जुन्या सर्व भाडेपट्ट्याचे नुतनीकरण करावे अशीच भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे. शासन निर्णयामध्येच मानीव नुतनीकरणाचा उल्लेख केलेला आहे.

या अंतर्गत नवीन नुतनीकरण ३० वर्षांसाठी करावयाचे आहे. मात्र दरम्यानच्या कालावधीत अनेक भाडेपट्ट्यांची मुदत संपुष्टात आलेली होती आणि शासनाला त्याची जाणीव होती. नवीन धोरण आखताना सर्व जुन्या भाडेपट्ट्यांच्या जुन्या शर्तीप्रमाणे त्यांचे मानीव नुतनीकरण

दि. ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत करून दिलेले आहे. तदनंतर नवीन धोरणानुसार त्या जमीनींच्या भाडेपट्ट्याची गणना २०१८ पासून करावयाची आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

महसूल विभागाप्रमाणेच मुंबई बोर्ड, म्हाडाच्या जमीनींच्याबाबतीत सर्वसाधारण धोरण झाले आहे काय? कारण त्यांचे सुद्धा पूर्वी धोरण नव्हते. त्यांनी अनेक संस्थांना भाडेपट्ट्ट्यावर जागा दिलेल्या आहेत. त्या संस्था नुतनीकरण करण्यासाठी गेल्यानंतर त्यांचे नुतनीकरण होत नव्हते. कारण त्यांच्याकडे नुतनीकरण करण्याचे धोरणच अस्तित्त्वात नव्हते. अशाप्रकारचे धोरण या संस्थांना सुद्धा लागू केले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने जे धोरण केलेले आहे ते केवळ शासकीय जमिनीपुरते केलेले आहे. म्हाडा, सिडको किंवा इतर ज्या संस्था आहेत त्यांना स्वतःचे धोरण करून घ्यावे लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु दरम्यानच्या काळात या संस्थांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केले असेल तर त्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण २०१८ नंतर पुन्हा करावे की नाही याचे तारतम्य शासनाकडे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भातील धोरण करताना दोन गोष्टी केलेल्या आहेत. जर त्या संस्थेने शर्तीचा भंग केला असेल तर त्या संस्थेच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर होणार नाही. त्या संस्थेने संपूर्ण तपशील शासनाकडे सादर करावा. तदनंतर शासन त्या प्रकरणी निर्णय घेईल. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

**ता. पंढरपूर, बाभूळगाव**

विभागाने उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने सादर केलेल्या विवरणपत्रात अनेक संस्थांबाबतची माहिती दिली आहे. यातील पंढरपूर तालुक्यातील बाभुळगावचा उल्लेख आहे. बाभुळगाव येथील जागा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या ताब्यात आहे. परंतु या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे विभागाच्या अभिलेख्यांमध्ये नसल्यामुळे विभागाने नुतनीकरण केले नाही. अशा परिस्थितीत सदरहू जागा जिल्हा परिषदेच्या नावे करण्यात काय अडचण आहे? या संदर्भातील कार्यवाही स्वतःहून करून द्यावयास पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या प्रकरणांमध्ये जागा वाटपाचा मूळ आदेश आढळून येत नाही त्या प्रकरणांमध्ये. जिल्हाधिकाऱ्यांनी तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर त्यानुसार मंजूर करण्याची कार्यवाही करता येईल.

परतु जिल्हा परिषद ही निमशासकीय संस्था आहे. विभाग इतर व्यक्ती/संस्थांना उदार अंतःकरणाने जागा देतो. निमशासकीय असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या नावे जागा करण्यात काय अडचण आहे? जिल्हाधिकाऱ्यांनी तशा प्रकारची कार्यवाही केली पाहिजे. कारण लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, " सदर जागा प्रदानाबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे नुतनीकरण करता आले नाही. " वास्तविक पाहता त्यांनी नमूद करावयास पाहिजे होते की, त्यांच्या योग्य ती कार्यवाही करून जिल्हा परिषद शाळेच्या नावे जागा वाटप करण्यात येईल, असे समितीने निदर्शनास आणले असता, ज्याप्रकरणामध्ये जागावाटपाचा मूळ आदेश आढळून येत नाही त्या प्रकरणामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर त्यानुसार मंजुरी करण्याची कार्यवाही करता येईल. जागा वाटप करण्याचा निर्णय शासन स्तरावरून घ्यावा लागेल. शासनाकडे या संदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीने सांगितल्यानुसार कार्यवाही करता येईल. असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत की, ज्या ठिकाणी जिल्हा परिषद शाळांच्या जागांचे कागदपत्रे मिळत नाहीत त्या प्रकरणी त्यांनी योग्य ती कार्यवाही करून शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, जेणेकरून त्यांना नियमानुकुल करता येईल. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**मौजे फळवणी, ता.माळशिरस, सातारा**

मौजे फळवणी, ता.माळशिरस, रयत शिक्षण संस्था, सातारा अंतर्गत माळशिरस तालुक्यातील फळवणी येथील रयत शिक्षण संस्था, सातारा बाबतचा उल्लेख आहे. रयत शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापकांनी सन १९९४ ते २०१८ या कालावधीतील प्रती वर्षाचे एकूण बाजार मूल्याच्या १५ टक्के प्रमाणे रुपये ४,४५,४९४ जमा करणे शक्य नसल्यामुळे सदरहू रक्कम माफ करण्यात यावी असे पत्र दिलेले आहे. एकप्रकारे या संस्थेने सदरहू रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविली आहे. सदरहू संस्थेला असे कसे करता येईल? विभागाने जी आकारणी केली आहे ती नियमाप्रमाणे नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, लॅण्ड डिस्पोजल नियमाच्या नियम ७ मध्ये अतिशय नाममात्र भाड्याने क्रीडांगणासाठी जमीन देण्याची तरतूद आहे. परंतु या प्रकरणात असे दिसते की, शासनाने या संस्थेला बाजार मूल्याच्या १५ टक्के या प्रमाणे भाडे आकारलेले आहे. या संस्थेच्या नॉन सॅलरी ग्रँटपेक्षा ही रक्कम किती तरी पटीने जास्त आहे. त्यामुळे ही रक्कम त्यांना भरणे शक्य नाही, असे त्यांनी कळविले आहे. सदरहू रक्कम भरू शकत नसल्यामुळे ती रक्कम रिव्हाईज करण्याबाबतचा प्रस्ताव संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडून तो प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर शासन या बाबतीत पुनर्विचार करेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासन पुर्नविचार करेल म्हणजे काय, या प्रकरणी नेमका काय निर्णय होणार आहे, कारण सर्वच संस्थांनी अशा प्रकारे जबाबदारी झटकली तर कसे चालेल? जी १५ टक्के प्रमाणे परिगणना केलेली आहे ते चुकीची केली आहे असे विभागाचे मत आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये चुकीचा विषय नाही. त्या संस्थेचे म्हणणे आहे की, जी परिगणना केलेली आहे ती जास्त आहे. त्यांची विनंती आहे की, ही रक्कम कमी करावी शेवटी दर कमी करण्याचे अधिकार शासनाला आहेत. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

दर कमी करण्याचे अधिकार शासनाला असतील तर प्रत्येक संस्था दर कमी करण्याचीच मागणी करीत राहतील असे मत समितीने व्यक्त केले असता, ही अत्यंत जुनी शैक्षणिक संस्था आहे. त्यांनी विभागाकडे दर कमी करण्याबाबतची विनंती केली तर तो प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवानी सांगितले.

शासनाने डिस्क्रीएशनरी पॉवरची पद्धत बंद करावी. जो काही न्याय, निकष लावावयाचा असेल तो सर्वांना सारखा लावावा. शिक्षण संस्थांबद्दल जे काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे असतील ते विभागाने घ्यावे. परंतु अशाप्रकारे कोणत्याही एका संस्थेला सूट देता येत नाही. विभागाने अशाप्रकारे सूट दिली तर निश्चितपणे त्या बाबतीत महालेखापाल यांच्याकडून पुन्हा आक्षेप येईल. समितीचे मत एवढेच आहे की, जी काही कार्यवाही करावयाची असेल ती धोरणात्मक स्वरूपाची करावी. विभागाने असे काही ठरवावयास पाहिजे की, शिक्षण संस्था असतील तर त्यांना अमुक दर आकारण्यात येईल. पूर्वी जे दर आकारण्यात आलेले आहेत ते क्रीडांगणासाठी आहेत. २०१८ पूर्वीचे आणि २०१८ नंतरचे जे नियम असतील तेच नियम या संस्थेला सुद्धा लागू केले पाहिजेत. असे समितीने सूचित केले असता, या प्रकरणामध्ये नुतनीकरण करताना दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ रोजीची सद्यःस्थितीतील स्वीकारण्यात आलेली आहे. त्या धोरणानुसार नुतनीकरणानंतर भाडेपट्टा जागेच्या सद्यःस्थितीतील बाजार मूल्याच्या ०.०१ टक्के आहे. विभागाकडून शैक्षणिक संस्थांना क्रीडांगण देण्यासाठी अत्यंत कमी दर आकारण्यात येतात. मात्र या प्रकरणामध्ये बाजार मूल्याच्या १५ टक्के दर आकारण्यात आलेला आहे.

०.०१ टक्के आकारण्यात यावे. विभागाने जे धोरण तयार केलेले आहे त्यामध्ये हा विषय येत नाही काय? कारण, ०.०१ टक्के सांगितले आणि येथे मात्र १५ टक्के म्हटले आहे. हे अन्यायकारक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकारी यांच्याकडून ०.१ रक्के आकारण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर विभाग हे निर्णयासाठी शासनाकडे सादर करेल. शासन त्याबाबत फेरविचार करील. जे धोरण आहे ते नुतनीकरणानंतरच्या भाडेपट्ट्याकरिता आहे. ही नुतनीकरणापूर्वीची बाब आहे. अगोदरच १५ टक्के केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीचे म्हणणे आहे की, सर्व शिक्षण संस्थांसाठी समान धोरण असावे. विभागाने शिक्षण संस्थांसाठी धोरण शिथील केलेले आहे. शासनाने त्याच धर्तीवर मागील प्रकरणांचा सुद्धा विचार करावा. दोन प्रकारच्या शिक्षण संस्था आहेत. काही शिक्षण संस्था गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करतात तर काही शिक्षण संस्था केवळ व्यावसायिक पद्धतीने चालविल्या जातात. विभाग इंजिनिअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेजसाठी वेगळे नियम करणार आहे की त्यांना ज्या जमिनी दिलेल्या आहेत त्यासाठी सुद्धा हेच धोरण लागू करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये शासन स्तरावर निर्णय होणार असल्यामुळे त्याबाबत अंतिम भाष्य करणे शक्य नाही. बाजार मूल्याच्या १५ टक्के दर खूप जास्त आहे असा मुद्दा समितीने उपास्थित केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला विभागाचे म्हणणे मान्य आहे. जे शिक्षण महर्षि आहेत त्यांची शिक्षणाबाबतची भावना वेगळी असते. परंतु, जे शिक्षण सम्राट निर्माण झालेले आहेत त्यांनी शासनाकडून जमिनी घेऊन तेथे व्यावसायिक महाविद्यालये सुरू केलेली आहेत. तेथे कोणालाही सवलत मिळत नाही. त्यांनी शासनाकडून जमिनी घेतलेल्या आहेत. विभाग २०१८ नंतर हे करीत आहे. विभागाने त्यासाठी काही वेगळे धोरण ठरविणार आहे की सरसकट सर्व शिक्षण संस्थांसाठी एकच धोरण ठरविण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने नुतनीकरण करताना दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ रोजीचे धोरण स्वीकारले आहे. त्यामध्ये फक्त क्रीडांगण असा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये संस्था कशा स्वरूपाची आहे असा भेदभाव करण्यात आलेला नाही. असे विभागीय संचिवानी अवगत केले.

**वासूद, ता. सांगोला जि. सोलापूर,**

वासूद, ता. सांगोला जि. सोलापूर येथील गावठाण येथे २०४१ चौ.मी. जागेच्या प्रकरणामध्ये सुद्धा तीच परिस्थिती आहे. ती जागा चेअरमन लोकल बोर्डाच्या ताब्यात आहे. लेखी उत्तरात नमूद केलेले आहे की, " सद्यःस्थितीत नूतनीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही करता येत नाही, कागदपत्र उपलब्ध नाहीत." विभागाने हे कोठे तरी नियमानुकूल केले पाहिजे. असे समितीने सूचित केले असता, समितीने सूचित केल्याप्रमाणे ज्या प्रकरणामध्ये जमीन जिल्हापरिषदेच्या ताब्यात आहे त्या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करून घेऊन शासन स्तरावर अंतिम निर्णय विभागाकडून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**बारोळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर**

बारोळे, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा या संस्थेला दिनांक २४ नोव्हेंबर १९७० रोजीच्या आदेशानुसार क्रीडांगणासाठी जागा दिलेली आहे. परंतु, इतर संस्थांना ज्याप्रमाणे जागा देण्यात आली त्याप्रमाणे या संस्थेस जागा न देता कब्जे हक्काने जागा देण्यात आलेली आहे. असे समितीने निदर्शनास आणले व विचारणा केली की, जागा कब्जे हक्काने देण्याबाबत आदेश आहेत काय? कारण, पटवारी यांनी लिहून दिले तरी तो मालक होत नाही. त्यांना १९७० मधील जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसारच जमीन देण्यात आली असेल. लेखी माहितीमध्ये जागा कब्जे हक्काने दिलेली असल्यामुळे नुतनीकरणाची गरज नसल्याचे नमूद केले आहे. १९७० मधील आदेश क्रीडांगणासाठी कब्जे हक्काने जागा देण्याबाबत आहे काय? आदेश आणि फेरफार यामध्ये फरक आहे. तसा आदेश असेल तर समितीचे काही म्हणणे नाही. प्रचलित नियमानुसार १९३३ मध्ये रयत शिक्षण संस्थेला वेगळ्या नियमानुसार जागा दिली जाते आणि या संस्थेला वेगळ्या नियमानुसार जागा दिली जाते हे योग्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग सर्वसामान्य प्रकरणामध्ये क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने जागा देतो मात्र १९७० मधील जो आदेश आहे तो सध्या शासन स्तरावर उपलब्ध नाही. त्या आदेशाची शहानिशा करून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्याप्रमाणे जागेची नोंदणी करून नुतनीकरणाची कार्यवाही करावी. जागा घ्यावी असे समितीचे मत नाही. परंतु, त्यांना जागा कब्जे हक्काने देऊन सर्व कर माफ करण्यात आलेले आहेत. कब्जे हक्काने जागा देण्याबाबत आदेश असेल तर समितीचे काही म्हणणे नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत चुकीची दुरुस्ती करण्यात येत असून दिनांक २४ नोव्हेंबर १९७० रोजीच्या आदेशाची प्रत उपलब्ध आहे. ती जागा नियम ३२ अन्वये महसूल मुक्त पद्धतीने देण्यात आलेली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महसूल मुक्त पद्धतीने याची परिभाषा काय आहे? महसूल मुक्त याची परिभाषा कब्जे हक्काने अशी होऊ शकत नाही. त्यांना महसूल माफ केलेला आहे. परंतु, मालकी हक्क कसा काय देता येईल? जागा कब्जे हक्काने देणे म्हणजे ज्यांना जागा दिली त्यांना जागेची मालकी देणे असे होते. महसूल मुक्त पद्धतीने म्हणजे त्यांच्याकडून पैसे घ्यावयाचे नाहीत, हे बरोबर आहे. परंतु, त्यांना मालकी हक्क दिला तर कब्जे हक्क होईल. असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या जमिनीकरिता कोणत्याही प्रकारचा महसूल वसूल केला जात नाही अशी जमीन महसूल मुक्त पद्धतीने दिलेली असते. या प्रकरणामध्ये त्यांनी स्पष्ट केलेले आहे की, नियम ३२ व ३६ अन्वये हे करण्यात आले आहे. सदर आदेशामध्ये भाडेपट्ट्याचा कालावधी दिलेला नाही. त्यावरून जागा भाडेपट्ट्यावर दिलेली नाही असे स्पष्ट होते. या संदर्भातील आदेशमध्ये असे म्हटले आहे की, The undersigned presence compliments to the Commissioner Pune Division to his enforsement no on the subject noted above is directed to convey the sanctioned of the Government to the grant of land measuring 4 acres. ही जमीन मंजूर झालेली आहे. आदेशामध्ये भाडेपट्टा हा शब्द वापरलेला नाही. आदेशामध्ये मंजूर जमीन (लँड ग्रँट) असा शब्द वापरलेला आहे. आदेशामध्ये पुढे " Revenue free under rule ३२ " असे नमूद केले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मंजूर जमीन (लँड ग्रँट) म्हणजे त्यांना जागा दिली. परंतु, त्यांच्याकडून कोणताही कर/सारा घ्यावयाचा नाही. जमीन मंजुर झाली (ग्रँट ऑफ लँड) असती तर ती महसूल मुक्त केले नसते. असे मत समितीने व्यक्त केले असता, जमीन मंजुर झाली तर जागेबाबत कोणताही टॅक्स घेतला जात नाही परंतु, जमीन वर्ग-२ केल्यानंतर सारा भरण्याची जबाबदारी त्या व्यक्तीची असते. मात्र, ज्यावेळी रेव्हेन्यू फ्री ग्रँट करण्यात येते त्यावेळी त्यासाठी सारा लावण्यात येत नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग आऊट राईट ग्रँट केली असेल तर काय? अशी विचारणा समितीने केली असता, आऊट राईट ग्रँट केली असली तरी सारा लावता येतो. विभागाने ऑक्युपन्सी बेसीसवर ग्रँट केली तरी सुद्धा सारा वसूल करणे शक्य आहे, असे अधिकार शासनाकडे आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आऊट राईट ग्रँट केले का लिजवर केले हे आदेशातून स्पष्ट होत नाही. Whether the owner of the land is Government or not? त्या जागेवर त्यांची वहिवाट आहे? अशी विचारणा समितीने केली असता, जागेची मालकी शासनाकडेच आहे. शासनाने ती जागा त्या संस्थेला मंजूर केलेली आहे. ही जमीन मंजूर केलेली आहे. त्यामुळे ती भोगवटा वर्ग-२ तत्त्वावर त्यांच्याकडे राहणार आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने कब्जे हक्काने जमीन दिलेली आहे. भोगवटादार वर्ग-२ करावे अशी समितीची मागणी आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यांनी आदेशामध्ये ग्रँट शब्द वापरलेला आहे. आदेशामध्ये कोठेही लिज शब्दाचा वापर करण्यात आलेला नाही. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

भोगवटादार वर्ग-१ आहे की वर्ग-२ आहे? ती जमीन भोगवटादार वर्ग-२ असेल तर कब्जे हक्काने जमीन दिली असे विभागाकडून सांगण्यात येऊ नये. त्यांना महसूल मुक्त पद्धतीने जमीन दिलेली आहे असे विभागाने सांगावे जेणेकरून त्यांचा कब्जे हक्काचा अधिकार होणार नाही, एवढेच समितीचे मत आहे. विभाग भोगवटादार वर्ग-२ देण्यावर वर ठाम असेल तर कब्जे हक्काने असे नमूद न करता महसूल मुक्त असे नमूद करावे, असे समितीने सूचित केले असता, भोगवटादार वर्ग-१ होऊ शकत नाही. त्यासाठी बंधने आहेत. शासन ज्यावेळी जमीन मंजूर (Land grant) करते त्यावेळी ती भोगवटादार वर्ग-२ असते, ती जमीन भोगवटादार वर्ग-१ होत नाही. महसूल मुक्त म्हणजे त्यांच्याकडून कोणताही महसूल घेतला जाणार नाही. असे विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण दिले.

विभागाचे म्हणणे समितीला मान्य आहे. परंतु, विभागाकडून भोगवटादार वर्ग-२ असे सांगण्यात येते आहे? भोगवटादार वर्ग-१ नसेल तर कब्जे हक्क होणार नाही. कब्जे हक्काने जागा दिलेली आहे हे विभागाचे उत्तर योग्य नाही. शिक्षण संस्था असल्यामुळे ती जागा महसूल मुक्त करून त्यांना मंजूर केली गेली. विभागाने जागेचा मालकी हक्क दिलेला नाही, केवळ ताबा दिलेला आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, या प्रकरणामध्ये शासनाने जो आदेश काढलेला आहे आणि त्यासाठी जे लँड डिस्पोजल रुल्स वापरले आहेत ते महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू लँड डिस्पोजल रुल्स १९७१ नाहीत. त्यांनी त्यापूर्वीचे नियम वापरलेले आहेत. त्यांनी नियम ३२ व ३६ कोट केलेले आहेत. समितीने थोडा वेळ दिला तर जुने रुल्स ३२ व ३६ बघून मंजुरीचे स्वरुप काय होते हे स्पष्ट करण्यात येईल. प्रथम दर्शनी ही जमीन भाडेपट्ट्ट्यावर दिलेली दिसत नाही. त्यामुळे नुतनीकरणाचा प्रश्न येत नाही हे विभागाचे उत्तर योग्य आहे. मात्र, या प्रकरणी ऑक्युपन्सी बेसीसवर आहे किंवा नाही हे निश्चितपणे सांगावे असा समितीचा मुद्दा आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कब्जे हक्काने म्हणजे त्या जमिनीवर शासनाचा अधिकार नाही असा अर्थ होतो काय? ज्यावेळी महालेखाकार यांच्या बरोबर एक्झीट कॉन्फरन्स झाली त्यावेळी सांगण्यात आले की, It is not on occupancy basis. असे मत समितीने मांडले.

यह पॅरा इसलिए लिया गया था क्योंकि यह जमीन ऑक्युपन्सी बेसीस पर दिया गया था. असे महालेखापाल यांनी निदर्शनास आणले असता, At that point of time, this information may not be available with the Secretary. Now, the Collecor has clarified. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या बाबत सर्व नियम, कायदे बघून समितीला लेखी माहिती सादर करावी. असे निदेश समितीने दिले असता, या संदर्भात जुने नियम बघून विभागाकडून समितीला माहिति सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

**जिल्हा कोल्हापूर (परिशिष्ट-३)**

यासंदर्भात परि.क्र. ४.३.४.३. मधील परिशिष्ट ३ मध्ये कोल्हापूर जिल्हातील शैक्षणिक प्रयोजनार्थ क्रीडांगणसाठी दिलेल्या जमिनीचा भाडेपट्टा अथवा पुनर्ग्रहण न केलेल्या ७ संस्थांचा उल्लेख आहे. विभागाने त्यापैकी ४ मुद्यांची माहिती दिलेली आहे.

उदगांव एज्युकेशन सोसायटी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर संदर्भात समितीला माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, या प्रकरणी जुने आदेश बघितले असता दिनांक २२ नोव्हेंबर १९६३ रोजीचा आदेश असून सदर जमीन भाडेपट्ट्याने दिल्याचे नमूद केलेले नाही. समितीने यापूर्वी जे प्रकरण बघितले तसेच हे प्रकरण आहे. या प्रकरणी जमीन भाडेपट्ट्याने दिल्याचे नमूद नाही. त्यामुळे भाडेपट्टा नुतनीकरणाचा प्रश्न उद्‌भवत नाही, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले .

विभागीय सचिवांनी जमीन भाडेपट्ट्याने दिलेली नसल्याचे सांगितले. परंतु, ही सर्व प्रकरणे तपासून घ्यावीत. जमीन कब्जे हक्काने दिली की नियम ३२ अन्वये दिली हे तपासून घ्यावे. असे निदेश समितीने दिले.

कुमार विद्यामंदिर घोसरबाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर याबाबतच्या या प्रकरणामध्ये दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी नुतनीकरण करण्यात आले आहे याबाबतच्या लेखी माहितीमध्ये थोडी फार जागा शिल्लक असून बाकी जागेचा वापर सुरू असल्यामध्ये म्हटले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, आता जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे त्यांनी दिनांक २१ डिसेंबर २०१८ रोजी जमिनीच्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण केले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मौजे तेरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील प्राथमिक विद्यामंदिरच्या क्रीडांगणासाठी दिलेल्या भाडेपट्ट्याप्रकरणी सुद्धा तोच प्रश्न आहे. त्या जमिनीवर जिल्हा परिषदेचा ताबा आहे. परंतु, पूर्वी अतिक्रमण समजून नोटीस देण्यात आली होती. मात्र या केसमध्ये असा खुलासा प्राप्त झालेला आहे की, ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेची नोंद आहे. त्या आधारे तहसीलदार शिरोळ यांनी दिनांक ८ जानेवारी २०१९ रोजी जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केलेला आहे. सदर जागा जिल्हा परिषदेच्या शाळेच्या नावे वर्ग करण्यास हरकत नसावी, अशी त्यांनी जिल्हाधिकारी यांना विनंती केलेली आहे. समितीने जी सूचना केलेली त्यानुसार त्यांनी जमीन ग्रँट करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**परिच्छेद क्र. ४.३.४.४. जमिनीच्या पुनर्ग्रहणसाठी कारवाई न करणे**

या परिच्छेदा संदर्भात आदर्श विद्या प्रसारक संस्था, कुळगांव या संस्थेसंदर्भात समितीला माहिती द्यावी असे सूचित करून बँकेच्या भाडेपट्टट्याचा जो दंड लावलेला आहे तो योग्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, आदर्श विद्या प्रसारक संस्था, कुळगांव यांना १९६३ मध्ये शैक्षणिक प्रयोजनार्थ जागेचे वाटप झाले होते. त्यापैकी २४० चौरस मीटर जागा बँकेला पोटभाड्याने दिली होती. त्यामुळे शर्तभंग झाल्याचे प्रस्तावित होते. संबंधित संस्थेने दिनांक ८ डिसेंबर २००४ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता की, त्यांना जमिनीचे शैक्षणिक व वाणिज्यिक बिगर शेती प्रयोजन करून मिळावे. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २००७ रोजी त्यांना शैक्षणिक व वाणिज्यिक बिगर शेतकी प्रयोजनार्थ काही अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे आणि शर्तभंग नियमानुकूल करण्यासाठी त्यावेळी त्यांच्याकडून ७२,६३०/- रुपये वसूल केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरुन दिसून येते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

**परिच्छेद क्रमांक ४.३.५-निष्कर्ष** (चर्चा झाली नाही)

**परिच्छेद क्रमांक ४.४- इतर लेखापरीक्षा अभिक्षणे** (चर्चा झाली नाही)

**परिच्छेद क्रमांक ४.४.१- भोगवटा किंमतीची कमी आकारणी** (चर्चा झाली नाही)

**परिच्छेद क्रमांक ४.४.१.१- जिल्हाधिकारी बीड (मौजे-गवारी, तहसील बीड)** (चर्चा झाली नाही)

**परिच्छेद क्रमांक ४.४.१.२- मौजे-आंबेगाव, ता.पुणे** (चर्चा झाली नाही)

**परिच्छेद क्र.४.४.२ बोलीदारांकडून लिलाव रक्कमेवरील मुल्यावार्धित कराची (VAT) कमी वसुली-**

**१० टक्के VAT ची वसुली स्त्रोतातून न करता रेती उत्खननाचे हक्क बहाल केल्यामुळे VAT ची वसुली, रु.१६.१८ लाखाची कमी वसुली झाली -**

या पारिच्छेदा बाबत वसुलीची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे दर दिला होता आणि पैसे वसूल करण्याची विनंती केली होती. अद्ययावत माहिती अशी आहे की श्री.थोरात यांनी सेल टॅक्स विभागाकडे ८ लाख ५० हजार १०० रुपये दिनांक ०२ मार्च २०१४ रोजी चलनाने भरले होते, असे निष्पन्न झाले आहे. अशा आशयाचे पत्र सेल टॅक्स ऑफिसर यांनी दिनांक ०७ जानेवारी २०१९ रोजी जिल्हाधिकारी नंदुरबार यांना दिलेले आहे. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**परिच्छेद क्रमांक ४.४.३- अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली** (चर्चा झाली नाही)

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ४.३ "शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीचा वापर याचे लेखापरीक्षण"**

**परिच्छेद क्रमांक ४.३.१ "भाडेपट्टा कमी आकारणी"**

**अभिप्राय :**

**३.१** शासन निर्णय (जून १९९२) नूसार भाडेपट्टा वाटप/नुतनीकरण आदेशाच्या तारखेच्या पाच वर्षाआधीच्या १ जानेवारीला असलेल्या बाजारमूल्याच्या ५० टक्क्यावर विहीत दराने भाडेपट्टा आकारावयास पाहिजे. मे, १९८४ च्या शासन निर्णयानूसार भाडेपट्ट्याचे विहीत दर ८ टक्के आहे. सप्टेंबर, १९९१ मध्ये ७,९०० चौ.मी. जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी क्रीडांगणासाठी देण्यात आली. बाजार मूल्याच्या आधारावर वार्षिक भाडेपट्टा रु. ५०६ ठरविण्यात आले. भाडेपट्टा सप्टेंबर, २००६ मध्ये संपुष्टात आला आणि शासनाने त्यांच्या आदेशानूसार जुलै, २०१४ मध्ये भाडेपट्टा आणखी ३० वर्षासाठी वाढविला. शासनाने अशा देखील सूचना केल्या की भाडेपट्टा संपुष्टात येण्याच्या तारखेपासून भाडेपट्टा जून १९९२ च्या शासन निर्णयामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वसूल करावयास पाहिजे. या शासन निर्णयानुसार वार्षिक भाडेपट्टा रु. ५.९३ लक्ष काढण्यात आले, म्हणजेच २००६-०७ ते २०१५-१६ या १० वर्षासाठी एकूण भाडेपट्टा रु. ५९.३४ लक्ष होते. परंतु विभागाने रु. १ प्रति वर्ष या चुकीच्या दराने ३० वर्षासाठी रु. ३० वसूल केले. यामुळे मात्र १० वर्षाची रु. ५९.३४ लाख भाडेपट्ट्याची कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहे.

मौजे कदमवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील सर्व्हे नं.२१५ ही जमीन भारती विद्यापीठाला क्रीडांगणासाठी देण्यात आली. सदरहू भाडेपट्टा सन २००६ मध्ये संपुष्टात आला. शासन निर्णय दिनांकः ३० जून १९९२ मध्ये म.न.पा. हददीतील क्षेत्रासाठी जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व ५ वर्षे आधीच्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्त्वात असलेल्या बाजारमूल्याच्या ५०% भोगाधिकार मूल्य वसूल करणेबाबत नमूद केले आहे. सदर प्रकरणी क्रीडांगणाच्या भाडेपट्ट्याची मुदत २००६ साली संपली असल्याने सन २००६ च्या ५ वर्षे आधीच्या वर्षाच्या म्हणजेच १ जानेवारी २००१ रोजी अस्तित्त्वात असलेले बाजारमुल्य विचारात घेऊन वार्षिक भाडेपट्ट्याचा दर ठरवून त्याप्रमाणे वसुली करणे आवश्यक आहे असे मत विभागाने नोंदविले आहे. शासनाने भाडेपट्ट्याचे नुतनीकरण जरी सन २०१४ मध्ये केले. तरी वास्तविक नुतनीकरण हे सन २००६ पासून पुढे ३० वर्षासाठी करण्यात आले. त्यामुळे सन २००६ च्या ५ वर्षे आधीच्या म्हणजे दिनांक १ जानेवारी २००१ रोजी अस्तित्त्वात असलेले बाजार मुल्य विचारात घेऊन वार्षिक भाडेपट्टट्याचा दर ठरवून वसुली करणे अभिप्रेत असताना वार्षिक रु. १ दराने वसूल केलेले शुल्क हे चुकीचेच आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले व महालेखाकारांचे आक्षेप विभागीय प्रतिनिधींनी मान्यच केले. परंतु या प्रकरणी महालेखाकारांच्या मते ज्याअर्थी शासनाने सन २०१४ मध्ये भाडेपट्टट्याचे नुतनीकरण केले आहे. त्याअर्थी सन २०१४ पासून ५ वर्षाअगोदर म्हणजे सन २००९ ला अस्तित्त्वात असलेले बाजार मुल्य विचारात घेऊन रु.५९.३४ लक्ष इतकी वसुलीची परिगणना केलेली आहे व विभागाच्या मते जरी २०१४ मध्ये भाडेपट्टा नुतनीकरणाचे आदेश निर्गमित केले असले तरी नुतनीकरण सन २००६ पासून करण्यात आले असल्यामुळे सन २००६ पासून ५ वर्ष मागे म्हणजे सन २००१ मधील मुल्यांकनाच्या आधारे वसुली केली पाहिजे अशी विभागाची धारणा आहे.

**शिफारस :**

**३.२ महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपामध्ये मुल्यांकनासाठी ग्राह्य धरण्यात आलेले वर्ष व विभागाने वस्तुतः ग्राह्य धरलेले वर्ष यामध्ये तफावत असल्यामुळे व त्यामुळे वसूलपात्र रकमेमध्ये मोठ्या प्रमाणात फरक येत असल्यामुळे जोपर्यंत याचा अर्थ उकल योग्य पद्धतीने होऊन समितीसमोर ही बाब निष्कर्षाप्रत येत नाही तोपर्यंत विभागाने ही वसुलीची कारवाई केली नाही. तसेच विभागाने १ रुपया दराने या प्रकरणी केलेली वसुली ही निश्चितच चुकीची आहे. हे विभागाने समितीसमोर मान्यच केले. समितीसमोर जो निर्णय होईल त्याप्रमाणे विभाग पुढील कारवाई करेल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.**

**वास्तविकतः भाडेपट्टट्याची मुदत सन २००६ मध्ये संपत असताना भाडेपट्टा मुदतवाढीसंदर्भात अथवा नुतनीकरणासंदर्भात १ वर्ष अगोदरच तसा अर्ज संस्थेने शासनास करणे आवश्यक असताना भाडेपट्टाधारकाकडून वर्षानुवर्षे नुतनीकरणासाठी अर्ज केला जात नाही व असा अर्ज विहित मुदतीत न केल्यामुळे शासन देखील अशा प्रकरणी कोणतीही कारवाई करीत नाही. त्यामुळे अशा मुदतीवाढीकडे संस्थेकडून अधिकच दुर्लक्ष होते. सदरहू प्रकरणी २००६ मध्ये भाडेपट्टा संपल्यानंतर भाडेपट्टाधारक वा शासन दोहोंकडूनही भाडेपट्टा मुदतवाढीसंदर्भात कोणतीही कार्यवाही ७-८ वर्षे न करणे व तब्बल ८ वर्षानंतर भूतलक्षी प्रभावाने असे आदेश निर्गमित करणे हीच कार्यपद्धती मुळात आक्षेपार्ह आहे व त्यातून नंतर अनेक अडचणी निर्माण होतात. सदर प्रकरणी त्याच भाडेपट्टेधारकाला विभागाने भाडेपट्ट्याचे नुतनीकरण आदेश ८ वर्षाच्या पूर्वलक्षीप्रमाणे दिले. परंतु जर २०१४**

**मध्ये हा भाडेपट्टा खंडीत करून विभागाने जर अन्य संस्थेला या जमिनीचा भाडेपट्टा देण्याचा निर्णय घेतला असता तर मात्र ५ वर्षापुर्वी म्हणजे २००९ च्या दराने ही आकारणी करणे क्रमप्राप्त ठरले असते. अशा परिस्थितीत निर्णयाच्या विलंबामुळे व ८ वर्षानंतर त्याच भाडेपट्टेधारकाला मुदतवाढ देणे गृहीत धरून सन २००१ म्हणजे तब्बल १४ वर्षे अगोदरचा दर निश्चित करणे ही बाब कदापि समर्थनीय नाही. त्यामुळे अशा निर्णयातील विलंबाप्रकरणी शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान पाहता महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे निश्चितच वस्तुस्थितीला धरून व शासनाच्या आर्थिक हिताचे आहे. विभागाने मुदतवाढीचा निर्णय सन २००६ मध्येच घेणे आवश्यक होते. सन २००६ ते २०१४ या कालावधीतील विलंबाचे कोणतेही समर्थन विभाग करू शकत नाही. भूतलक्षी प्रभावाने भाडेपट्टट्याचे केलेले नुतनीकरण व त्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेले मुल्यांकनाचे वर्ष यासंदर्भात विभागाने घेतलेली भुमिका जर मान्य केली तर भाडेपट्टेधारकांना ही बाब अधिकच फायदेशीर ठरु शकते व भाडेपट्टेधारक अधिकाधिक विलंबाने शासनाकडे नुतनीकरणाचे अर्ज करण्यास प्रवृत्त होतील व हे कदापी योग्य होणार नाही. याही उपर सदरहू संस्थेने सन २००६ ते सन २०१४ या काळात कोणत्याही परवानगीशिवाय क्रीडांगणाच्या जमिनीचा वापर केला त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५० नुसार भाड्याच्या रकमेव्यतिरिक्त २००० रुपये प्रति माह दंड आकारण्याची तरतूद आहे. त्याची देखील अंमलबजावणी सदरहू प्रकरणी होणे आवश्यक आहे. अनेकदा संस्थाकडून नुतनीकरणाची मागणी झाल्यानंतरही विभागाच्या स्तरावर वर्षानुवर्षे ही प्रकरणे निर्णयाविना प्रलंबित राहतात. समितीच्या मते विलंब संस्थेच्या अथवा विभागाच्या अशा कोणत्याही स्तरावरुन होणे निश्चितच समर्थनीय नाही. आता शासनाने क्रीडांगणासाठी द्यावयाच्या जमिनीचे धोरण १६ नोव्हेंबर, २०१८ रोजी तयार केलेले आहे. त्यामुळे हा प्रश्न भविष्यात उद्‌भवणार नाही. परंतु अगोदर असे कोणतेही धोरण अस्तित्त्वात नसल्यामुळे प्रकरणपरत्त्वे हे निर्णय घेतले गेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.**

**परंतु सदरहू प्रकरणी शासन तरतूदीचा निश्चित अर्थ उकल (Interpretation) करून कोणत्या वर्षाचा दर ग्राह्य धरून हे मुल्यांकन वा आकारणी करावी हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. तरीही या प्रकरणी तरतूदीचा निश्चित अर्थ उकल (Interpretation) करण्याबाबत शासनाच्या विधि व न्याय विभागाचे तात्काळ अभिप्राय घेण्यात यावे. या अनुषंगाने वसूलपात्र रकमेची निश्चिती करण्यात यावी. त्याचप्रमाणे नुतनीकरणास झालेल्या विलंबामुळे रु.२००० दरमहा दंडाची देखील आकारणी करण्यात यावी व संपूर्ण रक्कम भाडेपट्टेधारक संस्थेकडून तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच याप्रकरणी तरतूद स्पष्ट असतानाही विभागाने रुपये १ प्रति वर्ष या चुकीच्या दराने केलेले मुल्यांकन व वसुलीसंदर्भात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.२ "अनर्जित उत्पन्नाची कमी आकारणी"**

**अभिप्राय :**

**३.३** "महसूल व वन विभागाच्या सप्टेंबर, १९८३ च्या शासन निर्णयामध्ये वर्ग-II म्हणून जमीन धारण करणाऱ्या भूधारकास शासकीय जमीन विकण्याची परवानगी बाजार मूल्याच्या ५० टक्के रक्कम निव्वळ अनर्जित उत्पन्न अदा केल्यानंतरच मिळू शकेल असे विनिर्दिष्ट आहे.

ही जमीन मुंबई रायगड शिक्षण संस्थेस (ट्रस्ट) आश्रम शाळेसाठी महसूल मुक्त पद्धतीने देण्यात आली (जुलै १९९५) या ट्रस्ट ने ही जमीन दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित केली. महाराष्ट्र शासनाने १६,००० चौ.मी. जमीन हस्तांतरित करण्याची परवानगी दिली. महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी यांना अनर्जित उत्पन्न बाजार मूल्याच्या ५० टक्क्यांऐवजी १० टक्के दराने निव्वळ अनर्जित उत्पन्न म्हणून वसूल करावयाचे निर्देश दिले. दस्तावेजानुसार निव्वळ अनर्जित उत्पन्न रु.३२ लाख होते. परंतु विभागाने फक्त रु.६.४० लाख वसूल केले. यामुळे रु.२५.६० लाख अनर्जित उत्पन्नाची कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

मौजे वरप, ता.पेण, जि.रायगड येथील स.नं.११३ पैकी ४ एकर या जमिनीवरील परिवर्तन ८४ पवई संचलित अनुदानित रानपाखरे ही आदिवासी आश्रमशाळा पवार पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई या संस्थेकडे आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २८ सप्टेंबर २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये हस्तांतरण झालेले आहे. शासन ज्ञापन दिनांक ७ जून २००८ अन्वये तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक २६ जून २००८ च्या आदेशान्वये उक्त जमीन हस्तांतरणास मंजुरी दिलेली आहे. शासन ज्ञापन दिनांक ७ जून २००८ अन्वये जमिनीच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम अनर्जित रक्कम म्हणून शासन परिपत्रक दिनांक २ फेब्रुवारी १९८३ व शासन निर्णय दिनांक ११ मे १९८४ मधील अटी व शर्तीस अधीन राहून सदरची मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार १० टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. शासनाने याबाबत कोणतेही

नवीन धोरण ठरविलेले नसल्याने यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार १० टक्केइतकी अनर्जित रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. मात्र भविष्यात विषयांकित प्रकरणी शासनाने नवीन धोरण ठरविल्यास त्यानुसार सदर संस्थेकडून होणारी अनर्जित रक्कम वसूल करण्याबाबतची तजवीज ठेवण्यात आलेली आहे असे विभागाने समितीसमोर स्पष्ट केले. सदरहू प्रकरणी महालेखाकारांच्या मते दिनांक ८ सप्टेंबर १९८३ च्या शासन निर्णयान्वये ५०% रक्कम आकारणे आवश्यक असताना विभागाने केवळ १०% रक्कम आकारल्यामुळे शासनाचे नुकसान झाले असल्याचे त्यांचे आक्षेपात नमूद केले आहे.

**शिफारस :**

**३.४ समितीने या संदर्भात छाननी केली असता, शासनाने धर्मादाय प्रयोजनासाठीची जमीन त्याच प्रयोजनासाठी दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित केल्यामुळे व दोन्ही संस्था या धर्मादाय संस्था असल्यामुळे प्रकरणपरत्त्वे निर्णय घेऊन १०% अनर्जित रक्कम वसूल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे सन १९८३ चा निर्णय केवळ कृषी जमिनीस लागू असल्यामुळे सदरहू प्रकरणी कोणत्याही शासन निर्णयाचा भंग झालेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. सवलतीच्या कब्जेहक्कानी अथवा भोगाधिकार मूल्यरहित किमतीची जमीन प्रदान करण्यात आली असेल तर अनर्जित रक्कम किती घ्यावी याचे कोणतेही धोरण त्यावेळी अस्तित्त्वात नव्हते. त्यामुळे १०% दराने अनर्जित रक्कम घेण्यात आली. तसेच भविष्यात यासंदर्भात शासन जे धोरण निश्‍चित करेल ते संस्थेस मान्य असेल व त्या धोरणानुसार संस्था अनर्जित रक्कम देईल असे हमीपत्रदेखील संस्थेकडून घेण्याचा निर्णय त्यावेळी विभागाने घेतला व त्याअनुषंगाने संस्थेकडून हमीपत्रदेखील घेण्यात आले असे असताना विभाग केवळ १०% अनर्जित रक्कम घेण्याचा निर्णय घेऊ शकत नाही व सन १९८३ च्या शासन निर्णयाच्या आधारे ५०% रक्कम वसूल केली पाहिजे असे महालेखाकारांचे मत आहे. उपरोक्त परिस्थितीत विभागाने नवीन दरनिश्‍चिती करणे आतापर्यंत आवश्यक होते. परंतु यासंदर्भात आजतागायत विभागाने कोणतेही नियम तयार केले नाही वा दरनिश्‍चिती देखील केली नाही. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये निर्णय प्रकरणपरत्त्वे घेण्यात आले. अशा प्रकरणासंदर्भात प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे विशेषाधिकार ठेवण्याऐवजी निर्णयात समानता, पारदर्शकता व एकवाक्यता असणेसाठी विभागाने याबाबत सुस्पष्ट नियम १ महिन्याच्या आत तयार करावे असे समितीने सूचित केले असता, ३१ मार्च, २०१९ पर्यंत सदर नियम तयार करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. त्या अनुषंगाने समितीस दिलेल्या आश्वासित माहितीमध्ये शासन धर्मदाय संस्थांना विविध आदेशानुसार शासकीय जमिनीचे वाटप करीत असते. यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. १६.०४.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे अंतरीम आदेश पारीत केले आहेत.—"In the meanwhile, in our opinion, it would be appropriate if the Government of Maharashtra frame a policy which stands scrutiny of Article 14 of the Constitution. *Prima-facie* various notifications placed on record do not indicate any policy for allotment of land to the charitable institution. In the meanwhile no allotment should be made on the basis of existing notifications." मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर धर्मादाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथालये व अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचे वाटप करण्याबाबतची कार्यपद्धती विषद करणारे सविस्तर धोरण तयार करून त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. तथापि, सदरहू धोरण अंतिम करण्यापूर्वी ते मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने या धोरणाच्या प्रती शासकीय अभियोक्ता यांना पाठवून सदरहू धोरण मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याची विनंती केली आहे. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश अद्याप अप्राप्त असल्यामुळे निर्देश प्राप्तीनंतर यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे विभागामार्फत समितीस सादर करण्यात आले.**

**अतः विभागाने हे धोरण अंतिम करून त्याची अंमलबजावणी करावी. तसेच सदरहू प्रकरणी महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप व विभागाने घेतलेला निर्णय शासन निर्णयातील विहित तरतुदी, जमीन वाटपाच्या अटी, शर्ती व संस्थेने दिलेले हमीपत्र या अनुषंगाने विधि व न्याय विभागाचे मत तात्काळ घेऊन सदरहू संस्थेकडून घ्यावयाच्या अनर्जित उत्पन्नाच्या रकमेची फेरआकारणी करून अंतिम निश्‍चित रक्कम सदरहू संस्थेकडून वसूल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.३ "भाडेपट्टा करार आणि अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे"**

**अभिप्राय :**

**३.५** नोंदणी अधिनियम, १९०८ च्या नियम १७ (1)(d) मध्ये स्थावर मालमत्तेच्या भाडेपटटट्याची प्रत्येक वर्षी अथवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनिवार्यरीत्या नोंदणी करण्याचे प्रावधान आहे. तसेच महसूल व वन विभागाच्या दि.३१ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयामध्ये प्रावधान आहे कि, अशा सर्व प्रकरणांत ज्यात शासकीय जमीन एखाद्या संस्था, स्थानिक संस्था अथवा व्यक्तीस भोगवटाधिकार किंवा भाडेपट्ट्यावर देण्यात येते, त्या वेळी ज्याला जमीन देण्यात येत आहे त्याचे सोबत एक करार निष्पादीत करून त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारून त्याची महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अंतर्गत नोंदणी करावयास पाहिजे, जेणेकरून शासनखाती महसूल जमा होईल. तसेच करार निष्पादीत होऊन त्याची नोंदणी होईपर्यंत जमिनीचा ताबा द्यावयास नको असेही त्यात सूचित आहे :

परंतु कोल्हापूर, रायगड, सोलापूर आणि ठाणे या चार जिल्हाधिकारी कार्यालयांतील आठ प्रकरणांत मे २००७ ते जुलै २०११ दरम्यान विविध शिक्षण सोसायटी/संस्थांना जमीन देण्यात आली. ही जमीन भोगवटा आणि भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आली. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुक्रमे अनुच्छेद २५ आणि ३६ अनुसार याची नोंदणी करावयास पाहिजे होती. तथापि, संबंधित पक्षामध्ये भाडेपट्टा करार जमिनीचा ताबा दिल्यानंतरही निष्पादीत करण्यात आला नाही. कराराशिवाय शासकीय जमिनीस भाडेपट्ट्यावर देणे अधिनियमाच्या प्रावधानांच्या अनुरूप नव्हते. यामुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फीच्या स्वरूपात मिळणारा रु. १४.७६ लाखाचा महसुलही मिळू शकला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदर परिच्छेदात ठाणे जिल्ह्यातील—(१) मौजे कावेसर, ता. ठाणे येथील समन्वय प्रतिष्ठान, (२) मौजे ठाणे, ता.ठाणे येथील महाराष्ट्र कोळी समाज, (३) मौजे काटेमानिवली, ता. कल्याण येथील स्वामी समर्थ शिक्षण संस्था, (४) मौजे राहनाळ, ता. भिवंडी येथील साई सेवा शिक्षण मंडळ, (५) मौजे उल्हासनगर, ता. उल्हासनगर येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था या वाटपग्रही संस्थांपैकी महाराष्ट्र कोळी समाज यांना प्रदान करण्यात आलेल्या जमिनींबाबत दिनांक ४/१०/२०१७ रोजी करारनामा निष्पादित करण्यात आला असून त्यानुषंगाने मुद्रांक शुल्क (रु. ३,०८,०००/-) व नोंदणी फी (रु. ३०,०००/-) शासन जमा करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित चार वाटपग्रही संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या जमिनींबाबत शासन परिपत्रक दिनांक ३१/१०/२००६ मधील तरतुदीअन्वये करारनामा निष्पादित करण्याबाबत कळविण्यात आले आहे. जेणेकरून प्रस्तुत प्रकरणी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी शासनास मिळू शकेल, असे विभागाने समितीस सादर केले.

तसेच रायगड जिल्ह्यातील—(१) मौजे वरप, ता. पेण येथील परिवर्तन ८४ पवई, मुंबई संस्था, (२) सुहित जीवन ट्रस्ट, पेण, ता. पेण, (३) अध्यक्ष, कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळ, वरसगाव कोलाड, ता. रोहा, (४) तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट, गोवे, ता. रोहा, (५) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आगारवाडा, ता. म्हसळा, (६) सरकारी आश्रमशाळा, नेणवली, उद्धर, ता. सुधागड या संस्थांपैकी उपरोक्त क्रमांक (२), (३), (४) व (५) कडून मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसूल करण्यात आली आहे व क्र. (१) ते (३) बाबत करारनामा निष्पादित करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे व क्र. ६ ची जमीन शासनजमा करण्यात आली असून क्र. (१) बाबत करारनामा दस्त निष्पादित करणे व मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसूल करणेची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील ४ संस्थांपैकी ३ संस्थांचा भाडेपट्टा निष्पादनाबाबतची कार्यवाही करण्यात आलेली असून विहीत मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी आकारण्यात आलेली आहे व चौथ्या भारती विद्यापीठ, करवीर, जिल्हा कोल्हापूर या संस्थेबाबत सुधारित परिगणना करून सादर करण्यात आलेले आहे. सदर संस्थेच्या वार्षिक भाडेपट्ट्याच्या रकमेबाबतचा निर्णय अंतीम झाल्यानंतर उक्त संस्थेशी भाडेपट्टा करार निष्पादित करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले.

सोलापूर येथील पद्मशाली शिक्षण संस्थेस देण्यात आलेल्या जमिनीसंदर्भात सदर संस्थेने करारनामा-दस्त अद्यापही निष्पादित करून घेतलेला नाही. त्याअनुषंगाने नोटिशीद्वारे करारनामा-दस्त निष्पादित करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आलेले आहे असे समितीस सादर करण्यात आले.

**शिफारस :**

**३.६ सदरहू प्रकरणी भाडेपट्टा करार व अभिहस्तांतरण करार निष्पादित न करणे यासंदर्भात महालेखाकारांद्वारे सदरहू आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. सदरहू प्रकरणी हा करार करणे, त्याची नोंदणी करणे व त्याअनुषंगाने शासनास मुद्रांक शुल्क व नोंदणी फी प्राप्त होणे अभिप्रेत असल्याचे महालेखाकारांनी नमूद केले आहे. यासंदर्भात दिनांक ३१/१०/२००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीसंदर्भात करार निष्पादित करून त्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क व नोंदणी फी आकारणे आवश्यक ठरते व त्या अनुषंगाने संबंधित कार्यासनाने परिपत्रकदेखील निर्गमित केले ज्यात, शासनामार्फत भाडेपट्टा करार नोंदणी**

**करणे व मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. त्याचवेळी विभागाने समितीच्या निदर्शनास आणून दिले की, नोंदणी अधिनियमातील कलम १७ च्या आधारे हे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. परंतु त्याच कायद्यातील कलम ९० (१)(डी) मध्ये "Exemption of certain documents executed by or in favour of Government". या शिर्षांतर्गत शासनातर्फे जे दस्तावेज तयार होतात त्यांना नोंदणीपासून सूट देण्यात आली आहे. या दोन्ही तरतूदी व शासनाने निर्गमित केलेले परिपत्रक पाहता, यामध्ये विसंगती असल्याचे दिसून येते. परंतु ज्याअर्थी सन २००६ साली कार्यासनाने उपरोक्त प्रकारचा निर्णय घेऊन सर्वांना सूचना निर्गमित केल्या होत्या, त्याअर्थी त्याला काहीतरी आधार नक्कीच होता. या दोन्ही तरतूदींमध्ये विसंगती राहू नये यासाठी अगोदरच विभागाने विधि व न्याय विभागाकडे अनौपचारीक संदर्भ केलेला आहे. त्यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर या दोन्ही तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत अधिक स्पष्टता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. तसेच यात अशीही अडचण आहे की, हे सर्व व्यवहार ३०-४० वर्षांपूर्वीचे असून आता जर जुन्या सर्व भाडेपट्टयांच्या नोंदणीची अंमलबजावणी करावयाची झाल्यास त्यास आजच्या दराप्रमाणे मुद्रांक शुल्क भरावे लागेल व ही रक्कम फार जास्त असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत कलम ९० मधील तरतूद पहाता, सन २००६ चे परिपत्रकाचा आधार प्रश्नास्पद ठरतो. तसेच दुसरे असे की, जरी नोंदणीची सुट दिली तरी स्टॅम्प ड्युटी भरण्याची जबाबदारी कायम राहते व ती वसूल करणे क्रमप्राप्त ठरते अशी विभागाची धारणा आहे. परंतु विधि व न्याय विभागाच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करणे व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सुधारित सूचना निर्गमित करणे आवश्यक राहील असेही समितीसमोर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले आहे. आता दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी विभागाने एक धोरण निश्चित केले असून जमीन मंजुरीच्या आदेशातील ठराविक कालावधीनंतरदेखील मुदतवाढ मागायची असेल तर टेलिस्कोपीक पद्धतीने दंडाचे अधिमूल्य आकारण्याची तरतूद केली असून त्या अनुषंगाने जिल्हास्तरावर कारवाई सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अतः सदरहू प्रकरणी विभागाने विधि व न्याय विभागाकडून तात्काळ अभिप्राय प्राप्त करून घ्यावे व त्या अनुषंगाने करार निष्पादन, नोंदणी, मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसूल करणेबाबतची आवश्यक ती पुढील कारवाई कालबद्ध पद्धतीने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४ ''शासकीय जमिनीचे पुनर्ग्रहण न करणे''**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.१ ''जमिनीचा वापर न करणे''**

**अभिप्राय :**

**३.७** महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये विनिर्दिष्ट आहे की शर्तीचे उल्लंघन झाल्यास अथवा ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन प्रदान केली आहे. त्यासाठी तिचा वापर जिल्हाधिकारी ठरवतील त्या तारखेपर्यंत न झाल्यास शासनाने ती जमीन पुनर्ग्रहीत करावयास पाहिजे. परंतु चार जिल्ह्यांतील १५ प्रकरणांत २,१३,०२३ चौ.मी. जमीन शिक्षण संस्थांना प्रदान करण्यात आली होती. या संस्थांनी जमिनीचा वापर केला नव्हता. (जून २०१६), या सर्व प्रकरणांत जिल्हाधिकाऱ्यांद्वारे विनिर्दिष्ट वापर अवधी संपला होता. याव्यतिरिक्त नाशिक जिल्ह्यामधील एका प्रकरणात ४,००० चौ.मी. शासकीय जमीन ऑक्टोबर, १९३३ मध्ये शैक्षणिक प्रयोजनासाठी भोगवटा तत्त्वावर देण्यात आली होती. त्यामुळे ह्या जमिनीचे हक्क शासनाकडेच होते. तलाठी यांनी तहसीलदार, नाशिक यांना सादर केलेल्या अहवालानुसार ही जमीन पडित असून, या जमिनीवर कोणतेही बांधकाम नव्हते. यावरून या जमिनीला ज्या प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आले होते त्यासाठी तिचा वापर होत नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यापैकी मौजे मोरीवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील ३,२८० चौ.मी. जमीन शाळेच्या इमारतीसाठी महसूलमुक्त व सारा माफीने कब्जाहक्काने व लगतची ६,५६० चौ.मी. जमीन क्रीडांगणासाठी रु. १/- नाममात्र वार्षिक भाडे आकारून १५ वर्षाच्या कालावधीकरीता भाडेपट्ट्याने दिनांक १६/१०/२००२ रोजी मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, अंबरनाथ यांना विहित अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आली आहे. तथापि, उक्त नमूद जागेचा वापर सदर संस्था करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने शर्तभंगाबाबत संबंधितास नोटीस बजावण्यात आली होती. परंतु अर्जदार संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या जमिनीवर स्थानिक लोकांनी आक्षेप घेतले होते. तसेच, त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाल्याने सदर संस्थेस स्थानिक नियोजन प्राधिकारी यांच्याकडून आवश्यक त्या परवानग्या घेऊन जमिनीचा प्रत्यक्ष वापर सुरू करण्यास विलंब झाला.

सदर जागेवरील इमारत बांधकामास झालेला विलंब हा प्रशासकीय कारणांमुळे झालेला असून आता सदर जागेवर बांधकाम केलेले असून तेथे इयत्ता १ ते ५ पर्यंतचे वर्ग भरत आहेत. तसेच उक्त जमिनीपैकी क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने दिलेल्या ६,५६० चौ.मी. जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत दिनांक १६/१२/२०१७ रोजी संपुष्टात आली असून अर्जदार संस्थेने त्यांच्या दिनांक ४/५/२०१७ रोजीच्या अर्जान्वये सदर भाडेपट्ट्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. क्रीडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापरासाठी भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या संदर्भात भाडेपट्ट्याचे नुतनीकरणाचे करताना आकारावयाची भूईभाड्याची रक्कम व नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करणेसंदर्भात सर्वसमावेशक धोरण शासन निर्णय दिनांक १६/११/२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले आहे. सदर धोरणातील तरतूदीनुसार भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण करण्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सक्षम आहेत.

त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील एकूण चौदा शैक्षणिक संस्थांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या जागेचा वापर न केल्याबाबत सदर जागांचा स्थळ निरीक्षण अहवालासह प्रस्ताव प्राप्त करून घेणेबाबत व प्रचलित शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी नाशिक यांच्या स्तरावर सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

युथ एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी, नाशिक या संस्थेस दिनांक २१ जुलै १९३२ च्या आदेशान्वये मौजे नाशिक येथील जागा मुस्लिम विद्यार्थी वसतीगृह या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात आलेली आहे. सन २००७ मध्ये संस्थेस वरील नमूद जागेवर एकूण बांधकाम क्षेत्राच्या १५% क्षेत्रावर वाणिज्यिक वापर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर संस्थेने सदर मिळकतीस पुनर्विकास व पुनर्बांधणीस परवानगी मिळण्याबाबत दिनांक २६ सप्टेंबर २०१७ च्या अर्जान्वये विनंती केली आहे. याअनुषंगाने पुनर्विकास परवानगी देणे कामी कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

श्री विद्यावर्धिनी एज्युकेशन सोसायटी, सोनारवाडी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांना इंजिनिअरींग कॉलेज इमारत, क्रीडांगण व इतर प्रायोगिक कारणासाठी मौजे फणसवाडी ता.भुदरगड येथील जमीन इमारत, क्रीडांगण बांधकामासाठी भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त तत्त्वावर अटी व शर्तीस अधिन राहून मंजुर करणेत आलेली होती. तथापि, संस्थेला ज्या कारणांसाठी जमीन दिली होती त्या कारणाकरिता गेल्या सहा वर्षापासून जमिनीचा वापर केला नसल्यामुळे सदर आदेशातील अटींचा भंग झाल्यामुळे दिनांक ९/८/२०१६ मध्ये सदरची जमीन सरकार हक्कात घेणेत आली आहे.

नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड संचलित चंद्रभागाबाई यलगुतवार प्रशाला, सोलापूर या संस्थेस शाळेच्या इमारतीकरीता व क्रीडांगणासाठी १५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने जागा प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संपूर्ण जागेचा वापर क्रीडांगणासाठी असल्याने सर्व जागेचा मंजूर प्रयोजनासाठी वापर झाला आहे. परंतु, संस्थेस क्रीडांगणासाठी प्रदान केलेल्या जागेच्या भाडेपट्ट्याची मुदत २००८ साली संपलेली आहे. यासंदर्भात मुदतवाढीसंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

कृष्णा सदा आप्पाजी यल्मार मौजे भंडीशेगाव, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील जमीन गावठाणातील असून सन १९८० साली झालेले नगर भूमापन चौकशीच्या वेळेपासून किसन आप्पाजी यल्मार यांचे नावाची नोंद दिसून येते. सदरची जमीन खाजगी जमीन असल्याचे दिसून येत असल्यामुळे जमीन सरकार जमा करणे आवश्यक नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अशाप्रकारे प्रकरणनिहाय सर्व बाबींवर समितीने चर्चा केली असता त्यात अनेक ठिकाणी तांत्रिक बाबींची वा मुदतवाढी संदर्भातील पुर्तता व विहित प्रयोजनाचे पालन न झाल्याचे दिसून आले.

**शिफारशी :**

**३.८ (१) शासकीय जमिनीचे प्रनर्ग्रहण न करणे तसेच जमिनीचा वापर न करणे यासंदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे गंभीर असून एकुणच शासनाच्या कार्यपद्धतीवर शंका निर्माण करणारे आहेत. राज्यात विशिष्ट प्रयोजनासाठी दिलेल्या शासकीय जमीनींवर विभागाचे कोणतेही नियंत्रण राहात नाही. भाडेपट्ट्यांची मुदत संपल्यानंतरही त्याचे नुतनीकरण न करणे अथवा अमर्याद विलंबाने ते करणे, तसेच प्रयोजनाचे वा अटी शर्तीचे उल्लंघन झाल्यास विभागाद्वारे नियमानुसार कोणतीही कारवाई न करणे, एवढेच नव्हे तर महालेखाकारांनी राज्यात केवळ नमुन्यादाखल केलेल्या चार जिल्ह्यांच्या तपासणीत या बाबी निदर्शनास आल्या आहेत. परंतु राज्यात सर्वत्रच शासकीय जमिनी भाडेपट्ट्यावर देणेबाबत हीच परिस्थिती कायम आहे. एकदा जमीन भाडेपट्ट्याने दिली तर त्यावर विभागाचे कोणतेही नियंत्रण दिसून येत नाही व ही गंभीर बाब आहे. समितीने आक्षेपात नोंदविलेल्या जागेसंदर्भात प्रकरणनिहाय चर्चा केली. त्यातील काही प्रकरणात आता विहित प्रयोजनाची पुर्तता आता करण्यात आली आहे, काही प्रकरणात मुदतवाढ तसेच नुतनीकरणासंदर्भातील कार्यवाही विभागाच्या स्तरावर सुरू आहे व काही प्रकरणात शासनाने जमीन ताब्यात घेतलेली आहे.**

**मोरीवली ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील जागेसंदर्भात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप व विभागाने यासंदर्भात दिलेले स्पष्टीकरण पहाता जरी जमिनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी मुदतीत होऊ शकला नाही तरीही त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार नाही तर स्थानिकांचा विरोध, पोलीस केस, न्यायालयीन प्रकरणे व परवानग्या प्राप्त न होणे अशा अडचणी असल्यामुळे व आता सदरहू ठिकाणी शाळा सुरू असल्यामुळे ही वस्तुस्थिती मान्य करण्यास हरकत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. यापूर्वी शासनस्तरावर अशा बाबींकरिता कोणतेही सुस्पष्ट धोरण अस्तित्त्वात नसल्यामुळे अशा प्रकरणांमध्ये सक्तीची कारवाई होत नव्हती व प्रत्येक निर्णय हा प्रकरणपरत्त्वे विशेषाधिकार वापरुन घेण्यात येत होता. परंतु आता ११ जानेवारी २०१७ तसेच दिनांक १६ नोव्हेंबर २०१८ या दोन शासन निर्णयान्वये विभागाने शासकीय जमिनीवरील इमारत बांधकामासाठी मुदतवाढ देणेसंदर्भात तसेच क्रीडांगणासंदर्भात विस्तृत व सुस्पष्ट धोरण निश्चित केले असल्यामुळे त्या अनुषंगाने आता कारवाई होत असून त्यामध्ये कारवाईचे वर्षनिहाय अनेक टप्पे विहीत करण्यात आले आहे व तरीही अटी शर्तींची पुर्तता न झाल्यास संबंधित व्यक्ती/संस्थेकडून जागा ताब्यात घेण्याची कारवाई देखील विभागाद्वारे करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः विभागाने राज्यात धडक मोहिम राबवून अशी सर्व प्रकरणे शोधून काढावी व त्याच्या प्रयोजनाची पुर्तता, अटी शर्तींचे उल्लंघन, भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण, बांधकामास द्यावयाची मुदतवाढ या सर्व बाबींची कालबद्ध पद्धतीने तपासणी करावी व नियमानुसार आवश्यक ती पुढील कारवाई करण्यात यावी. तसेच या शासकीय जमीनींचा सर्व तपशील अद्यावत ठेवण्यात यावा व प्रकरणांचा नियमित पाठपुरावा करण्यात यावा व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.९ (२) समितीच्या असेही निदर्शनास आले की, एखाद्या संस्थेला विशिष्ट हेतूसाठी जमीन दिली असेल तर प्रयोजनाची उद्दिष्ट पूर्ण होण्याअगोदर अशा संस्थांच्या भाडेपट्ट्याचे हस्तांतरण करावयाचे झाल्यास त्यास शासनाची पूर्वानुमती आवश्यक असून त्याशिवाय जमीन हस्तांतरण करता येत नाही. अशाप्रकारे पदाधिकाऱ्यांच्या बदलामुळे तसेच ज्या संस्थेने ज्या उद्देशासाठी ही सवलत घेतलेली आहे त्याचे कोणतेही बांधकाम न करता ती जागा दुसऱ्यांना देणेसंदर्भात कोणतेही धोरण सद्यःस्थितीत शासनस्तरावर अस्तित्त्वात नाही. अतः यासाठी देखील धोरण सूनिश्चित करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.२ "जमिनीच्या वाटपात शर्तीचे उल्लंघन"**

**अभिप्राय :**

**३.१०** महसूल व वन विभागाने दि. ८ फेब्रुवारी १९८३ च्या परिपत्रकात जमीन वाटपाची पद्धती विहीत केली आहे. ज्यानुसार जिल्हाधिकाऱ्याने शैक्षणिक प्रयोजनासाठी जमीन प्रदान करण्याच्या संबंधातील प्रस्तावाची पडताळणी करावयास पाहिजे व आवश्यक असेल तेथे हे प्रस्ताव पोलिस इन्टेलिजेन्स मार्फत पाठवावयास पाहिजे. परंतु ठाणे जिल्ह्यातील ३९४.६० चौ.मी. शासकीय जमीन महाराष्ट्र कोळी समाज संघाला कार्यालय तसेच शैक्षणिक प्रयोजनासाठी वाटप करण्यात आली. जमिनीची भोगवटा किंमत म्हणून रु.५१.३० लाख संस्थेकडून वसूल करण्यात आले. परंतु असे आढळून आले की, जिल्हाधिकारी ठाणे यांनी परिपत्रकातील शर्तींना पूर्ण न करता हे प्रकरण पाठविले होते.

यामध्ये विशेषतः शैक्षणिक प्रयोजनासाठी जागा देताना शालेय शिक्षण विभागाकडून शाळा सुरू करण्याची अनुमती प्राप्त आहे काय, संस्थेकडे इमारत योजना आहे काय, बांधकामासाठी २५% आर्थिक स्त्रोत आहे काय, या अटी शर्तींचा समावेश होता. ज्याची पडताळणी करणे संबंधित अधिकाऱ्यांवर बंधनकारक होते. प्रस्तावामध्ये उणिवा/त्रुटी असूनही जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आवेदकास शासकीय जमीन वाटप करण्याची शासनाकडे शिफारस केली. ही जमीन फेब्रुवारी, २००९ मध्ये प्रदान करण्यात आली. जमीन वाटपाच्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत शिक्षण संस्थेने बांधकाम पूर्ण करावयाचे होते. परंतु सदर संस्थेने इमारतीचे बांधकाम पूर्ण केले नव्हते. त्यामुळे या जमिनीचे शासनाने पुनर्ग्रहण करावयास पाहिजे होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने यासंदर्भात माहिती घेतली असता उपरोक्त जमीन महाराष्ट्र कोळी समाज संघ या संस्थेस कार्यालयासाठी व शैक्षणिक उपक्रमासाठी दिनांक २४/५/२०१० च्या आदेशान्वये कब्जाहक्काने प्रदान करण्यात आली आहे. प्रदान केलेल्या जागेवर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून आजपर्यंत पूर्ण बांधकाम केल्याचे दिसून येत नाही. सदर जागेवर इमारतीच्या बांधकामासाठी मुदतवाढ घेण्याबाबत तहसीलदार, ठाणे यांनी दिनांक १४/२/०१८ रोजी अध्यक्ष, महाराष्ट्र कोळी समाज संघ यांना कळविण्यात आले असता या प्रकरणी जागेवर बांधकाम सुरू असून इमारतीचे तीन मजले बांधकाम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे सदर जागा शासनाकडे पुनर्ग्रहीत करणे उचित होणार नाही असा खुलासा सदर संस्थेने केला.

**शिफारस :**

**३.११ "महाराष्ट्र कोळी समाज संघ, ठाणे" या संस्थेस जमिनीचे प्रदान करताना अटी शर्ती विहित करण्यात आल्या होत्या. ज्यात विशेषत: शैक्षणिक प्रयोजनासाठी जागा देताना शाळेची मान्यता आहे काय, बांधकामासाठी २५% आर्थिक स्त्रोत उपलब्ध आहे काय, संस्थेकडे इमारत योजना आहे काय, या शर्तींचा समावेश होता व याची पुर्तता करूनच जमिनीचे वितरण करणे अभिप्रेत होते. परंतु सदरहू संस्थेने याची पुर्तता केलेली नसतानाही जमीन वाटप करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून करण्यात आली. या संस्थेकडे शाळा सुरू करण्यासाठी कोणतीही शाळेची मान्यता नव्हती. त्यांच्याकडे बांधकामासाठी पैसे उपलब्ध नव्हते तसेच इमारत योजनांचा आराखडा देखील नव्हता. तसेच सन २०१६ पर्यंत या जागेवर कोणतेही बांधकाम देखील झालेले नव्हते. शाळेची मान्यता नसतानाही शाळेच्या प्रयोजनासाठी जागेचे वितरण विभागाने कशाच्या आधारे केले हाच मूळ प्रश्न असताना ही जागा परत घेण्याची गरज नाही असे समर्थन विभागाने समितीसमोर कशाच्या आधारे केले हा देखील प्रश्न उद्‌भवतो. समितीने याची सखोल तपासणी केली असता, ही जागा केंद्र व राज्य शासनाच्या योजना व इतर गोष्टींसाठी लोकांना प्रबोधन करावे तसेच परिसरातील सर्व कोळी बांधवांना विविध योजना व विविध सवलतींची माहिती व्हावी यासाठी एक स्थान असावे. अशा प्रकारच्या प्रयोजनासाठी देण्यात आली असून त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची शाळा चालविणे किंवा कोणतेही शैक्षणिक संकुलासाठी ती जागा देण्यात आली नव्हती त्यामुळे शिक्षण विभागाची वा शाळेची मान्यता या प्रकरणी घेण्यात आली नव्हती असे संबंधित संस्थेचे म्हणणे आहे. याबाबत समितीने विभागाकडूनच महालेखाकारांना सादर झालेल्या कागदपत्रांमध्ये तसेच दिनांक २४ मे २०१० रोजीच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जागा वाटप आदेशामध्ये ही जागा कार्यालयासाठी व शैक्षणिक उपक्रमासाठी कब्जा हक्काने अटी शर्तीसह मंजुरी देण्यात येत असल्याचे नमूद आहे. या आदेशामध्ये स्पष्टपणे शैक्षणिक उपक्रम असे नमूद असल्यामुळे महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपात निश्चितच तथ्य आहे. या प्रकरणी निश्चित निष्कर्षाप्रत येणेअगोदर विभागाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे व संबंधित संस्थेचे याप्रकरणी असलेले मत या सर्व बाबीची तपासणी करून यासंदर्भात शासनाच्या विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन शासनाद्वारे वाटप केलेल्या जमिनीचे विहित प्रयोजन, संस्थेकडून झालेली त्याची अंमलबजावणी, प्रयोजनाचा नेमका अर्थ व याप्रकरणी झालेले अटी शर्तींचे उल्लंघन याची निश्चिती विभागाने करावी व त्यात वस्तुत: उल्लंघन झाले असल्यास नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही विभागाने करावी. तसेच या प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.३ "शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या भाडेपट्ट्याचे नविनीकरण न करणे"**

**अभिप्राय :**

**३.१२** जिल्हाधिकाऱ्यांद्वारे जारी करण्यात आलेल्या आदेशांच्या शर्ती आणि अटी प्रमाणे क्रीडांगण म्हणून जमिनीचे वाटप १५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आले होते. भाडेपट्टा कालावधी संपण्याआधी शासनाने त्याचे नविनीकरण करावयास पाहिजे होते. परंतु चार जिल्ह्यातील ४२ प्रकरणांत क्रीडांगणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपट्टा कालावधी जून १९९६ ते ऑगस्ट २०१६ दरम्यान संपला होता. शासनाने या जमिनीच्या भाडेपट्ट्यांचे नविनीकरण करावयास पाहिजे होते अथवा ही जमीन पुनर्ग्रहित करावयास पाहिजे होती. पट्टेदारांनी नविनीकरणासाठी आवेदन ही केले नव्हते आणि विभागाने जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाई सुद्धा केली नव्हती. काही प्रकरणे खालील प्रमाणे आहेत.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी ९,१४६.१० चौ.मी. (नोव्हेंबर,१९८६), ६,३०० चौ.मी. (जून,१९८८), १८,१७९ चौ.मी. (एप्रिल,१९९७) दिलेल्या जमीनींचा भाडेपट्टा संपून अनुक्रमे १५ वर्षे, ४ वर्षे व ४ वर्षे इतका कालावधी उलटूनही जमिनीचे पुनर्ग्रहण केले नाही. तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी ८,००० चौ.मी. (मार्च,१९९४) व जिल्हाधिकारी, नाशिक यांनी ८,००० चौ.मी. (एप्रिल,१९८८) भाडेपट्टा संपून अनुक्रमे ६ व १३ वर्षे इतका कालावधी उलटूनही जमिनीचे पुनर्ग्रहण केले नव्हते.

रायगड जिल्ह्यामध्ये दोन शैक्षणिक संस्थांना क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने जमिनी मंजूर करण्यात आल्या आहेत. यातील अभिनव ज्ञान मंदिर संस्थेला मौजे कडाव ता.कर्जत येथील ८६५० चौ.मी क्षेत्र क्रीडांगणासाठी १५ वर्षाच्या कालावधीसाठी (१९९४) भाडेपट्ट्याने मंजूर करण्यात आले. ज्याची मुदत दिनांक १९.४.२००९ रोजी संपलेली आहे. सदर संस्थेने सदरचा भाडेपट्टा मुदत वाढवून मिळणेबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार विहित धोरणाच्या आधारे दिनांक १५.१२.२०१८ च्या आदेशान्वये सदर भाडेपट्ट्यास ३० वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, चोंढी किहीम, ता.अलिबाग येथील जमीन क्रीडांगणासाठी (१९९४) १५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेकराराने मंजूर करण्यात आलेली असून सदर भाडेपट्ट्याची मुदत दिनांक १७.१.२००९ रोजी संपल्याने सदर संस्थेने केलेल्या अर्जान्वये शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. मात्र सदरचा प्रस्ताव सन २०१२ च्या मंत्रालयीन आगीमध्ये नष्ट झाल्याने, सदर संचिकेची पुनर्बांधणी करून, सदरचा फेर प्रस्ताव शासनास सादर करणेत आला होता. परंतु शासनाने यासंदर्भात सर्वसमावेशक धोरण शासन निर्णय दिनांक १६.११.२०१८ अन्वये विहीत केल्यामुळे त्याआधारे सदर भाडेपट्ट्यास ३० वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच सोलापूर जिल्ह्यामधील एकूण पंधरा शैक्षणिक संस्थांना क्रीडांगणासाठी भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या जागेसंदर्भातील संस्थानिहाय सविस्तर विवरणपत्र विभागाच्या उत्तरासमवेत जोडण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी सोलापूर यांच्यामार्फत कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील जमिनींचा भाडेपट्टा नुतनीकरण करून देणेत आलेले आहे. तसेच मौजे उदगाव, ता. शिरोळ येथील उदगाव एज्युकेशन सोसायटी उदगाव यास प्रदान (१९६३) केलेला आदेश पाहता सदरची जमीन संस्थेला तांत्रिक विद्यालयाच्या इमारतीसाठी वाटप झालेचे दिसून येते. परंतु सदरची जमीन भाडेपट्ट्याने दिलेचे नमूद नाही. सबब भाडेपट्टा नुतनीकरणाचा प्रश्न उदभवत नाही. तसेच मौजे शिरटी ता. शिरोळ, मौजे तेरवाड व पदमभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील लक्ष्मीबाई पाटील शैक्षणिक संकुल कुंभोज ता. हातकणंगले या जमिनीसंदर्भातील कार्यवाहीची सद्यःस्थिती विभागाच्या उत्तरात नमूद करण्यात आलेली नाही.

तसेच नाशिक जिल्ह्यातील एकूण एकोणीस (१९) शैक्षणिक संस्थांना क्रीडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टट्याने प्रदान करण्यात आलेल्या जागांच्या भाडेपट्टा मुदतवाढीसंदर्भात दिनांक १६.११.२०१८ अन्वयेच्या धोरणानुसार क्रीडांगण भाडेपट्टा मुदतवाढीबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत जिल्हास्तरावर सुरू आहे. अशाप्रकारे महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या प्रकरणांसंदर्भात विस्तृत सद्यःस्थिती विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सादर केली.

अभिनव ज्ञान मंदिर संस्था संचलित श्री.गजानन विद्यालय, कडाव संदर्भात भाडेपट्टा सन २००९ मध्ये संपलेला असताना २०१५ मध्ये त्याच्या नुतनीकरणासंदर्भात अर्ज करणे व तोपर्यंत अशा मुदत संपलेल्या भाडेपट्ट्यांसंदर्भात विभागाने स्वतःहून कोणतीही छाननी वा तपासणी न करणे ही देखील गंभीर बाब आहे. यासंदर्भात संस्थेच्या प्राचार्यांना विभागाने खुलासा विचारला असता अशी मुदतवाढ घेण्याबाबत कोणतीही कल्पना त्यांना नसल्याचे त्यांनी सांगितले. सदरहू प्रकरणी शर्त भंग नसल्यामुळे विभागाने सन २०१५ साली प्राप्त अर्जावर कार्यवाही करून पुढील ३० वर्षासाठी भाडेपट्ट्याचे नुतनीकरण केले.

सदरहू परिच्छेदात ४ जिल्ह्यांतील ४२ प्रकरणांत क्रीडांगणासाठी शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भाडेपट्टा कालावधी संपलेला असताना त्याचे नुतनीकरण वा जमीन पुर्नग्रहण अशी कोणतीही कारवाई केलेली नव्हती. समितीने या प्रकरणांची संस्थानिहाय तपासणी केली असता, बाभुळगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर : बाभुळगाव येथील जागा जिल्हापरिषद शाळेच्या ताब्यात आहे. परंतु या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे विभागाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध नसल्यामुळे हे नुतनीकरण होऊ शकले नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः अनेक खाजगी व्यक्तींना किंवा संस्थेला शासनाने मोठ्या प्रमाणात जागा भाडेपट्ट्याने दिलेल्या आहेत. सदरहू प्रकरणी तर जागा जिल्हापरिषदेच्या म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्याच ताब्यात असताना विभागाने स्वतःहून याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कारवाई करण्यास कोणतीही हरकत नव्हती. जिल्हाधिकाऱ्यांनी तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यास जागा वाटपासंदर्भात शासनस्तरावरून त्यावर कार्यवाही करणे विभागास शक्य होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

मौ. फळवणी, ता.माळशिरस, जि.सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या संदर्भात सदरहू आक्षेप नोंदविण्यात आलेले आहे. लँड डिस्पोजल् ॲक्टमधील नियम ७ अन्वये अतिशय नाममात्र भाड्याने क्रीडांगणासाठी जमीन देण्याची तरतूद आहे. परंतु सदरहू प्रकरणी संस्थेला बाजार मूल्याच्या १५ टक्के या प्रमाणात भाडे आकारणी करण्यात आलेली आहे. परंतु संस्थेने ही रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविली. रक्कमेचा फेरविचार करून ती कमी करण्याबाबत शासनास संस्थेकडून विनंती प्राप्त झाल्यास त्याचा शासनस्तरावर विचार करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित विभागाने प्रकरणनिहाय रकमेचा फेरविचार करून जर ती कमी केली तर सर्वच संस्था अशाप्रकारे विनंती करेल व कोणीही ही रक्कम पुर्णतः शासन जमा करणार नाही. एका संस्थेला एक व दुसऱ्या संस्थेला दुसरा न्याय ही कार्यपद्धतीच मुळात चुकीची असून जो काही न्याय, निकष लावायचा तो सर्वांना सारखाच लावणे आवश्यक असून विभागाने यासंदर्भात एक सामाईक धोरण व निर्णयात एक वाक्यता ठेवणे आवश्यक आहे. केवळ एका संस्थेला अशी सूट दिली तर अन्य संस्थांकडून देखील अशी

मागणी वेळोवेळी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. सन २०१८ च्या धोरणानुसार नुतनीकरणानंतर भाडेपट्टा जागेचा सद्यःस्थितीत बाजारमुल्याच्या ०.०१ टक्के इतक्या अत्यंत कमी दराने आकारणी करण्यात येते. मात्र या प्रकरणात बाजारमुल्याच्या १५ टक्के दराने ही आकारणी करण्यात आली असून ती निश्चितच अन्यायकारक आहे असे वाटते. त्यामुळे या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यास शासन त्यावर निश्चित विचार करेल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

वासुद ता.सांगोला, जि.कोल्हापूर येथील जागा ही लोकल बोर्डाच्या ताब्यात असून कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे नुतनीकरणाची कारवाई करता येत नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. या प्रकरणी देखील जमीन जिल्हापरिषदेच्या ताब्यात असल्यामुळे शासनाने सकारात्मक विचार करून कारवाई करणे संदर्भात समितीने सूचित केले.

बारोळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर प्रकरणी २४ नोव्हेंबर १९७० रोजीच्या आदेशानुसार क्रीडांगणासाठी जागा दिलेली असून इतर संस्थेप्रमाणे भाडेपट्ट्याने जागा न देता ती नियम ३२ अन्वये महसूल मुक्त पद्धतीने देण्यात आलेली आहे. त्यामुळे या संस्थेकडून कोणताही कर वा सारा घेणे अपेक्षित नाही. विभागाने जागेचा मालकी हक्क दिलेला नसून ताबा दिलेला आहे. जागा अद्यापही शासनाच्या मालकीची असून फक्त कोणत्याही प्रकारचा भाडेपट्टा या प्रकरणी वसूलपात्र नाही. तरीही नियम ३२ व नियम ३६ या पूर्वीच्या कायद्यातील तरतूदी असल्यामुळे विभागाने त्याची तपासणी करून जागेच्या मंजुरीचे स्वरुप, अटी शर्ती काय होत्या याची तपासणी करावी व त्यानुषंगाने आवश्यक ती पुढील कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

जि. कोल्हापूर (परिशिष्ट ३) : सदरहू परिच्छेदात कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण ७ संस्थांचा उल्लेख आहे. त्यातील उदगाव एज्युकेशन सोसायटी ता. शिरोळ, जि. कोल्हापूर प्रकरणी १९६३ रोजीचे जमिनीचे आदेश असून त्यात भाडेपट्टट्याने जमीन दिल्याचे नमूद नाही. त्यामुळे भाडेपट्टा नुतनीकरणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशी सर्व प्रकरणे विभागाने तातडीने तपासून घेऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

कुमार विद्या मंदिर घोसरबाढ ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे या जमिनीचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

मौजे तेरवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे देखील जमिनीवर जिल्हापरिषदेचा ताबा आहे. पूर्वी अतिक्रमण समजून नोटीस देण्यात आलेली होती. परंतु ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमध्ये या ठिकाणी जिल्हापरिषद शाळेची नोंद असल्यामुळे सदर जागा जिल्हापरिषदेच्या नावे वर्ग करण्यास हरकत नसावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शासनस्तरावरून योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता आहे असे समितीने सूचित केले.

**शिफारशी :**

**३.१३ (१) महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहू आक्षेप हे निश्चितच गंभीर स्वरूपाचे असून शासनाच्या एकंदरीत धोरणात्मक बाबींवरच आक्षेप नोंदविणारे आहेत. महालेखाकारांनी नमुन्या दाखल काही संस्थांचे लेखापरीक्षण केले असता त्यामध्ये काही गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीने सर्व आक्षेपित जमिनीसंदर्भात प्रकरणनिहाय विस्तृत चर्चा केली. परंतु अशा सर्वच प्रकरणांमध्ये विभागाला शासनाच्या धोरणाच्या आधारेच निर्णय घेणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणांचा समितीने विचार केला असता ही संपूर्ण कार्यपद्धतीच शासन व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. शासनाने सार्वजनिक प्रयोजनासाठी व्यक्तींना वा संस्थांना जागा देणे, परंतु त्याचा कोणताही पुढील पाठपुरावा न करणे, संस्था स्वतःहून जोपर्यंत मुदतवाढीसाठी अर्ज करीत नाही तोपर्यंत विभागाला याची कोणतीही माहिती नसते. अथवा भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतर विभागाकडून कोणताही पाठपुरावा अशा जमीनींसंदर्भात स्वतःहून केला जात नाही. ही देखील गंभीर बाब आहे. भाडेपट्टट्यांच्या नुतनीकरणासंदर्भात विभागाने आता धोरण निश्चित केले असून सन २०१८ च्या शासन निर्णयानुसार भाडेपट्टट्यांचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्यास्तरावर आता सुरू करण्यात आली आहे. यावर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवित विभागाने भविष्यकाळासाठी धोरण निश्चित केले आहे. परंतु महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात विभागाने नियमानुसार कारवाई करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. विभागाने या विषयाला गांभिर्याने घेतले नाही. धोरण नसतानाच्या कालावधीतील ही प्रकरणे असताना तत्कालीन प्रस्थापित नियमांतर्गत विभागाने या प्रकरणांमध्ये कारवाई करणे आवश्यक होते. परंतु एकाही जिल्ह्यात अशा गंभीर प्रकरणी विभागाची कारवाई करण्याची भूमिका दिसून आली नाही असेही महालेखाकारांनी नमूद केले असता, पूर्वी यासंदर्भात धोरणच नसल्यामुळे कारवाई होऊ शकली नाही. यामध्ये त्यावेळी देखील धोरण अस्तित्त्वात असणे आवश्यक होते. परंतु असे धोरण अस्तित्त्वात नव्हते ही देखील वस्तुस्थिती असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. अशा सर्व प्रलंबित भाडेपट्ट्यांचे मानीव नुतनीकरण दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत करून त्यानंतर नवीन धोरणानुसार**

**२०१८ पासून सुधारित भाडेपट्टे असे धोरण आता शासनाने स्वीकारले आहे. तसेच यात संस्थेने शर्त भंग केला असेल तर त्या संस्थेच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण जिल्हाधिकारी यांचेस्तरावर न होता प्रकरण शासनाकडे निर्णयार्थ पाठवावे लागते असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अतः महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदांमध्ये नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने विभागाने या सर्व आक्षेपित प्रकरणांमध्ये योग्य तो निर्णय शासनस्तरावरून घ्यावा. निर्णय घेताना एका संस्थेला एक न्याय व दुसऱ्या संस्थेला दुसरा न्याय अशाप्रकारे विशेषाधिकाराचा वापर करून प्रकरणपरत्त्वे निर्णय घेण्याच्या कार्यपद्धतीचा वापर टाळण्यात यावा व जो काही न्याय, निकष लावायचा तो सर्वांना समान पद्धतीने लावणेसंदर्भात धोरणाची अंमलबजावणी सामाईकरित्या करण्यात यावी व स्वेच्छाधिकाराचा वापर टाळावा. तसेच राज्यात सर्वत्र अशी आणखी प्रकरणे अस्तित्त्वात असणार त्याची देखील छाननी व तपासणी करण्यात यावी व या सर्व प्रकरणी तत्कालिन कायद्यातील तरतूदी व शासनाने आता नव्याने स्वीकारलेले धोरण या सर्व बाबींचा पूर्ण अभ्यास करून या प्रकरणी गुणवत्तेनुसार कालबद्ध पद्धतीने निर्णय घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.१४ (२) शासनाचे हे धोरण केवळ जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील शासकीय जमिनीपुरती असून राज्यातील अन्य जमिनींना हे लागू नाही. म्हाडा, महानगरपालिका, एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको व अन्य संस्थांच्या जमिनीदेखील मोठ्या प्रमाणात व्यक्तींना वा संस्थांना भाडेपट्टट्यावर देण्यात येतात. परंतु या जमीनींसंदर्भात देखील शासनस्तरावर अद्यापही धोरण निश्चित झालेले नाही. त्यामुळे याच अडचणी त्या ठिकाणी देखील येतात व प्रकरण निहाय वेगवेगळे निर्णय घेण्याची मुभा संबंधित प्राधिकरणाला वा स्थानिक संस्थांना प्राप्त होतात. शासनाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व स्पष्टता व एकवाक्यता राहण्याकरिता उपरोक्त जमिनीसंदर्भात देखील धोरण सुनिश्चित करण्यासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.३.४.४ "जमिनीच्या पुनर्ग्रहणासाठी कारवाई न करणे"**

**अभिप्राय :**

**३.१५** महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या नियम ८ मध्ये वाटप आदेशातील शर्तीचे उल्लंघन झाल्यास शासनाने जमिनीचे पुनर्ग्रहण करावयास पाहिजे. तसेच ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे त्यासाठी जमिनीचा वापर न झाल्यास, जिल्हाधिकाऱ्याने ठरविलेल्या तारखेपर्यंत जमिनीचे पुनर्ग्रहण करावयास पाहिजे असे विनिर्दिष्ट आहे.

६०,७०० चौ.मी.जमीन आदर्श विद्या प्रसारक संस्था, कुळगावला शैक्षणिक प्रयोजनासाठी वाटप करण्यात आली (जुलै १९६३). या जमिनीपैकी २४० चौ.मी. जमीन या संस्थेने एका बँकेस पोटभाड्याने दिली. म्हणून तहसीलदार, अंबरनाथ यांनी शर्तभंग चा प्रस्ताव तयार करून उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांना आवश्यक कारवाईसाठी पाठविला (जुलै २००७). परंतु,त्यानंतर SDO किंवा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आजपर्यंत याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

ही जमीन आदर्श विद्या प्रसारक संस्था कुळगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांना शासनाकडून शैक्षणिक व वाणिज्य बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे अर्जदार संस्थेने दिनांक ८/१२/२००४ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली होती. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १५/१०/२००७ च्या आदेशान्वये ६५६२.५१ चौ.मी. क्षेत्राची शैक्षणिक व वाणिज्य बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यात काही अटी व शर्तीवर परवानगी दिली आहे. सदर बिगरशेती आदेशातील अट क्र.२३ पाहता अर्जदार संस्था यांनी विषयांकीत जमिनीवरील बांधकामापैकी २५० चौ.फुट क्षेत्र परस्पर दि जनता कल्याण सहकारी बँक यांना भाडेपट्टट्याने दिल्याने सदरचा शर्तभंग नियमानुकुल करण्यासाठी दंड रक्कम रु.७२,६३०/- तहसीलदार, अंबरनाथ यांच्याकडे भरणा केल्याचे दिसून येते. (ऑक्टोबर,२००७)

**शिफारस :**

**३.१६ सदरहू प्रकरणी आदर्श विद्या प्रसारक संस्था, कुळगाव यांना १९६३ मध्ये शैक्षणिक प्रयोजनार्थ जागेचे वाटप झाले असता त्यातील २४० चौ.मी. जागा बँकेला पोटभाडे स्वरूपात वाणिज्यिक प्रयोजनासाठी देणे हे निश्चितच शर्तभंग ठरते. संबंधित संस्थेने सन २००४ मध्ये केलेल्या अर्जान्वये तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी १५ ऑक्टोबर, २००७ रोजी त्यांना शैक्षणिक व वाणिज्यिक बिगर शेतकी प्रयोजनार्थ काही अटी व शर्तीवर परवानगी दिली असून शर्तभंग नियमानुकूल करण्यासाठी त्यांचेकडून रु.७२,६३०/- वसूल केल्याचे जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून दिसून येते. महालेखाकारांनी सदरहू आक्षेप हे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता नोंदविले असून विभागाने उपरोक्त वस्तुस्थिती महालेखाकारांच्या त्याचवेळेस निदर्शनास आणून देणे**

**आवश्यक होते. जेणेकरून महालेखाकारांच्या आक्षेपाचे निराकरण वेळेत होऊन हे आक्षेप नोंदविले गेले नसते. परंतु विभागाने हे आक्षेप वेळेत गांभिर्याने न हाताळल्यामुळे आक्षेप अंतिम झाले. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून याची योग्य ती दखल विभागाने घ्यावी व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.४ "इतर लेखापरीक्षा अभिक्षणे"**

**परिच्छेद क्रमांक ४.४.१ "भोगवटा किंमतीची कमी आकारणी"**

**परिच्छेद क्रमांक ४.४.१.१ "जिल्हाधिकारी, बीड कार्यालयातील दस्तावेज"**

**अभिप्राय :**

**३.१७** जिल्हाधिकारी, बीड यांनी मौ.गवारी येथील ४९,५०० चौ.मी. शासकीय जमीन आगाऊ ताब्यासह महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड लातूरला दिली ज्यासाठी रु.४०.२५ लाख भोगवटा किंमत वसूल केली. सह जिल्हा निबंधक (वर्ग-१), बीड द्वारे परिगणित केलेल्या भोगवटा किंमतीची ASR २०१३ च्या सुचना २९ आणि उक्त GR च्या प्रावधानांप्रमाणे भोगवटा किंमत रु.५५.८३ लाख येते. अशाप्रकारे, चुकीचे टप्पा दर लावल्यामुळे रु.१५.५८ लाख भोगवटा किंमतीची कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

बीड जिल्ह्यातील गौ.गवारी जि.बीड येथील जमिनीचे भोगवटामूल्य रु.५५,८२,५००/- ऐवजी रु.४०,२५,००/- वसूल केली असून फरकाची रक्कम रु.१५.५८ लक्ष वसूल करण्याबाबत लेखापरिच्छेद उपस्थित करण्यात आला असून फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडून महापारेषण कंपनीकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

त्याअनुषंगाने सदर प्रकरणी जमिनीची तफावत किंमत रु.१५,५७,५००/- शासन खाती जमा करण्याच्या प्रस्तावास मुख्य अभियंता, महापारेषण, कं, मुंबई यांनी मान्यता दिली असून सदर रक्कम शासन खाती जमा केली जाणार असल्याची हमी दिनांक १९.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महापारेषण कंपनी यांनी दिली असल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारस**

**३.१८ महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या (मे,२००६) निर्णयाप्रमाणे शासकीय जमिनीचे भोगवटा किंवा भाडेपट्टा आधारावर वाटप करताना आणि शासकीय जमिनीचे मूल्यांकन करावयाचे आहे अशा सर्व प्रकरणांत, शासकीय जमिनीचे मूल्यांकन, ज्या तारखेला त्या जमिनीचे वाटप आदेश किंवा अन्य आदेश ज्यामध्ये मूल्यांकन नमूद केले असेल, जारी करण्यात आले असेल, त्या तारखेस वार्षिक दर अनुसूची (ASR) मध्ये विहित दरानुसार निर्धारित करावयास पाहिजे. याशिवाय महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने विविध संस्थांना भोगवटा किंमतीवर वाटप केलेल्या शासकीय जमिनीच्या मूल्यांकनासाठी विशिष्ट टप्पे (Slabs) विहित (एप्रिल,२००८) केले आहेत. ASR २०१३ च्या सूचना २९ प्रमाणे ग्रामीण भागातील शासकीय जमीन जर अकृषक प्रयोजनार्थ देण्यात आली असेल तर त्या जमिनीचे बाजार मूल्य ASR मध्ये त्या क्षेत्रासाठी विनिर्दिष्ट असलेल्या अकृषक दराच्या ५० टक्के दराने निर्धारित करावयास पाहिजे.**

**अशाप्रकारे भोगवटा किंमत परिगणित करण्यासाठी जमिनीचे मुल्यांकन करताना चुकीचा टप्पा दर व चुकीचे दर लावल्यामुळे भोगवटा किंमतीची कमी आकारणी झाली. अतः ही रक्कम विभागाने तात्काळ वसूल करावी. तसेच सदरहू प्रकरणी केलेल्या सदोष आकारणीसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.४.१.२ "तहसीलदार, आंबेगाव, जिल्हा पुणे कार्यालयातील दस्तावेज"**

**अभिप्राय :**

**३.१९** विभागाने मौजा तांबडेमळा, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे येथील २०,००० चौ.मी. शासकीय जमीन आगाऊ ताब्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ, पुणे ला दिली व रु.१७.५० लाख भोगवटा किंमतीची वसुली केली. त्याचप्रमाणे भोगवटा किंमतीची परिगणना करतांना विभागाने खुल्या जमिनीचे दर रु.२५० प्रति चौ.मी. (म्हणजेच रु.५०० ते ५०%) इतके कमी केले आणि अंकगणितीय चुकी करून

बाजार मुल्य रु.३५ लाख काढले आणि पुन्हा त्यालाही ५० टक्क्यांनी कमी केले आणि रु.१७.५० लाख इतकी भोगवटा किंमत परिगणित केली. ASR २०१३ च्या सूचना २९ अनुसार आणि वर नमूद केलेल्या GR प्रमाणे भोगवटा किंमत रु.३५.५० लाख असावयास पाहिजे होती. अशाप्रकारे, चुकीच्या परिगणनेमुळे रु.१८ लाख (रु.३५.५० लाख - रु.१७.५० लाख) भोगवटा किंमतीची कमी आकारणी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.२० मौजे तांबडेमळा, ता.आंबेगाव, जि.पुणे येथील गायरान जमीन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रस्तावित आगारासाठी विभाग नियंत्रक राज्य महामंडळ, पुणे यांना प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने तहसीलदार यांनी सन २०१३ च्या मुल्यांकनानुसार प्रतिग्राही यांच्याकडून रक्कम रु.१७,५०,०००/- वसूल करून जागेचा ताबा संबंधितांना देण्यात आलेला आहे. परंतु तत्कालीन बाजार भावानुसार जागेचे एकूण मुल्यांकन रु.७०,००,०००/- होत असून त्या रक्कमेच्या ५०% रक्कम म्हणजेच रु.३५,००,०००/- वसूल करणे अपेक्षीत होते असा आक्षेप महालेखाकारांनी उपस्थित केलेला आहे. त्यानुसार प्रतिग्राही यांनी यापूर्वी भरलेली रु.१७,५०,०००/- इतकी रक्कम वजा जाता उर्वरीत रु.१७,५०,०००/- एवढी रक्कम दिनांक ५/५/२०१६ अन्वये शासकीय कोषागारात जमा केलेली आहे.**

**तथापि, आता मा.महालेखाकार, नागपूर-II यांचेकडील पत्र दिनांक १७/६/२०१६ अन्वये सदरची भोगवटा किंमत ही रु.१८,००,०००/- (३५.५० लाख-१७.५० लाख) वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यापैकी १७.५० लक्ष ५ जून, २०१६ रोजी जमा झाले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे यांना उर्वरीत (१८ लक्ष - १७.५० लक्ष) रु.५०,०००/- इतकी रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले असून सदरची रक्कम वसूल करण्यासंदर्भात आवश्यक ती दक्षता घेण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः उपरोक्त तफावतीची रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी तसेच सदरहू प्रकरणी केलेल्या सदोष आकारणी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.४.२ "बोलीदारांकडून लिलाव रक्कमेवरील मूल्यवर्धित कराची (VAT) कमी वसुली"**

**अभिप्राय :**

**३.२११** वित्त विभागाने अधिसूचित केले की, दि.१५ फेब्रुवारी, २०१३ पासून महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम ३१ (A)(१)(a) च्या प्रयोजनार्थ लिलाव रक्कमेच्या १० टक्के दराने ज्या व्यापाऱ्यास किंवा व्यक्तीस रेती उत्खननाचा हक्क दिला असेल अशा यशस्वी बोलीदारांकडून रेती उत्खननासाठी ठरवून दिलेल्या रक्कमेशिवायची रक्कम ज्याच्या अधिकारितेत ते क्षेत्र येत असेल, त्या जिल्हाधिकाऱ्याने वसूल करावयास पाहिजे. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी मार्च २०१३ ते सप्टेंबर २०१४ दरम्यान रेती घाटांचे ई-लिलाव केले आणि दोन यशस्वी बोलीदारांना निर्देशित (designated) क्षेत्रातून रेती उत्खननाचे हक्क बहाल केले. दोन बोलीदारांकडून रु.३२३.५२ लाख लिलाव रक्कम आणि त्यावरील रु.१६.१७ लाख मूल्यवर्धीत कर वसूल करण्यात आले. लिलाव रक्कमेच्या १० टक्के दराने मूल्यवर्धित कर रु.३२.३५ लक्ष वसूल करावयास पाहिजे होता. ज्यामुळे रु.१६.१८ लाख मूल्यवर्धित कर कमी वसूल केला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.२२ १० टक्के दराने VAT ची वसुली स्त्रोतातून न करता रेती उत्खननाचे हक्क बहाल केल्यामुळे VAT ची रु.१६.१८ लाखाची कमी वसुली झाली असे आक्षेप सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नमूद केले आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील सन २०१३-२०१४ या कालावधीत मूल्यवर्धीत कराची (VAT) एकूण रु.१६,१७,६२२/- एवढी रक्कम वसूल करावयाची होती. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी नंदूरबार यांनी मे.एकता कंपनी प्रो.प्रा.लियाकत अहमद फरीद अहमद यांचेकडून मूल्यवर्धित कराची रक्कम रु.७,६७,५००/- दिनांक १६/१/२०१७ च्या चलनाद्वारे विक्रीकर विभागाकडे जमा करण्यात आली आहे. तसेच दुसरे लिलावधारक श्री.सचिन रामचंद्र थोरात यांचेकडून मूल्यवर्धीत करापोटी रु.८,५०,१२२/- वसूल करावयाची असून त्याअनुषंगाने उक्त थकित वसुली महाराष्ट्र जमीन महसूलाच्या वसुलीबाबत नियम, १९६७ मधील नियम १७ (२) जमीन महसूलाची थकबाकी (आर.आर.सी. वसुली अंतर्गत) वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांना कळविण्यात आले असून, जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.**

**सदरहू आक्षेप महालेखाकारांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी नोंदविले आहेत. वास्तविकतः महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत विभागाच्या प्रतिनिधींनी हे आक्षेप मान्य केले व ही रक्कम वसूल करण्याचेही सांगितले. परंतु तरीही अद्यापही ही पूर्ण रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या बैठकीस येणे अगोदर सदरहू प्रकरणी वसुली संदर्भातील कार्यवाही पूर्ण करूनच बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु तसे करण्यात आले नाही. मुळात विभागाच्या चुकीमुळे VAT ची सदोष आकारणी व कमी वसुली करण्यात आली. विभागाच्या अंतर्गत लेखापरीक्षणात देखील ही बाब विभागाच्या लक्षात स्वतःहून येत नाही ही देखील अतिशय गंभीर बाब आहे. त्याउपर महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यावर देखील ही वसुली आजतागायत पूर्ण होऊ नये ही बाब निश्चितच आक्षेपार्ह आहे. अतः विभागाने ही प्रलंबित वसुली तात्काळ कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. तसेच सदरहू प्रकरणी सदोष आकारणी व वसुली संदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ४.४.३ "अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली"**

**अभिप्राय :**

**३.२३** महसूल व वन विभागाच्या माहे सप्टेंबर,१९८३ च्या शासन निर्णयानुसार भोगवटादाराने निव्वळ अनर्जित उत्पन्नाच्या ५० टक्के रक्कम म्हणजेच चालू बाजार मूल्य आणि विक्रीद्वारे संपादीत केलेली रक्कम यांच्यातील फरकाच्या ५० टक्के, यापैकी जी अधिक असेल, ती रक्कम शासनाला अदा करावी. तसेच, महसूल व वन विभागाद्वारे निर्गमित परिपत्रकानुसार (जुलै २०१२) वर्ग- II जमिनीचे वर्ग- १ जमिनी (इनाम/वतन जमीन) कृषितर प्रयोजनासाठी रूपांतर करावयाचे असल्यास बाजार मूल्याच्या ५० टक्के इतकी रक्कम नजराणा/अनर्जित उत्पन्न म्हणून अर्जदाराकडून वसूल करावयास पाहिजे.

परंतु कोल्हापूर महानगरपालिका (KMC) कसबा बावडा, ई-वॉर्ड, येथील सुधारित सर्वे क्र. ९११/C ची ३,१०९ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या इनाम/वतन जमिनीच्या भोगवटादाराने ती जमीन रस्त्याच्या विकास प्रकल्पांतर्गत येत असल्यामुळे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करिता KMC कडे आवेदन केले (जून २०१३) आयुक्त, KMC यांनी तहसीलदार, करवीर यांना वरील जमिनीच्या रूपांतरणाकरिता भोगवटादाराकडून नजराणा रक्कम वसूल करण्याचे निर्देश दिले (डिसेंबर २०१४) त्यानुसार तहसीलदार करवीर यांनी जमिनीचे बाजार मूल्य रु. १२.०९ लाखावर ५० टक्के इतके नजराणा/अनर्जित उत्पन्न रु. ६.०४ लाख वसूल केले (एप्रिल २०१५) बाजार मूल्याच्या परिगणनेचे तपशीत दस्तावेजात आढळले नाही.

वरील जमिनीच्या हस्तांतरणाकरिता भोगवटादार आणि KMC यांच्यात निष्पादीत (जून २०१३) दस्तावेजांच्या पठनानुसार, विभागाने परिगणीत केलेल्या रु. १२.०९ लाख मूल्याच्या ऐवजी ASR २०१३ नूसार जमिनीच्या बाजार मूल्याचे मूल्यांकन रु. १.२७ कोटी होते. त्यामुळे रु. ६.०४ लाख ऐवजी रु. ६३.७४ लाख नजराणा /अनर्जित उत्पन्न वसुली योग्य होते. परिणामी रु. ५७.६९ लाख नजराणा /अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**३.२४ ASR प्रमाणे बाजारमूल्याचे परिगणन न केल्यामुळे रु. ५७.६९ लाख अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली झाली असे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नमूद केले आहे. महालेखाकारांचे सदरहू अभिक्षण विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले व मौजे कसबा बावडा, ई वॉर्ड, जि. कोल्हापूर येथील जागेचे हस्तांतरण करतेवेळी ASR प्रमाणे बाजारमूल्याचे परिगणन न केल्यामुळे रु. ५७.६९ लाख अनर्जित उत्पन्नाची कमी वसुली झाली या परिच्छेदाचे अनुषंगाने सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करणेत आलेली असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु या सदोष आकारणी संदर्भात संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अतः विभागाने जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करावी. तसेच महालेखाकारांनी नमुन्यादाखल काही प्रकरणांची तपासणी केली असता असे गंभीर आक्षेप निदर्शनास आले. राज्यात अन्यत्रही अशा प्रकरणांची नक्कीच पुनरावृत्ती असणार. अतः विभागाने अशी सर्व प्रकरणे शोधून काढावी व त्यातून वसूलपात्र रक्कम तात्काळ वसूल करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षातील महसूली जमा अहवालातील लेखा परिच्छेद क्र.६.१ बाबत

स्पष्टीकरणात्मक ज्ञापन

४.१

| अ.क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | विषय | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ६.१ | **कर प्रशासन:-**<br><br>या प्रकरणात राज्य उत्पादन शुल्क, करमणूक शुल्क, राज्य शिक्षण उपकर (EC), रोजगार हमी उपकर (EGC), इत्यादीं मधून प्राप्त होणाऱ्या जमांचा समावेश आहे. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्रपणे तयार करण्यात आलेल्या अधिनियम व नियम यांच्याद्वारे याचे प्रशासन केले जाते. | महसूल विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांतील करमणूक शाखेमध्ये खालीलप्रमाणे अस्थायी पदे अस्तित्वात आहेत. तथापि, करमणूक शुल्काच्या वसूलीसाठी करमणूक शुल्क अधिकारी, सहायक करमणूक शुल्क अधिकारी, करमणूक शुल्क निरीक्षक यांच्याकडून कार्यवाही करण्यात येते.<br>अ. विभाग स्तर-<br>१. उपायुक्त (करमणूक शुल्क)<br>२. करमणूक शुल्क निरीक्षक<br>३. लिपिक-टंकलेखक<br>४. वाहनचालक<br>५. शिपाई<br>ब. जिल्हा स्तर-<br>१. करमणूक शुल्क अधिकारी<br>२. सहायक करमणूक शुल्क अधिकारी<br>३. करमणूक शुल्क निरीक्षक<br>४. वरिष्ठ लेखापरिक्षक<br>५. निम्नश्रेणी लघुलेखक<br>६. लिपिक-टंकलेखक<br>७. शिपाई<br>८. वाहनचालक |

(ल.ह.कारंडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ च्या महसुली क्षेत्र अहवालातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक व अहवालातील पृष्ठ क्रमांक | विषय | स्पष्टीकरण/अभिप्राय/कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ व २ | ६.३.१ पान क्र.१०८-१०९ | **लेखापरिक्षण शुल्काची वसुली न होणे-** आयुक्त, सहकारी संस्था यांनी सादर केलेल्या माहितीनुसार दि.३१ मार्च २०१६ रोजी ३४९९७ संस्थांकडुन रु.६९.६४ कोटी रक्कम वसुली योग्य् होती. मागील पाच वर्षाचे वर्षनिहाय विश्लेषण तक्ता ६.३.१ मध्ये दिलेले आहे. सदर तक्त्यावरुन असे दिसुन येते की, थकबाकीची रक्कम रु.५२.२३ कोटी पासुन वाढवुन रु.६९.६४ कोटी म्हणजे ३३ % वाढली होती. तर वसुलीचा वेग क्रमश: कमी झाला होता. हे निदर्शनास आणुन दिल्यावर विभागाने सांगितले की, संस्था तोट्यात चालत होत्या, अवसायनात निघाल्या होत्या किंवा बंद पडल्या होत्या. त्यामुळे रकमेची वसुली करता येऊ शकली नव्हती.<br>तथापि, लेखापरीक्षणात असे आढळुन आले की, पुण्यातील लेखापरीक्षीत केलेल्या १०६४८ नोंदणीकृत संस्थांपैकी फक्त ६३७ तसेच कोल्हापूरातील लेखापरीक्षीत केलेल्या ९५९३ नोंदणीकृत संस्थांपैकी फक्त १७७ संस्था अवसायनात निघाल्या होत्या किंवा बंद झाल्या होत्या अथवा नोंदणी केलेल्या पत्त्यावर सापडल्या नव्हत्या. अशाप्रकारे ज्या संस्थांनी आपले कामकाज बंद केले होते त्या संख्येने खुप कमी होत्या. | **६.३.१ लेखापरिक्षण शुल्काची वसुली न होणे :**<br>शासकीय लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण केलेल्या संस्थांकडील लेखापरीक्षण शुल्क मागणी व वसुलीबाबतची दिनांक **०१.०४.२०१६** ते **३०.०९.२०१८** या कालावधीतील आकडेवारी **तक्ता क्र.१ (पान क्र.११)** मध्ये नमुद केलेली आहे.<br>लेखापरीक्षण शुल्कापोटी दिनांक **३१** मार्च **२०१६** रोजी एकूण **३४९९७** संस्थांकडून रु. ६९.७१ कोटी रक्कम येणे बाकी होती. मागील अडीच वर्षात म्हणजेच दिनांक **०१.०४.२०१६** ते **३०.०९.२०१८** या कालावधीत एकूण रु.**२६.२८** कोटी रकमेची वसुली झाली आहे, तथापि त्या प्रमाणात येणे बाकीत घट झालेली नाही, कारण सदर कालावधीत चालु लेखापरीक्षण शुल्क मागणी पोटी रु.**२१.२१** कोटीची वाढ झालेली आहे. तसेच या कालावधीत एकूण रु.**१२.०८** कोटी थकीत लेखापरीक्षण शुल्क वसुल झाले आहे, मात्र त्या प्रमाणात थकीत लेखापरीक्षण शुल्क रक्कम कमी झाली नाही, सदर कालावधीतील चालु लेखापरीक्षण शुल्काची संपूर्ण वसुली न झाल्याने त्यापोटी थकीत राहीलेल्या लेखापरीक्षण शुल्काचा समावेश एकूण थकीत लेखापरीक्षण शुल्कात झालेला आहे. परंतू दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या तुलनेत दिनांक ३० सप्टेबर २०१८ अखेर थकीत असलेल्या लेखापरीक्षण शुल्क रकमेत घट झालेली असून लेखा परीक्षण शुल्क थकित असलेल्या | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम-१५५ खाली जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीसाठी केलेल्या कारवाईची प्रगती लोकलेखा समितीस सादर करावी.<br>वेळेत कार्यवाही करावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आयुक्तांना सादर केलेल्या मासिक अहवालात थकबाकी प्रतिबिंबीत झाली होती, परंतु, MCS अधिनियमाच्या कलम १५५ मध्ये, संस्थांकडुन शासनाला देय असलेल्या सगळया रकमांची वसुली जमिन महसुल थकबाकीप्रमाणे करण्यात यावी असे निर्देशित केल्यानंतरही वसुलीसाठी कारवाई केली गेली नव्हती. | संस्थांच्या संख्येत ही घट झाली आहे. दिनांक ३०.०९.२०१८ अखेर येणे असलेल्या लेखा परीक्षण शुल्क रकमेची संस्था निहाय वर्गवारीनुसार आकडेवारी **तक्ता क्र. २ (पान क्र.११)** मध्ये नमुद केलेली आहे.<br>लेखापरीक्षण शुल्का पोटी येणे असलेल्या रु. ६४.६५ कोटी रकमेपैकी नोंदणी रद्द झालेल्या १७६३ संस्था, बंद १४३५ संस्था, अवसायनातील २०१८ संस्था व आर्थिक अडचणीतील ३२३८ संस्थां अशा एकूण ८४५४ संस्थाकडील येणे लेखापरीक्षण शुल्क रक्कम रु.४४.५८ कोटी असून एकूण येणे रकमेशी तीचे प्रमाण ६८.९६ % आहे. एकूण येणे बाकीपैकी रु. ३९.९१ म्हणजेच ६१.७३ % लेखापरीक्षण शुल्क आर्थिक अडचणीतील संस्थांकडून येणेबाकी असून, त्यापैकी रु.३४.१२ कोटी रक्कम मुंबई विभागातील आहे. एकूण रु. ६४.६५ कोटी लेखापरीक्षण शुल्क येणे बाकी पैकी रु.३९.३५ कोटी रकमेच्या वसुलीसाठी कलम १५५ अंतर्गत कारवाई प्रस्तावीत असून येणे रकमेशी ते प्रमाण ६०.८७ % एवढे आहे. तसेच ज्या संस्थांची नोंदणी रद्द झालेली आहे तसेच ज्यांचेकडून लेखापरीक्षण शुल्क वसूल होणे शक्य नाही, अशा एकुण रु. ०.१४ कोटी रकमेच्या लेखापरीक्षण शुल्क माफीचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. उर्वरित लेखापरीक्षण शुल्क रकमेच्या वसुलीसाठी पाठपुरावा सुरु आहे. | |
| ३ | ६.३.२<br>पान नं ११० | **शासकीय भाग भांडवलाची वसुली न होणे (तक्ता ६.३.२)**<br>महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या GRs-२ मध्ये नमूद केलेल्या शर्ती आणि अटीनुसार, प्रत्येक संस्थेने, शासनाच्या भाग भांडवलाच्या विमोचनासाठी एक भाग भांडवल परतावा निधी | ज्या सहकारी संस्थांमध्ये शासनाने भाग भांडवल म्हणून रक्कम गुंतवली आहे, त्या सहकारी संस्थांनी दरवर्षी १/१५ रक्कमही त्यांच्या नफ्यातुन भाग भांडवल परतफेड निधी म्हणून वेगळी काढून ठेवणे आवश्यक आहे. तथापि, भागभांडवल दिलेल्या संस्था तोटयात अथवा नाममात्र नफयात असल्याने भागभांडवल परतावा निधी | पुढील प्रगती लोकलेखा समितीस सादर करावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्माण/तयार करावयाचा असतो संस्था प्रत्येक वर्षी भाग भांडवलाच्या रक्कमेपैकी १/१५ रक्कम निधीत जमा करावयाची होती. परंतु, आम्हाला असे आढळून आले की, संस्थांनी भाग भांडवल परतावा निधी निर्माण केला नव्हता किंवा विभागानेही असा निधी तयार करण्याच्या अटीची सक्तीने अंमलबजावणी केली नव्हती. अशाप्रकारे, भाग भांडवलाची वसुली सुनिश्चित केली नव्हती. | काढता आला नाही. सर्व क्षेत्रीय का[illegible]लयांनी त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांना याची अंमलबजावणी करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच भागभांडवल वसूलीच्या मागणीप्रमाणे संस्थांकडून भागभांडवल भरणा करून घेण्याबाबत सूचना देण्यात ~~आल्या आहेत.~~ | |
| ४ | ६.३.३<br>पान क्र.११० | नफयातील सहकारी **संस्थांकडून लाभांश प्राप्त होण्याची सुनिश्चिती न करणे**<br>महाराष्ट्र शासनास भाग भांडवल देण्यासाठी अधिकृत करणाऱ्या शासन निर्णयांतील अटी व शर्तीनुसार, नफयात असलेली प्रत्येक सहकारी संस्था जोपर्यंत शासनाच्या भाग भांडवलाची पूर्णपणे परतफेड करत नाही तो पर्यंत भाग भांडवलाच्या चार टक्क्यांपर्यंत लाभांश देऊ शकत होती. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, वर्ष २०१४-१५ मध्ये १,००४ संस्थांना नफा झाला होता या संस्थामध्ये शासनाने रु.७.१४ कोटी भाग भांडवल गंतवले होते. जर या संस्थांनी लाभांश घोषित केला असता तर शासनाला रु.२८.५६ लाखाचा महसूल प्राप्त झाला असता. आंध्र प्रदेश सहकारी संस्था अधिनियम, १९६४ मध्ये ज्याप्रमाणे लाभांश घोषित करणे हे बंधनकारक आहे तशी तरतूद MCS अधिनियमात नव्हती. | राज्यामध्ये सहकार आयुक्त योजनांतर्गत दि.१.४.२०१८ अखेर **१५३८** संस्थांना रू.**२००२.०३** लाख शासकीय भाग भांडवल प्राप्त आहे. प्राप्त भाग भांडवला पैकी रू.**१२२.३३** लाख भाग भांडवल वसूल झालेले असून आजमितीस रू.**१८७९.७०** लाख भाग भांडवल थकीत आहे. उपरोक्त प्रमाणे प्राप्त भाग भांडवल संस्थांपैकी सन २०१६-१७ मध्ये १२५ संस्था नफ्यात असून त्यांच्या नफ्याची रक्कम रू.५३६.४६ लाख आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील देवगड तालुका बलुतेदार सहकारी संस्थेने सन २०१५-१६ वर्षी रू.०.१९ लाख लाभांश घोषित केला असून सदर रकमेचा भरणा केलेला आहे. श्रीराम ग्राहक सहकारी संस्था, गडहिंग्लज जि.कोल्हापूर या संस्थेने लाभांश घोषित केला असून रू.०.०६ लाख भरणा केलेला आहे. तथापि १२३ संस्थांना रू.५३६.२० लाख नफा झालेला असून तो नाममात्र असल्याने लाभांश जाहीर केलेला नाही. | १२५ नफ्यातील सहकारी संस्थांकडून किती शासकीय भाग भांडवल येणे आहे? सक्तीने लाभांश घोषित करण्याबाबतच्या सूचनेचा विचार व्हावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | ६.३.४<br>पान नं ११० | **शासकीय खात्यात अधिभाराचा भरणा न करणे (६.३.४)**<br>MCS नियमांच्या नियम १०७(इ) मधील तरतुदीनुसार, संस्थांना दिलेल्या कर्जाच्या वसुलीच्या खर्चापोटी एकूण वसूल झालेल्या रक्कमेच्या १.७५ टक्के दराने संस्थेने शासकीय खात्यात "अधिभार" म्हणून भरणा करावयाचा होता. लेखापरीक्षणात सादर केलेल्या माहितीनुसार, वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ दरम्यान पुणे (शहर), पुणे (ग्रामीण), सोलापूर आणि नाशिक विभागातील सात संस्थांकडून विभागाने रु.१.७९ कोटी अधिभार संकलित केला होता. या रक्कमेपैकी विभागाने रु.१.६४ कोटी कोषागारात भरले नव्हते आणि ते वसुलीचा खर्च म्हणून दाखविले होते. खर्चाच्या पुष्टीसाठी म्हणून लेखापरीक्षेला कुठलेही दस्ताऐज सादर केले नव्हते. विभागाने संपूर्ण राज्यासाठी माहिती गोळा करावी आणि झालेल्या खर्चाच्या अचुकतेची खात्री करावी. | **परीच्छेदात आक्षेप घेतलेल्या अधिभार वसूलीबाबत खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :-**<br><br>**१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर :-**<br>**अ)** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर या बँकेने सन २०११ ते २०१५ या कालावधीत वसुल झालेल्या खातेवरील रु. ६५.५३ लाख इतका सरचार्ज शासनाचे तिजोरीत भरला नसलेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन बँकेने सादर केलेल्या खुलाश्यानुसार महाराष्ट्र शासन कृषी व सहकार विभाग यांचेकडील पत्र क्र.सी.सी.आर.११८२/३७२४४/सीआर/४९१/२-स, दि.०९.०२.१९८३ अन्वये बँकेच्या अधिकाऱ्याने वसुल केलेला सरचार्ज शासनाचे तिजोरीत भरण्याची गरज नाही. संबधित बँकेने तो वसुली यंत्रणेवरील खर्चापोटी स्वत:कडे ठेवावा. मात्र सहकार खात्याकडील अधिकाऱ्यांनी वसुल केलेला सरचार्ज शासनाचे तिजोरीत भरावा असे स्पष्टपणे नमूद केले आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सन २००८ पासून सहकार खात्याकडील शासनाचे अधिकारी कार्यरत नाहीत. त्यामुळे सदरचा खर्च बँकेच्या वसुली यंत्रणेवर खर्च केला जातो. वसुल झालेल्या सरचार्जमध्ये वसुली यंत्रणेवरील खर्च जास्त असल्याने दरवर्षी तूट आहे.<br>ब) यशवंत भाऊ पाटील क्रेडिट सोसायटी लि., ता. पंढरपूर, जि. सोलापूर या संस्थेची सन २०१४-१५ या सालात रक्कम रुपये ४५.२० लाख इतकी वसुल झालेली असून सदर रकमेवर रुपये १.४२ लाख इतका सरचार्ज वसुल झालेचे दिसून येत आहे. त्यास अनुसरुन संस्थेने सादर केलेल्या खुलाश्यानुसार संस्थेची सन २०१४-१५ मध्ये थकबाकी रुपये ४५.२० इतकी वसुली झालेली नाही | ६१,६५४ प्रकरणांत रु.२९.०२ कोटी सरचार्ज वसूली कशाप्रकारे करण्यात येईल त्याबाबतचा कृती कार्यक्रम लोकलेखा समितीस स्पष्ट करावा.<br>सन २०११-१२ ते २०१५-१६ मधील सरचार्ज वसुली रु.१२०.३६ कोटी पैकी खर्च वजा जाता रु.८.२१ कोटी सरचार्जचा भरणा केला आहे. सरचार्ज वसुलीपैकी उर्वरित रक्कम कोणत्या आधारे ठेवलेली आहे तो आदेश लोकलेखा समितीस स्पष्ट करावा. |

तर रक्कम रुपये ४५.३९ इतकी वसुल। झालेली आहे व सदर रकमेवर रक्कम रुपये १.४२ लाख इतका सरचार्ज वसुल झालेला नसून रक्कम रुपये १.३३ लाख इतकी सरचार्जची रक्कम वसुल झालेली आहे व सदरची संपूर्ण रक्कम चलनाने भरणा करणेत आलेली आहे व उक्त चलनांच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. **(पान क्र.१५-१८)**

**२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर:-**

**(अ)** सेवा विकास को ऑप बँक लि. पुणे या बँकेने सन २०१२ या कालावधीतीलरु. ३.११ लाख इतक्या जमा सरचार्जपैकी रु.२.५० लाख इतकी सरचार्जची रक्कम शासनाचे तिजोरीत भरणा केल्याचे दिसून येत असून उर्वरीतरक्कम रु.६१०००/- इतकी रक्कम भरणा केल्याचे दिसून येतनाही.

उक्त बँकेने उर्वरीत रक्कम रुपये ६१,०००/- इतक्या रकमेचाभरणा शासकीय कोषागारामध्ये केलेला असून उक्त चलनांच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. **(पान क्र.१९)**

**(ब)** अशोक नागरी सहकारी बँकेने सन २०१२ या कालावधीत रु. १०,०००/- इतक्या जमा झालेल्या सरजार्चची रक्कम शासनाचे तिजोरीत भरणा केल्याचे दिसून येत नाही.

बँकेने सरचार्जची रक्कम रुपये १०,०००/- शासकीय कोषागारात भरलेली असून चलनाची प्रत सोबत जोडली आहे. **(पान क्र.२०)**

**(क)** पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. पुणे या संस्थेचा सन् २०११-१२ ते सन २०१४-१५ या

| | | | |
|---|---|---|---|
| | | कालावधीतील रुपये १०.१६ लाख रुपयांचा सरचार्ज भरणा करण्याचे शिल्लक असल्याचे दिसून येते.<br>त्या अनुसरुन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालयाने प्रपत्र-ब च्या विहित नमुन्यामध्ये भरणा केलेल्या सरचार्जची माहिती सोबत तक्ता क्र.६ (पान क्र.१३) सोबत जोडला आहे.<br>**३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पुणे**:- बारामती तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., ता.बारामती, जि. पुणे या संस्थेची रु.४,५५,०००/- वसुल केलेला सरचार्ज शासकीय कोषागारात भरणा करणात आला आहे. (पान क्र.३८)<br>४. **नाशिक विभागातील** ३ सहकारी संस्थाकडून रु.२,४२,७३७ वसुल केलेला सरचार्ज शासकीय कोषागारात भरणा केला आहे. **(पान क्र.२१-३०)**<br>**परिच्छेदामध्ये नमुद १,६४,७९,७३७ सरचार्ज पैकी रु.१६,११,२८५ शासकीय कोषाग़ारात भरणा केला असून उर्वरित रु.१,४८,६८,४५२ रक्कम सहकारी संस्थाच्या वसुली खर्चासाठी वापरलेली असून त्याचा तपशिल उपलब्ध झाला आहे.**<br><br>राज्यातील **सरचार्ज वसुलीची सद्यस्थिती :-**<br>राज्यातील ९ विभागांकडून सरचार्ज वसूली, सरचार्जचा झालेला खर्च आणि कोषागारात भरणा केलेला सरचार्जची माहितीचे एकत्रित संकलन केले असून तक्ता क्र.७ (**पान क्र.१४**) मध्ये सादर केलेला आहे.<br>या कार्यालयाकडील पत्र दि.२४.६.२०१६, दि.२९.१०.२०१६, दि.२३.३.२०१८, दि.०८.१२.२०१८ अन्वये सरचार्ज वसुलीबाबत सविस्तर सूचना दिलेल्या असून सरचार्ज वसुलीचा आढावा नियमितपणे घेण्यात | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | येत आहे. सदर वसुली अधिका-यांन वसुल केलेला सरचार्ज भरणा वसुल केलेल्या महिन्यात शासकीय कोषागारात भरणा होईल, याबाबत सुचना दिलेल्या आहेत. | |
| ६ | ६.३.५<br>पान क्र.१११ | **संस्थांची लेखापरीक्षा आणि त्यांचे अनुपालन -**<br>MCS अधिनियमातील कलम ८१ अंतर्गत निबंधकाने प्रत्येक संस्थेच्या लेख्यांची वर्षातुन किमान एकदा तरी लेखापरीक्षा करावी किंवा करवुन घ्यावी. आयुक्त, सहकारी संस्था यांनी लेखापरीक्षेला सादर केलेल्या माहितीनुसार, सर्व विभागातील एकुण १,९६,९०७ संस्थांपैकी फक्त १,४७,६८९ (७५ टक्के) संस्था लेखापरीक्षेसाठी नेमून दिल्या होत्या. ज्यापैकी १३,०९१ संस्थांची विभागीय लेखापरीक्षकांकडुन आणि ६२,१८६ संस्थांची इतर लेखापरीक्षकांकडुन लेखापरीक्षा प्रलंबित होती. अशाप्रकारे नेमून दिलेल्या संस्थांच्या लेखापरीक्षा करण्यातील प्रलंबितता ५१ % होती आणि एकुण संस्थांच्या लेखापरीक्षेतील प्रलंबितता ६३% होती. विभागाने या संस्थांची लेखापरीक्षा करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा.<br>महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८२ नुसार, लेखापरीक्षकाद्वारे लेखापरीक्षा अहवालाच्या प्रपत्र "O" मध्ये लक्षात आणुन दिलेल्या दोष किंवा अनियमितता, प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत प्रत्येक संस्थेने दोष दुरुस्ती करण्यासाठी, अनियमिततांवर तोडगा काढण्यासाठी पावले उचलावीत आणि | **६.३.५ संस्थांचीलेखापरीक्षावत्याचेअनुपालन :**<br>• **लेखापरीक्षक नियुक्ती :**<br>सहकार अधिनियमातील सुधारीत तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून, सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर सोपविण्यात आलेली असून या संस्थांना राज्यस्तरीय नामतालिकेतुन लेखापरीक्षक नियुक्तीची स्वायतत्ता प्रदान केलेली आहे. सदर सुधारीत तरतुदीनुसार अधिनियमातील ७५ (२अ) अन्वये संबंधित संस्था राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालिकेतुन, संस्था अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार लेखापरीक्षकाची नियुक्ती करतात. तथापि, ज्या संस्था अशी नियुक्ती करीत नाहीत, त्या संस्थांचे बाबतीत कलम ८१ (१) (अ) खालील परंतुकान्वये संबंधित निबंधकाकडून त्या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्तीचे आदेश परंतुकान्वये पारीत केले जातात. सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्ती केलेल्या संस्थांची संकलित आकडेवारी **तक्ता क्र.३** (पान **क्र.१२)** मध्ये नमुद केलेली आहे.<br>सहकार आयुक्त कार्यालयाने प्रत्येक वर्षी लेखापरीक्षणास पात्र असलेल्या सर्व संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्तीबाबत | विभागाकडून प्रलंबित लेखापरिक्षण पूर्ण करण्यासाठी व दोष दुरुस्तीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. |

त्याबाबतीत केलेल्या कारवाईचा अहवाल निबंधकाला सादर करावा. संस्थांकडुन सादर झालेल्या या अहवालांना विभागाकडून "दुरुस्ती अहवाल " असे संबोधण्यात येते. विभागाकडून सादर करण्यात आलेल्या माहितीवरुन असे आढळुन आले की, दि.३१ मार्च २०१६ ला ७५६२८ संस्थांपैकी ५४५५४ संस्थांनी (७२%) दुरुस्ती अहवाल सादर केले नव्हते. त्यामुळे संबंधित संस्थांनी केलेल्या सुधारणात्मक कारवाईबाबत विभागाला खात्री करता येऊ शकली नव्हती. संस्थांकडून दुरुस्ती अहवालाच्या अभावी, संस्थांच्या कार्यक्षमतेची सुनिश्चितता करता येऊ शकली नाही.

वेळोवेळी पाठपुरावा करुन कार्यवाही केली असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणास पात्र असलेल्या संस्थांपैकी केवळ ८ संस्था वगळता उर्वरित सर्व संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती केलेली असल्याने लेखापरीक्षक नियुक्तीचे प्रमाण ९९.९९ % आहे.

- **लेखापरीक्षण कामकाज :**

सहकार आयुक्त यांचे अधिकार कक्षेतील सहकारी संस्थांचे सन २०१४-१५ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या संस्थांची संकलित आकडेवारी **तक्ता क्र. ४ (पान क्र.१२)** मध्ये नमुद केलेली आहे.

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणासाठी नियुक्ती करताना मागील थकीत कालावधीसह अद्यावतपणे लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्ती केली जाते. या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या परिपत्रकीय सुचना व केलेल्या पाठपुराव्यानुसार सन २०१६-१७ अखेर थकीत लेखापरीक्षण संस्थांची प्रलंबीतता ६३ % वरुन २६.९३ % पर्यंत कमी करण्यात आलेली आहे.

लेखापरीक्षण प्रलंबीत असणा-या संस्थांचा आढावा घेतला असता, संस्थांचे दप्तर अपूर्ण असल्याने, लेखापरीक्षणासाठी संस्थांकडून लेखापरीक्षकांना दप्तर उपलब्ध करून न दिल्याने, लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण न केल्याने तसेच इतर कारणांमुळे लेखापरीक्षण प्रलंबीत राहीलेले आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण प्रलंबीत असलेल्या संस्थांची संख्या ४२०९८ एवढी असून त्यामध्ये प्रमुख्याने २८८८७ गृहनिर्माण संस्थांचा समावेश असुन या संस्था त्यांचे रेकॉर्ड अद्ययावत

ठेवत नाहीत, तसेच लेखापरीक्षणा.ल रेकॉर्ड उपलब्ध करून देत नाहीत, त्यामुळे सदर संस्थांचे लेखापरीक्षण थकीत राहण्याचे प्रमाण इतर संस्थांच्या तुलनेत जास्त आहे. लेखापरीक्षण न होण्यास ज्या ठिकाणी संस्था कारणीभूत आहेत अशा संस्थांचे विरुद्ध अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु असून त्यानुसार या ४२०९८ संस्थांपैकी २१४५८ संस्थांचे अवसायनाचे अंतरिम आदेश पारीत केलेले असुन त्यापैकी १७१० संस्थांचे अवसायनाचे आदेश अंतिम करण्यात आलेले आहे. तसेच लेखापरीक्षण न होण्यास ज्या ठिकाणी लेखापरीक्षक कारणीभूत आहेत अशा लेखापरीक्षकांची नावे लेखापरीक्षक नामतालीकेवरुन कमी करण्याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

- **दोष दुरुस्ती अहवाल :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८२ नुसार, लेखापरीक्षकाद्वारे लेखापरीक्षा अहवाल सादर केल्यानंतर त्यामधील दोषांची पुर्तता करुन त्याबाबतचा दोष दुरुस्ती अहवाल "ओ" नमुन्यात लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत संस्थेने निबंधकाला सादर करणे बंधनकारक आहे. सन २०१४-१५ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण झालेल्या संस्थांचे दोष दुरुस्ती अहवालांचे अनुषंगाने माहिती **तक्ता क्र. ५** (**पान क्र.१२**) मध्ये नमुद केलेली आहे.

सन २०१४-१५ या लेखापरीक्षण वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांचे प्रमाणे ५०.२४ % एवढे होते. मुख्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या बैठकामध्ये

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सर्व संस्थांचे दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत सातत्याने सुचना देण्यात येत असतात. त्यासंदर्भात दि.२२/८/२०१५ व दि. ११/८/२०१७ रोजी परिपत्रकीय सुचना देण्यात आलेल्या असून वेळोवेळी त्याअनुषंगाने पाठपुरावा करण्यात आलेला आहे. त्यानुसार लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांच्या प्रमाणात घट झाली असून, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांचे प्रमाण अनुक्रमे १५.६७ % व ३०.७८ % आहे. सर्व संस्थांकडून दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणे तसेच त्यासंदर्भाने पुढील उचित कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा सुरु आहे. | |

## तक्ता क्रमांक १

शासकीय लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण केलेल्या संस्थांकडील लेखापरीक्षण शुल्क मागणी व वसुलीबाबतची दिनांक ०१.०४.२०१६ ते ३०.०९.२०१८ या कालावधीतील आकडेवारी

(रक्कम कोटीत)

| वर्ष | आरंभी शिल्लक | आर्थिक वर्षातील चालू मागणी | एकुण मागणी | वसुली | | | येणे लेखापरीक्षण शुल्क | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | थकीत | चालु | एकुण | थकीत | चालु | एकुण |
| २०१५-१६ | ७३.२५ | ६.६४ | ७९.८९ | ४.६५ | ५.५३ | १०.१८ | ६८.६० | १.११ | ६९.७१ |
| २०१६-१७ | ६९.७१ | १०.४४ | ८०.१५ | ५.६८ | ६.८९ | १२.५८ | ६४.०३ | ३.५४ | ६७.५८ |
| २०१७-१८ | ६७.५८ | ७.९२ | ७५.५० | ४.६४ | ५.३८ | १०.०३ | ६२.९२ | २.५४ | ६५.४७ |
| सप्टेंबर २०१८ | ६५.४७ | २.८५ | ६८.३२ | १.७५ | १.९१ | ३.६७ | ६३.७१ | ०.९३ | ६४.६५ |

## तक्ता क्रमांक २

**दिनांक ३०.०९.२०१८ अखेर येणे असलेल्या लेखा परीक्षण शुल्क रकमेची संस्था निहाय वर्गवारीनुसार आकडेवारी**

(रक्कम कोटीत)

| अ क्र. | दि.३०.९.२०१८ अखेरील लेखापरीक्षण शुल्क येणे बाकी असलेल्या संस्थांची कारणनिहाय वर्गवारी | लेखापरीक्षण शुल्क येणे | | येणे बाकी पैकी कलम १५५ अंतर्गत प्रस्ताव सादर | | येणे बाकी पैकी लेखापरीक्षण शुल्क माफी प्रस्ताव | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | नोंदणी रद्द | १७६३ | ०.५८ | ३४१ | ०.२८ | ५२७ | ०.०६ |
| २ | अवसायनातिल | २०१८ | २.९७ | २३७ | १.०७ | ३२ | ०.०४ |
| ३ | बंद संस्था | १४३५ | १.१२ | ८९९ | ०.६० | ९१ | ०.०२ |
| ४ | आर्थिक अडचणीतील | ३२३८ | ३९.९१ | ११८३ | २५.५५ | ५२ | ०.०२ |
| ५ | चालु संस्था | ११९४३ | २०.०८ | ४६३४ | ११.८६ | ० | ०.०० |
| | एकुण संस्था | **२०३९७** | **६४.६५** | **७२९४** | **३९.३५** | **७०२** | **०.१४** |

## तक्ता क्रमांक ३

### सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्ती केलेल्या संस्थांची संकलित आकडेवारी

| लेखापरीक्षण वर्ष | सहकार आयुक्त यांच्या अधिकार कक्षेतील एकुण संस्था | सहकार आयुक्त यांच्या अधिकार कक्षेतील लेखापरीक्षणास पात्र असणाऱ्या एकुण संस्था | संस्थांनी कलम ७५ (२अ) अन्वये लेखापरीक्षकाची नियुक्त केलेल्या संस्थांची संख्या | निबंधकाने कलम ८१ (१) (अ) च्या परंतुकान्वये नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांच्या संस्था संख्या | एकुण | नियुक्ती न झालेल्या संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | १८६५०७ | १८६५०७ | ७०९७२ | ७७५२२ | १४८४९४ | ३८०१३ |
| २०१५-१६ | १५९२८८ | १५४५०८ | ५२८१९ | ९८८५८ | १५१६७७ | २८३१ |
| २०१६-१७ | १५९४९२ | १५६८३७ | ७८०७८ | ७८२२० | १५६२९८ | ५३९ |
| २०१७-१८ | १६२३३५ | १५८६२२ | ७८१७० | ८०४३९ | १५८६१४ | ८ |

## तक्ता क्रमांक ४

### सहकार आयुक्त यांचे अधिकार कक्षेतील सहकारी संस्थांचे सन २०१४-१५ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या संस्थांची संकलित आकडेवारी

| लेखापरीक्षण वर्ष | राज्यातील एकुण सहकारी संस्था | सहकार आयुक्त यांचे अधिकार कक्षेतील लेखापरीक्षणास पात्र असणाऱ्या सहकारी संस्था | यापैकी लेखापरीक्षणास वाटप झालेल्या संस्था संख्या | यापैकी लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या सहकारी संस्था | लेखापरीक्षण न झालेल्या सहकारी संस्था | लेखापरीक्षणासाठी वाटप केलेल्या संस्था संख्येशी लेखापरीक्षण न झालेल्या संस्था संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | २१८४२९ | १८६५०७ | १४८४९४ | ७७४९० | ७१००४ | ४७.८२ % |
| २०१५-१६ | १८०२८९ | १५४५०८ | १५१६७७ | ११६०८४ | ३५५९३ | २३.४७% |
| २०१६-१७ | १७९५२४ | १५६८३७ | १५६२९८ | ११४२०० | ४२०९८ | २६.९३% |
| २०१७-१८ | १८१६७४ | १५८६२२ | १५८६१४ | *१००३९८ | ५८२१६ | ३६.७० % |

* सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाची आकडेवारी माहे नोव्हेंबर २०१८अखेर असुन लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या संस्थांच्या संख्येत माहे मार्च २०१९ अखेर वाढ होणार आहे.

## तक्ता क्रमांक ५

### सन २०१४-१५ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण झालेल्या संस्थांचे दोष दुरुस्ती अहवालांचे अनुषंगाने माहिती खालिलप्रमाणे -

| अक्र. | लेखापरीक्षण वर्ष | लेखापरीक्षण पुर्ण संस्था संख्या | दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त संस्था संख्या | दोष दुरुस्ती अहवाल अप्राप्त संस्था संख्या | ज्या संस्थाकडून दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त झालेले नाहित त्यांचे विरुध्द केलेली कारवाई. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोटीस | कलम ८७ | कलम १४६ | अवसायन |
| १ | २०१४-१५ | ७७४९० | ३८५५९ | ३८९३१ | १४८१ | १३२७ | ५७० | १२ |
| २ | २०१५-१६ | ११६०८४ | ९७८९३ | १८१९१ | ६७३२ | ६२ | ३८३ | १२ |
| ३ | २०१६-१७ | ११४२०० | ७९०४८ | ३५१५२ | १२०८८ | ११०१ | १३१७ | ५१५ |

## तक्ता क्रमांक ६

**पुणे जिल्हा नागरी सहकारी फेडरेशन यांनी जमा केलेल्या व भरलेल्या अधिभाराचा तपशिल (रक्कम रुपयात)**

| वर्ष | सरचार्ज आकारणी | वसूली खर्च | शिल्लक | भरणा रक्कम | चलन क्र. आणि भरणा केलेचा दिनांक (चलनाची प्रत जोडली आहे) |
|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | १९,३१,१६३ | १८,०६,१६३ | १,२५,००० | १,२५,००० | २१४४ दि. २४.०८.२०१२ (पान क्र.३१) |
| २०१२-१३ | १८,६६,६९२ | १८,६६,६९२ | ५०,००० | ५०,००० | १६४५ दि.१०.०३.२०१४ (पान क्र.३२) |
| २०१३-१४ | २०,३९,६७० | १८,३९,६७० | २,००,००० | २,००,००० | ८२१ दि. ३१.१२.२०१४ (पान क्र.३३) |
| २०१४-१५ | ३५,३९,८४४ | ३५,५९,५९१ | २,८०,२५३ | २,८०,००० | १३५ दि.२५.०२.१६ (पान क्र.३४) आणि ९१६, दि. १७.०३.२०१६ (पान क्र.३५) |
| २०१५-१६ | ४०,०१,९३७ | ३८,७७,१६२ | १,२४,७५५ | १,२५,०२८ | ५१० दि.१९.०९.१६ ते ५२२, दि. १९.०९.१६ (पान क्र.३६ व ३७) |
| एकूण | १,३३,७९,३०६ | १,२५,९९,२७८ | ७,८०,०२८ | ७,८०,०२८ | |

**साक्ष :**

**५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या महसुली क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र.६.३.१ लेखापरीक्षण शुल्काची वसुली न होणे, ६.३.२- शासकीय भाग भांडवलाची वसुली न होणे, ६.३.३ नफ्यातील सहकारी संस्थाकडून लाभांश प्राप्त होण्याची सुनिश्चित न करणे, ६.३.४-शासकीय खात्यात आधिभारांचा भरणा न करणे ६.३.५ संस्थाची लेखापरिक्षा आणि त्यांचे अनुपालन** यासंदर्भात दि. १९ डिसेंबर, २०१८ रोजी सहकार विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक ६.३.१ **लेखापरीक्षण शुल्काची वसुली न होणे** या परिच्छेदाबद्दल रेव्हेन्यू रिकव्हरीच्या आरआरसीची कार्यवाही सुरू केलेली आहे. यामध्ये आतापर्यंत किती प्रगती झालेली आहे? २०११-२०१२ मध्ये ५२ कोटी रूपये थकबाकी होती व २०१५-२०१६ मध्ये ७० कोटी रूपयांच्या जवळपास थकबाकी पोहोचली. असे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी प्रलंबित वसुली एकूण ६४ कोटी ६५ लाख रूपये इतकी आहे. ही रिकव्हरी २०,३९७ सोसायटीकडून येणे बाकी आहे. यापैकी ८,४५४ सोसायट्यांमध्ये काही सोसायट्यांची नोंदणी रद्द झालेली आहे, काही सोसायट्यां अवसायनात गेलेल्या आहेत, काही सोसायट्या बंद आहेत तर काही सोसायट्या आर्थिक अडचणीत आहेत. अशी एकूण ६९ टक्के थकबाकी ८,४५४ सोसायट्यांकडून वसूल करायची आहे. तरी देखील विभागाने १५५ सेक्शन खाली आरआरसीची कार्यवाही सुरू केलेली आहे. आतापर्यंत ३९ कोटी ६५ लाख रूपयांची आआरसीची कार्यवाही इनिसिएट केली आहे. यामध्ये ०.१४ कोटी वेव्हरची कार्यवाही केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इतर रक्कम अवसायानात गेलेल्या सहकारी संस्थाची आहे, असे विभागाचे मत आहे काय? एकूण थकबाकी ६४ कोटी रूपये आहे. ४० कोटी रूपये एकूण आरआरसी काढली, १४ लाख रूपयांचे वेव्हर प्रपोजल केलेले आहे आणि इतर २५ कोटी रूपयांबद्दल विभागाचे मत आहे की, ही रक्कम डिफॉल्टर संस्थांकडे राहिलेली आहेत. ज्या संस्था अवसायनात गेल्या आहेत, त्यांचीदेखील आरआरसी केली असेल? अशी विचारणा समितीने केली असता, समितीचे मत योग्यच आहे. ही केवळ संस्था आहे. या संस्थांकडून वसुली न होण्याचे कारण रिकव्हरी बाकी असलेल्या ६९ टक्के संस्थांमध्ये काहीतरी अडचण आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वेव्हरबद्दल काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केलेली आहेत काय? विभागाने १४ लाख रूपयांचे वेव्हरचा प्रस्ताव तयार केलेला आहे. What is the ground for such waiver? अशी विचारण समितीने केली असता, सध्या विभागाकडून मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आलेली नाहीत. जेथे कोणताही असा अर्थ राहिलेला नाही आणि वसुलीची शक्यता नाही, याकरिता वित्त विभागाच्या मान्यतेने वेव्हरचा प्रस्ताव निर्गमित करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

८ हजार पेक्षा जास्त संस्था अवसायनात आहेत, आर्थिकदृष्ट्या अडचणीत आहेत इत्यादी. यासर्व संस्थांबद्दल मोठमोठी आकडेवारी विभागाकडून देण्यात येते. परंतु काही वसुलीच होणार नसेल तर त्याला काही अर्थ नाही. कोणत्या परिस्थितीमध्ये वेव्हर करायचे किंवा नाही करायचे याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करून दिल्यास या कामाला वेग येईल. १४ लाख रूपयांची वेव्हरची केस केलेली आहे. तसेच ८ हजार संस्थांकडून वसुलीची आशा दिसत नाही, असेही सांगण्यात आले. एकूण १ लाख ५७ हजार संस्था असून त्यापैकी २० हजार संस्था डिफॉल्ट आहेत. म्हणजे त्यांच्याकडे ६९ टक्के वसुलीयोग्य रक्कम असेल. याकरिता मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली तर हा आकडा आणखी कमी होईल, असे महालेखाकारांना व समितीला वाटते. याबद्दल विभागाला तातडीने निर्णय घेता येईल. यामुळे जास्त थकबाकी रहाणार नाही. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यात सहमती दर्शविली.

शासनाने शेतकऱ्यांची १७ हजार कोटी रूपयांची कर्जमाफी केली. लेखा परीक्षण शुल्कापोटी वसुली बाकी असलेल्या सेवा सहकारी संस्था आणि विविध सहकारी संस्था कोणकोणत्या आहेत? ८ हजार संस्थांचे वर्गीकरण कशा प्रकारचे आहे, सरकारने शेतकऱ्यांची १७ हजार कोटी रूपयांची कर्ज माफी केल्यामुळे जास्तीत जास्त संस्थांकडे पैसा जमा आला, बँकांकडेही पैसा आला. असे मत समितीने व्यक्त केले असता, ८,४५४ संस्थांपैकी १,७६३ संस्थांची नोंदणी रद्द झालेली आहे. १४३५ संस्था बंद झालेल्या आहेत. २,०१८ संस्था अवसायनात गेलेल्या आहेत. रक्कम येणे बाकी असलेल्या संस्थांमध्ये विविध कार्यकारी संस्था २० हजार . आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२० हजार संस्थांमधील शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे अनेक संस्था अवसायनात गेल्या असतील. आता शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी केलेली आहे. त्यामुळे अशा संस्थांकडे पैसे जमा झालेले असतील. संस्थेकडे पैसे आले असतील, लिक्विडेटरकडे पैसे आले असतील. त्यांनी त्याच्या शुल्कापोटी रक्कम भरणे आवश्यक आहे. विभागाने त्या पद्धतीनेही पाहिले पाहिजे, जेणेकरून वसुलीचे प्रमाण वाढेल. शेतकऱ्यांकडे पैसे आले की, निश्चितच सोसायटीची वसुली होणार आहे. असे समितीने सूचित केले असता, यामध्ये विविध कार्यकारी सोसायट्यांची संख्या जास्त आहे. १९ कोटी ४३ लाख रूपये विविध कार्यकारी संस्थांचेच आहे. अशी माहीती विभागीय सचिवांनी दिली.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीनंतर संस्थांची वसुली झाली असेल. त्या दृष्टीने वसुलीकरिता गती देण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक ६.३.२ : शासकीय भागभांडवलाची वसुली न होणे**

या परिच्छेदाबाबत हा विषय शासकीय भागभांडवलाची वसुली नकारार्थी संदर्भातील आहे. याबाबत नियमात असलेल्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक संस्थेला भागभांडवल परतावा निधी निर्माण करावा लागतो. तसेच प्रती वर्षी १ बटे १५ एवढी रक्कम आऊट ऑफ टोटल प्रॉफीट शेअर कॅपीटल रिडंमशन फंडमध्ये टाकावी लागते. १९८२ पासून आतापर्यंत १,५३८ सोसायट्यांना एकूण ४८ कोटी रूपयांचे भागभांडवल दिलेले आहे. त्यापैकी २० कोटी रूपये विभागाची मागणी आहे. त्यापैकी जवळपास १ कोटी २२ लाख रूपये वसूल झालेले आहेत. तसेच १८ कोटी ७९ लाख रूपये थकीत आहे. अशी माहीती विभागीय सचिवांनी दिली.

भागभांडवलामध्ये १८ कोटी ७९ लाख रूपये भागभांडवल बाकी आहे, हा मुद्दा योग्य आहे. परंतु ते लोक पैसे काढत नाहीत. असे मत समितीने व्यक्त केले असता, याचे मोठे कारण असे आहे की, जेथे नफा आहे, तेथून विभागाला १/१५ इतकी रक्कम टाकायची आहे. एकूण संस्थापैकी १२५ संस्था नफ्यामध्ये आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१ लाख ५७ हजार संस्थांपैकी केवळ १४५ संस्था नफ्यात आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, ज्यांना भागभांडवल देण्यात आलेले आहे, त्यापैकी १२५ संस्था नफ्यात आहेत. त्यांचे नफा देखील नाममात्र आहे. ५३६ कोटी ४६ लाख रूपये इतका नफा आहे. नाममात्र नफा असल्यामुळे त्यांना १५ पैकी १ भाग रिडेम्पशन फंडामध्ये टाकता आला नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**परिच्छेद क्रमांक ६.३.३- नफ्यातील सहकारी संस्थांकडून लाभांश प्राप्त होण्याची सुनिश्चिती न करणे**

तथापी १२३ संस्थांना ५३६.२० लाख रूपयांचा नफा झालेला असून तो नाममात्र असल्यामुळे लाभांश देखील जाहीर करण्यात आलेला नाही, याबाबत विभागाचे काय मत आहे. तसेच शेअर कॅपिटलची देखील अशीच स्थिती आहे. महालेखाकार यांनी आक्षेप काढत असताना या विषयावर असे सांगितले की, आंध्र प्रदेश सहकारी संस्था अधिनियम, १९६४ मध्ये त्यांच्या कलम ३६ (५) 'ड' अंतर्गत ज्या प्रमाणे लाभांश घोषित करणे त्यांनी बंधनकारक केले. तशी तरतूद महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह सोसायटी अधिनियमात करणार काय? विभागाने आंध्र प्रदेशच्या या अधिनियमाचा अभ्यास केला पाहिजे. किती लाभांश झाला याचा डीव्हीडंट विभागाकडून जाहीर करण्यात येत नाही. ती रक्कम शासनाला मिळत नाही. डीव्हीडंट जाहीर करणे हे संस्थांच्या इच्छेवर आहे. संस्था नफ्यामध्ये असतील तर त्यांनी डीव्हीडंट जाहीर केला पाहिजे. आंध्र प्रदेश सहकारी संस्था अधिनियम ६४ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात याचे पालन केला तर त्यांचा जो लाभांश दिसतो, इथे विभागाने भागभांडवल दिलेले आहे, इथला लाभांश विभागाला मिळेल. असे समितीने सूचित केले.

सरकार का जो शेअर कॅपिटल है उसमें भी लाभांश देना पडेगा, वह संस्था देते नहीं है. इसीलिए महालेखाकार का कहना है कि इसमें सरकार की भागभांडवल लगी हुआ है, सरकार को ता प्रेजेंटेशन लेना नहीं है, तो सरकार का भाग भांडवल का और लाभांश का हिस्सा मिलना चाहीए और यदि संस्था मुनाफे में है, तो आंध्रप्रदेश के सहकारी नियमों के अंतर्गत ऊनका लाभांश डिक्लेअर करना मॅन्डेटरी है, तो Why Maharashtra should not have a same rule? अशी विचारणा समितीने केली असता, या अधिनियमांचा अभ्यास करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामध्ये सरकारचा फायदा आहे. त्यामुळे असे केले पाहिजे. सहकारी संस्था त्यांचा लाभ दाखवितच नाही. सहकारी संस्थांना लाभ दाखविणे बंधनकारक झाले तर ते लाभांश देखील दाखवतील. त्यांच्याकडून शेअर कॅपीटलचे भागभांडवल, लाभांश मिळत नाही. म्हणजेच टोटल सबसीडी झाली. त्यामुळे या विषयावर शासनाने विचार करावा, असे महालेखाकार यांचे मत आहे व समितीचे देखील तसेच मत आहे. असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक. ६.३.४ : शासकीय खात्यात अधिभाराचा भरणा न करणे**

या परिच्छेदाबाबत माहिती देताना वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ दरम्यान पुणे (शहर),पुणे (ग्रामीण) सोलापूर आणि नाशिक विभागातील सात संस्थांकडून विभागाने रु.१.७९ कोटी अधिभार वसूल केला होता. या रकमेपैकी विभागाने १.६४ कोटी कोषागारात भरले नव्हते आणि ते वसुलीचा खर्च म्हणून दाखविले होते. असा आक्षेप महालेखाकारांनी नोदविला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियमाच्या १०७ (e) मध्ये अधिभार वसुलीबाबत तरतूद आहे. जी वसुली होते त्यापैकी १.७५ टक्के रक्कम अधिभार म्हणून शासनाकडे जमा केली जाते. त्या रकमेतून त्या संबधित संस्थानी वसुलीचा खर्च वजा केला नव्हता. त्यामुळे ती रक्कम १६.११ लाख इतकी आहे. विभागाने ती रक्कम ७ संस्थांकडून वसूल

केलेली आहे. तसेच, इतर विभागाकडून माहिती गोळा करण्याबाबतचा मुद्दा होता. ती माहिती गोळा केलेली आहे. त्यामध्ये ३.९७ कोटी वसुलीची थकबाकी आहे. रिकव्हरी चार्जेसच्या कॉस्टींग संदर्भात निर्देश देण्यात आले होते. पूर्वी ती १.७५ ते ६ टक्क्यांपर्यंत घेण्याचे निर्देश होते. आता दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी नवीन निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार आता ०.५ ते १.५ टक्के एवढीच रक्कम घ्यायची आहे. अस विभागीय सचिवांनी सांगितले.

०.५ ते १.५ असे डिस्क्रीशन कसे काय ठेवले? म्हणजे आता विभागाला ते मिळणार नाही. मग जी जुनी थकबाकी आहे त्याचे काय? अशी विचारणा समितीने केली असता, जेवढी रक्कम असेल त्याप्रमाणे आहे. मूलतः त्यामध्ये रिकव्हरीचा खर्च कव्हर होईल. जुनी थकबाकी वसूल करावी लागेल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पूर्वीची थकबाकी ३.७९ कोटी रुपये आहे. समितीला माहिती देण्यात आली की, १.६४ कोटी पैकी १६ लाख रुपये बाकी आहेत. विभागाने १.६४ कोटी पैकी १६ लाख रुपये वसूल केलेले आहेत. मग उर्वरित रकमेच्या वसुलीचे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने १६ लाख रुपये वसूल केले आहेत. याबाबत ९ विभागांची माहिती घेतलेली आहे. आता वसुली करणे बाकी नाही. त्यामध्ये वसुलीचा खर्च होता. परंतु, तो वजा करण्यात आला नव्हता. प्रत्यक्षात जी रक्कम वसूल करावयाची होती ती १६.११ लाख रुपये होती. असा खुलासा विभागीय सचिवांनी केली.

The surcharge is 1.75%, which is to be recovered. Is it recovered by the officers of the Department's? In that case even if there is cost of recovery, it has to go from your regular budget and not from this. Any money which belongs to the Government must come to the consolidated fund of the State through treasury. There may be some expenses like officers visiting the field, travelling expenses etc., it has to come from regular budget. असे मत महालेखाकारांनी मांडले.

महालेखाकारांचे असे मत आहे की, संस्थांनी आपापली रक्कम कापून घेतली आणि उर्वरित रक्कम जमा केली. सेवा विकास को-ऑपरेटिव्ह बँकेने पूर्ण रक्कम जमा केली नाही. त्यांनी जो खर्च झाला होता ती रक्कम कपात करून उर्वरित रक्कम जमा केली. असे मत समितीने व्यक्त केले.

विभागाने १९८३ च्या शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे. महालेखापालांकडे त्या शासन निर्णयाची प्रत नाही. सन २०१८ मध्ये शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. तो नवीन शासन निर्णय आहे. परंतु, विभागाने १९८३ मधील शासन निर्णयाचा संदर्भ दिलेला आहे. आम्हाला त्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करून द्यावी. असे महालेखाकारांनी सूचित केले, यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शवली.

महालेखाकारांचे असे मत आहे की, total surcharge should be deposited in the treasury and then they should ask for reimbursement-Whether this is practical? कारण, बँकेचे लोक ते देणारच नाहीत असा मुद्दा समितीने मांडला असता, आता तो प्रश्न राहिलेला नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे अधिकारी तेथे गेले तर तो खर्च नियमित बजेटमधून होईल. तो खर्च वसुलीच्या खर्चामधून वळता केला जाणार नाही. परंतु, बँका किंवा सहकारी संस्थानी अंमलबजावणी केली तर त्यांचा जो खर्च होतो तो ते वजा करु शकतात असे विभागाच्या सन १९८३ च्या शासन निर्णयाप्रमाणे म्हटले आहे. परंतु, महालेखापाल कार्यालयात सन १९८३ च्या शासन निर्णयाची प्रत नाही. त्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर त्याची तपासणी करण्यात येईल. विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत ते थेट त्यातून रक्कम काढू शकत नाहीत, असे मत महालेखापालांनी व्यक्त केले.

विभागाचे अधिकारी वसुली करीत असतील तर ते संपूर्ण पैसे त्यांनी जमा करावेत आणि जे खर्च आहेत त्यासाठी विभागाच्या बजेटमधून मागणी करावी. असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,पुणे या संस्थेचा सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतील रुपये ९०.१६ लाख रुपयांचा सरचार्ज भरणा करण्याचे शिल्लक असल्याचे दिसून येते असे लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे. या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये ज्या संस्थांची नोंद आहे त्यांच्याकडून विभागाने १६ लाख रुपये वसुली केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लेखी माहितीमध्ये पुढे असे नमूद केले आहे की, " त्यास अनुसरुन जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांच्या कार्यालयाने प्रपत्र-ब च्या विहित नमुन्यामध्ये भरणा केलेल्या सरचार्जची माहिती तक्ता क्र.६ (पान क्र.१३) सोबत जोडला आहे. " परंतु, ती माहिती समितीकडे प्राप्त झालेली नाही. म्हणून या केस संदर्भात सद्य:स्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी ७,८०,०२८ रुपयांचा भरणा केलेला आहे आणि जी उर्वरित रक्कम आहे ती त्यांनी एक्स्पेन्सेस म्हणून दाखविलेली आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तक्ता क्र.६ मध्ये भरणा रक्कम ७ लाख ८० हजार रुपये असल्याचे नमूद केले आहे. परंतु, समितीला सांगण्यात आले की, १६ लाख रुपये वसूल केलेले आहेत. अशी बाब समितीने निदर्शनास आणली आसता, ती रक्कम सर्व संस्थांची मिळून आहे. आता केवळ मुद्दा क्र. " सी " संदर्भात चर्चा करण्यात येत असून त्यांनी ७ लाख ८० हजार रुपये भरलेले आहेत आणि ८२ लाख ३३ हजार रुपये खर्च दाखविलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांचे असे मत आहे की, विभागाला ६१६५४ केसेसमध्ये एकूण २९ कोटी २ लाख रुपये वसूल करावयाचाचे होते. विभागाला रिकव्हरी चार्जेस काढून ८.२१ कोटी घ्यावयाचे आहेत. असे समितीने सूचित केले असता, १६५४ स्वतंत्र वसुलीची प्रकरणे आहेत. एकूण किती रक्कम आहे याचे लेखापरीक्षण करून वसुलीची कार्यवाही विभागाकडून करण्यात येणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाने वसुलीची कार्यवाही करण्यासाठी दिनांक २४.६.२०१६, २९.१०.२०१६, २३.३.२०१८ व ८.१२.२०१८ अन्वये सरचार्ज वसुलीबाबत " Detailed instructions regarding recovery of surcharge has been given to the field offices. " या संदर्भातील फलश्रुती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांना १.६४ कोटी रुपये वसूल करावयाचे आहेत असा त्यांचा पूर्वी दृष्टीकोन होता. परंतु, आता त्यांनी प्रत्यक्ष वसुलीचा खर्च वजा करून रक्कम काढलेली आहे. जी विशिष्ट प्रकरणे होती. त्यामध्ये त्यांनी वसुली केलेली आहे. आता विभागाकडे ९ रिजनकडून आकडेवारी आलेली आहे. आता ही रक्कम वसूल होईल. ही रक्कम ३-४ महिन्यात पूर्ण वसुली करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय सचिवानी सांगितले.

विभागीय सचिवांनी जे सांगितले ते शक्य नाही. कारण, मोठ्या प्रमाणावर थकबाकी आहे. सहकार विभागातील संस्था नफ्यात असो किंवा तोट्यात असो त्या संस्थेची रक्कम देण्याची भूमिका नसते. असे मत याबाबत सामितीने व्यक्त केले.

**परिच्छेद क्रमांक. ६.३.५ : संस्थांचे लेखापरिक्षा आणि त्यांचे अनुपालन**

हा परिच्छेद खूप महत्वाचा आहे. महाराष्ट्र सहकारी अधिनियमातील कलम ८१ अंतर्गत निबंधकाने प्रत्येक संस्थेच्या लेख्यांची वर्षातून किमान एकदा तरी लेखापरीक्षा करावयाची आहे. आता नवीन नियमानुसार संस्थेला सुद्धा लेखापरिक्षक नियुक्त करण्याची मूभा आहे. परंतु, १९६९०७ संस्थांपैकी आता पर्यंत ५० हजार संस्थांनी लेखापरीक्षण केले नाही. या नियमाच्या अगोदर १ लाख ४७ लेखापरिक्षक नेमून दिले होते त्यांचे ३७ टक्के लेखापरीक्षण झालेले आहे, ६३ टक्के लेखापरीक्षण झालेले नाही. संस्थांना लेखापरिक्षकाची निवड करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सर्व संस्थांचे लेखापरीक्षण वेळेवर झाले पाहिजे, दोष दुरुस्ती अहवाल वेळेवर प्राप्त झाला पाहिजे याबाबत सध्या कोणती परिस्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने आपण आता पॅनल तयार केलेले आहे. त्यातून लेखापरिक्षकाची नेमणूक करता येते. त्यांनी पॅनलमधून लेखापरिक्षकाची निवड करावयाची आहे. आता आपण नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात कोणकोणत्या संस्थांनी लेखापरिक्षकाची नेमणूक केलेली आहे याबाबत विभाग आढावा घेतो. ज्यांनी लेखापरिक्षकाची नेमणूक केली नाही अशा ठिकाणी रजिस्ट्रार यांच्याकडून लेखापरिक्षकाची नेमणूक केली जाते. सन २०१४-१५ मध्ये जवळपास ५० टक्के संस्था नॉन कम्प्लायन्स होत्या. सन २०१६-१७ मध्ये ३० टक्के सोसायट्या नॉन कम्प्लायन्स होत्या. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ज्या संस्थांनी लेखापरिक्षकाची नेमणूक केली नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली? काही संस्थांचे १२-१२ वर्षे ऑडिटच होत नाही. लेखापरिक्षकाची नियुक्ती करावयाची नाही हे गंभीर आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात कोणत्या संस्थांनी लेखापरिक्षकाची नेमणूक केलेली आहे याबाबत विभागाकडून आढावा घेण्यात येतो. ज्या सोसायट्यांनी लेखापरिक्षकाची नेमणूक केलेली नाही तेथे रजिस्ट्रारकडून लेखापरिक्षकाची नेमणूक केली जाते. त्यांना कायद्यानुसार लेखापरिक्षकाची नेमणूक करणे बंधनकारक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कायद्यानुसार लेखापरिक्षकाची नेमणूक करणे बंधनकारक असताना त्यांनी ती नेमणूक केली नाही तर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येते? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी लेखापरीक्षण केले नाही तर विभाग लेखापरीक्षण करून घेतो. त्यांना कलम १४६ अंतर्गत नोटीस देऊन त्यांच्या विरुद्ध कारवाइ करणे शक्य आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रशासकाची नेमणूक केली जाते काय? लेखापरिक्षकाची नेमणूक केली नाही तर कायद्यात कोणती तरतूद आहे? का त्याबाबत कायदा सायलेंट आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून त्यांना कलम १४६ अंतर्गत नोटीस देण्यात येते आणि ५ हजार रुपयांपर्यंत दंड करता येतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून या संदर्भात कारवाई होत नसल्यामुळे कोणतीही संस्था लेखापरीक्षण करून घेण्याबाबत काळजी घेत नाही. त्यांना विभागाची भीतीच वाटत नाही. संस्थेत जनतेचे पैसे गुंतलेले असतात. परंतु, ते १०-१२ वर्षे लेखापरीक्षण करून घेत नाहीत. मग जे नियमित डिफॉल्टर आहेत त्यांच्या विरुद्ध कारवाई केली नाही तर असेच सुरू राहील. असे मत व्यक्त करून जेथे लेखापरीक्षण विभागाकडून करण्यात येते त्याचा खर्च संस्थांकडून वसूल करण्यात येतो, की तो खर्च विभाग सोसतो अशी विचारणा समितीने केली असता, लेखापरीक्षणाचा खर्च विभाग वसूल करतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गृहनिर्माण संस्था विभागाच्या अंतर्गत आहेत का? जे लेखापरीक्षण प्रलंबित आहे, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण प्रलंबित आहे. त्यावर काही कारवाई का करीत नाही? जवळपास ३० हजार गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण झाले नाही. असे समितीने निदर्शनास आणले असता, सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये अभिलेख्यांची मोठी अडचण आहे. त्यामुळे बऱ्याचदा लेखापरीक्षण होत नाही.

स्थावर मालमत्ता असल्याने गृहनिर्माण संस्थांमध्ये सदस्यांकडून वसुली करणे खूप सोपे आहे. गृहनिर्माण संस्थांचे लेखापरीक्षण झाले पाहिजे, एवढाच समितीचा मुद्दा आहे. विभागाने उत्तरामध्ये सांगितले आहे की, ४२ हजार पैकी २८ हजार या सोसायट्या आहेत. त्याबाबत वेगळी भूमिका घेतली पाहिजे. कारण विभागाचे टक्केवारी ३० टक्क्यांपर्यंत आली आहे, त्या ३० टक्क्यांमध्ये यांचा मोठा सहभाग आहे. यांचेसुध्दा काही तरी मॅकॅनिझम डिव्हाईस केले तरच होईल. असे मत व्यक्त करून दोष दुरुस्ती अहवालाबाबततमाहिती देण्यास समितीने सूचित केले असता, दोष दुरुस्ती अहवालाचे मॉनिटरिंग आता स्ट्रिक्ट केले आहे. सन २०१६-२०१७ मध्ये लेखा परीक्षण पूर्ण करणाऱ्या संस्थांची संख्या ११४२०० इतकी होती. त्यातील ३५१५२ संस्थांकडून दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त झाला नाही. त्यापैकी १२०८८ संस्थांना दोष दुरुस्ती अहवाल न दिल्याबाबत नोटिस दिली. कलम ८७ नुसार ११०१ संस्थांवर कारवाई केली. कलम १४६ नुसार १३१७ संस्थावर कारवाई केली. तर ५१५ संस्था अवसायनात काढल्या आहेत. जेथे जेथे दोष दुरुस्ती अहवाल सादर होत नाही तेथे तेथे कारवाई केली आहे. अशी माहीती विभागीय सचिवांनी दिली.

लेखापरीक्षण केले व दोष दुरुस्ती अहवालावर कारवाई केली नाही तर लेखापरीक्षणाचा काही उपयोग नाही. त्यामुळे दोष दुरुस्ती अहवालाला सुध्दा तितकेच महत्त्व दिले पाहिजे. त्याबाबतचे नियंत्रण जिल्हा सहनिबंधक स्तरावर (डी.डी.आर. लेव्हलवर) असले पाहिजे. कारण महाराष्ट्र राज्यात सहकाराचे फार मोठे जाळे आहे. त्याला छेद देण्याचे काम या संस्थांचे पदाधिकारी करीत असतात. त्यावर नियंत्रण राहिले तर कुठे तरी या संस्थांवर व संस्था चालकांवर दबाव राहिल जेणेकरून अपव्यवहाराची शक्यता खूप कमी होईल, असे मत समितीने व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ६.३ "सहकारी संस्थांकडून प्राप्ती" यावरील लेखापरिक्षा**

**परिच्छेद क्रमांक ६.३.१ "लेखापरिक्षा शुल्काची वसुली न होणे"**

**अभिप्राय :**

**६.१** आयुक्त, सहकारी संस्था यांनी सादर केलेल्या माहितीनुसार दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी ३४९९७ संस्थांकडून रु.६९.६४ कोटी रक्कम वसुली योग्य होती. महालेखाकारांनी मागील पाच वर्षाचे वर्षनिहाय विश्लेषण केले असता यातील थकबाकीची रक्कम रु.५२.२३ कोटी पासुन रु.६९.६४ कोटी म्हणजे ३३ऽ वाढली होती. तर वसुलीचा वेग क्रमशः कमी झाला होता. संस्था तोट्यात चालत होत्या, अवसायनात निघाल्या होत्या किंवा बंद पडल्या होत्या. त्यामुळे रकमेची वसुली करता येऊ शकली नव्हती असा खुलासा विभागाने केला.

तथापि, पुण्यातील लेखापरीक्षणात केलेल्या १०६४८ नोंदणीकृत संस्थांपैकी फक्त ६३७ तसेच कोल्हापूरातील लेखापरीक्षीत केलेल्या ९५९३ नोंदणीकृत संस्थांपैकी फक्त १७७ संस्था अवसायनात निघाल्या होत्या किंवा बंद झाल्या होत्या अथवा नोंदणी केलेल्या पत्त्यावर सापडल्या नव्हत्या. अशाप्रकारे ज्या संस्थांनी आपले कामकाज बंद केले होते त्या संख्येने खूप कमी होत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शासकीय लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण केलेल्या संस्थांकडील लेखापरीक्षण शुल्क मागणी व वसुलीबाबतची आकडेवारी पाहता लेखापरीक्षण शुल्कापोटी दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी एकूण ३४९९७ संस्थांकडून रु.६९.७१ कोटी रक्कम येणे बाकी होती.

माहे एप्रिल,२०१६ ते सप्टेंबर,२०१८ या कालावधीत एकूण रु.२६.२८ कोटी रकमेची वसुली झाली. तसेच या कालावधीत एकूण रु.१२.०८ कोटी थकीत लेखापरीक्षण शुल्क वसुल झाले आहे. परंतु दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीच्या तुलनेत दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ अखेर थकीत असलेल्या लेखापरीक्षण शुल्क रकमेत घट झालेली असून लेखा परीक्षण शुल्क थकित असलेल्या संस्थांच्या संख्येत ही घट झाली आहे.

लेखापरीक्षण शुल्का पोटी येणे असलेल्या रु.६४.६५ कोटी रकमेपैकी नोंदणी रद्द झालेल्या १७६३ संस्था, बंद १४३५ संस्था, अवसायानातील २१०८ संस्था व आर्थिक अडचणीतील ३२३८ संस्था अशा एकूण ८४५४ संस्थाकडील येणे लेखापरीक्षण शुल्क रक्कम रु.४४.५८ कोटी असून एकूण येणे बाकीपैकी रु.३९.९१ कोटी लेखापरीक्षण शुल्क आर्थिक अडचणीतील संस्थांकडून येणेबाकी असून, त्यापैकी रु.३४.१२ कोटी रक्कम मुंबई विभागातील आहे. एकूण रु.६४.६५ कोटी लेखापरीक्षण शुल्क येणे बाकी पैकी रु.३९.३५ कोटी रकमेच्या वसुलीसाठी कलम १५५ अंतर्गत कारवाई प्रस्तावित आहे. तसेच ज्या संस्थांची नोंदणी रद्द झालेली आहे तसेच ज्यांचेकडून लेखापरीक्षण शुल्क वसूल होणे शक्य नाही, अशा एकुण रु.०.१४ कोटी रकमेच्या लेखापरीक्षण शुल्क माफीचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. उर्वरित लेखापरीक्षण शुल्क रकमेच्या वसुलीसाठी पाठपुरावा सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले.

**शिफारस :**

**६.२ सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणारे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (MCS अधिनियम) द्वारे सहकारी संस्थांना चालना, नोंदणी, विकास, पर्यवेक्षण, तपासणी आणि सहकारी संस्थांची वार्षिक लेखापरिक्षा केली जाते. सहकारी संस्थांच्या प्राप्ती या सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारीत सहकारी संस्थांचे आयुक्त/निबंधकाद्वारे प्रशासीत/संनियंत्रित केल्या जात होत्या. प्रत्येक संस्थेची वार्षिक लेखापरिक्षा करण्याची जबाबदारी विभागाची होती. संस्थांकडून निबंधकांना लेखापरिक्षा शुल्क देय होते. एखादी संस्था किंवा संस्थांनी तिचे किंवा त्यांचे लेखे निबंधकांनी तयार केलेल्या प्रमाणित लेखापरिक्षकांच्या सूचीमधील एका लेखापरिक्षकाद्वारे लेखापरीक्षण करण्यासाठी अधिसूचित करण्याचे अधिकार निबंधकांना देण्यात आले होते. विभाग, संस्थांना त्यांच्या कर्जाची वसुली करण्यासाठी दिलेल्या सहाय्यापोटी शुल्क म्हणजे अधिभार वसुल करत होता आणि शासनाकडून गुंतविलेल्या भाग भांडवलाची आणि शासनाला देय असलेल्या इतर रक्कमांच्या वसुलीवर देखरेख सुध्दा करण्याची विभागाची जबाबदारी होती व परंतु ती प्रभावीपणे पार न पाडल्यामुळे अनेक संस्थांची लेखापरीक्षण शुल्काची वसुली पुर्णतः होऊ शकली नाही. विभागाने आता यासंदर्भात महसुली वसुली (Revenue Recovery) ची कारवाई सुरू केलेली असून याच्या सद्यःस्थितीबाबत समितीने विचारणा केली असता, दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी प्रलंबित वसुली ६४.६५ कोटी इतकी असून ही वसुली जवळजवळ २०,३९७ संस्थांकडून येणे बाकी आहे. त्यापैकी ८,४५४ संस्थांपैकी काही संस्थांची नोंदणी रद्द झाली**

**असून काही संस्था बंद आहेत, काही आर्थिक अडचणीत असून काही अवसायानात गेलेल्या आहेत. या अनुषंगाने आतापर्यंत ३९.६५ कोटी रुपयांची महसुली वसुलीची कार्यवाही सुरू झाली असून १४ लक्ष रुपयांची माफीची (Waiver) कारवाई करण्यात आलेली आहे. उर्वरीत संस्थांमध्ये काही ना काही अडचणी असल्यामुळे ही वसुली करण्यास अडचणी निर्माण होत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.**

**रक्कम माफ (Waive) करणेबाबत मार्गदर्शक तत्त्वे किंवा आधार, निकष निश्चित केले आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता, यासंदर्भात विभागाकडून मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आलेली नसून जेथे वसुलीची कोणतीही शक्यता नाही तेथे रक्कम माफ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेने सादर करण्यात येतो असे समितीसमोर सांगण्यात आले. सदरहू आक्षेपांच्या अनुषंगाने सादर झालेल्या संस्थांची आकडेवारी व त्यांचेकडून वसुलपात्र असलेली रक्कम पाहता याची व्याप्ती फारच मोठी आहे. यातील सर्व संस्थांचा एकाच सामायिक पातळीवर विचार करणे योग्य ठरणारे नाही. या सर्व संस्थांच्या निरनिराळ्या कॅटेगरीनुसार त्याची विभागणी केल्यास ही वसुली अधिक प्रभावीपणे होण्याची शक्यता आहे. अतः या संपुर्ण वसूल पात्र रकमेची व संस्थांच्या आकडेवारीची एकत्रित गणना न करता त्याची प्रकरण निहाय विभागणी केल्यास विभागाचे काम अधिक सोपे होऊ शकते. तसेच या करीता सुस्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे सूनिश्चित केली तर हा आकडा अधिकच कमी होऊ शकतो व विभागाला तातडीने निर्णय घेऊन विभागाला जास्तीत जास्त रक्कम वसुली करणे शक्य होऊ शकेल असे समितीचे स्पष्ट मत आहे. इतकेच नव्हे तर शासनाने आता शेतकऱ्यांची कोट्यावधी रुपयांची कर्जमाफी केली असून त्या माध्यमातून या संस्थांकडे जास्तीत जास्त निधी जमा झालेला आहे. अशा संस्थांकडून अधिकाधिक पाठपुरावा करून विभागाने जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई तात्काळ करावी व उपरोक्त वसूल पात्र रक्कम तातडीने वसूल करावी व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ६.३.२ "शासकीय भाग भांडवलाची वसुली न होणे"**

**अभिप्राय :**

**६.३** महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या शासन निर्णयांध्ये नमूद केलेल्या शर्ती आणि अटींनुसार प्रत्येक संस्थेने शासनाच्या भाग भांडवलाच्या विमोचनासाठी एक भाग भांडवल परतावा निधी निर्माण/तयार करावयाचा असतो. संस्थेने प्रत्येक वर्षी भाग भांडवलाच्या रक्कमेपैकी १/१५ रक्कम निधीत जमा करावयाची होती. परंतु संस्थांनी भाग भांडवल परतावा निधी निर्माण केला नव्हता किंवा विभागानेही असा निधी तयार करण्याच्या अटीची सक्तीने अंमलबजावणी केली नव्हती. अशाप्रकारे भाग भांडवलाची वसुली सुनिश्चित केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

ज्या सहकारी संस्थांमध्ये शासनाने भाग भांडवल म्हणून रक्कम गुंतवली आहे, त्या सहकारी संस्थांनी दरवर्षी १/१५ रक्कमही त्यांच्या नफ्यातून भाग भांडवल परतफेड निधी म्हणून वेगळी काढून ठेवणे आवश्यक आहे. तथापि, भाग भांडवल दिलेलया संस्था तोट्यात अथवा नाममात्र नफ्यात असल्याने भाग भांडवल परतावा निधी काढता आला नाही. सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांना याची अंमलबजावणी करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच भाग भांडवल वसुलीच्या मागणीप्रमाणे संस्थांकडून भाग भांडवल भरणा करून घेण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**६.४ शासकीय भाग भांडवलाची वसुली न होणे यासंदर्भात सदरहू आक्षेप नोंदविलेले असून नियमातील तरतूदीनुसार प्रत्येक संस्थेला भाग भांडवल परतावा निधी निर्माण करावा लागतो व प्रत्येक वर्षी एकूण नफ्याच्या १/१५ रक्कम भाग भांडवलासाठी निधीमध्ये टाकावी लागते. सन १९८२ पासून आतापर्यंत १,५३८ सोसायट्यांना एकूण ४८ कोटी रुपयांचे भाग भांडवल दिलेले आहे. त्यापैकी २० कोटी २ लक्ष रुपयाची विभागाची मागणी आहे. पैकी फक्त १.२२ कोटी रुपये वसूल झालेले असून १८.८० कोटी इतकी वसुलीची रक्कम प्रलंबित आहे. काही संस्थांना नाममात्र नफा झाल्यामुळे भाग भांडवल परतावा निधीमध्ये ही रक्कम टाकता आलेली नाही. विभागाने ही संपुर्ण रक्कम वसूल होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना कालबद्ध पद्धतीने तातडीने करावी. या संपुर्ण भाग भांडवलाची रक्कम वसूल करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ६.३.३ "नफ्यातील सहकारी संस्थांकडून लाभांश प्राप्त होण्याची सुनिश्चिती न करणे"**

**अभिप्राय :**

**६.५** महाराष्ट्र शासनास भाग भांडवल देण्यासाठी अधिकृत करणाऱ्या शासन निर्णयांतील अटी व शर्तीनुसार, नफ्यात असलेली प्रत्येक सहकारी संस्था जोपर्यंत शासनाच्या भाग भांडवलांची पूर्णपणे परतफेड करत नाही तोपर्यंत भाग भांडवलाच्या चार टक्क्यांपर्यंत लाभांश देऊ शकत होती. सन २०१४-१५ मध्ये १,००४ संस्थांना नफा झाला होता. या संस्थामध्ये शासनाने रु.७.१४ कोटी भाग भांडवल गुंतवले होते. जर या संस्थांनी लाभांश घोषित केला असता तर शासनाला रु.२८.५६ लाखाचा महसूल प्राप्त झाला असता. आंध्र प्रदेश सहकारी संस्था अधिनियम, १९६४ मध्ये ज्याप्रमाणे लाभांश घोषित करणे हे बंधनकारक आहे तशी तरतूद MCS अधिनियमात नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्यामध्ये सहकार आयुक्त योजनांतर्गत दिनांक १.४.२०१८ अखेर १५३८ संस्थांना रु.२००२.०३ लक्ष शासकीय भाग भांडवल प्राप्त आहे. प्राप्त भाग भांडवलापैकी रु.१२२.३३ लाख भाग भांडवल वसूल झालेले असून आजमितीस रु.१८७९.७० लाख भाग भांडवल थकीत आहे. उपरोक्तप्रमाणे प्राप्त भाग भांडवल संस्थांपैकी सन २०१६-१७ मध्ये १२५ संस्था नफ्यात असून त्यांच्या नफ्याची रक्कम रु.५३६.४६ लाख आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुका बलुतेदार सहकारी संस्थेने सन २०१५-१६ वर्षी रु.०.१९ लाख लाभांश घोषित केला असून सदर रकमेचा भरणा केलेला आहे. श्रीराम ग्राहक सहकारी संस्था, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या संस्थेने लाभांश घोषित केला असून रु.०.०६ लाख भरणा केलेला आहे. तथापि १२३ संस्थांना रु.५३६.२० लाख नफा झालेला असून तो नाममात्र असल्याने लाभांश जाहीर केलेला नाही असे विभागाने समितीसमोर विदित केले.

**शिफारस :**

**६.६ नफ्यातील सहकारी संस्थांकडून लाभांश प्राप्त होण्याची सुनिश्चिती न करणे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. यामध्ये १२३ संस्थांना रु.५३६.२० लक्ष रुपयांचा नफा झाला परंतु तो नाममात्र असल्याने लाभांश जाहीर करण्यात आला नाही. एकीकडे भाग भांडवलाची रक्कम न भरणे दुसरीकडे लाभांशाची देखील सुनिश्चिती न करणे म्हणजेच १००% नफा त्या संस्थेचा होतो. सद्यःस्थितीत नफा व लाभांश जाहीर करणे हे संस्थेच्या इच्छेवर अवलंबून असल्यामुळे बऱ्याचदा तो घोषित करण्यात येत नाही. आंध्र प्रदेशमध्ये आंध्र प्रदेश सहकारी संस्था अधिनियम, १९६४ च्या कलम ३६(५)(ड) अंतर्गत लाभांश घोषित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर जोपर्यंत महाराष्ट्रात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात लाभांश घोषित करणे बंधनकारक करत नाही. तोपर्यंत ही बाब संस्थेच्या इच्छेवर अवलंबून असते व अशा परिस्थितीत संस्थेद्वारे नफाच लपवून ठेवणे हा सोयीस्कर मार्ग अवलंबिण्यात येतो. परिणामी भाग भांडवलाची रक्कम देखील संस्थेकडून प्राप्त होत नाही व त्याआधारे शासनास प्राप्त होणारा लाभांश देखील शासनाकडे जमा होत नाही. त्यामुळे यात शासनाच्या महसूलाचे दुहेरी नुकसान होते. अशा परिस्थितीत यावर तोडगा काढण्यासाठी आंध्र प्रदेशाच्या धर्तीवर महाराष्ट्रात सहकारी संस्थांचा लाभ व त्यावरील लाभांश हे दोन्ही दर्शविणे बंधनकारक करण्यात यावे. त्याअनुषंगाने आवश्यक ती तरतूद अधिनियमात करण्यात यावी व सदरहू परिच्छेदान्वये वसुलपात्र असलेली लाभांशाची रक्कम तातडीने वसुल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ६.३.४ "शासकीय खात्यात अधिभाराचा भरणा न करणे"**

**अभिप्राय :**

**६.७** MCS नियमांच्या नियम १०७ (इ) मधील तरतुदीनुसार, संस्थांना दिलेल्या कर्जाच्या वसुलीच्या खर्चापोटी एकूण वसूल झालेल्या रक्कमेच्या १.७५ टक्के दराने संस्थेने शासकीय खात्यात "अधिभार" म्हणून भरणा करावयाचा होता. लेखापरीक्षणात सादर केलेल्या माहितीनुसार, वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ दरम्यान पुणे (शहर), पुणे (ग्रामीण), सोलापूर आणि नाशिक विभागातील सात संस्थांकडून विभागाने रु. १.७९ कोटी अधिभार संकलित केला होता. या रक्कमेपैकी विभागाने रु. १.६४ कोटी कोषागारात भरले नव्हते आणि ते वसुलीचा खर्च म्हणून दाखविले होते. खर्चाच्या पुष्टीसाठी म्हणून लेखापरीक्षेला कुठलेही दस्तावेज सादर केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस :

६.८ समितीने यासंदर्भात विभागाकडून विस्तृत माहिती घेतली असता बऱ्याच ठिकाणी आता अधिभाराची रक्कम कोषागारात जमा केल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. त्याचा संपुर्ण आढावा घेतला असता परिच्छेदामध्ये नमुद रु. १,६४,७९,७३७/- अधिभारापैकी रु. १६,११,२८५/- शासकीय कोषागारात भरणा केला असून उर्वरित रु.१,४८,६८,४५२/- इतकी रक्कम सहकारी संस्थाच्या वसुली खर्चासाठी वापरलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तसेच राज्यातील ९ विभागांकडून अधिभार वसुली, अधिभाराच्या वसुलीवर झालेला खर्च आणि कोषागारात भरणा केलेल्या अधिभाराच्या माहितीचे एकत्रित संकलन करण्यात आले असून अधिभार वसुलीबाबत सविस्तर सूचना दिलेल्या असून त्याच्या वसुलीचा आढावा नियमितपणे घेण्यात येत आहे. सदर वसुली अधिकाऱ्याने वसुल केलेल्या अधिभाराचा भरणा वसुल केलेल्या महिन्यात शासकीय कोषागारात भरणा करणेबाबत सुचना दिलेल्या असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ (e) मध्ये अधिभार वसुलीची तरतूद असून संस्थेची जी एकूण वसुली होते त्यापैकी १.७५% ते ६% पर्यंत रक्कम अधिभार म्हणून शासनाकडे जमा केली जाते. आता दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी च्या आदेशान्वये ०.५ ते १.५% इतकी रक्कम देय ठरते. परंतु जुनी वसुली मात्र जुन्या दरानेच करणे आवश्यक असल्याचेही समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. विभागाने उपरोक्तपणे नमूद केलेल्या वसुलीच्या सद्य:स्थितीबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदवत १.७५% अधिभार वसूल करणे व तो राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करणे बंधनकारक आहे व वसुलीचा जो काही खर्च आहे तो विभागाच्या नियमित अंदाजपत्रकातुन तरतूद करून खर्च करणे अपेक्षित आहे असे मत नोंदविले. परंतु असे न करता संस्थांनी आपापली वसुलीच्या खर्चाची रक्कम कापून घेतली व उर्वरीत रक्कम जमा केली. यासंदर्भात विभागाने समितीचे लक्ष सन १९८३ च्या शासन निर्णयाकडे वेधले, ज्यामध्ये दिनांक ९.२.१९८३ च्या निर्णयाअन्वये बँकेच्या अधिकाऱ्याने वसुल केलेला सरचार्ज शासनाचे तिजोरीत भरण्याची गरज नाही. संबधित बॅकेने तो वसुली यंत्रणेवरील खर्चापोटी स्वतःकडे ठेवावा. मात्र सहकार खात्याकडील अधिकाऱ्यांनी वसुल केलेला सरचार्ज शासनाचे तिजोरीत भरावा असे स्पष्टपणे नमूद केले आहे. विभागाचे अधिकारी जर या वसुलीसाठी गेले तर वसुलीच्या खर्चाची प्रतिपूर्ती अधिकाऱ्यांना नियमित अंदाजपत्रकीय तरतुदीमधुन होईल व त्यामुळे तो अधिभाराच्या वसुलीमधून वळता केला जाणार नाही परंतु जर बँका किंवा सहकारी संस्थांनी ही वसुली केली व त्यासाठी जो काही खर्च येईल तो ते वजा करु शकतात असे या १९८३ च्या शासननिर्णयात नमूद आहे. या शासननिर्णयाची प्रत त्यावेळी महालेखाकारांकडे उपलब्ध करून देण्यात आली नव्हती त्यामुळे हे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत असेही समितीसमोर सांगण्यात आले.

महालेखाकारांच्या मते विभागाला १,६५४ प्रकरणांमध्ये एकूण रु.२९.०२ कोटी वसूल करावयाचे होते. त्यातून वसुली खर्च काढून रु.८.२१ कोटी घ्यावयाचे होते. याबाबत समितीने विचारणा केली असता, १,६५४ ही स्वतंत्र वसुलीची प्रकरणे असून त्यातून किती रक्कम येणे आवश्यक आहे, याचे लेखापरीक्षण करून वसुलीची कार्यवाही विभागाकडून करण्यात येणार असल्याचे समितीस सांगण्यात आले. याअगोदर रु. १.६४ कोटी वसूल करावयाचे होते, परंतु आता प्रत्यक्ष वसुलीचा खर्च वजा करून वसूलपात्र रकमेची निश्चिती करण्यात आलेली आहे. काही प्रकरणातून वसुलीही झालेली आहे व उर्वरीत वसुली ३-४ महिन्यात करण्याचे प्रयत्न विभागाकडून सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींकडून समितीस सांगण्यात आले. सहकार विभागातील संस्था नफ्यात असो किंवा तोट्यात असो त्यांना शासनाकडे रक्कम जमा करण्याची कधीही भूमिका नसते. विभागाने वसुली प्रकरणी सक्त भुमिका न घेतल्यास ही वसुली कधीही होणे शक्य नाही. नियमानुसार वा शासन निर्णयानुसार जी काही वसुली खर्चाची कपात संस्थांना अनुज्ञेय ठरते त्याबाबत समितीचे काहीही म्हणणे नाही. परंतु उर्वरीत रक्कमेचा भरणा संस्थांनी न चुकता व नियमितरित्या शासन कोषागारात स्वतःहून भरणे आवश्यक व अभिप्रेत आहे. परंतु शासन व संस्था दोन्ही या प्रकरणी गंभीर नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः विभागाने अधिभारा संदर्भात संपुर्ण राज्यासाठी माहिती संकलित करावी आणि झालेल्या खर्चाची व वसुलपात्र रक्कमेच्या अचुकतेची खात्री करावी. तसेच महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांमधील प्रकरणांमधून निश्चित वसूलपात्र रकमेची गणना करून ती तात्काळ संबंधित संस्थांकडून वसूल करण्यात यावी व ती कालबद्ध पद्धतीने वसूल न झाल्यास संस्थांवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**परिच्छेद क्रमांक ६.३.५ "संस्थांची लेखापरीक्षा आणि त्यांचे अनुपालन"**

**अभिप्राय :**

**६.९** MCS अधिनियमातील कलम ८१ अंतर्गत निबंधकाने प्रत्येक संस्थेच्या लेख्यांची वर्षातुन किमान एकदा तरी लेखापरीक्षा करावी किंवा करवुन घ्यावी. आयुक्त, सहकारी संस्था यांनी लेखापरीक्षेला सादर केलेल्या माहितीनुसार, सर्व विभागातील एकुण १,९६,९०७ संस्थांपैकी फक्त १,४७,६८९ संस्था लेखापरीक्षेसाठी नेमून दिल्या होत्या. ज्यापैकी १३,०९१ संस्थांची विभागीय लेखापरीक्षकांकडून आणि ६२,१८६ संस्थांची इतर लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षा प्रलंबित होती. अशाप्रकारे नेमून दिलेल्या संस्थांच्या लेखापरीक्षा करण्यातील प्रलंबितता ५१% होती आणि एकुण संस्थांच्या लेखापरीक्षेतील प्रलंबितता ६३% होती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८२ नुसार, लेखापरीक्षकाद्वारे लेखापरीक्षा अहवालाच्या प्रपत्र "O" मध्ये लक्षात आणुन दिलेल्या दोष किंवा अनियमितता, प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत प्रत्येक संस्थेने दोष दुरुस्ती करण्यासाठी, अनियमिततांवर तोडगा काढण्यासाठी पावले उचलावीत आणि त्याबाबतीत केलेल्या कारवाईचा अहवाल निबंधकाला सादर करावा. संस्थांकडून सादर झालेल्या या अहवालांना विभागाकडून "दुरुस्ती अहवाल" असे संबोधण्यात येते. परंतु दिनांक ३१ मार्च, २०१६ ला ७५६२८ संस्थांपैकी ५४५५४ संस्थांनी (७२ टक्के) दुरूस्ती अहवाल सादर केले नव्हते. त्यामुळे संबंधित संस्थांनी केलेल्या सुधारणात्मक कारवाईबाबत विभागाला खात्री करता येऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सहकार अधिनियमातील सुधारित तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून, सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करून घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर सोपविण्यात आलेली असून या संस्थांना राज्यस्तरीय नामतालिकेतुन लेखापरीक्षक नियुक्तीची स्वायतत्ता प्रदान केलेली आहे. सदर सुधारित तरतुदीनुसार अधिनियमातील ७५ (२अ) अन्वये संबंधित संस्था राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालिकेतुन, संस्था अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार लेखापरीक्षकाची नियुक्ती करतात. तथापि, ज्या संस्था अशी नियुक्ती करीत नाहीत, त्या संस्थांचे बाबतीत कलम ८१ (१)(अ) खालील परंतुकान्वये संबंधित निबंधकाकडून त्या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्तीचे आदेश परंतुकान्वये पारीत केले जातात.

सहकार आयुक्त कार्यालयाने प्रत्येक वर्षी लेखापरीक्षणास पात्र असलेल्या सर्व संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षक नियुक्तीबाबत वेळोवेळी पाठपुरावा करून कार्यवाही केली असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणास पात्र असलेल्या संस्थांपैकी केवळ ८ संस्था वगळता उर्वरित सर्व संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती केलेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

त्याचप्रमाणे सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणासाठी नियुक्ती करताना मागील थकीत कालावधीसह अद्ययावतपणे लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्ती केली जाते. लेखापरीक्षण प्रलंबित असणाऱ्या संस्थांचा आढावा घेतला असता, संस्थांचे दप्तर अपुर्ण असल्याने, लेखापरीक्षणासाठी संस्थांकडून लेखापरीक्षकांना दप्तर उपलब्ध करून न दिल्याने, लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण न केल्याने तसेच इतर कारणांमुळे लेखापरीक्षण प्रलंबित राहिलेले आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण प्रलंबित असलेल्या संस्थांची संख्या ४२०९८ एवढी असून त्यामध्ये प्रामुख्याने २८८८७ गृहनिर्माण संस्थांचा समावेश असून या संस्था त्यांचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवत नाहीत, तसेच लेखापरीक्षणात रेकॉर्ड उपलब्ध करून देत नाहीत, त्यामुळे सदर संस्थांचे लेखापरीक्षण थकीत राहण्याचे प्रमाण इतर संस्थांच्या तुलनेत जास्त आहे. लेखापरीक्षण न होण्यास ज्या ठिकाणी संस्था कारणीभूत आहेत अशा संस्थांचे विरुद्ध अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरू असून त्यानुसार या ४२०९८ संस्थांपैकी २१४५८ संस्थांचे अवसायनाचे अंतरिम आदेश पारीत केलेले असुन त्यापैकी १७१० संस्थांचे अवसायानाचे आदेश अंतिम करण्यात आलेले आहे. तसेच लेखापरीक्षण न होण्यास ज्या ठिकाणी लेखापरीक्षक कारणीभूत आहेत अशा लेखापरीक्षकांची नावे लेखापरीक्षक नामतालीकेवरून कमी करण्याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरू असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम ८२ नुसार, लेखापरीक्षकाद्वारे लेखापरीक्षा अहवाल सादर केल्यानंतर त्यामधील दोषांची पुर्तता करून त्याबाबतचा दोष दुरूस्ती अहवाल "ओ" नमुन्यात लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन तीन महिन्याचे आत संस्थेने निबंधकाला सादर करणे बंधनकारक आहे. सन २०१४-१५ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण झालेल्या संस्थांचे दोष दुरुस्ती अहवालांची माहिती सादर केली आहे.

सन २०१४-१५ या लेखापरीक्षण वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांचे प्रमाण ५०.२४ टक्के एवढे होते. मुख्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या बैठकामध्ये सर्व संस्थांचे दोष दुरूस्ती अहवाल प्राप्त करून घेणेबाबत सातत्याने सूचना देण्यात येत असतात. त्यासंदर्भात दि.२२/८/२०१५ व दि.११/८/२०१७ रोजी परिपत्रकीय सुचना देण्यात आलेल्या असून वेळोवेळी

त्याअनुषंगाने पाठपुरावा करण्यात आलेला आहे. त्यानुसार लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरूस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांच्या प्रमाणात घट झाली असून, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल सादर न करणाऱ्या संस्थांचे प्रमाण अनुक्रमे १५.६७ टक्के व ३०.७८ टक्के आहे. सर्व संस्थांकडून दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त करून घेणे तसेच त्यासंदर्भाने पुढील उचित कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा सुरू असल्याचेही समितीस सांगण्यात आले.

**शिफारस :**

**६.१० संस्थांचे लेखापरीक्षण व त्यांचे अनुपालन करून दोष दुरुस्ती अहवाल नियमितरित्या सादर न होणे संदर्भात हे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहे. संस्थांच्या कामकाजांच्या अनुषंगाने हे आक्षेप अत्यंत महत्वपूर्ण असून राज्यातील सर्व संस्थांचे नियमित लेखापरीक्षण करणे बंधनकारक असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८१ अंतर्गत निबंधकाने प्रत्येक संस्थांच्या लेख्यांची वर्षातुन किमान एकदा तरी लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे. आता नवीन नियमानुसार विभागाने लेखापरीक्षकांचे पॅनल तयार केलेले असून त्यातून संस्थेने लेखापरीक्षकाची नेमणूक करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. राज्यातील एकूण १,९६,९०७ संस्थांपैकी आतापर्यंत ५०,००० संस्थांनी लेखापरीक्षणच केलेले नाही. संस्थांनी लेखापरीक्षकाची निवड केली किंवा कसे याबाबत नियमित आढावा घेऊन जेथे अशी नियुक्ती झालेली नाही तेथे विभागाकडून नियुक्ती करून घेणे व कोणत्याही परिस्थितीत संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. परंतु समितीने यासंदर्भातील आकडेवारीची तपासणी केली असता जवळजवळ ५० टक्के संस्थांमध्ये याची पुर्तता झालेली नव्हती. कित्येक संस्थांचे बारा-बारा वर्षे ऑडीटच झालेले नाही. या बाबी संस्थांतर्गत गैरव्यवहारास पोषक ठरणाऱ्या असून अशामुळे कारवाईचे कोणतेही भय पदाधिकाऱ्यांच्या मनात राहणार नाही. नियमित लेखापरीक्षण झाल्यास निश्चितच या सर्व बाबींवर नियंत्रण येऊ शकते. ज्या संस्थांनी वर्षानुवर्षे लेखापरीक्षकांची नियुक्तीच केलेली नाही अशा संस्थांवर विभागाने नियमांच्या तरतुदीअंतर्गत कारवाई देखील केलेली नाही. परिणामी संस्थांकडून हे विषय गांभीर्याने हाताळले जात नाही ज्याचे गंभीर परिणाम राज्यात अनेक सहकारी संस्था नष्ट होण्यामध्ये झाल्याचे वेळोवेळी दिसून येते. महाराष्ट्रात सहकाराचे फार मोठे जाळे पसरलेले असून त्याला छेद देण्याचे काम काही संस्था व त्यांचे पदाधिकारी करतात. ज्याला कारणीभूत शासनाचे अपुरे नियंत्रण देखील आहे. विभागाने या संस्थांवर कायद्याच्या तरतुदी अंतर्गत प्रभावी नियंत्रण ठेवले तर अशा बाबी घडण्यापासून नक्कीच थांबविता येतील, परंतु विभागाकडून अपेक्षित कारवाई प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे अनेक संस्थांमध्ये गैरव्यवहार झालेला आहे. संस्थांचे नियमित लेखापरीक्षण केल्यानंतर त्यात नोंदविण्यात आलेल्या त्रुटी वा दोषांचे निराकरण करून दोष दुरुस्ती अहवालावर जोपर्यंत विभाग कारवाई करत नाही तोपर्यंत लेखापरीक्षणाला व त्यात नोंदविलेल्या गंभीर आक्षेपांना कोणताही अर्थ शिल्लक राहत नाही. त्यामुळे लेखापरीक्षण करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच दोष दुरुस्ती करून त्या संदर्भातील अहवाल देणे देखील आवश्यक आहे. राज्यात कित्येक सहकारी संस्था तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये अद्यापही लेखापरीक्षण पूर्ण झाले नाही. तसेच त्यांच्यावर कोणतीही कारवाई देखील विभागाने केलेली नाही ही देखील गंभीर बाब आहे. यासाठी विभागाने प्रभावी यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. समितीने यासंदर्भात आकडेवारीची विचारणा केली असता, सन २०१६-२०१७ मध्ये लेखापरीक्षण पुर्ण करणाऱ्या संस्थांची संख्या जवळजवळ १,१४,२०० इतकी असल्याचे निदर्शनास आले. त्यातील ३५,१५२ संस्थांकडून दोष दुरुस्ती अहवाल प्राप्त झाला नाही. त्यापैकी १२,०८८ संस्थांना दोष दुरुस्ती अहवाल न दिल्याबद्दल नोटीस देण्यात आली असून कलम ८७ नुसार ११०१ संस्थांवर कारवाई केली व कलम १४६ नुसार १,३१७ संस्थांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ५१५ संस्था अवसायनात काढण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. विभागाने समिती समोर सादर केलेली आकडेवारी पाहता विभागाने हा विषय अधिक गांभिर्याने हाताळणे अत्यावश्यक आहे. यासाठी धडक मोहीम आखून कालबद्ध पद्धतीने राज्यातील सर्व संस्थांचे लेखापरीक्षण तातडीने पूर्ण करण्यात यावे. त्या लेखापरीक्षणाच्या अहवालावर कृती तथा पुर्तता अहवाल अथवा दोष दुरूस्ती अहवाल देखील सादर केल्यासंदर्भात विभागाकडून खात्री व पाठपुरावा करण्यात यावा. ज्या संस्थांनी याची पुर्तता केली नाही त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विभागाने अशा संस्थांचा नियमितरित्या त्रैमासिक आढावा घेऊन नियमांच्या अंमलबजावणीची पुर्तता करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# महसूल व वन (महसूल) विभाग

## भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षातील महसूली जमा अहवालातील लेखा परिच्छेद क्र.६.४ बाबत

### स्पष्टीकरणात्मक ज्ञापन

५.७ —

| अ.क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | विषय | स्पष्टीकरण | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाच्या अभिप्रायावर विभागाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ६.४ | केबल चालकांकडून करमणूक शुल्काची वसुली न होणे - (१५८ केबल चालकांनी रू.७०.३३ लाख करमणूक शुल्काचा भरणा केला नव्हता)<br><br>मुंबई करमणूक शुल्क अधिनियम,१९२३(BED अधिनियम) च्या कलम ३(४) अन्वये केबलचालकांनी अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्काचा भरणा करावयाचा होता.केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्काच्यां (DTH ब्रॉड कास्टींग सेवावरील करमणूक शुल्काच्या आकारणीसहित) संकलनाच्या नियम १४ अंतर्गत सार्वजनिक लिलाव नियम,२००३ द्वारे जिल्हाधिकारी यांनी केबल चालकांचे निर्धारण करून करमणूक शुल्काची वसुली करणे आवश्यक असते.या केबल चालकांनी करमणूक शुल्काच्या प्रदानासह प्रपत्र E मध्ये मासिक विवरणे जिल्हाधिका-याकडे सादर करणे आवश्यक असते.BED | सदर लेखापरिच्छेद जिल्हाधिकारी,रत्नागिरी व जिल्हाधिकारी,सोलापूर यांच्याशी संबंधित असून सदर लेखा परिच्छेदाचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे:-<br>(१) **जिल्हाधिकारी,रत्नागिरी-**<br>रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १३ केबल चालकांकडे रू.२,७९,६००/- इतकी रक्कम वसुलीवर प्रलंबित असल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. १३ केबल चालकांपैकी १२ केबलचालकांकडून रू.२,३६,६४०/- इतक्या करमणूक शुल्काची रक्कम व रू.३२९१८/- इतकी व्याजाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.तसेच केबल चालक श्री.विजय रामधर यादव हे त्यांचा केबल व्यवसाय आलेल्या रत्नागिरी तालुक्यातील मि-या या गावी राहत नसल्याने व त्याचा पत्ता उपलब्ध होत नसल्याने त्यांच्याकडील करमणूक शुल्काची रक्कम रू.४२९६०/- व त्यावरील व्याजाची रक्कम रू.५१५५२/- अशी एकूण रू.९४५१२/- इतकी रक्कम वसूल करता आलेली नाही.सदर व्यक्ती गावी | Out of the objected amount of Rs.७०.३३ lakh, the Department has stated that an amount of Rs.३.११ lakh did not constitute dues.Of the balance ,Rs.६७.२२ lakh,the Department has recovered Rs.५८.३६ lakh i.e. ८७%. Of the remaining amount,notices under MLRC for recovery of Rs.०.६९ lakh have been issued.<br>The Department may submit the details regarding action taken in respect of balance recovery of Rs.८.१७ lakh to PAC.<br>The fact remains that laxity in collection of Entertainments Duty | सदर परिच्छेदातील आक्षेपित रकमेपैकी ८७% वसुली पुर्ण करण्यात आलेली असून उर्वरित रू.८.१७ लाख रकमेची वसुली जिल्हाधिकारी,सोलापूर यांच्या स्तरावरून करण्यात येत आहे. तसेच यापुढे असेही नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.एमजीएसटी-१०१७/प्र.क्र.१०३(१०), दि.२९.६.२०१७ मधील नोंद क्र.३४ अन्वये व केंद्र शासनाने शासन अधिसूचना क्र.११/२०१७ केंद्रीय कर(दर), दि.२८.६.२०१७ मधील नोंद क्र. ३४ नुसार लेखाशीर्ष ९९९६ (मनोरंजन, संस्कृती आणि खेळ विषयक सेवा) वर "वस्तू व सेवा कर" बसविला आहे. त्यास अनुसरून या विभागाचा आदेश क्र.इएनटी-२०१७/प्र.क्र.१११/टी-१, दि.१.७.२०१७ अन्वये महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ नुसार बसविण्यात येणा-या करमणूक शुल्क भरण्यापासून सूट |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अधिनियमाच्या कलम ४(ब)(४) नुसार जर विवरणे विहित वेळेत सादर केली नाहीत तर राज्य शासनाने केबल चालकांना पर्याप्त वेळ देऊन विवेक बुद्धीने निर्णय घेऊन केबल चालकांकडून देय करमणूक शुल्काची रक्कम निर्धारित करावी आणि करमणूक शुल्क व देय असल्यास शास्ती भरण्याचे निर्देश द्यावे.कलम ४ ब च्या तरतुदींचे अनुपालन न केल्यास कलम ५अ अंतर्गत सहा महिन्यांच्या कालावधीइतकी कैद अथवा रू.५००० पर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. शुल्काचे प्रदान न केल्यास BED अधिनियमाच्या कलम ९ ब नुसार,पहिल्या ३० दिवसांसाठी प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने व्याज देखील आकारणीय असते.<br><br>मे २०१४ ते जलै २०१५ दरम्यान केलेल्या सात कार्यालयांच्या दस्ताऐवजांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की,ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१५ मधील विविध कालावधीत १५८ केबल चालकांनी रू.७०.३३ लाख करमणूक शुल्कासह विवरणे सादर केली नव्हती.संबंधित जिल्हाधिका-यांनी | राहत नसलेबाबत मंडळ अधिकारी,रत्नागिरी यांनी दि.९.१२.२०१६ रोजी पंचनामा केलेला आहे.तसेच सदर व्यक्ती श्री.विजय यादव याचा ठावठिकाणा मिळून येत नसलेबाबत पोलिस निरीक्षक,रत्नागिरी शहर पोलिस ठाणे यांनी तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,रत्नागिरी यांना दि.१९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. सबब,सदंर लेखापरिच्छेदाच्या अनुषंगाने करमणूक शुल्काची व त्यावरील व्याजाची रक्कम वसूल करण्यात आलेली असून केवळ एका प्रकरणात वसुली करणे शक्य नाही.सबब,जिल्हाधिकारी,रत्नागिरी कार्यालयाशी संबंधित आक्षेपाची पूर्णपणे पूर्तता करण्यात आलेली आहे. (चलनाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.तथापि,डी.जी.केबल नेटवर्क व साईस्टार केबल यांच्या चलनाच्या प्रती उपलब्ध होत नसलेने लेजर बुक ची व कोषागार कार्यालयात रकमा जमा केलेल्या नोंदीची प्रत सोबत जोडलेली आहे).<br><br>(२) <u>जिल्हाधिकारी,सोलापूर</u>:-<br>सदर लेखापरिच्छेदामध्ये सन २०१३-१४ या वर्षातील केबल चालकांच्या वसुलीबाबतच्या | led to delay in collection of revenue by the Government. | देण्यात आलेली आहे. तसेच दि.१.७.२०१७ पासून करमणूक केंद्रांकडून करमणूक शुल्काऐवजी "वस्तू व सेवा कर" वसूल करण्यात येत आहे. त्यामुळे दि.१.७.२०१७ पासून करमणूक केंद्रांच्या सनियंत्रणासंदर्भातील कार्यवाही या विभागाकडून करण्यात येत नाही.<br>सबब, उपरोक्त वस्तुस्थिती व उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही विचारात घेऊन सदर लेखा परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मागणी न केल्यामुळे एवढ्या रक्कमेच्या ED ची वसुली झाली नव्हती.तसेच विहित दराने व्याजही आकारणीय होते.<br><br>आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने अभिक्षणे मान्य केली आणि जून २०१४ ते मार्च २०१६ दरम्यान,५१ केबल चालकांकडून रू.२८.६३ लाखांची वसुली केल्याचे कळविले.उर्वरित वसुलीबाबतचा अहवाल प्राप्त झाला नाही.<br><br>आम्ही हे प्रकरण जून २०१६ मध्ये शासनाच्या नजरेस आणून दिले;त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (फेब्रुवारी २०१७). | नोंदवहीची छाननी केली असता रू.१४,२३,८००/- इतक्या रकमेची वसुली न केल्याबाबत तसेच सन २०१४-१५ या वर्षातील केबल चालकांच्या वसुलीबाबतच्या नोंदवहीची छाननी केली असता रू.५५,७५,७४०/- इतक्या रकमेची वसुली न केल्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे.<br><br>सन २०१३-१४ या वर्षातील रकमेपैकी रू.१३,९७,३४०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.तर केवळ एक केबल चालक श्रीमती अंजना नितीन ननावरे यांच्याकडील रू.२६,४६०/-इतकी रक्कम वसूल केलेली नाही.त्यानुषंगाने सदर प्रकरणी जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.त्यामुळे सन २०१३-१४ या वर्षातील एकूण रू.१४,२३,८००/- रकमेपैकी रू.१३,९७,२४०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली असून ९८.१३% वसुली पुर्ण करण्यात आलेली आहे.<br><br>सन २०१४-१५ या वर्षातील रकमेपैकी रू.४४,५२,४६७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.तसेच केबल चालक श्री.श्रीनिवास गड्डम यांचेकडे रू.६,९५,८३५/- इतकी रक्कम थकीत असलेचे आक्षेपात नमूद केले आहे. यानुषंगाने नमूद करण्यात | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | येते की, महालेखाकार कार्यालयाने श्री.गड्डम यांचेकडे प्रतिमहा २२०९ जोडण्या गृहीत धरून सप्टेंबर,२०१३ ते मार्च,२०१४ या कालावधीत एकून १५४६३ इतक्या जोडण्या गृहीत धरून रू.६,९५,८३५/- इतक्या करमणूक शुल्काची गणना करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्षात श्री.गड्डम यांचेकडे सप्टेंबर,२०१३ ते मार्च,२०१४ या कालावधीत ८६५७ इतक्या अधिकृत जोडण्या असून त्यावर रू.३,८९,५६५/- इतके करमणूक शुल्क देय आहे व सदरची रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात आलेली आहे. तसेच अन्य एक केबल चालक श्री.भालचंद्र आपुणे यांनी एप्रिल,२०१२ पासून केबल व्यवसाय पूर्णपणे बंद केलेला असून त्यानुषंगाने जिल्हाधिकारी,सोलापूर यांना त्यांनी अर्जान्वये कळविले आहे.तसेच त्यांनी तसे दि.३.५.२०१२ रोजी प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे.त्यामुळे ऑगस्ट,२०१२ ते मार्च,२०१३ या कालावधीत करमणूक शुल्काची रक्कम वसूल करता येणार नाही.सबब,रू.४५६०/- इतकी रक्कम संबंधित केबल चालकांकडून वसुलीस पात्र ठरत नाही.सबब,उपरोक्त बाबी विचारात घेता सन २०१४-१५ या वर्षातील एकूण वसुलीयोग्य रक्कम रू.५५,७५,७४०/- इतकी नसून रू.५२,६४,९१०/- इतकी आहे.तसेच | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सदर रकमेपैकी रू. ४४,५२,४६७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली असून ८४.५७% वसुली पुर्ण करण्यात आलेली आहे (चलनाच्या प्रती जोडलेल्या आहेत). उर्वरित रक्कम रू.८,१२,४४३/- वसूल करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी,सोलापूर यांच्या स्तरावरून करण्यात येत आहे.त्यानुषंगाने शासनस्तरावरून तातडीने वसुली करण्याच्या सूचना संबंधितांना बैठकीवेळी देण्यात आलेल्या आहे.<br>राज्यघटना (१०१ वी सुधारणा) अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमामध्ये महाराष्ट्र अधिनियम क्र. ४२/ २०१७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.तसेच महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र. एमजीएसटी-१०१७/ प्र.क्र. १०३(१०), दि. २९ जून, २०१७ मधील नोंद क्र. ३४ अन्वये, आणि भारत सरकार ने शासन अधिसूचना क्र. ११/२०१७ केंद्रींय कर (दर), दि. २८ जून, २०१७ मधील नोंद क्र. ३४ नुसार लेखाशिर्ष ९९९६ (मनोरंजन, संस्कृती आणि खेळ विषयक सेवा) वर वस्तू व सेवा कर बसविला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत करमणूक शुल्काच्या सनियंत्रणासंदर्भातील कार्यवाही या विभागाकडून करण्यात येत नाही. | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सबब, उपरोक्त स्पष्टीकरण विचारात घेता व प्रस्तुत प्रकरणी वसुलीच्या अनुषंगाने झालेली उक्त कार्यवाही लक्षात घेता सदर लेखापरिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती. | | |

(ल.ह.कारंडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षातील महसूली जमा अहवालातील लेखा परिच्छेद क्र.६.५ बाबत
स्पष्टीकरणात्मक ज्ञापन

| अ.क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | विषय | स्पष्टीकरण | महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालयाच्या अभिप्रायावर विभागाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ६.५ | **डिस्कोथेक कडून करमणूक शुल्काची वसूली न होणे -**<br>तीन डिस्कोथेककडून रु.२८.०० लाख करमणूक शुल्काची भरणा न होणे.<br>मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, (BED अधिनियम) च्या कलम ३ (१७) च्या तरतूदी अंतर्गत, डिस्कोथेकच्या मालकांकडून, वेळोवेळी विनिदिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारून प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत त्याचा आगाऊ भरणा करावा. जर करमणूक शुल्क विहीत तारखेपर्यंत भरले गेले नाही तर शुल्काची रक्कम भरण्यासाठी मागणी सूचना जारी केली जाते. BED अधिनियमाच्या कलम ९ ब नुसार, शुल्क भरण्यात कसूर झाल्यास पहिल्या ३० दिवसासाठी प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने व्याज देखील आकारणीय असते. मागणी सूचनेचे अनुपालन न केल्यास सहा महिन्यापर्यंतच्या कालावधी इतकी कैद अथवा ५००० | सदरचा परिच्छेद हा कोकण विभागाशी संबंधीत आहे<br>सदर परिच्छेदातील कोंकण विभागातील मुंबई शहर जिल्ह्यातील झोन क्रं. ८ व ९ मधील एकूण आक्षेपित रक्कम रूपये २८,००,०००/- पैकी रक्कम रूपये २३,००,०००/-(८२.००%) वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये ५,००,०००/- वसूलीची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांचे स्तरावर सुरू आहे. (सोबत चलनांच्या छायांकित प्रत सुलभ संदर्भासाठी सादर केलेली आहे.)<br>सदर प्रकरणी रूपये १६,५१,०००/- इतकी व्याजाची रक्कम वसूलीची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांचे स्तरावर सुरू असून संबंधित खातेदारांना वसूलीच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.<br>प्रस्तुत प्रकरणी झालेली कार्यवाही विचारात घेवून सदर परिच्छेद निकाली काढण्यात यावा, | Out of the recoverable amount of Rs.२८ lakh, the Department has recovered Rs.२३ lakh i.e.८२%. Action for recovery of balance amount of Rs.५ lakh and interest of Rs.१६.५१ lakh is initiated on Collector office level. Notices also issued to the related defaulters.<br>The fact remains that laxity in collection of Entertainment Duty led to delay, and possibly irrecoverable loss, in collection of revenue by the Government. | उक्त परिच्छेदातील आक्षेपित रक्कम रू.२८ लाख पैकी रू.२३,००,०००/- वसूल करण्यात आलेले आहेत.<br>मे.कॅनव्हास हॉर्सशोर एंटर्टेनमेंट प्रा.लि, लोअर परेल, मुंबई यांनी मूळ करमणूक शुल्काची रक्कम रू.१९,००,०००/- पूर्णत: शासन जमा केलेली आहे.तथापि, सदर डिस्कोथेक चालकाकडे रू.१६.०४ लाख इतक्या व्याजाची रक्कम वसूलपात्र असल्याची गणना करण्यात आलेली आहे. तथापि, आक्षेपीत करमणूक शुल्काची मूळ रक्कम टप्याटप्याने शासनखाती जमा करण्यात आलेली आहे. ज्या कालावधीची रक्कम ज्या दिनांकास भरण्यात आलेली आहे त्या कालावधीकरीता रक्कम भरणा करण्यात आलेल्या दिनांकापर्यंतच व्याजाची आकारणी करणे अपेक्षित होते. तथापी, व्याजाची परिगणना करताना एकूण आक्षेपित रकमेवर आज पर्यंतचे दंडनीय व्याज आकारणी केलेली असल्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.<br><br>दोन ६ कार्यालयांच्या दस्तऐवजांची छाननी (जून २०१४) करतांना असे आढळून आले की, सप्टेंबर २०१२ ते मार्च २०१४ दरम्यान, विविध कालावधीत रु. २८.०० लाखाच्या करमणूक शुल्काचा तीन डिस्कोथेकच्या मालकांनी भरणा केला नव्हता. या प्रकरणांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी देखील उपस्थित केली नसल्यामुळे एवढ्या रक्कमेचे करमणूक शुल्क वसूल झाले नव्हते. तसेच विहित दराने व्याजही आकारणीय होते.<br><br>आम्ही ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने अभिक्षणे मान्य केली. वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही.<br><br>आम्ही हे प्रकरण जूलै २०१६ मध्ये ही बाब शासनाच्यां निदर्शनास आणून देण्यात आली, त्याचे उत्तर प्राप्त झालेले नाही (फेब्रुवारी २०१७). | अशी शिफारस करण्यात येत आहे. | | दंडनीय व्याज रकमेची परिगणना सदोष दिसून येते. आज रोजी व्याजाची पूर्ण परिगणना केली असता रक्कम रू.८.९२ लाख इतकी व्याजाची रक्कम देय होते.सदर रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने सदर करमणूक केंद्राच्या ठिकाणी भेट दिली असता सदर आस्थापना बंद करण्यात आली असल्याचे आढळून आले. त्याबाबतचा पंचनामा संबंधित करमणूक कर निरीक्षक यांनी दि.१२.११.२०१८ रोजी केलेला आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तीचा शोध घेणेकामी व संबंधितावर शासकीय रकमेचा अपहार केल्या प्रकरणी महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चे कलम ५ (क) अन्वये गुन्हा नोंदविणेसाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, ना.म. जोशी मार्ग पोलिस ठाणे यांना दि.१.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे.<br><br>तसेच, आक्षेपातील उर्वरीत करमणूक शुल्काची रक्कम रू.५ लाख व त्यावरील देय व्याज रक्कम रू.४६,७५०/- मे. एम. हाईप (फाफा हॉस्पीट्यालीटी प्रा.लि) यांचेकडून वसूल करावयाची आहे. सदर रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | उक्त करमणूक केंद्राच्या ठिकाणी भेट दिली असता, सदर अस्थापना बंद असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर करमणूक केंद्राचे मालक श्री.आसाद महमद हुसेन नमाजी यांचा शोध घेऊन तसा अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून दि.२८.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलिस ठाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सांताक्रुझ पोलिस ठाणे यांना कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच यापुढे असेही नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.एमजीएसटी-१०१७/प्र.क्र.१०३(१०), दि.२९.६.२०१७ मधील नोंद क्र.३४ अन्वये व केंद्र शासनाने शासन अधिसूचना क्र.११/२०१७ केंद्रीय कर(दर), दि.२८.६.२०१७ मधील नोंद क्र. ३४ नुसार लेखाशीर्ष ९९९६ (मनोरंजन, संस्कृती आणि खेळ विषयक सेवा) वर "वस्तू व सेवा कर" बसविला आहे. त्यास अनुसरून या विभागाचा आदेश क्र.इएनटी-२०१७/प्र.क्र.१११/टी-१, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दि.१.७.२०१७ अन्वये महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ नुसार बसविण्यात येणा-या करमणूक शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. तसेच दि.१.७.२०१७ पासून करमणूक केंद्रांकडून करमणूक शुल्काऐवजी "वस्तू व सेवा कर" वसूल करण्यात येत आहे. त्यामुळे दि.१.७.२०१७ पासून करमणूक केंद्रांच्या सनियंत्रणासंदर्भातील कार्यवाही या विभागाकडून करण्यात येत नाही.<br>सदर प्रकरणी ८२ % झालेली वसुली तसेच उपरोक्त वस्तुस्थिती पाहता उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही विचारात घेऊन सदर लेखा परिच्छेद वगळण्यात यावा,ही विनंती. |

(ल.ह.कारंडे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

कक्ष अधिकारी
महसूल व बन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**साक्ष :**

**परिच्छेद क्रमांक ६.४ : केबल चालकांकडून करमणूक शुल्काची वसुली न होणे.**

**८.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावरील अहवालातील परिच्छेद क्र.६.४ व ६.५ संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ११ डिसेंबर २०१८ रोजी महसूल व वन (महसूल) विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच परिच्छेद क्र.६.६ बाबत गृह/राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सचिवांची व विभागीय प्रतिनिधींनी साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी ६.४ - केबल चालकांकडून करमणूक शुल्काची वसुली न होणे या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, केबल चालकांकडून करमणूक शुल्काची वसुली यासंदर्भातील हा परिच्छेद असून यामध्ये रत्नागिरी आणि सोलापूर या २ जिल्ह्यांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्हयातील एकूण १३ केबल चालकांकडे २ लाख ७९ हजार ६०० रूपये बाकी होते. त्यापैकी १२ केबल चालकांकडून २ लाख ३६ हजार ६४० रूपयांची वसुली झालेली आहे. उर्वरित एका केबल चालकाचा पत्ता उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याच्याकडून रक्कम वसूल करणे बाकी आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ५५ लाख ७५ हजार ७४० रूपयाची वसुली न केल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. यासंदर्भात विभागाने पडताळणी केली असता एकूण ५२ लाख ६४ हजार ९१० रूपये वसुली योग्य रक्कम आहे. या रक्कमेपैकी ४४ लाख ५२ हजार ४६७ रूपये वसूल करण्यात आलेले आहेत. म्हणजेच जवळपास ८४.५७ टक्के वसुली पूर्ण झालेली आहे. या पैकी ८ लाख १२ हजार ४४३ रूपये वसूल होणे बाकी आहेत. ही रक्कम ४४ केबल ऑपरेटरकडून वसूल करायची होती. त्यापैकी २ केबल ऑपरेटर्सचा पत्ता मिळत नाही. इतर व्यक्तीकडून वसुलीची प्रक्रिया चालू आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४४ पैकी ३८ केबल ऑपरेटर्सकडून वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही चालू आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ४४ केबल चालकांपैकी २ केबल चालक महत्त्वाचे आहेत. परंतु ते केबल चालक सापडत नाहीत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, असे पोलीस स्टेशनला पत्र देण्यात येईल, तसेच म्हाडामध्ये २ व्यक्ती आहेत, परंतु त्या व्यक्तीचे नाव वसुलीसाठी काढलेले नाही. श्री. संजय पवार नावाचे तहसीलदार यांच्या नावाने वसुली काढलेली आहे. म्हाडाचे २ आणि पत्ता मिळत नसलेले २ केबल चालक अशा ४ व्यक्ती होत आहेत तसेच सदरहू वसुली श्री. संजय पवार यांच्या नावे दाखविण्यात आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदरहू वसुली कोणी दाखविली? ती वसुली विभागाने दाखविलेली आहे. श्री. संजय पवार यांच्या नावाने वसुली दाखविलेली आहे. महसूल विभागातील तलाठी किंवा आरआयई किंवा इतर कोणत्या अधिकाऱ्याने वसुली दाखविली असेल. How can Department say it is the name of Tehsildar? असा मुददा समितीने उपस्थित केला. असता ती रक्कम १८ हजार ६६० रूपये आहे. उर्वरित ४० प्रकरणामध्ये काहींची २ हजार रूपये तर काहींची ३ हजार रूपये अशी कमी रक्कम आहे. ही एकूण रक्कम ४ लाख ७५ हजार रूपये आहे. एकूण शिल्लक १.१७ आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या एकूण रक्कमेपैकी ३ लाख ३७ हजार या रक्कमेची प्रमुख २ प्रकरणे असून हे केबल चालक विभागाला सापडत नाहीत. राईट ऑफ करण्यासाठी प्रस्ताव करावा लागेल. ४ लाख ७५ हजार रूपयांच्या बदल्यात ४० केबल चालकांकडून वसुली झालेली आहे. यासंदर्भात सर्वांना नोटीस देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे रक्कम वसूल झाली नाही तर आरआरसी म्हणून करणे शक्य आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

अशा प्रकारे वसुली केव्हा होणार? याकरिता काही कालावधी निश्चित केला आहे काय? या समितीच्या प्रश्नाबाबत, ही वसुली या वर्षामध्ये करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधीनी अवगत केले.

ही नेहमीची प्रक्रिया आहे की, महालेखाकारांनी आक्षेप काढल्यानंतर कार्यवाही सुरू करण्यात आली? महालेखाकारांच्या आक्षेपानंतर विभागीय कार्यवाही सुरू केली असेल तर ही बाब आक्षेपार्ह आहे. महालेखाकारांनी यामध्ये असे नमूद केले आहे की, या वसुलीसंदर्भात विभागाकडून पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. महालेखाकारांचा आक्षेप आला म्हणून विभाग कार्यवाही करीत आहे. परंतु महालेखाकारांनी आक्षेप घेण्यापूर्वीच विभागाने कार्यवाही केली किंवा कसे अशी विचारणा समितीने केली असता, समितीचे मत योग्यच आहे. वसुली करण्यासंदर्भात त्यावेळी कार्यवाही झालेली नाही त्यामुळेच महालेखाकारांनी आक्षेप घेतलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

ही रक्कम जमा करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर होती किंवा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वसुली केली नाही किंवा ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याकडे काळजीपूर्वक लक्ष ठेवायला पाहिजे, यांच्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी काहीच मत व्यक्त केले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, यासंदर्भात संबंधित करमणूक निदेशकांना नोटीस दिलेल्या आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

एचबी ३७७—१२असंबंधित करमणूक निदेशकांनी वेळेवर कार्यवाही केली नाही, म्हणूनच ही थकबाकी झालेली आहे. What action have Department taken against those officers? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत संबंधितांना नोटीस दिलेल्या आहेत. समितीचे मत लक्षात घेता संबंधित करमणूक निदेशकांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधीकडून समितीला आश्वस्त करण्यात आले.

महालेखाकारांच्या आक्षेपानंतर नोटीसा दिलेल्या असतील. परंतु आक्षेप येण्यापूर्वी करमणूक निदेशकांनी त्यांचे कर्तव्य किंवा त्यांची जबाबदारी म्हणून त्यांनी स्वतः वसुली करायला पाहिजे होती. त्यांनीही काही केले नाही व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांनीही काही केलेले नाही. आता परिच्छेदावर आक्षेप निघाल्यामुळे तसे सांगण्यात येत आहे. वसुली करणे हे जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांचे कर्तव्य किंवा वसुली करणे त्यांचे काम होते की नाही? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधितांनी वेळेवर रक्कम वसूल करणे ही त्यांची जबाबदारी होती असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

संबंधितांनी वेळेवर रक्कम वसूल केली नाही. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर काहीच कारवाई केलेली नाही असे मत समितीने व्यक्त केले.

महालेखाकारांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, " The fact remains that laxity in collection of Entertainments Duty led to delay in collection of revenue by the Government. " आता जीएसटीमुळे तो विषय सुटलेला आहे. परंतु करमणूक शुल्क वसूल करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर होती त्यांनी वसुलीकडे दुर्लक्ष का केले, यामध्ये दिरंगाई का केली याबाबत त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली? तसेच रत्नागिरी आणि सोलापूरमध्ये काही केबल चालक सापडत नाहीत. असे कसे होऊ शकते? व्यक्ती येतात, व्यवसाय करतात तरी जिल्हाधिका-यांना माहीत होत नाही. असे कसे शक्य आहे? केबल चालक सापडत नाहीत, ही बाब तर अतिशय गंभीर आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्या त्या वेळी संबंधितांकडून वसुली झालेली नाही, हे मान्य आहे. परंतु आजच्या परिस्थितीमध्ये त्या व्यक्ती प्रत्यक्षात त्या व्यवसायात नसल्यामुळे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर ते सापडत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच वसुली करण्यामध्ये अडचणी येत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

व्यावसायिक सापडत नाहीत, याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली आहे काय? त्यांना अशा प्रकारे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे काय? शासनाची थकबाकी आहे म्हणून ते सापडत नाहीत काय? ज्यांच्या अकार्यक्षमतेमुळे थकबाकी राहिली, थकबाकी वसूल करण्याची जबाबदारी ज्यांनी पार पाडली नाही, त्यांच्याकडून थकबाकी वसूल करावी. ज्या अधिकाऱ्यांची ही जबाबदारी होती व त्या अधिकाऱ्याने जबाबदारी पूर्ण केली नसेल तर त्याच्याकडून थकित रक्कम वसूल करावी. नंतर तो ती रक्कम संबंधितांकडून वसूल करेल असे समितीने सूचित केले असता, ज्यांच्याकडून वसूल करायची होती, त्यांच्याकडून वसुली होत नसेल तर महसुलाची थकबाकी म्हणून ती रक्कम वसूल करण्यासाठी सर्वप्रथम प्रयत्न करणे आवश्यक आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी आता वसुलीसंदर्भातील प्रक्रिया सुरू केलेली आहे. तसेच त्यांनी असेही सांगितले की, मार्च पर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. केबल चालकांकडून महसुलाची वसुली करणे ही वेगळी प्रक्रिया आहे व ती यापुढे चालू राहील. परंतु ज्यांनी केबल चालकांकडून करमणूक शुल्क वसूल केले नाही, त्यांच्यावर कारवाई करणे ही दुसरी बाब आहे व त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. संबंधितांकडून वसुली करण्यात येईल, असे त्यांनी सांगितलेले आहे. परंतु काही केबल चालक सापडत नाहीत, ते फरार होण्यापूर्वी संबंधितांनी वसुलीचा प्रयत्न केलेला नाही. आता ते फरार झालेले आहेत. फरार झालेल्या केबल चालकांचा शोध पोलिसांच्या माध्यमातून झाला पाहिजे. तसेच याबाबत तातडीने कारवाई करण्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले, त्यांच्यावर विभागाने कारवाई प्रस्तावित करावी. असे समितीने सूचित केले असता समितीच्या सुचनेनुसार ज्या अधिकाऱ्यांनी संबंधितांवर वेळेवर कारवाई केली नाही, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

**परिच्छेद क्रमांक ६.५ : डिस्कोथेककडून करमणूक कराची वसुली न होणे**

डिस्कोथेकसंदर्भात ५ लाख रूपयांची वसुली बाकी आहे याबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, एकूण ३ डिस्कोथेक होते व त्यामध्ये २८ लाख रूपये करमणूक शुल्काची वसुली करायची होती. त्यापैकी आतापर्यंत २३ लाख रूपये वसूल झालेले आहेत. ३ डिस्कोथेकपैकी १ डिस्कोथेक पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे त्यांच्याकडून शुल्क वसूल करणे शक्य होत नाही. इतर दोघांकडून वसुली झालेली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

५ लाख रूपये व त्याच्यावरील व्याजाचे १६ लाख ५१ हजार रूपये असे एकूण २१ लाख ५१ हजार रूपये संबंधितांकडे बाकी आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता या परिच्छेदामध्ये दाखविलेले व्याज १६.४ लाख रूपये होते. त्यामध्ये “कॅनव्हास हॉट सोर्स” या आस्थापनेकडील व्याजाची रक्कम काढण्यात आली असता ती १६ लाख १ हजार रूपये दाखविण्यात आली होती. परंतु त्यांनी प्रत्यक्षात वेळोवेळी भरलेल्या रकमेची पुनर्गणना करून व्याजासह परिगणना केली असता, व्याजाची रक्कम ८ लाख ९२ हजार एवढी येते असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

त्यावर ८ लाख ९२ हजार रूपये वसूल करण्याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित आस्थापनेला भेट दिली होती. परंतु ती आस्थापना बंद झाल्याचे आढळून आले. त्यामुळे “कॅनव्हास हॉट सोर्स” या आस्थापनेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा, असे संबंधित पोलीस स्टेशनला पत्र दिलेले आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

एखादा कर्मचारी किंवा घरकाम करण्यासाठी मोलकरीण कामावर ठेवत असताना त्यांच्याकडून फोटो, ओळखपत्र किंवा आधार कार्ड घेऊन त्या व्यक्तीची तपासणी करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात येते. शहरामध्ये किंवा गावामध्ये डिस्कोथेक किंवा इतर काम करणारे येत असतात. त्यांच्याकडून त्यांच्या स्थायी पत्त्याचा पुरावा न घेता व त्याची तपासणी न करता अशा व्यक्तींना शहरामध्ये व्यवसाय करू दिला जातो. महसूल विभागातील अधिकारी काय करतात? यापूर्वीच्या ६.४ या मुद्यातील केबल चालक सापडत नाहीत व या मुद्यातील डिस्कोथेकचा व्यवसाय करणारी व्यक्ती सापडत नाही. हे दोन्हीही सारखेच मुद्दे आहेत. आस्थापना गायब आहे याचा अर्थ काय होतो? ज्याच्या नावे डिस्कोथेकचा परवाना दिला तो व्यावसायिक सापडत नाही, असा आस्थापना बंद होती असा याचा अर्थ होतो. मुंबईत डिस्कोथेक चालविण्यासाठी बरीच गुंतवणूक करावी लागते. दोन-चार लाख रूपयामध्ये डिस्कोथेकचा व्यवसाय सुरू करता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू आस्थापना बंद झालेली आहे. संबंधित व्यावसायिकाने डिस्कोथेकचा व्यवसाय पॅलेडियम मॉल, लोअर परेल, मुंबई येथे सुरू केला होता. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पॉलेडियम मॉल, लोअर परेल येथे डिस्कोथेकचा व्यवसाय सुरू करणे धनाढ्य व्यक्तीचेच काम आहे. पूर्वीही सांगितले की, मुंबईमध्ये घरकाम करणारी महिला किंवा भाडेकरू ठेवायचा असला तरी त्याची सर्व कागदपत्रे तपासून पाहिली जातात. त्याच्याकडून लेखी घेतले जाते. असे असताना एखाद्या मोठ्या मॉलमध्ये डिस्कोथेकचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाचा साधा पत्ता मिळत नाही. तो कसा काय फरार झाला? तो कर बुडवून कसा पळू शकतो? सदरहू व्यावसायिकाशी विभागाचे हितसंबध असल्याशिवाय किंवा प्रशासनाचे व व्यावसायिकाचे संगनमत असल्याशिवाय तो गायब होऊ शकतो का? पॉलेडियम सारख्या मॉलमध्ये डिस्कोथेक सुरू करणाऱ्या व्यक्तीचा पत्ता मिळत नाही, ही गंभीर बाब आहे. विभागाकडून कोणत्याही व्यक्तीच्या नावाने कागदपत्रे न तपासता परवानगी देण्यात येते काय? आधारकार्ड, मूळ पत्ता इत्यादी कागदपत्रे घेतली जात नाही काय? त्याच्याकडून कर घ्यायचा आहे त्या संबंधित व्यावसायिकाचा पूर्ण पत्ता व पूर्ण माहिती असल्याशिवाय परवाना कसा देण्यात येतो? असे मुद्दे उपस्थित करून त्या व्यवसायिकाने मॉलमध्ये भाड्याने जागा घेतली असेल, संबंधित मालकासोबत भाडे करार केला असेल, रीतसर नोंदणी केली असेल. या बाबी सामितीने निदर्शनास आणल्या असता, पॉलेडियम मॉलच्या मॅनेजरकडून सदर व्यावसायिकाने केलेल्या कराराची प्रत मागितलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

त्यावर, असे असेल तर मॉलवरच कारवाई करावी व त्यांना वसुलीची नोटीस द्यावी परंतु तसे रीतसर होणार नाही ज्यांनी भाडेतत्त्वावर जागा दिली असेल तर, त्या मालकाची पैसे देण्याची जबाबदारी रहात नाही, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडून लायसन्स दिले त्यावेळी व्यवसायिकाकडून स्थायी पत्ते घेणे आवश्यक होते. मुंबई शहरामध्ये अशा प्रकारे व्यावसायिकांना परवानग्या मिळत असतील तर पाकिस्तानी नागरीक देखील असा व्यवसाय सुरू करू शकतो. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. ओळख पत्र, आधार कार्ड किंवा मूळ पत्ता असलेली प्रत न घेता व्यवसाय करू दिला जात असेल तर उद्या एखादा पाकिस्तानी किंवा बांगलादेशी नागरिक येऊन मुंबईत अशा प्रकारचा व्यवसाय करू शकतो. ते येथे येऊन काहीही करू शकतात. विभागाकडून कसे सांगण्यात येत आहे की, विभागाला व्यावसायिक सापडत नाही? हे प्रकरण अतिशय गंभीर आहे, एखादा विदेशी नागरिक मुंबईत येऊन अशा प्रकारे कर बुडवून गेला तर विभाग त्याला काही करू शकणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, संबंधित व्यावसायिकावर गुन्हा दाखल करण्यात यावा, असे पत्र विभागाने पोलीस स्टेशनला दिलेले आहे,असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

डिस्कोथेक सुरू करण्यासाठी कमीतकमी १० ना-हरकत प्रमाणपत्रे लागतात? पोलीस स्टेशनचे ना-हरकत प्रमाणपत्र व इतर ना-हरकत प्रमाणपत्र लागत असेलच. नळ जोडणी घ्यायची असेल तर ५ ना-हरकत प्रमाणपत्रे लागतात. डिस्कोथेककरिता महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र लागत असेल. तेथे फुड स्टॉल सुरू करायचा असेल तर त्यासंदर्भातील ना-हरकत प्रमाणपत्र लागत असेल की, नाही? तरीही विभागाचे मत आहे की, व्यावसायिक सापडत नाही. उद्या कोणत्याही विदेशी नागरिकाने येथे येऊन असा व्यवसाय केला तर विभाग असेच म्हणेल की,

तो सापडत नाही. डिस्कोथेकचा व्यवसाय सुरू करायला साधारणतः १० एनओसी लागत असताना विभागाकडे त्याचा एकही पुरावा नाही. डिस्कोथेचा व्यवसाय सुरू करणाऱ्या व्यावसायिकाला पकडण्यासाठी विभागाने कोणते प्रयत्न केले आहेत? फरार झालेला व्यावसायिक सापडत नाही व त्याची आस्थापना बंद झालेली आहे, असे विभागाचे म्हणणे आहे. त्याला शोधण्याकरिता विभागाने कोणते प्रयत्न केले? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या रेकॉर्डवर असलेल्या पत्यावर शोधले असता तो सापडला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आस्थापनेकडे किंवा विभागाच्या रेकॉर्डवर पॉलेडियम मॉलचा पत्ता असेल. त्याने मॉलमधील डिस्कोथेकला बंद केले व तो फरार झाला. तो कुठे रहातो, तो कोण आहे? हे तपासण्याचे काम विभागाच्या प्रतिनिधींचे आहे, परंतु विभागाकडून सांगण्यात येते की, तो फरार झालेला आहे. यासंदर्भात पूर्ण केस दप्तरी दाखल केली पाहिजे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, हे अत्यंत कॅज्युअल ॲप्रोच आहे. त्यांचे उत्तर आहे की, त्यानी पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

प्रधान सचिवांनी हा विषय अतिशय गांभीर्याने घेतला पाहिजे. नवीन जीएसटी आल्यामुळे ही वसुली करायची आवश्यकता नाही. प्रत्येक बाबीमध्ये असे असेल तर, absconded is not an excuse, the amount should be recovered. For this proper initiation and action should be taken by the department. ज्यांच्या चुकांमुळे थकबाकी झाली आहे, त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी, त्यांनी त्यांची जबाबदारी पूर्ण केली तरीही रक्कम वसूल झाली नसेल तर राईट-ऑफ करण्यात यावी त्याबाबत समितीचे काही म्हणणे नाही. परंतु करमणूक शुल्क वसूल न करणाऱ्या अधिकाऱ्याला काहीच दंड करणार नाही काय? अशी विचारणा समितीने केली असता, डिस्कोथेकच्या व्यवसायिकाकडून करमणूक शुल्क वसूल न करण्याकरिता जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्याविरूद्ध खातेनिहाय चौकशी करण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वस्त केले.

त्या व्यावसायिकाकडून कागदपत्रे आणि त्याचा मूळ पत्ता, फोटो, ओळखपत्र इत्यादी कागदपत्रे कोणत्या अधिकाऱ्याने जमा करून घेतली होती? डोळेझाक करून लायसन्स देण्यात आले होते काय? अशी विचारणा समितीने केली असता, करार असल्याशिवाय परवाना दिलेला नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले डिस्कोथेकसाठी परवानगी मिळवण्याकरिता कमीत कमी १० ना-हरकत प्रमाणपत्रे वेगवेगळ्या संबंधित विभागाकडून घ्यावे लागले असतील. गृह विभागाची देखील नाहरकत घ्यावी लागली असणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू प्रकरणी गृह विभागाकडून नाहरकत अथवा खाद्य परवाने घेतले आहेत त्यामधून संबंधिताचा पत्ता शोधण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

आज विभागाची साक्ष असताना विभागीय प्रतिनिधी प्रश्नावलीच्या अनुषंगाने कोणतीही तयारी करून आले नाहीत. या विषयावर विचारणा होणार असल्याने सर्व माहिती घेऊन समितीसमोर येणे अपेक्षित आहे. असे मत सामितीने व्यक्त केले असता, उक्त प्रकरणातील सदरहू व्यक्तीचा पत्ता का सापडत नाही, या अनुषंगाने देखील विचारणा केली होती. सदरहू व्यक्तीने व्यवसायासाठी अर्ज केला होता, त्यावेळी पॅरेडीयन मॉल ज्यांच्या मालकीचे आहे त्यांच्याबरोबर करारनामा करण्यात आला होता. सदरहू करारनामा पाहून उक्त प्रकरणी कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे. करारनाम्यातील पत्त्याच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु सदरहू प्रकरणातील व्यक्ती सापडून येत नाही, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी यांनी दिली आहे. सदरहू प्रकरणी खाद्य परवाना, पोलीस यांचा ना-हरकत दाखला यासाठी उक्त व्यक्तीने जो पत्ता दिलेला असेल त्यावर शोध घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे. पोलिसांच्या मदतीने त्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

सदरहू प्रकरणी संबंधित व्यक्तीने पॅरेडीयन मॉल सोबत करारनामा केल्यानंतर त्यास डिस्कोथेकचा परवाना देण्यात आला आहे. हे योग्य नाही. डिस्कोथेकसाठी ज्या व्यक्तीला परवानगी, परवाना किंवा लायसन्स देण्यात येते त्याची आधारकार्डसह सर्व माहिती घेतली पाहिजे. उक्त प्रकरणातील व्यक्ती सापडत कशी नाही? If the concerned person is dead then it is okay, but if he is alive then he has to be found out. जरी संबंधित व्यक्ती मृत झाली तरी देखील RRC मुळे राजस्व बुडत नाही ते संबंधिताच्या मालमत्तेमधून वसूल करता येते. परंतु विभागाने या सर्व बाबी परवाना देताना नमूद करणे आवश्यक आहे. इतर परवाने देताना देखील आधारकार्डसह इतर सर्व माहिती न घेता परवाने दिले तर कर्ज बुडेल. उक्त व्यक्ती सापडत नसल्याने राईट ऑफ करण्यात यावे, असे म्हणणे योग्य नाही. सदरहू प्रकरण महालेखाकार यांनी माहे जुलै, २०१६ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयास निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर २ वर्षांनी प्रशासनाने दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी पंचनामा केला आहे. ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे यांना उक्त प्रकरणी शोध व अपहार प्रकरणी दिनांक १ डिसेंबर, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पत्र दिले आहे. सदरहू कार्यवाही समितीने साक्ष लावल्यामुळे केली आहे. सदरहू बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर २ वर्षे काय केले? The Chairman: When the A.G. had pointed out this audit point, you should have taken action. या २ वर्षात विभागाने सर्व कार्यवाही पूर्ण केली असती तर समितीचे समाधान झाले असते. उक्त बाब

जिल्हाधिकारी प्रशासनाच्या लक्षात आली नाही, हे समजणे शक्य आहे. परंतु लक्षात आणून दिल्यानंतर कार्यवाही करणे आवश्यक आहे. But if the Department does not take any action in this regard then it means that there is some conspiracy between the department employees and the license holder. सदरहू प्रकरणी सर्व संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे, अशी समितीची भूमिका असून त्यानुसार कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे. सदरहू प्रकरणातील सर्व संबधितांची माहिती प्राप्त करून त्यांना पोलिसांच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न करावा. सदरहू प्रकरणी अपर जिल्हाधिकारी गंभीर नाहीत. ते समितीला २-३ वेळा सांगत आहेत की, पोलिसांना पत्र देण्यात आले आहे. सदरहू कार्यवाही करून त्यांची जबाबदारी संपत नाही. तसेच, सदर प्रकरण महालेखापालांकडून सन २०१६ मध्ये विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे व विभागाकडून सन २०१८ मध्ये कार्यवाही करण्यात आली आहे सदरहू कार्यवाही समितीने साक्ष लावल्यामुळे करण्यात आली आहे. पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला म्हणजे सर्व कार्यवाही संपली का? या प्रकरणाचे गांभीर्य समजून घेणे आवश्यक आहे. आगामी काळात एखादा विदेशी व्यक्ती अशा पद्धतीने डिस्कोथेक किंवा इतर उपक्रम सुरु करील. शासकीय वसुली प्रकरणी प्रशासनाने गंभीर असले पाहिजे, ही समितीची अपेक्षा आहे. शासनाची वसुली बुडीत जाऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. असे समितीने सूचित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ६.४ "केबल चालकांकडून करमणूक शुल्काची वसुली न होणे"**

**अभिप्राय**

**९.१** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (BED अधिनियम) च्या कलम ३(४) अन्वये केबलचालकांनी अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्काचा भरणा करावयाचा होता. केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्काच्या (DTH ब्रॉड कास्टींग सेवावरील करमणूक शुल्काच्या आकारणीसहित) संकलनाच्या नियम १४ अंतर्गत सार्वजनिक लिलाव नियम, २००३ द्वारे जिल्हाधिकारी यांनी केबल चालकांचे निर्धारण करून करमणूक शुल्काची वसुली करणे आवश्यक असते. या केबल चालकांनी करमणूक शुल्काच्या प्रदानासह प्रपत्र E मध्ये मासिक विवरणे जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक असते. BED अधिनियमाच्या कलम ४(ब)(४) नुसार जर विवरणे विहित वेळेत सादर केली नाहीत तर राज्य शासनाने केबल चालकांना पर्याप्त वेळ देऊन विवेक बुद्धीने निर्णय घेऊन केबल चालकांकडून देय करमणूक शुल्काची रक्कम निर्धारित करावी आणि करमणूक शुल्क पण देय असल्यास शास्ती भरण्याचे निर्देश द्यावे. कलम ४ ब च्या तरतुदींचे अनुपालन न केल्यास कलम ५अ अंतर्गत सहा महिन्यांच्या कालावधीइतकी कैद अथवा रु. ५००० पर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. शुल्काचे प्रदान न केल्यास BED अधिनियमाच्या कलम ९ ब नुसार,पहिल्या ३० दिवसांसाठी प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने व्याज देखील आकारणीय असते.

परंतु ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१५ मधील विविध कालावधीत १५८ केबल चालकांनी रु. ७०.३३ लाख करमणूक शुल्कासह विवरणे सादर केली नव्हती.संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी न केल्यामुळे एवढ्या रक्कमेच्या करमणूक शुल्काची वसुली झाली नव्हती. तसेच विहित दराने व्याजही आकारणीय होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात समितीने विस्तृत छाननी केली असता रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १३ केबल चालकांकडे रु. २,७९,६००/- इतकी रक्कम वसुलीवर प्रलंबित असल्याचा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. १३ केबल चालकांपैकी १२ केबल चालकांकडून रु. २,३६,६४०/- इतक्या करमणूक शुल्काची रक्कम व रु. ३२,९१८/- इतकी व्याजाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच एका केबल चालकाकडून पत्ता उपलब्ध होत नसल्याने त्यांच्याकडील करमणूक शुल्काची रक्कम रु. ४२,९६०/- व त्यावरील व्याजाची रक्कम रु. ५१,५५२/- अशी एकूण रु. ९४,५१२/- इतकी रक्कम वसूल करता आलेली नाही.

तसेच सोलापूर जिल्ह्यातील केबल चालकांच्या वसुलीबाबतच्या नोंदवहीची छाननी केली असता रु. १४,२३,८००/- इतक्या रकमेची वसुली न केल्याबाबत तसेच सन २०१४-१५ या वर्षातील केबल चालकांच्या वसुलीबाबतच्या नोंदवहीची छाननी केली असता रु. ५५,७५,७४०/- इतक्या रकमेची वसुली न केल्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे.

सन २०१३-१४ या वर्षातील रकमेपैकी रु. १३,९७,३४०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तर केवळ एक केबल चालकाकडून रु. २६,४६०/- इतकी रक्कम वसूल केलेली नाही. त्यानुषंगाने सदर प्रकरणी वसूलपात्र रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सन २०१४-१५ या वर्षातील रकमेपैकी रु. ४४,५२,४६७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच केबल चालक श्री.श्रीनिवास गड्डम यांचेकडील रु. ६,९५,८३५/- इतक्या थकीत रकमेसंदर्भात महालेखाकारांनी प्रतिमहा २२०९ जोडण्या गृहीत धरून सप्टेंबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीत एकून १५४६३ इतक्या जोडण्याप्रमाणे धरून रु. ६,९५,८३५/- इतक्या करमणूक शुल्काची गणना करण्यात आली. तथापि, प्रत्यक्षात श्री. गड्डम यांचेकडे ८६५७ इतक्या अधिकृत जोडण्या असून त्यावर रु. ३,८९,५६५/- इतके करमणूक शुल्क देय आहे व सदरची रक्कम पूर्णपणे वसूल करण्यात आलेली आहे. तसेच अन्य एक केबल चालक श्री. भालचंद्र आपुणे यांनी एप्रिल, २०१२ पासून केबल व्यवसाय पूर्णपणे बंद केलेला असल्यामुळे करमणूक शुल्काची रक्कम वसूल करता येणार नाही. उपरोक्त बाबी विचारात घेता सन २०१४-१५ या वर्षातील एकूण वसुलीयोग्य रक्कम रु. ५५,७५,७४०/- इतकी नसून रु. ५२,६४,९१०/- इतकी आहे. तसेच सदर रकमेपैकी रु. ४४,५२,४६७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरित रु. ८,१२,४४३/- वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

**शिफारस :**

**९.२ सदरहू परिच्छेदात केबल चालकाकडून करमणूक शुल्काची वसुली न होणे यासंदर्भातील महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले असून यात विशेषतः रत्नागिरी व सोलापूर या दोन जिल्ह्यांचा समावेश असून रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १३ केबल चालकांकडे रु.२,७९,६००/- इतकी रक्कम शिल्लक होती. त्यापैकी १२ केबलचालकांकडून रु.२,३६,६४०/- रुपयांची वसुली**

**झाली असून एका केबलचालकाचा पत्ता उपलब्ध होत नसल्यामुळे ती रक्कम प्रलंबित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील रु.५२,६४,९१०/- एवढ्या वसूल पात्र रकमेपैकी रु.४४,५२,४६७/- रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे व रु.८,१२,४४३/- वसूल होणे बाकी आहे. त्यातील दोन केबल ऑपरेटरचा पत्ता मिळत नसून इतर वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. जे केबलचालक सापडत नाही त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा असे पत्र पोलिस स्टेशनला देण्यात येईल असेही समितीस सांगण्यात आले. एकूण वसूलपात्र रकमेपैकी रु.३,३७,०००/- रकमेची प्रमुख दोन प्रकरणे असून हे केबलचालक विभागाला सापडत नाही. याबाबत विभाग काय निर्णय घेणार अशी समितीने विचारणा केली असता, महसुली वसुली म्हणून वसुली करण्याचा पर्याय विभागाकडे उपलब्ध असल्याचे समितीस सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित त्या-त्या वेळी या केबलचालकांकडून रक्कम वसूल करण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी ती वेळेत व गांभीर्याने पार न पाडल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवलेली आहे. या अधिकाऱ्यांनी या प्रकरणांचा पाठपुरावा जर वेळेत केला असता तर ही परिस्थिती उद्‌भवली नसती. त्या अधिकाऱ्यांवर विभागाने काय कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित करमणूक निदेशकांना नोटीस दिलेली असून त्यांचेवर कारवाई करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येईल असेही समितीस आश्वासित करण्यात आले. वास्तविकतः शासनाला करमणूक शुल्काच्या माध्यमातून प्राप्त होणारा महसूल पाहता विभागाने या सर्व बाबींवर स्वतः नियंत्रण ठेवून वेळोवेळी त्यांची जबाबदारी प्रभावीपणे पारपाडणे अभिप्रेत व आवश्यक असताना या प्रकरणांमध्ये विभागाने कोणतीही कारवाई गांभिर्याने केली नाही. विभागाने शासनाकडे येणे असलेल्या महसूलाबाबत सजग असले पाहिजे. महालेखापालांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर समितीने यासंदर्भात साक्ष लावल्यानंतर विभाग आता वसुलीची कारवाई व अधिकाऱ्यांना नोटीस देण्याची कारवाई सुरू करत आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून समिती यासंदर्भात तीव्र नापसंती करीत आहे. त्या-त्या वेळी करमणूक शूल्क वसूल करण्याची जबाबदारी ही विभागाच्या अधिकाऱ्यांची होती. ती त्यांनी त्या-त्या वेळी पार पाडली असती तर निश्चितच ही परिस्थिती उद्‌भवली नसती. केबल चालकांनी कर भरणा केला नाही, विभागाच्या अधिकाऱ्यांनी तो वसूल केला नाही, विभागाद्वारे प्रकरणाचा कोणताही पुढील पाठपुरावा करण्यात आला नाही, आता हे केबलचालक सापडतदेखील नाही व तरीही विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करणे ही खचितच गंभीर बाब आहे. विभाग अशा प्रकरणांकडे किती गांभीर्याने पाहते व शासनाला प्राप्त होणाऱ्या महसूलासंदर्भात विभाग किती गंभीर आहे हे यावरूनच स्पष्ट होते. जीएसटीमुळे भविष्यात हा विषय आता सुटलेला आहे परंतु प्रलंबित परिच्छेदामधील वसूलपात्र रक्कम पूर्णपणे वसूल करणे बंधनकारक आहे. अतः विभागाने वसूलपात्र असलेली सर्व रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. केबलचालकांचा पत्ता शोधण्यासाठी पोलिस विभागाची मदत घेऊन व्यक्तीचा शोध घेण्यात यावा. तसेच त्यांचेवर गुन्हा नोंदविण्यात यावा व संपूर्ण वसुली सक्त महसुली वसुली स्वरूपात वसूल करण्यात यावी व तरीही ती वसूल न झाल्यास ही संपूर्ण रक्कम संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावी. तसेच या प्रकरणी वेळेत करमणूक शुल्क वसूल न केलेबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक ६.५ "डिस्कोथेक कडून करमणूक शुल्काची वसुली न होणे"**

**अभिप्राय :**

**९.३** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३, (BED अधिनियम) च्या कलम ३ (१७) च्या तरतूदी अंतर्गत, डिस्कोथेकच्या मालकांकडून, वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारून प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत त्याचा आगाऊ भरणा करावा. जर करमणूक शुल्क विहित तारखेपर्यंत भरले गेले नाही तर शुल्काची रक्कम भरण्यासाठी मागणी सूचना जारी केली जाते. BED अधिनियमाच्या कलम ९ ब नुसार, शुल्क भरण्यात कसूर झाल्यास पहिल्या ३० दिवसासाठी प्रतिवर्षी १८ टक्के दराने आणि त्यानंतर प्रतिवर्षी २४ टक्के दराने व्याज देखील आकारणीय असते. मागणी सूचनेचे अनुपालन न केल्यास सहा महिन्यापर्यंतच्या कालावधी इतकी कैद अथवा रु.५,०००/- पर्यंत दंड अथवा दोन्हीं शिक्षा होऊ शकतात. दोन कार्यालयांच्या दस्तऐवजांच्या छाननीत रु.२८ लाखाच्या करमणूक शुल्काचा तीन डिस्कोथेकच्या मालकांनी भरणा केला नव्हता. या प्रकरणांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी मागणीदेखील उपस्थित केली नसल्यामुळे एवढ्या रकमेचे करमणूक शुल्क वसूल झाले नव्हते. तसेच विहित दराने व्याजाची आकारणी केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

मुंबईतील झोन क्र. ८ व ९ मधील एकूण आक्षेपित रक्कम रु. २८,००,०००/- पैकी रक्कम रु. २३,००,०००/- वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम रु. ५,००,०००/- वसुलीची कार्यवाही तसेच रु.१६,५१,०००/- इतकी व्याजाच्या रक्कमेची वसुलीची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांचे स्तरावर सुरू असून संबंधित खातेदारांना वसुलीच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत असे समितीस सांगण्यात आले आहे.

**शिफारस :**

**९.४ सदरहू प्रकरणी डिस्कोथेककडून करमणूक कराची वसुली संदर्भात समितीने विचारणा केली असता, ३ डिस्कोथेककडून एकूण २८ लक्ष रुपयांची वसुली करायची होती त्यापैकी २ जणांकडून २३ लक्ष रुपये वसूल करण्यात आलेले आहे व एका डिस्कोथेककडून ५ लाख रुपये व त्यावरील रु.१६.०४ लक्ष इतक्या व्याजाची गणना करण्यात आली होती. परंतु ही व्याजाची गणना सदोष असून याची पूर्ण परिगणना केली असता रु.८.९२ लक्ष इतकी व्याजाची रक्कम वसूलपात्र आहे. परंतु आता हा डिस्कोथेक बंद झाला असल्यामुळे शुल्क वसूल करणे शक्य होत नाही. त्यामुळे "कॅनव्हास हॉट सोर्स" या डिस्कोथेकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा असे पत्र संबंधित पोलिस स्टेशनला दिल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. समितीने याबाबत गंभीर आक्षेप नोंदवित कोणताही व्यक्ती येतो व मोठमोठ्या मॉलमध्ये डिस्कोथेकसारखा व्यवसाय करून शासनाच्या करमणुक शुल्काचा भरणा न करता निघून जातो व त्याचा कोणताही अतापता विभागाला न सापडणे ही शासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविणारी बाब आहे. सन २०१६ मध्ये महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने तातडीने या प्रकरणाचा पाठपुरावा व कारवाई करून निष्कर्षाप्रत येणे आवश्यक असताना लोकलेखा समितीची बैठक लागेपर्यंत विभागाने हा विषय गांभीर्याने हाताळला नाही व याकडे लक्षही दिले नाही व आता केवळ साक्ष लागल्यामुळे त्या डिस्कोथेकच्या मालकाचा शोध घेण्याचा विभाग प्रयत्न करीत आहे. केवळ गुन्हा नोंदविण्याबाबत पोलीस स्टेशनला पत्र देऊन विभागाची जबाबदारी संपत नाही. त्या व्यक्तीचा शोध घेण्याचे अनेक मार्ग विभागाकडे उपलब्ध असताना या विषयाचा पाठपुरावा विभागाने गांभिर्याने केल्याचे दिसून येत नाही. विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या संगनमताशिवाय अशी प्रकरणे घडूच शकत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. एखाद्या ठिकाणी एखादे दुकान जरी उघडायचे झाल्यास शासनाच्या कमीतकमी १० विभागांच्या परवानग्यांची आवश्यकता असते व त्या प्रत्येक परवानगीसाठी मालकाचा संपूर्ण तपशील, त्याचा स्थायी पत्ता व सर्व आवश्यक माहिती घेतल्याशिवाय अशा परवानग्या देण्यात येत नाही. तसेच ज्या मॉलमध्ये हे डिस्कोथेक सुरू झाले त्या मॉलसोबतदेखील करार केल्याशिवाय हे डिस्कोथेक तेथे सुरू होऊ शकत नाही अशा अनेक माध्यमातून त्या डिस्कोथेक मालकाचा शोध घेण्याचे पर्याय विभागाकडे उपलब्ध असतानाही विभागाने यासंदर्भात कोणताही तपास वा कारवाई केली नाही व केवळ समितीच्या साक्षीसाठी आल्यानंतर आता यासंदर्भात कारवाई करण्याचे समितीस आश्वासित करणे ही बाब निश्चितच अयोग्य आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही व्यक्तीचे आधार कार्ड, मुळ पत्ता व इतर आवश्यक माहिती वा कागदपत्रे घेतल्याशिवाय डिस्कोथेकचा परवाना कसा काय दिला तसेच मुदतीत या डिस्कोथेककडून करमणूक शुल्काची वसुली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभागाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही विभागाने ती देखील केली नाही यावरूनच विभाग या प्रकरणी गंभीर नसल्याचे स्पष्ट होते. सदरहू प्रकरण हे महालेखाकारांनी नमुन्यादाखल केलेल्या तपासणीत आढळून आले आहे. राज्यात अनेक ठिकाणी अशा बाबींची निश्चितच पुनरावृत्ती झालेली असणार व त्याअनुषंगाने राज्याचा कोट्यवधी रुपयांचा महसूलदेखील बुडवल्याची पूर्ण शक्यता आहे. विभागाने ही प्रकरणे गांभीर्याने न हाताळल्यास अशा प्रकरणांवर निर्बंध बसू शकणार नाही. याहुनही गंभीर बाब म्हणजे सदरहू प्रकरणी महालेखाकारांनी जुलै २०१६ मध्ये हे प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही तब्बल दोन वर्षाने प्रशासनाने दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी पंचनामा केला व दिनांक १ डिसेंबर, २०१८ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना पत्र दिले आहे. केवळ समितीची साक्ष लावल्यामुळे विभागाद्वारे ही कारवाई सुरू झाली परंतु दरम्यानच्या दोन वर्षाच्या कालावधीत विभागाने यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही हीदेखील गंभीर बाब आहे. शासनाकडे राज्यात इतकी मोठी यंत्रणा कार्यरत असताना एखाद्या व्यक्तीचा शोध न लागणे हेदेखील शासनाला निश्चितच भुषणावह नाही. अतः विभागाने त्या डिस्कोथेक मालकाचा शोध घ्यावा त्यासाठी राज्यातील अन्य विभागांचीदेखील पूर्ण मदत घ्यावी व सदरहू प्रकरणी वसूलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच या प्रकरणी ही वसुली वेळेत न करणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवरदेखील कडक कारवाई करण्यात यावी व डिस्कोथेक मालकाकडून रक्कम वसूल न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

एचबी ३७७—१२अ

## गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

### भारताचे नियंत्रक व महालेखापरीडक यांच्या सन २०१५-१६ च्या महसुली क्षेत्रावरील अहवालातील परिच्छेदातील क्र. ६.६ बाबतची माहिती

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | परिच्छेदाचा तपशील | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | ६.६ | **नऊ अनुज्ञप्तींच्या बाबतीत रु.११.७१ लाखाचे अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क वसूल करण्यात आले नाही.**<br>सीएल-३, सीएल/एफएल/ टीओडी-३, एफएल-२, एफएल-३ इत्यादींसाठी अनुज्ञप्तीचे प्रदान, नुतनीकरण किंवा सातत्यपूर्ण वापर यासाठी महाराष्ट्र पेय मद्य (अनुज्ञप्तींचे प्रदान, नूतनीकरण किंवा सातत्यपूर्ण वापर यासाठीची कालमर्यादा आणि शुल्क) नियम, १९९६ मधील नियम ४ चे उपवाक्य (अ) आणि महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९७३ सह मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील तरतूदीद्वारे प्राप्त झालल्या अधिकारांचा वापर करून आयुक्त अधिसूचनेच्या अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक दोन मध्ये नमूद केलेल्या अनुज्ञप्तींसाठी प्रत्येक वर्षाकरता दर अधिसूचित करतात. जे दर, अश्या अनुज्ञप्ती ज्या क्षेत्रात दिल्या जातात किंवा जेथे त्यांचे नूतनीकरण करण्यात येते त्या क्षेत्रातील लोकसंख्येवर आधारीत असतात.<br>जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ दरम्यान राज्य उत्पादन शुल्क यांच्या अहमदनगर, रायगड आणि ठाणे कार्यालयाच्या दस्तऐवजांची तपासणी करताना असे आढळून आले की, नऊ अनुज्ञप्तींबाबत नूतनीकरण शुल्क हे जनगणनेच्या आधारावर तयार केलेल्या दरसूचीनुसार आकारले नव्हते. याबाबत रु.११.७१ लाख इतकी कमी वसूली परिगणित करण्यात आली होती.<br>फेब्रुवारी, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ दरम्यान ही बाब विभागाच्या नजरेस आणून दिल्यावर विभागाने अभिक्षण मान्य केले आणि फेब्रुवारी, २०१६ मध्ये चार प्रकरणांत रु.०.८५ लाखाची वसूली झाल्याचे कळविले. उर्वरीत रक्कमेच्या वसूलीचा अहवाल प्रतिक्षित आहे.<br>आम्ही ही बाब शासनाला जून, २०१६ मध्ये कळविली. त्यांचे उत्तर अजून प्राप्त झाले नाही. | महालेखापरीक्षक यांच्या अहवालातील अहमदनगर, रायगड, ठाणे या तीन जिल्हयातील नऊ अनुज्ञप्तीबाबतचे कमी वसूली परिगणीत करण्यात आलेली रु.११.७१ लाख इतकी रक्कम वसूल करण्याबाबतची सद्य:स्थिती पुढील प्रमाणे आहे.<br>**जिल्हा अहमदनगर** :- अहमदनगर जिल्हयातील ६ अनुज्ञप्तींची रु.३,०७,५३२/- इतके नुतनीकरण शुल्क कमी वसूल करण्यात आल्याचे आढळून आले होते. याअनुषंगाने अधीक्षक, राउशु, अहमदनगर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, वसूल करावयाच्या नुतनीकरण शुल्कापैकी रु.२,८५,६३२/- इतकी रक्कम यापूर्वीच वसूल करण्यात आली असून उर्वरित रु.२१,९००/- इतकी रक्कम संबंधितांकडून दि.६.१२.२०१८ रोजी चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणा करण्यात आली आहे.<br>सद्य:स्थितीत उपरोक्त वसूल करावयाच्या नुतनीकरण शुल्काची कोणतीही रक्कम थकीत नाही.<br>**जिल्हा रायगड** :- रायगड जिल्हयातील १ अनुज्ञप्तीचे रु.२,४७,५००/- इतके नुतनीकरण शुल्क कमी वसूल करण्यात आल्याचे आढळून आले होते. याअनुषंगाने अधीक्षक, राउशु, रायगड यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, कळंबोली, पनवेल येथील एफएल-२ अनुज्ञप्तीधारकाने त्यांच्या अनुज्ञप्तीचे सन २०११ ते २०१६ या पाच वर्षांच्या कालावधीकरीता नुतनीकरण केलेले आहे. तसेच सदर अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करतेवेळी त्यावेळी जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात नुतनीकरण शुल्क भरलेले असल्याने रु.२,४७,५००/- ही आक्षेपित रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सद्य:स्थितीत रायगड जिल्हयातील उपरोक्त वसूल करावयाच्या नुतनीकरण शुल्काची कोणतीही रक्कम थकीत नाही. याअनुषंगाने कार्यवाही प्रलंबित नसल्याने परिच्छेद बंद करण्याबाबत मा.महालेखाकार यांना विनंती केली असता, त्यांचे पत्र क्र.अ.प्रा.लं.प्र./राउशु/२०१४१५२७८/६५०, दि.५.१०.२०१८ अन्वये मूळ परिच्छेद बंद केला आहे.<br>**जिल्हा ठाणे** (विभाजनानंतर पालघर) :- ठाणे जिल्हयातील (विभाजनानंतर पालघर) ४ अनुज्ञप्तींचे रु.६,१५,७३३/- इतके नुतनीकरण शुल्क कमी वसूल करण्यात आल्याचे आढळून आले होते. याअनुषंगाने अधीक्षक, राउशु, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, वसूल करावयाच्या नुतनीकरण शुल्काची रु.५,८६,६९६/- इतकी रक्कम पुढील वर्षांच्या नुतनीकरण शुल्कामध्ये समायोजित करून तसेच रु.२९,०३७/- इतकी रक्कम चलनाद्वारे संबंधितांकडून शासकीय कोषागारात भरणा करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत उपरोक्त वसूल करावयाच्या नुतनीकरण शुल्काची कोणतीही रक्कम थकीत नाही.<br>यानुषंगाने असेही नमूद करण्यात येते की, जनगणनेची अद्यावत आकडेवारी प्राप्त करून अनुज्ञप्ती शुल्काची वसूली कधी पासून लागू करावी याबाबत आयुक्त, राउशु यांनी परिपत्रक क्रमांक एलएआर १११७/४४०/७, दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी जारी केले आहे. सदर परिपत्रकात जनगणनेची अद्यावत आकडेवारी वेळेवर प्राप्त करून योग्य अनुज्ञप्ती शुल्काची वसूली करण्याबाबत यापुढे दक्षता घेण्याची सूचना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडून सर्व संबंधित अधीक्षकांना देण्यात आली आहे. |

कक्ष अधिकारी
गृह विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

**साक्ष :**

**परिच्छेद क्रमांक ६.६ - "अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्काची कमी वसुली"**

**११.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर अहवालातील परिच्छेद क्रमांक ६.६ -अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्काची कमी वसुली या परिच्छेदाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी गृह विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी नऊ अनुज्ञप्तीच्या बाबतीत रु.११.७१ लाखाचे अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क वसूल करण्यात आले नाही यासंदर्भात सदरहू रक्कम वसूल झाली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, उक्त प्रकरणी वसुली पूर्णतः झालेली आहे. हा विषय अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क वसुलीचा विषय होता. सदरहू शुल्क आकारणी जनसंख्येवर आधारीत असते. सन २०११ च्या जनगणनेचा अहवाल सन २०१३ मध्ये प्राप्त झाला. सन २०१५ मध्ये महालेखाकार कार्यालयाने आक्षेप काढल्यानंतर सन २०११ ते २०१३ या कालावधीतील उक्त प्रकरणी शुल्क फरकाची वसुली वसूल केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The remarks of Accountant General are " The licensee was situated at village Katkarpada which was separated from Boisar in August 2009. The population of Katkarpada after separation from Boisar Village may be ascertained and license fees for the period 2010-2015 may be levied accordingly. " विभागाने महालेखाकार यांचे आक्षेपांचे अवलोकन केले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व काटकरपाडा प्रकरणी समायोजन करण्यात आले आहे. सदरहू प्रकरणी ५ वर्षांचे नुतनीकरण शुल्क वसूल करण्यात आले होते. त्याऐवजी १ वर्षाकरिता रक्कम समायोजित केली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार दरवर्षी लायसन्स नुतनीकरण करण्यात येते. परंतु बोईसरमध्ये सन २०१० मध्ये ५ वर्षाकरिता नुतनीकरण करण्यात आले होते ते १० हजार ऐवजी कमी दर्शविण्यात आले होते. उक्त प्रकरणी संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

११ हजार लोकसंख्या असताना १० हजार का दर्शविण्यात आली? महालेखाकार कार्यालयाने लेखा आक्षेप काढल्यानंतर साक्षीच्या वेळी सर्व कार्यवाही करून समितीसमोर येणे अपेक्षित होते असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे. सदरहू बाब ब्रिफिंग घेताना आजच समजली आहे. सदरहू अधिकारी यांची माहिती काढण्यास व चौकशी करण्यास सांगितले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदरहू लेखा आक्षेप २ वर्षे अगोदर काढण्यात आलेला आहे. असे सामितीने निदर्शनास आणले असता, सदरहू प्रकरणी सन २०१६ मध्ये वसुलीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी सांगीतले.

सदरहू प्रकरणी वसुलीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. परंतु संबंधित अधिकारी यांनी चुकीची लोकसंख्या दर्शविली आहे. सन २०१५ ते सन २०२० या कालावधीकरिता अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात आले होते. त्यामधून सन २०१५-१६ मध्ये समायोजित केली आहे, अशी माहिती विभागाने दिली आहे.

सद्यःस्थितीतील लोकसंख्येचा आधार घेण्यात यावा. जुन्या लोकसंख्येनुसार अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क आकारण्यात येऊ नये, असे समितीने निर्देश दिल्यानंतर शासन निर्णय २०१७ मध्ये निर्गमित करण्यात आला आहे. याकडे सामितीने लक्ष वेधले असता, माननीय आयुक्त कार्यालयाने दिनांक २७ सप्टेंबर २०१७ रोजी परिपत्रक काढले होते, त्यानुसार सूचना देण्यात आलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

अनुज्ञप्ती शुल्क आकारणी प्रकरणी चुकीची जनगणना ग्राह्य धरून कमी शुल्क आकारण्यात येत आहे. याप्रकरणी शासनाचा फायदा होवो किंवा नुकसान होवो परंतु नवीन जनगणनेनुसार शुल्क आकारणी केली पाहिजे, असे समितीने शासनाला निर्देश दिले होते. सदरहू वसुली प्रकरणी ज्या व्यक्तीने आपली जबाबदारी योग्य रितीने पार पाडली नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे निर्देश सामितीने दिले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

या अनुषंगाने आणखी दोन बाबी आहेत. सीएल २ लायसन्सधारकांसाठी सकाळी १०-०० ते रात्री १०-३० अशी वेळ परिपत्रक काढून निश्चित करण्यात आली आहे. परंतु पोलीस शॉप ॲक्टनुसार सकाळी ११-०० ते रात्री ११-०० पर्यंतची वेळ देण्यात येते. यामुळे अडचणी निर्माण होत आहेत, लायसन्सधारकांना नोटीस देण्यात येत आहेत. त्यामुळे उक्त प्रकरणी काही तरी मार्ग काढण्यात यावा. असे समितीने सूचित केले असता, कामगार विभागाने शॉप ॲक्टनुसार वेळ निश्चित करताना राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अभिप्राय घेतले नव्हते. असे विभागीय संचिवांनी सांगितले.

लायसन्सधारक असोसिएशनशी त्यांच्या अडचणी विचारल्या त्यावेळी त्यांनी उक्त २ अडचणी सांगितल्या होत्या. त्यांना पोलीस नेहमी पोलीस नोटीस देतात. सब इन्स्पेक्टर, राज्य उत्पादन शुल्क यांच्या मान्यतेने स्टँपसह मुदत संपलेल्या बियर अमरावती विक्री करण्यात येत आहेत. याप्रकरणी विचारणा करण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता, Department will try to have same timings. मुदत संपलेल्या साठ्यावर पुनःप्रक्रिया (रिप्रोसेस) करण्यासाठी मान्यता मागण्यात आली होती. उक्त प्रकरणी कोणत्याही युनिटला मान्यता देण्यात आलेली नाही. या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

मुदत संपलेल्या बियर स्टँम्प मारून विक्रीस परवानगी देण्याचा अधिकार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या इन्स्पेक्टरला आहे काय? उक्त प्रकरणी विभागाकडून परवानगी नाकारण्यात येत असताना एखादा इन्स्पेक्टर स्वतःचा स्टँम्प मारून मुदत संपलेली बियर विक्री करण्यास परवानगी देत असेल तर त्यास तात्काळ निलंबित केले पाहिजे. सदरहू बाब गंभीर आहे. सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, आऊट डेटेड स्टॉक संबंधित युनिटकडून परवानगी मागण्यात येते. ज्या युनिटने पुनःप्रक्रिया (रिप्रोसेस) करण्यासाठी परवानगी मागितली होती त्यांना ती देण्यात आली नाही. यासंदर्भात चौकशी करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ६.६ "अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्काची कमी वसुली"**

**अभिप्राय :**

**१२.१** सीएल-३, सीएल/एफएल/टीओडी-३, एफएल-२, एफएल-३ इत्यादीसाठी अनुज्ञप्तीचे प्रदान, नुतनीकरण किंवा सातत्यपूर्ण वापर यासाठी महाराष्ट्र पेय मद्य (अनुज्ञप्तीचे प्रदान, नुतनीकरण किंवा सातत्यपूर्ण वापर यासाठीची कालमर्यादा आणि शुल्क) नियम, १९९६ मधील नियम ४ चे उपवाक्य (अ) आणि महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९७३ सह मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ मधील तरतुदीद्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून आयुक्त अधिसूचनेच्या अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक दोन मध्ये नमूद केलेल्या अनुज्ञप्तीसाठी प्रत्येक वर्षाकरता दर अधिसूचित करतात, जे दर, अशा अनुज्ञप्ती ज्या क्षेत्रात दिल्या जातात किंवा जेथे त्यांचे नुतनीकरण करण्यात येते त्या क्षेत्रातील लोकसंख्येवर आधारित असतात.

जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ दरम्यान राज्य उत्पादन शुल्क यांच्या अहमदनगर, रायगड आणि ठाणे कार्यालयाच्या दस्तऐवजांची तपासणी करताना असे आढळून आले की, नऊ अनुज्ञप्तींबाबत नुतनीकरण शुल्क हे जनगणनेच्या आधारावर तयार केलेल्या दरसूचीनुसार आकारले नव्हते. याबाबत रु.११.७१ लाख इतकी कमी वसुली परिगणित करण्यात आली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महालेखापरीक्षक यांच्या अहवालातील अहमदनगर, रायगड, ठाणे या तीन जिल्ह्यांतील नऊ अनुज्ञप्तीबाबतचे कमी वसुली परिगणीत करण्यात आलेली रु. ११.७१ लक्ष इतक्या रकमेच्या वसुलीबाबत समितीस सादर करण्यात आले की, अहमदनगर जिल्ह्यातील ६ अनुज्ञप्तींची रु.३,०७,५३२ इतक्या कमी नुतनीकरण शुल्कापैकी पूर्ण रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील १ अनुज्ञप्तीचे रु.२,४७,५०० इतके नुतनीकरण शुल्क कमी वसुलीबाबत कळंबोली, पनवेल येथील एफएल-२ अनुज्ञप्तीधारकाने त्यांच्या अनुज्ञप्तीचे सन २०११ ते २०१६ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता नुतनीकरण केलेले आहे. तसेच सदर अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करतेवेळी त्यावेळी जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात नुतनीकरण शुल्क भरलेले असल्याने रु.२,४७,५०० ही आक्षेपित रक्कम वसूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच ठाणे जिल्ह्यातील (विभाजनानंतर पालघर) ४ अनुज्ञप्तीचे रु.६,१५,७३३ इतके नुतनीकरण शुल्क वसूल करण्यात आले आहे.

जनगणनेची अद्ययावत आकडेवारी प्राप्त करून अनुज्ञप्ती शुल्काची वसुली कधी पासून लागू करावी याबाबतचे परिपत्रक दि. २७ सप्टेंबर, २०१७ रोजी जारी केले आहे. सदर परिपत्रकात जनगणनेची अद्ययावत आकडेवारी वेळेवर प्राप्त करून योग्य अनुज्ञप्ती शुल्काची वसुली करण्याबाबत यापुढे दक्षता घेण्याची सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले.

**शिफारशी :**

**१२.२ (१) अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्काच्या कमी वसुलीसंदर्भात सदरहू आक्षेप नोंदवण्यात आले असून सदर प्रकरणी रु.११.७१ लक्षचे अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्क पूर्णतः वसूल करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सदरहू आक्षेप विभागीय प्रतिनिधींनी मान्य करून त्याअनुषंगाने वसुली देखील करण्यात आली. परंतु लोकसंख्या कमी दर्शवून नुतनीकरण शुल्काची कमी आकारणी केल्या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली नाही. वास्तविक सदरहू प्रकरण अतिशय सुस्पष्ट असताना व महालेखाकारांनी यासंदर्भात आक्षेप नोंदविल्यानंतरही संबंधितांवर कारवाई करूनच विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु विभागाने यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही व आता समितीसमोर कारवाई करण्याचे मान्य करणे ही बाब कदापी समर्थनीय नाही. अनुज्ञप्ती शुल्क आकारणी प्रकरणी चुकीची जनगणना ग्राह्य धरून कमी शुल्क आकारणे हे निश्चितच गंभीर बाब आहे. शासनाला प्राप्त होणाऱ्या महसुलाची रक्कम ही कमी असो वा जास्त तसेच त्यात शासनाचे नुकसान असो वा फायदा कोणत्याही परिस्थितीत आकारणी नियमानुसारच करणे अधिकाऱ्यांकडून अपेक्षित आहे व त्यात संबंधित अधिकाऱ्यांनी निश्चितच कसूर केलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सहमती दर्शविलेली आहे. अतः विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१२.३ (२) सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीने विभागीय प्रतिनिधींच्या असेही निदर्शनास आणले की, CL-2 लायसन्स धारकांसाठी सकाळी १०-०० ते रात्री १०-३० अशी वेळ परिपत्रक काढून निश्चित करण्यात आली आहे. परंतु पोलीस शॉप ॲक्टनुसार सकाळी ११-०० ते रात्री ११-०० पर्यंतची वेळ देण्यात येते. वेळेतील या तफावतीमुळे लायसन्स धारकांना नोटीस**

देण्यात येते. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, कामगार विभागाने शॉप ॲक्टनुसार वेळ निश्चित करताना राज्य उत्पादन शुल्काचे अभिप्राय घेतले नव्हते असे विभागीय सचिवांनी समिती समोर सांगितले. अतः वेळेतील ही विसंगती दूर करून त्यात एकवाक्यता राहण्याच्या अनुषंगाने विभागाच्या स्तरावरुन आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(३) तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले की, मुदत संपलेल्या बाटल्यांवर पुन्हा स्टॅम्प मारून बिअरची विक्री करण्यास परवानगी देतात. मुदत संपलेल्या स्टॉकवर पुन्हा प्रक्रिया करण्याची देखील शासनाच्या परवानगीची आवश्यक असते व ती शासनाने अद्यापही दिलेली नाही. परंतु तरीही राज्यात अशा प्रकारे स्टॅम्प मारून जर मुदत संपलेल्या बिअरची विक्री होत असेल तर त्याची पुर्ण चौकशी करण्यात येईल असे समितीस आश्वासित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात समितीने केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

नगर विकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा दिनांक ३१ मार्च,२०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा महसुली क्षेत्रावर अहवालातील परिच्छेदातील स्पष्टीकरण

९३.१ शापन

| परिच्छेद क्र. | मुद्दा | विभागाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ६.७ | **राज्य शिक्षण उपकर (SEC) आणि रोजगार हमी उपकर (EGC) यांचा कमी भरणा करणे**<br>शिक्षण उपकर आणि रोजगार हमी उपकारापोटी संकलीत केलेल्या एकूण उपकरापैकी रु.११.७० कोटीचा कमी भरणा करण्यात आला.<br>जमिनी आणि इमारतींवरील शिक्षण, (उपकर) कर (संकलन आणि परतावा) नियम,१९६२ च्या नियम ४ सह महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ आणि ६(ब) तील तरतुदीनुसार कुठल्याही महानगरपालिकेने (MC) कुठल्याही कॅलेंडर आठवड्यात जमा/ संकलीत केलेली उपकर किंवा दंडाची रक्कम पुढील आठवडा संपण्यापूर्वी शासकीय खात्यात जमा करणे आवश्यक असते. जर एखाद्या MC ने अधिनियमानुसार अशा जमा केलेल्या रक्कमेचा | औरंगाबाद महानगरपालिका<br>सन २०११-१२ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षात राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या करापोटी प्रत्यक्षात वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून शासन निर्देशाप्रमाणे २% रिबेट वजा जाता संपूर्ण रक्कम शासन कोषागारात जमा करण्यात आलेली आहे.<br>औरंगाबाद महानगरपालिकेतील झोन निहाय रोख किर्द नुसार सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीतील एकूण रक्कम रुपये १५.७६ कोटी राज्य शिक्षण उपकरापोटी शासनास भरावयाचे होते. तसेच रोजगार हमी उपकरापोटी एकूण रक्कम रुपये ३.०३ कोटी शासन खाती जमा करावयाचे होते. सदर एकूण रक्कम रु.१८.७९ कोटी दिनांक २७.६.२०१६ च्या विवरणानुसार शासन खाती जमा करण्यात आलेले आहे. सदर रक्कम वसुलीप्रमाणे पूर्णपणे शासन खाती जमा करण्यात आली आहे.<br>उपरोक्त कालावधीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकरापोटी कमी भरणा केलेला नाही.<br><br>भिवंडी निजामपूर महानगरपालिका<br>भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात शिक्षणकर, रोजगारहमी कराची वसूली झालेली रक्कम परंतु शासनाकडे भरणा न केलेल्या प्रलंबित रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.:- |

भरणा केला नाही तर, शासनाने योग्य वाटेल अशा प्रकारची चौकशी करुन अशी रक्कम जमा करण्यासाठी कालावधी निश्चित करावा. ज्या बँक/कोषागारात MC ची मिळकत जमा केली जाते त्यांना MC च्या खात्यातून अशा रक्कमेचे शासनाला प्रदान करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार ही शासनाला या अधिनियमांतर्गत देण्यात आले आहेत. MC कडून शासकीय महसुलाचा भरणा करण्यात झालेल्या विलंबा बाबत व्याज किंवा दंड आकारण्याची तरतूद अधिनियमात नाही.

दोन महानगरपालिकांच्या (औरंगाबाद आणि भिवंडी निजामपूर) कर संकलन नोंदवह्यांची छाननी (ऑगस्ट २०१४ ते डिसेंबर २०१५) केली असता, आमच्या निदर्शनास आले की, या महानगरपालिकांनी वर्ष २०११-१२ ते २०१४-१५ दरम्यान राज्य शिक्षण उपकर आणि रोजगार हमी उपकरापोटी संकलित केलेल्या रु.२१.५१ कोटींपैकी, फक्त रु.९.८१ कोटींचा शासकीय खात्यात भरणा केला होता, परिणामी, रु.११.७० कोटी एवढा कमी भरणा केला गेला.

| आर्थिक वर्ष | महाराष्ट्र शासन शिक्षणकर व रोजगार हमी कर पोटी वसुल रक्कम | २ टक्के रिबेट | शासनास भरावयाची रक्कम | शासनास भरणेत आलेली रक्कम | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ५,५१,४१,४४२ | १,१०,२८२९ | ५४,०३,८६१६ | ४०,३२,३४६६ | १३,७१,५१४७ |
| २०१२-१३ | ६,१४,५३,०३८ | १,२२,९०६१ | ६०,२२,३९७७ | ५०,९९,१३९२ | ९,२३,२५८२ |
| २०१३-१४ | ८,९१,८९,४१६ | १,७८,३७८८ | ८७,४०,५६२७.६८ | ४९,८३,९०१० | ३७,५६,६६१८ |
| २०१४-१५ | ९४,८६,९,४०७ | १,८९,७३८८ | ९२,९७,२०१८.८६ | ५७,३४,९५६९ | ३५,६२,२२४९ |
| | | | एकूण | | ९६,१३,६७९९ |

महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत जकात कर तसेच स्थानिक स्वराज्य संस्था कर बंद झाला असल्याने महानगरपालिकेला उत्पन्नाचा स्त्रोत अल्प स्वरुपात होत असल्याने महानगरपालिकेस बांधिल खर्च भागविण्याकरीता १०० टक्के शासनाच्या अनुदानावर अवलंबून रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

सन २०११-१२ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षात शासनाकडे भरावयाची शिक्षणकर व रोजगाराची थकीत असलेली रक्कम महानगरपालिकेस पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास

| | | |
|---|---|---|
| | हे निदर्शनास आणून दिल्यानंतर, महानगर पालिकांनी सांगितले की याबाबत पडताळणी केली जाईल.<br>ही बाब जानेवारी २०१६ ला विभागाच्याही निदर्शनास आणून दिली. परंतु, विभागाकडून केल्या गेलेल्या कारवाईचा तपशील प्राप्त झाला नाही. | सदरची रक्कम शासनाकडे भरणा करण्यात येईल अन्यथा महानगरपालिकेस मिळणाऱ्या अनुदानातून परस्पर वर्ग करण्यात येईल. |

लेखा अधिकारी,
नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**साक्ष :**

**परिच्छेद क्रमांक ६.७ - राज्य शिक्षण उपकर (SEC) आणि रोजगार हमी उपकर (EGC) यांच्या कमी भरणा करणे.**

**१४.१** या परिच्छेदाबाबत भिवंडी आणि औरंगाबाद येथील वसुली संदर्भातील माहिती देण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता, औरंगाबाद येथील वसुली पूर्ण झालेली आहे. संबंधितांनी त्या त्या वर्षामध्ये पैसे भरलेले आहेत. त्यासंदर्भातील रेकॉर्ड तयार करण्यात आलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी अवगत केले, तसेच भिवंडी येथील पैसे बाकी आहे, ही सत्य परिस्थिती आहे. २०११-२०१२ ते २०१४-२०१५ या काळातील ९ कोटी ६१ लाख रूपयांची रक्कम बाकी होती. सदरहू रक्कम मार्च अखेर भरण्यात यावी, अशा त्यांनी संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच महानगरपालिका आयुक्तांनी आपल्याला आश्वासन दिलेले आहे की, सर्व रक्कम मार्च अखेर पर्यंत भरण्यात येईल. त्यापैकी त्यांनी पहिला हप्ता १ कोटी ३७ लाख रूपये भरलेले आहेत. उर्वरित साधारणतः ७ कोटी रूपयांची रक्कम मार्च अखेर पर्यंत वसूल करण्यात येईल. यदाकदाचित त्यांनी ही रक्कम भरली नाही तर याच वर्षी २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या अनुदानातून वसुलीची रक्कम कपात करण्यात येईल, नगरविकास विभागाच्या सचिवांनी समितीस आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**परिच्छेद क्रमांक ६.७ "राज्य शिक्षण उपकर (SEC) आणि रोजगार हमी उपकर (EGC) यांचा कमी भरणा करणे"**

**अभिप्राय :**

**१५.१** जमीनी आणि इमारतींवरील शिक्षण, (उपकर) कर (संकलन आणि परतावा) नियम, १९६२ च्या कलम ४ आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ आणि ६(ब) तील तरतुदीनुसार कुठल्याही महानगरपालिकेने (MC) कुठल्याही कॅलेंडर आठवड्यात जमा/ संकलीत केलेली उपकर किंवा दंडाची रक्कम पुढील आठवडा संपण्यापूर्वी शासकीय खात्यात जमा करणे आवश्यक असते. जर एखाद्या MC ने अधिनियमानुसार अशा जमा केलेल्या रक्कमेचा भरणा केला नाही तर, शासनाने योग्य वाटेल अशा प्रकारची चौकशी करून अशी रक्कम जमा करण्यासाठी कालावधी निश्चित करावा. ज्या बँक/ कोषागारात MC ची मिळकत जमा केली जाते त्यांना MC च्या खात्यातून अशा रक्कमेचे शासनाला प्रदान करण्याचे निर्देश देण्याचे अधिकारही शासनाला या अधिनियमांतर्गत देण्यात आले आहेत. MC कडून शासकीय महसुलाचा भरणा करण्यात झालेल्या विलंबाबाबत व्याज किंवा दंड आकारण्याची तरतूद अधिनियमात नाही.

दोन महानगरपालिकांच्या (औरंगाबाद आणि भिवंडी-निजामपूर) कर संकलन नोंदवह्यांच्या छाननीत या महानगरपालिकांनी वर्ष २०११-१२ ते २०१४-१५ दरम्यान राज्य शिक्षण उपकर आणि रोजगार हमी उपकरापोटी संकलित केलेल्या रु. २१.५१ कोटींपैकी, फक्त रु. ९.८१ कोटींचा शासकीय खात्यात भरणा केला होता, परिणामी, रु. ११.७० कोटी एवढा कमी भरणा केला गेला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस :**

**१५.२ शिक्षण उपकर आणि रोजगार हमी उपकारापोटी संकलीत केलेल्या एकूण उपकरापैकी रु. ११.७० कोटीचा कमी भरणा करण्यात आल्यासंदर्भातील गंभीर आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेत राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या करापोटी प्रत्यक्षात वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून शासन निर्देशाप्रमाणे २ टक्के रिबेट वजा जाता संपूर्ण रक्कम शासन कोषागारात जमा करण्यात आलेली आहे. सदर रक्कम वसुलीप्रमाणे पूर्णपणे शासनखाती जमा करण्यात आली आहे.**

**महानगरपालिकेचे आर्थिक स्त्रोत जकात कर तसेच स्थानिक स्वराज्य संस्था कर बंद झाला असल्याने महानगरपालिकेला उत्पन्नाचा स्त्रोत अल्प स्वरूपात होत असल्याने महानगरपालिकेस बांधिल खर्च भागविण्याकरीता १०० टक्के शासनाच्या अनुदानावर अवलंबून रहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. सन २०११-१२ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षात शासनाकडे भरावयाची शिक्षणकर व रोजगाराची थकीत असलेली रक्कम महानगरपालिकेस पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास सदरची रक्कम शासनाकडे भरणा करण्यात येईल अन्यथा महानगरपालिकेस मिळणाऱ्या अनुदानातून परस्पर वर्ग करण्यात येईल असे समितीसमोर सांगण्यात आले.**

**सदरहू परिच्छेदात भिवंडी व औरंगाबाद येथील वसुली संदर्भात समितीने विचारणा केली असता औरंगाबाद येथील वसुली पूर्ण झालेली आहे, परंतु भिवंडी येथील वसुली अद्यापही शिल्लक असून सन २०११-१२ ते २०१४-१५ या काळातील ९.६१ कोटी इतकी रक्कम येणे प्रलंबित आहे. सदरहू रक्कम मार्च अखेरपर्यंत भरणेबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आली असून त्यापैकी पहिला हप्ता रु.१.३७ कोटी इतकी रक्कम भरण्यात आलेली आहे. उर्वरित साधारणत ८.२४ कोटी रुपयांची रक्कम लवकरच वसूल करण्यात येईल. परंतु ती रक्कम न भरल्यास याच वर्षी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या अनुदानातून ती रक्कम कपात करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. अतः याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कारवाई विभागाने तातडीने करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

**विवरण क्रमांक १**

**दिनांक २७/१२/१८ ची साक्ष**

# महाराष्ट्र शासन

विधीमंडळ कामकाज प्राथम्य

ई-मेल:- pac.revenue@maharashtra.gov.in

क्र. विनिले-२०१७/प्र.क्र.१०५/पीएसी
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दि.०१/०६/२०१९

प्रति,

कक्ष अधिकारी, (ड-१)
महाराष्ट्र विधान भवन
मुंबई-३२

विषय — सन २०१४-१५ महसूली क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.३.३
तसेच सन २०१५-१६ महसूली क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.३
च्या अनुषंगाने विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०१४-१५ महसूली क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.३.३- "शास्ती कमी वसूली / वसूली न करणे" या विषयावर दि. २३ मे, १३ जून, ८ ऑगस्ट, २९ ऑगस्ट, आणि ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी लोकलेखा समितीच्या साक्षीदरम्यान अ.मु.स (महसूल) यांनी आश्वासित केलेल्या परिच्छेदांबाबत वसूलीची माहिती सोबत पाठविण्यात येत आहे.

तसेच सन २०१५-१६ महसूली क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.२ व ४.३.३ या परिच्छेदावर दि. २७.१२.२०१८ रोजी लोकलेखा समितीच्या साक्षीदरम्यान अ.मु.स (महसूल) यांनी सूचीत केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची पत्र आणि टिपणी सोबत पाठविण्यात येत आहे.

सोबत —वरील प्रमाणे

आपली,

(प्रज्ञा मुळे)
कक्ष अधिकारी

४.३.२.१.१

महसूल व वन विभाग/म-१(धोरण)

"शासकीय मालमत्ता हस्तांतरीत झाल्यास नोंदणी करणे बंधनकारक करणे." या मुद्दयाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही म-१ (धोरण) कार्यासनाकडून नस्ती क्र.मुद्रांक-२०१७/अनौ.११/प्र.क्र.३३/म-१ वर सुरु असुन उक्त नस्ती अभिप्रायास्तव विधी व न्याय विभागाला दि.१० डिसेंबर, २०१८ रोजी पाठविण्यात आली आहे. विधी व न्याय विभागाकडून अद्याप पर्यंत अभिप्राय अप्राप्त आहेत. विधी व न्याय विभागाशी याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

माहितीस्तव सादर,

30.04.१८

(प्रितमकुमार जावळे)
कक्ष अधिकारी

क.अ.(श्रीम.मुळे) पीएसी कार्यासन

## विवरण क्रमांक

महाराष्ट्र शासन

क्रमांक-लोलेस२०१९/प्र.क्र. १७/ज-१
महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- २७ मे, २०१९

प्रति,
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रातील अहवालाबाबत लोकलेखा समितीची साक्ष.

महोदय,

उपरोक्त विषयावरील सन २०१५-१६ या वर्षातील महसूली क्षेत्र अहवालातील या कार्यासनाशी संबंधीत ४.३.२ या परिच्छेदावर दि.२७.१२.२०१८ रोजी लोकलेखा समितीच्या साक्षी दरम्यान अ.मु.स. (महसूल) यांनी सूचीत केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे आहे :-

या संदर्भात नमूद करण्यात येते की, शासन धर्मादाय संस्थांना विविध आदेशानुसार शासकीय जमिनीचे वाटप करीत असते. या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६.०४.२०१८ रोजी खालील प्रमाणे अंतरीम अंतीम आदेश पारीत केले आहेत.

"In the meanwhile, in our opinion, it would be appropriate if the Government of Maharashtra frame a policy which stands scrutiny of Article-१४ of the Constitution. Prima facie various notifications placed on record do not indicate any policy for allotment of land to the charitable institution. In the meanwhile, no allotment should be made on the basis of existing notifications."

मा. सर्वोच्च न्यायलयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर धर्मादाय संस्थांना सांस्कृतिक, वैद्यकीय शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथलये व अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचे वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती विषद करणारे सविस्तर धोरण तयार करुन त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. तथापी, सदरहू धोरण अंतीम करण्यापुर्वी ते मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शनास आणण्याच्या दृष्टीने दिनांक ७ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये या धोरणाच्या प्रती शासकीय अभियोक्ता यांना पाठवून, सदरहू धोरण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शनास आणण्याची विनंती केली आहे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायलयाचे निदेश अद्याप अप्राप्त आहे. सदरहू निर्देश प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(रमेश चव्हाण)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रत, माहितीस्तव सादर,
उपसचिव (पीएसी), महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई

यांना कळविण्यात येते की, परिच्छेद ४.३.३ ज-१ या कार्यासनाशी संबंधीत असल्याने त्यासंबंधीची कार्यवाही संबंधीत कार्यासनाने करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन अवगत करावे..

समितीची साक्ष दि.२७.१२.२०१८ (३.३.२)

# महाराष्ट्र शासन

क्रमांक-लोलेस२०१९/प्र.क्र. १७/ज-१
महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक- २७ मे, २०१९

प्रति,
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

**विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा महसूली क्षेत्रातील अहवालाबाबत लोकलेखा समितीची साक्ष.**

महोदय,

उपरोक्त विषयावरील सन २०१५-१६ या वर्षातील महसूली क्षेत्र अहवालातील या कार्यासनाशी संबंधीत ४.३.२ या परिच्छेदावर दि.२७.१२.२०१८ रोजी लोकलेखा समितीच्या साक्षी दरम्यान अ.मु.स. (महसूल) यांनी सूचीत केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे आहे :-

या संदर्भात नमूद करण्यात येते की, शासन धर्मदाय संस्थांना विविध आदेशानुसार शासकीय जमिनीचे वाटप करीत असते. या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६.०४.२०१८ रोजी खालील प्रमाणे अंतरीम अंतीम आदेश पारीत केले आहेत.

"In the meanwhile, in our opinion, it would be appropriate if the Government of Maharashtra frame a policy which stands scrutiny of Article-१४ of the Constitution. Prima facie various notifications placed on record do not indicate any policy for allotment of land to the charitable institution. In the meanwhile no allotment should be made on the basis of existing notifications."

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर धर्मादाय संस्थांना सांस्कृतिक, वैधकीय शैक्षणिक, सामाजिक, धर्मशाळा, अनाथलये व अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचे वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती विषद करणारे सविस्तर धोरण तयार करुन त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. तथापी, सदरहू धोरण अंतीम करण्यापूर्वी ते मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शनास आणण्याच्या दृष्टीने दिनांक ७ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये या धोरणाच्या प्रती शासकीय अभियोक्ता यांना पाठवून, सदरहू धोरण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शनास आणण्याची विनंती केली आहे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश अद्याप अप्राप्त आहे. सदरहू निर्देश प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(रमेश चव्हाण)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रत, माहितीस्तव सादर,
सहसचिव (पीएसी), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई

यांना कळविण्यात येते की, परिच्छेद ४.३.३ म-१ या कार्यासनाशी संबंधीत असल्याने त्यासंबंधीची कार्यवाही संबंधीत कार्यासनाने करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन अवगत करावे..

समितीची साक्ष दि.२७.१२.२०१८ (३.३.२)

# परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी ३७७—१९ (७००-६-२०१९)

**मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१८**

## लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.४६ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स. तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**महसूल व वन (महसूल) विभाग :**

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग

**गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग :**

श्रीमती वल्सा नायर सिंह, प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ६.४ व ६.५ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग आणि परिच्छेद क्रमांक ६.६ यासंदर्भात प्रधान सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१८

## लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.४५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स. तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :**

श्रीमती शुभांगी शेठ, सहसचिव, वित्त विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**सहकार वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग :**

श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ६.३ यासंदर्भात प्रधान सचिव, सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार) विभाग यांची साक्ष घेतली.

## गुरूवार, दिनांक २७ डिसेंबर, २०१८

## लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.४६ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स. तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

**वित्त विभाग :**

श्री. वैभव राजेघाटगे, उप सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :**

**महसूल व वन (महसूल) विभागः**

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१, ४.२, ४.३ व ४.४ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१९**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.१५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(८) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(११) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१२) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स. तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

(१) श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

(२) श्री. रविकिरण उबाले, उप महालेखाकार, मुंबई

**विभागीय प्रतिनिधी :**

**महसूल व वन (महसूल) विभाग :**

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१, ४.२, ४.३ व ४.४ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली.

## गुरूवार, दिनांक १३ जून, २०१९

## लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक १३ जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(४) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील महसूल व वन (महसूल), सहकार, वस्त्रोद्योग व पणन (सहकार), गृह (राज्य उत्पादन शुल्क) व नगरविकास विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई